भारतीय साम्राज्य.

नारायण भवानराव पावगी.

यानें रचिलें असे.

तें

पुणें येथें "सत्यप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

शके १८१९

विजयनाम संवत्सरे.

:0:

किंमत १४ आणे.

श्री

सद्गुरु चरणारविंदीं

नमन करून

ही

ग्रंथरूपी

यथाशक्ति व यथामति केलेली

अत्यल्प

देशसेवा.

नारायण भवानराव पावगी

यानें

आपल्या दयितआर्यभूमीच्या ठिकाणीं

असलेल्या अत्युत्कट

प्रीत्यर्थ

सकल

आर्यभगिनींस व आर्यबांधवांस

प्रीतिपूर्वक

अत्यादरानें समर्पिली असे.

भारतीय साम्राज्य.

पुस्तक चवथें.

प्रस्तावना.

इतितेज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरंमया ॥

१ भारतीय साम्राज्याच्या प्रथम पुस्तकांत आर्य-देश व तत्संबंधीं वृत्तांत याविषयींची हकीकत दिली असून त्यांत एकंदर नऊ भाग आहेतः—

१ देशस्थिति व वर्णन २ उद्भिज्जसंपत्ति, व मुख्य उत्पन्न होणारे पदार्थ. ३ उद्भिज्जसंपत्ति व शाक पुष्पफलवैचित्र्य. ४ कृषिकर्म व तत्संबंधीं खतें, राब, व साधनें. ५ कृषिकर्म व तत्संबंधीं जनावरें, आणि जमिनीचा मगदूर. ६ प्राणिजातिसंपती. ७ खनिज संपत्ति. ८ वातावरणमीमांसा. आणि ९ भरतखंड-भूरचना.

२ द्वितीय पुस्तकांत आर्य लोक व त्यांचे बुद्धि-वैभव याचेंच दिग्दर्शन केलें आहे, व त्याचे पांच भाग आहेतः—

१० आर्यांचें मूलनिवासस्थान, व त्यांचें वैभव. ११ आर्यांची सामाजिकरचना, व धर्मसंस्था. १२

आर्यभाषा, व तिचें श्रेष्ठत्व. १३ वेद, व वेदांगें. आणि १४ महाकाव्यें, व गद्यपद्यादि भाषाशास्त्र.

३ तृतीय पुस्तकांत आर्येतिहास व भूगोल, याविषयींचा वृत्तांत दिला आहे, व त्याचे पांच भाग केले आहेत:—

१५ इतिहास व भूगोलासारख्या ग्रंथासंबंधीं आर्यांचें न्यूनत्व, व त्यांचीं कारणें. १६ वेदकालीन इतिहास. १७ उत्तर हिंदुस्थांतील प्राचीन नृपावलि. १८ दक्षिण हिंदुस्थानांतील प्राचीन नृपावलि. आणि १९ प्राचीन आर्यभूगोल.

प्रस्तुतच्या चवथ्या पुस्तकांत, आर्यशास्त्र व कला यांविषयींचें सविस्तर विवेचन आहे, व त्याचे बारा भाग केले आहेत:—

२० धर्मशास्त्र. २१ वेदान्तशास्त्र. २३ ज्योतिःशास्त्र, भूमितिशास्त्र, अंकगणित, व बीजगणित. २ वैद्यशास्त्र. २४ नीतिशास्त्र. २५ धनुर्वेद. २६ गांधर्ववेद अथवा गायनकला. २७ चित्रकला. २८ शिल् कला व निर्माणविद्या. २९ पटचातुर्य व रागकौशल् ३० वास्तुविद्या, यंत्रकला, गंधद्रव्यक्रिया, पा शास्त्र, द्यूतचातुर्य, व इतर कला. आणि ३१ लेखनकल

मुक्काम पुणें, मंगळवार. मार्गशीर्ष शुद्ध ११ शके १८१५ विजयनाम संवत्सरे.

नारायण भवानराव पावगी.

अनुक्रमणिका.

पूर्वार्ध

पुस्तक चवथें.

भाग २० वा.

धर्मशास्त्र.

आर्यांची शोधकबुद्धि, व तन्निर्मित चौदा विद्या, चौसष्ट क-ला, आणि षट्शास्त्रें, व अठरापुराणें---त्यांचें धर्मशास्त्र---त्यांतील मूलतत्वें---त्यांचा विन्यास---वेदविन्यासकाल---सूत्रांचा काल, व स्मृतिविन्यास---धर्मशास्त्रावरील ग्रंथ---मनूचा काल---याज्ञवल्क्या- काल---धर्म शब्दाची व्याख्या---मनुस्मृति---सृष्टिरचना--- स्मृतींतील सारांश---ब्राह्मणांचें कर्तव्यकर्म---वेदपठण---चतुर्व- र्णी कर्मे---आश्रमचतुष्टय---ब्रह्मचर्य व्रत---गृहस्थाश्रम--- ाचे प्रकार व त्यांतील भेदाभेद---गृहस्थांचें प्रत्यहीं आचरण--- स्थाश्रमांची थोरवी---वानप्रस्थाश्रम व त्यांतील विधि--- ासाश्रम, व त्यांतील इतिकर्तव्यता---आश्रम चतुष्टयांचें पालन, त्संबंधीं वेदकालापासून आजपर्यंत एकसारखी चालत आलेली ति---चिनी यात्रिक ईत्सिंग याचें हिंदुस्थांत आगमन, व चा ब्राह्मणांविषयींचा अभिप्राय---चाऱ्ही आश्रमांत वेदाध्ययन याविषयीं आज्ञा---वेदाध्ययनाचा मुख्य हेतु---भिक्षुकांविषयीं

अश्लाघ्य निंदा—त्यांचें आम्हांवर उपकार—चार वेदांचें हल्लींच्या कालीं अध्ययन—वेद पठण व शिक्षणनैपुण्य—आर्यशिक्षणकला—वेदांची सर्वज्ञता—उपनिषदांचें सामर्थ्य—उपनिषदांची अनुपमेयता.

भाग २१ वा.

वेदान्तशास्त्र.

वेदान्तविषय—षड्दर्शनें—सांख्यदर्शन—परिणामवाद—त्याचा आदि प्रवर्तक कपिल महामुनि—त्याचा सांख्यप्रवचन नामक ग्रंथ—सिंहावलोकन—कपिलाचा काल—योगदर्शन, व त्याचा प्रवर्तक पंतजलि—सिंहावलोकम—जैमिनीदर्शन—त्याचा काल—त्याचें मूलतत्व—वेदान्तदर्शन—यांतील तत्वें—तत्संबंधीं श्रुतीचीं वचनें—वेदान्तदर्शनाचा प्रवर्तक व्यास—वैशेषिकदर्शन—त्याचा प्रवर्तक कणाद ऋषि—वैशेषिकदर्शनाचीं मूलतत्त्वें—वैशेषिकसूत्रावर पादाचार्यांचें भाष्य—न्यायदर्शन व त्यांतील विषय—न्यायदर्शनाचा प्रवर्तक गौतम—हिंदूंपासून प्राप्त झालेलें ग्रीक लोकांचें ज्ञान—षड्दर्शनांचें सार—निरीश्वर वादी—चार्वाक, बुद्ध, प्रभृति—चार्वाकाचें नीतिभ्रष्ट मत—चार्वाकमतांतील सिधान्त—चार्वाका-ची जन्मभूमि, व काल—बौद्धमतसिद्धान्त—जैनमतांतील तत्त्व—जैनमताचा प्रवर्तक अर्हत् नामक आचार्य, व त्याचा काळ—हिं ची तत्वान्वेषण जिज्ञासा व तिचा काल.

भाग २२ वा.

ज्योतिःशास्त्र, भूमितिशास्त्र, अंकगणित व बीजगणित

तत्त्वविद्येप्रमाणें इतर शास्त्रांत हिंदूंची प्रवीणता—हिंदू ज्योति

विद्या व तिचा पुरातन शोध—हिंदुज्योतिर्विद्येचा पुरातन शोध असल्याविषयीं, नामांकित ग्रंथकारांचे अभिप्राय—आर्य ज्योतिःशास्त्राचा उदयकाळ, किंवा वैदिककाळ—त्याची वृद्धि, व यावनिक काळ—त्याचा उत्कर्ष काळ—त्याचा अस्तकाल—आर्य ज्योतिर्विद्येचे चार काळ—वैदिक किंवा उदय काळांतील शोध—सत्तावीस नक्षत्रें—सूर्याचें आकर्षण—ग्रहणाचें कारण—राशिरूपान्तर—इंद्र धनुष्य—तें पडण्याचीं कारणें—रश्मिदंड—सूर्यप्रकाश, व त्याचीं कारणें—धूमकेतु, व तत्संबंधीं शोध—ग्रीस देशाच्या तुलनेनें हिंदु ज्योतिःशास्त्राचें पौराणत्व—पुराण ज्योतिषी पराशर—यावनिक कालांतील ज्ञानप्राप्ति—हिंदूज्योतिःशास्त्रांचें चलन—हिंदूंची ज्ञानोन्नत्ति व उत्कर्ष आणि तत्संबंधीं पाश्चिमात्यांचे अभिप्राय—उत्कर्ष कालांतील हिंदु ग्रंथकार, व त्यांचे शोध—सिद्धान्तशिरोमणींतील मूलतत्वें—पृथिवीची गोलाकृति—पृथिवीचें आकर्षण—प्राचीनकाळांतील हिंदूंच्या शोधाविषयीं, पाश्चिमात्यांचें विचार—हिंदुज्योतिर्विद्येचा अस्तकाल—दैवज्ञविद्या—तिचा यूरोप व आफ्रिका खंडांत प्रसार—राजाजयसिंगाच्या वेधशाला, व त्याचे शोध—यूरोपांतील या वेळच्या स्थितीचें दिग्दर्शन—ग्रीस देशांतील नक्षत्रावलोकनाचा काळ—भूगोलाविषयीं आरिस्टाटल व तालिमी यांचें मत—त्यांच्या मताचें मिथ्यत्व—यांत बदल होण्याचीं कारणें—कोपर्निकस याचें मत—ग्यालिलियोचें मत—न्यूटनूचें मत—आर्यज्योतिर्विद्या, व तिचें पाश्चिमात्य देशांत पुनरुज्जीवन—ग्रीक हे हिंदूंचे चेले—वेदांतील प्राचीन शोध—इतर राष्ट्राच्या तुलनेनें हिंदूंचें प्राचीनत्व—त्यांचें भूमितिशास्त्र—त्यांचें अंकगणित व बीजगणितशास्त्र—भरतखंडाच्या तुलनेनें यूरोपांतील अज्ञान.

भाग २३ वा.

वैद्यशास्त्र.

हिंदूंचें वैद्यक हें त्यांच्या स्वतंत्र परिश्रमाचें फल---त्याचें पौराणत्व---त्याचा विकासकाल---हिंदु वैद्यकावरील आति प्राचीन ग्रंथ---ऋग्वेदांत त्याचें आदिकथन---आयुर्वेदांत त्याचें विवेचन, व तत्संबंधीं पौराणिक कथानक---अग्निवेशतंत्र---कायचिकित्सा व शल्यचिकित्सा---चरक व त्याचा काल---सुश्रुत व त्याचा काल------रसवैद्यक, व त्याचीं मूलतत्वें---रसवैद्यकाचा काल---वाग्भट, व त्याचे ग्रंथ---अष्टांगहृदय---हिंदु वैद्यकाची पर्याप्ति---हिंदूंची वैद्यकीय शस्त्रें---वाग्भटाचा काल, व तदनंतरचे वैद्यकावरील ग्रंथकार---हिंदूवैद्यकापासून इतर राष्ट्रांस प्राप्ति---हिंदुवैद्यकाची चढती व उतरती कला---वैद्यकांत, हिंदूंची क्षणोक्षणीं इतरांस मदत---आर्यवैद्यक; व त्याचा इतर राष्ट्रांवर अनुग्रह.

भाग २४ वा.

नीतिशास्त्र.

संस्कृतांतील नीतिग्रंथ---कामन्दकीय नीतिशास्त्र---पंचतंत्र, हितोपदेश, व दुसरीं नीतिकाव्यें---भारतीयांचा कथामृतनिर्झर---पंचतंत्राचीं भाषांतरें---पल्हवींत, अरबींत, इराणींत, फ्रेंच भाषेंत, इंग्रजींत, व तुर्कींत---प्राचीचें पाश्चात्यांस ऋण---प्राच्य कथांचें पौराणत्व---प्राच्य कथापर्यटन---आशियाखंडांत, यूरोपखंडांत, आणि अमेरिकेंत---ग्रीक गंधाविषयीं मिथ्या व निर्मूलककल्पना---पंचतंत्रांतील नीतितत्वांची कीर्ति---हिंदुधर्मांतील नीतिशास्त्राचीं मूलतत्वें---त्यावर परधर्मीयांचे हल्ले व त्याचा परिणाम.

भाग २५ वा.

आर्यकला.

आर्यकला—त्यांतील विषय—धनुर्वेद, व तत्संबंधी ग्रंथ—युद्धकलेचें शास्त्रीय विवेचन.

भाग २६ वा.

गायनकला.

गायनकला व तिचें मोहकत्व—आर्यसंगीताचें प्राचीनत्व—हिंदुसंगीताचा पौराणिक, व ऐतिहासिक काल—हिंदुसंगीताची चढती, व उतरती कळा—गायनाचे प्रकार, व सूर—संगीताचीं अंगें—वादनकला—नाट्यकला—ताल—गायनकलेंत हिंदूंचें इतर राष्ट्रांनीं केलेलें अनुकरण—गायनकलेंतील ग्रंथकार—गायनकलेची अभिवृद्धि, व तिचा ऱ्हास—हिंदु राग—गायनकलेची सांप्रतची स्थिति—तत्संबंधीं पाश्चिमात्यांचें अज्ञान, व तज्जन्य अवहेलना.

भाग २७ वा.

अर्थशास्त्र.

अर्थशास्त्र, व त्यांतील विषय—चित्रकला व तिचे प्राचीनत्व—हिंदुचित्रकलेंतील उणीव—पाणिनी व अशोक, यांच्या वेळची चित्रकलेची स्थिति—हिंदु गृहांतील चित्रनिर्मिति.

भाग २८ वा.

शिल्पकला.

शिल्पकला, व त्यांतील विषय—हिंदूंची निर्माणविद्या—त्यांनीं खोदून निर्माण केलेलीं विवरमंदिरें अथवा कोरींव लेणीं—मद्रास इलाख्यांतिल लेणीं—मुंबई इलाख्यांतील लेणीं—कोरींव लेण्यांचीं मुख्य स्थलें—त्यांविषयीं परकीयांचें अभिप्राय—या निर्मितीविषयीं प्रसिद्ध एल्फिन्स्टन् इतिहासकार यांचा अभिप्राय—श्रीरंगपट्टण व बंगाल इलाख्यांतील, व भुवनेश्वर येथील देवालयें—विजया नगरचा प्रध्वंस—हिंदुस्थान व मिसर, या दोन देशांतील निर्मितीमध्यें तुलना—वेरूळ येथील अप्रतीम मंदिरें, व त्यांचा काल—जगन्नाथाचें देवालय व त्याचा काल—हिंदूंची तडागरचना—कूपरचना—सेतुरचना, व तोरणें, आणि जयस्तंभ—आर्यशिल्पाची स्वभावसिद्धता—यवनांनीं आर्यशिल्पाचें केलेलें अनुकरण.

—

भाग २९ वा.

पटनिर्माण विद्या व रागकौशल्य.

भारतीयकला व जीवनसाधन—भरतखंडाची इतर देशांशीं तुलना—आर्यचारुकलांचें ऐतिहासिक दृष्टीनें अन्वेषण—हिंदुग्राम संस्थाविषयीं दोन शब्द—आर्यकलांचा उत्कर्ष व ऱ्हास व त्यांचीं कारणें—त्यांचें पुनरुज्जीवन—कार्पासनिर्मितीचा पौराणिक काल—देशीमालाचा कारखाना, व त्याची निर्गत—मद्रास इलाख्यांतील मध्यप्रांतांतील, व—मुंबईतील—हिंदुस्थानांतील गिरण्यांचा अहवाल—इ० स० १८७९ सालचा—इ० स० १८८४ सालचा—बंगाल इलाख्यांतील देशी भाग—वस्त्रालंकरणांत हिंदूंचें

भाग ३० वा.

वास्तुविद्या व यंत्रकला.

भाग ३१ वा.

लेखनकला.

भारतीय साम्राज्य.

पूर्वार्ध.

पुस्तक चवथें.

आर्यशास्त्र व कला.

भाग २० वा.

आर्यशास्त्र.

आर्यांची शोधकबुद्धि, व तन्निर्मित

आमचे पूर्वज आर्य हे प्रत्येक गोष्टीचा फारच शोधकबुद्धीनें, दूरवर, आणि अति उत्सुकतेनें, विचार करीत. त्यामुळें त्यांच्या कुशाग्रबुद्धीच्या तडाक्यांतून ी शास्त्र सुनें गेलें नाहीं. कोणतेंही शास्त्र घेतलें त्यांत त्यांचें नैसर्गिक प्रागल्भ्य, आणि सखोलाण, हीं दृष्टिगोचर झाल्यावांचन राहतच नाहींत. व

ह्यामुळेंच त्यांच्या बुद्धिमत्तेचें आणि पराक्रमशीलतेचें मोठें आश्चर्य वाटतें.

चौदा विद्या, चौसष्ट कला, आणि षट्शास्त्रें, व अठरापुराणें.

चौदा विद्या,[1] चौसष्ट कला,[2] षट्शास्त्रें,† आणि **अठरा पुराणें,**‡ इत्यादि ब्राह्मणनिर्मित जें ज्ञानभाण्डार, त्याचें अवलोकन केलें, म्हणजे त्यांच्या प्रचुरबुद्धितेजाचें आणि अत्युत्कट उत्साहश-

---

१. चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्वण वेद); सहा अंगें (शिक्षा, कल्प, व्याकारण, निघंट, ज्योतिष, छंद); व चार उपांगें (मीमांसा, न्याय, पुराणें, आणि धर्मश अशा एकंदर चौदा विद्या आहेत.

२. १ गीत, २ वाद्य, ३ नृत्य, ४ नाट्य, ५ आलेख्य षकच्छेद्य, ६ तंडुल, ७ कुसुमबलिप्रकार, ८ पुष्पास्तर, ९ द सनांगराग, १० मणिभूमिकाकर्म, ११ शयनरचना, १२ उदक १३ नेपथ्ययोग, १४ उदकघात, १५ चित्रयोग, १६ माल्यग्रथन ल्प, १७ कर्णपत्रभंग, १८ पानकरसरागासवयोजन, १९ सूची कर्म, २० सूत्रक्रीडा, २१ सुगंधयुक्ति, २२ वीणाडमरुकवाद्य, प्रहेलीकाकूटवाणी ज्ञान, २४ प्रतिमाला, २५ दुर्वचकयोग, २ पुस्तकवाचन, २७ नाटकाख्यायिकादर्शन, २८ काव्यसमस्यापूर २९ पटिकावेत्रवाण विकल्प, ३० पुष्पवाटिकानिमित्तज्ञान, ३१ यं मातृकाधारण मातृका संवाच्य, ३२ मानसीकायक्रिया, ३३ योग, ३४ तर्ककर्म, ३५ तक्षण, ३६ वास्तु, ३७ रौप्यरत्न ३८ धातुवाद, ३९ मणिरागज्ञान, ४० बालक्रीडन, ४१

(पुढें चालू)

† ‡ ह्या टिपा पुढील पानावर पहा.

स्त्रीचें कुतूहल वाटून, तज्जन्य विस्मयानें आपला जीव अगदीं थक्क होऊन जातो. खरोखर, विद्येच्या प्रत्येक शाखेंत ब्राम्हण हे परिपूर्णतेस पोहोंचले आहेत, (" Early excellence of the Bráhmans in all these branches of learning ") ह्मणून प्रसिद्ध इतिहासकार एलफिन्स्टन् यांनीं जो अभिप्राय आपल्या इतिहासांत प्रदर्शित केला आहे, तो केवळ यथार्थ आहे, असें प्रत्येक विवेकी मनुष्याच्या हृत्पटिकेवर बिंबल्यावांचून राहणार नाहीं.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

, ४२ वृक्षायुर्वेदयोग, ४३ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि, ४४ शुककाप्रलापन, ४५ उत्साहन, ४६ केशमार्जन कौशल, ४७ अभिक्रोश, ४८ शेकरापीडयोजन, ४९ भूषणयोजन, ५० ऐंद्रजाल, क्रौंचमारणयोग, ५२ हस्तलाघव, ५३ चित्रशाकापूणभक्तविक्रिया, ५४ अक्षरमुष्टिकाकथन, ५५ देशभाषाज्ञान, ५६ छंदोन, ५७ क्रियाविकल्प, ५८ वस्त्रगोपन, ५९ द्यूतविशेष, ६० आकक्रीडा, ६१ म्लेच्छितकविकल्प, ६२ वैनायिकविद्याज्ञान, ६३ जायिक विद्याज्ञान, आणि ६४ वैतालिक विद्याज्ञान, अशा चौसष्ट ला आहेत.

† १ सांख्यदर्शन, २ योग (पतंजलि) दर्शन, ३ जैमिनिदर्शन, वेदान्तदर्शन, ५ वैशेषिकदर्शन, आणि ६ न्यायदर्शन, अशीं ट्शास्त्रें आहेत.

‡ १ ब्रह्म, २ पद्म, ३ विष्णु, ४ शिव, ५ लिंग, ६ गरुड, ७ नारद, ८ भागवत, ९ अग्नि, १० स्कंद, ११ भविष्य, १२ ब्रह्मवैवर्तक, १३ मार्कंडेय, १४ वामन, १५ वराह, १६ मत्स्य, १७ कूर्म, आणि १८ ब्रह्मांड, अशीं अठरा पुराणें आहेत.

त्यांचें धर्मशास्त्र.

आतां, सर्व शास्त्रांत, ऐहिक व पारमार्थिक सुखोत्पत्तीच्या संबंधानें, धर्मशास्त्र हें शिरोभागीं होय. सबब तत्संबंधींच आपण प्रथमतः विचार करूं.

धर्मशास्त्र.

त्यांतील मूलतत्वें.

सर्व सुधारलेल्या देशांत, आणि प्रत्येक समनूजस व उन्नत्तीप्रत पावलेल्या राष्ट्रांत, सा जिक व्यवस्था उत्कृष्ठ रीतीनें, अबाधित, आणि यथान्याय चालावी यासाठीं, धर्मशास्त्रा अवलंबन करण्याची मोठीच अवश्यकता असते. हें ध शास्त्र ह्मटलें ह्मणजे मुख्यत्वेंकरून ईश्वरनिष्ठा, नीतिनि पुण्य, व्यवहारदाक्षिण्य, संप्रदायपटुत्व, आणि आचार शीलन, इत्यादि मूलतत्वांचें एकीकरण, किंवा विन्यास होय.

त्यांचा विन्यास.

आह्मां हिंदूचें धर्मशास्त्र विन्यासरूपानें इसवी सनापूर्वीं, नऊशें किंवा दहाशें वर्षें उदयास आलें असून, या भूतलावर तें सर्वांत जुनें असल्याचें समजतें. तथापि, त्यांतील तत्वांचें बीजारोपण सदहू कालाच्याही फारच अगोदरचें असून, तें वेदांत, आणि षतः सूत्रांत, स्पष्टपणें व्यक्त होतें. आतां वेद चार या वेद चतुष्टयासच समुच्चयरूपानें श्रुति असें

ह्मणतात. ह्या सर्वांचा शिरोभाग ह्मटला म्हणजे **उपनिषदें** होत. या **उपनिषदांत ईशनिष्ठा,** आणि तदंतर्गत सैर्वैक्यता, हीं ठायीं ठायीं व्यक्त होतात, हें जास्त सांगावयास नको. प्रत्येक वेदाचीं जशीं **उपनिषदें** आहेत, त्याप्रमाणेंच प्रत्येक **वेदांचीं सूत्रेंही** आहेत; व त्यांत नीति, व्यवहार, संप्रदाय, आणि आचार, इत्यादिकांचें थोडेंबहुत तरी विवेचन असतें. हींच सामाजिकस्थितीचीं सर्वत्र व्याकीर्ण झालेलीं मूलतत्वें, मानवी कुटुंबाच्या व्यवस्थेसाठीं, व तीं सुलभ रीतीनें स्मृतींत राहवीं या हेतूनें, विद्वान् आणि दूरदृष्टी, अशा आमच्या ऋषींनीं एकत्र केलीं, व त्यांसच **स्मृति** असें म्हणतात. ज्या विद्वन्मुकुटमणींनीं ह्या **स्मृति** रचल्या, त्यांस **स्मृतिकार** असें ह्मणतात. **स्मृतींची** एकंदर व्यवस्था, त्यांची रचना, त्यांचा विन्यास, त्यांतील भाषापद्धति, त्यांत वारंवार दृष्टिगोचर होणारीं **वेदवचनें** आणि त्यांचा उल्लेख, याविषयीं पूर्ण विचार केला म्हणजे ह्या **स्मृति वेदांनंतर** निर्माण झाल्या, अशाबद्दल यत्किंचितही शंका राहत नाहीं.

वेदविन्यासकाल.

वेदांचा विन्यासकाल इसवी शकापूर्वी तीन ३००० हजार वर्षें असल्याविषयीं मागील भागांत साद्यंत विवेचन केलेलें आहे. वेदकालानंतरचा **ब्राम्हण** काल असून, तो १४००।१९०० वर्षांपासून तों इसवी शकापूर्वी १००० हजार वर्षांपर्यंत असावा असें वाटतें.

सूत्रांचा काल, व स्मृतिविन्यास.

तदनंतरचा सूत्रकाल होय. व याच कालांत स्मृतींचा विन्यास झाला असल्याविषयीं सर्वांनुमतें ठरतें. ह्या कालाची व्याप्ति इसवी शकापूर्वी एक १००० हजार वर्षां पासून तों इ० स० पू० ५४३ वर्षे असावी, असें वाटतें.

मानव गृह्यसूत्रें, कात्यायनकृत कर्मप्रदीप, आप स्तंबकृत धर्मसूत्रें, शौनककृत प्रतिसांख्य सूत्रें, पार स्करकृत कातीय गृह्यसूत्रें, अश्वलायन श्रौत व गृह्य सूत्रें, सांख्य गृह्यसूत्रें, आणि बौध्यायन सूत्रें, इत्यादि कांत धर्मशास्त्राचीं मूलतत्वें आढळून येतात. तसें गौतम, विष्णु, आणि वशिष्ठकृत धर्मशास्त्रांतही त्यांचे प्राचुर्य दिसून येतें.

धर्मशास्त्रावरील ग्रंथ.

धर्मशास्त्रावर एकंदर लहान मोठें ग्रंथ एकशें बावीस असून, शिवाय आणखी चतुर्विंशति षट्त्रिंशत्, सप्तर्षि, षडशीति षण्णवति, वगैरे स्मृतिसमुदायवाचक दुसरे ग्रंथ आहेत मनु, याज्ञवल्क्य, पारस्कर, कात्यायन, कण्व, गौतम, शाण्डिल्य, जाबालि, पाराशर, शंख, हारीत, नारद, बृहस्पति, संवर्त, कोकिल, गोभिल, सूर्या रुण, लघुपराशर, वृद्धपराशर, लघुबृहस्पति, लघु शौनक, वगैरे अनेक स्मृतिकार आहेत. परंतु त्या सर्वांत मनु हा शिरोभागीं होय.

मनु हा इसवी शकापूर्वी नवव्यां किंवा दहाव्या शतकांत उदयास आला असल्याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे. मनूनंतर

मनूचा काल.

...व्या खालोखाल महत्वाचा, व दुसऱ्या पंक्तीचा स्मृतिकार ह्मटला ह्मणजे याज्ञवल्क्य होय. ह्याचा काल इसवी शकाच्या दुसऱ्या शतकांत असावा, अशी क... आहे. मनुस्मृतीवर कुल्लूक भट्टाचार्यांची प्रसिद्ध ...का असून, याज्ञवल्कयावर मिताक्षराची टीका आहे.

याज्ञवल्क्याचा काल.

आतां हिंदु धर्मशास्त्रांतील विषयांचें प्रतिपादन करण्यापूर्वी, धर्म ह्मणजे काय हें पाहणें महत्वाचें असल्यामुळें, तत्संबंधीं थोडा विचार करूं. धर्माची व्याख्या खालीं ...हिल्याप्रमाणें एके ठिकाणीं थोडक्यांत दिली आहेः—

धर्म शब्दाची व्याख्या.

धृतिः क्षमो दमोऽस्तेयंशौचमिंद्रिय निग्रहः ।
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥

याप्रमाणें दशगुणान्वित धर्म असून, महाभारतांत

1. "This would make the author of the Code ... about 900 years before Christ." That the Code ...ery ancient is proved by the difference of religion ... manners from those of present times, no less ...n by the obsolete style".

(Elphinstone's India. P. 438).

मुद्धां, " आत्मज्ञानं तितिक्षा च धर्मः साधारण
असें ह्मटलें आहे. याज्ञवल्क्य स्मृतींत धर्माची व्या
सांगितली आहे, तिजवरून धर्म ह्मणजे १ इज्या, २
चार, ३ दम, ४ अहिंसा, ५ दान, ६ स्वाध्याय
आणि योगसाधनाच्या द्वारें ७ आत्मदर्शन, हीं होत.

इज्याचार दमा हिंसा दानं स्वाध्यायकर्मच ।
अयं तु परमो धर्मो यद्योगेनात्मदर्शनम् ॥

(याज्ञवल्क्य.)

" श्रुतिप्रमाणकोधर्मः " असें हारीताचें वा
असून, " चोदनालक्षणोऽर्थो धर्मः " असें जैमि
ह्मणतो. भविष्य पुराणांत व मनुस्मृतींत, धर्माची व्या
खालीं लिहिल्याप्रमाणें दिली आहेतः-

धर्मः श्रेयः समुद्दिष्टं श्रेयोऽभ्युदय लक्षणम् ।
सतुपञ्चविधः प्रोक्तो वेदमूलः सनातनः ॥
अस्य सम्यगनुष्ठानात्स्वर्गो मोक्षश्च जायते ।
इहलोके सुखैश्वर्यमतुलंच खगाधिप ॥

(भविष्यपुराण.)

विद्वद्भिः सेवितः सद्भिर्नित्यमद्वेषरागिभिः ।
हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्तं निबोधत ॥ १ ।

(मनुस्मृति. अध्याय २ श्लोक

सर्व स्मृतिकारांत मनु हा आद्य असून, सर्वमान

आहे. यानें मानवधर्म, आणि वर्णा-
ृस्मृति. श्रमधर्म, यांविषयीं साद्यंत मीमांसा
आहे. ह्या मानवधर्मशास्त्रांत जगत् कसें निर्माण
याविषयीं प्रथम सांगून, तदनंतर सर्व कोटींतल्या
ांची व मनुष्यमात्रांची कशी उत्पत्ती झाली, हें सवि-
कथन केलेलें आहे.

सीदिदं तमोभूतमप्रज्ञातमलक्षणम् ।
नक्र्यमविज्ञेयं प्रसुप्तमिव सर्वतः ॥ ५ ॥
स्वयंभूर्भगवानव्यक्तो व्यञ्जयन्निदम् ।
भूतादि वृत्तौजाः प्रादुरासीत्तमोनुदः ॥ ६ ॥
ऽसावतीन्द्रिय ग्राह्यः सूक्ष्मोऽव्यक्तः सनातनः ।
र्वभूतमयोऽचिन्त्यः सएव स्वयमुद्बभौ ॥ ७ ॥
ऽभिध्याय शरीरात् स्वात्सिसृक्षुर्विविधा प्रजाः ।
ापः एवससर्जादौ तासुबीज मवासृजत् ॥ ८ ॥
दण्डमभवद्धैमं सहस्रांशु समप्रभम् ।
स्मिञ्जज्ञे स्वयंब्रह्मा सर्वलोकपितामहः ॥ ९ ॥
स्मिन्नण्डेस भगवानुषित्वा परिवत्सरम् ।
वयमेवात्मनोध्यानात्तदण्डमकरोद्द्विधा ॥ १२ ॥
ाभ्यांस शकला भ्यांच दिवं भूमिंच निर्ममे ।
ध्ये व्योम दिशश्चाष्टावपां स्थानंचशाश्वतम् ॥ १३ ॥
वमेतैरिदं सर्वं मन्नियोगान्महात्मभिः ।
था कर्म तपोयोगात्सृष्टं स्थावर जंगमम् ॥ ४१ ॥

पशवश्च मृगाश्चैव व्यालाश्चोभयतोदतः ।
रक्षांसि च पिशाचाश्च मनुष्याश्च जरायुजाः ॥४३
एवं सर्वं स सृष्ट्वेदं मांचाचिन्त्य पराक्रमः ।
आत्मन्यन्तर्दधेभूयः कालंकालेन पीडयन् ॥ ५१
तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते ।
द्वापरे यज्ञमेवाहुर्दानमेकं कलौयुगे ॥ ८६ ॥
सर्वं सास्य तु सर्गस्य गुप्त्यर्थं समहाद्युति ः
मुखबाहूरुपज्जानां पृथक्कर्माण्यकल्पयत् ॥ ८७
अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहंचैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥ ८८
प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेवच ।
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः ॥ ८९ ॥
पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेवच ।
वणिक्पथं कुसीदंच वैश्यस्य कृषिमेवच ॥९०
एकमेवतुशूद्रस्य प्रभुः कर्मसमादिशत् ।
एतेषामेववर्णानां शुश्रूषा मन सूयया ॥ ९१ ॥
भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः ।
बुद्धिमत्सुनरा श्रेष्ठाः नरेषु ब्राह्मणाः स्मृताः ॥ ९६
ब्राम्हणेषुच विद्वांसो विद्वांसो विद्वत्सुकृतबुद्धयः
कृतबुद्धिषुकर्तारः कर्तृषुब्रम्हवेदिनः ॥ ९७ ॥

(मनुस्मृति अध्याय १.

ह्या स्थावर जंगमात्मक सृष्टीची रचना होण्यापूर्वी, स

सृष्टिरचना.

कांहीं तमोमय होतें. तथापि स्वयंभू असा जो **भगवान्** तो तदन्तर्गतच न, त्या **प्रलयकाल**च्या अवस्थेंत अगदीं प्रसुप्त होता. या वेळीं, तो अहंकारामुळें एकाएकी प्रबुद्ध होऊन, ही अखिल चराचर सृष्टि, नानाविध प्रजा, आणि ज, अण्डज, व स्वेदज, वगैरे कोटींतील असंख्य प्राणी ण केले. पुढें मनुष्यमात्राच्या सामाजिक स्थितीची स्था लावण्यासाठीं, त्यांचे **ब्राम्हण**, **क्षत्रिय**, **वैश्य**, गि **शूद्र**, असे चार भेद कल्पून, त्या प्रत्येकांचीं पृथक् पृथक् व विहिताचरण, हीं त्यांच्या मागें लावून दिलीं. अशा रें ही **हिंदुसमाज**स्थिति उदयास आली, असें **ऋग्वे**-लोकनानें व **मनुस्मती**वरून चांगलें लक्षांत येतें.

मनुस्मृतींतील सारांश.

मनुस्मृतीचें समग्र अवलोकन केलें ह्मणजे असें सहज लक्षांत येईल कीं, मनुष्याच्या उत्पत्ती-पासून, किंबहुना या जगाच्या उ-त्पत्तीपासून, तों तहत् त्याच्या अन्ता-, मनुष्यमात्राच्या इतिकर्तव्यतेचें त्यांत साद्यन्त चन केलें आहे. ह्मणजे जगदुत्पत्ति, नृदेह संस्कारविधि, र्योपचार, स्नानविधि, दाराधिगमन, विवाहलक्षण, यज्ञविधान, श्राद्धकल्प, वृत्तिलक्षण, स्नातकव्रत, भ-भक्ष्य व शौचविचार, द्रव्यशुद्धि, स्त्रीधर्मयोग; तसेंच स्य, मोक्ष, व संन्यास लक्षण, राजधर्म, साक्षिप्रश्नवि-

धान, स्त्रीपुरुषधर्म, विभागधर्म, द्यूतकंटक शोधन, शूद्रोपचार, संकीर्णसंभव, आपद्धर्म, वर्णप्रायश्चित्त संसारगमन, त्रिविध कर्मांच्या गुणदोषांचें परीक्षण, धर्म, जातिधर्म, कुलधर्म, आणि पाषण्डगणधर्म, यां सविस्तर वर्णन मोठ्या मार्मिकपणानें केलें आहे. प आध्यायाच्या ८८ व्या श्लोकांत ब्राह्मणांचें कर्त सांगितलें असून, त्यांत, अ आणि अध्ययन यांची योजना रोभागीं केली आहे. त्यावरून

ब्राह्मणांचें कर्तव्य-कर्म.

दान व विद्यार्जन करण्याच्या कामीं, ब्राम्हण हे पूर्वी काळीं अति निपुण होते. इतकेंच नाहीं तर, त्यांची कामीं असलेली ख्याति आजमितिसही जशीच्या त कायम आहे. वाराणशीं सारख्या मोठमोठ्या क्षे आणि पुण्यपत्तनासारख्या विस्तीर्ण शहरांत, ब्राम्हण वस्तीच्या लहान लहान गांवांत, अजूनही वै विद्वज्जन आपल्या छात्रवर्गास वेदाध्यापन करीत ल्याचें हम्मेश दिसून येतें. परोपकार व देशसमृद्धि साठीं विद्यादान, आणि ज्ञान व आत्मोन्नति या विद्यार्जन, हें जणुकाय ब्राम्हणांचें ब्रीदच असून त्यांच्या पिण्डांतच खिळल्यासारखें दिसतें. अशा प्र रची त्यांस विद्येची अनुपम गोडी होती, म्हणून इतक्या योग्यतेस चढले, आणि आपला पुराण देश एव

मोठया वैभवास आणिला. बाल्यावस्थेपासून तों युवास्थेपर्यंत, आणि युवावस्थेपासून तों वृद्धावस्थेपर्यंत, विद्यार्जनाचीच उत्कट इच्छा असल्यामुळें, ते आपलें सर्व आयुष्य त्यांतच घालवीत, व विद्यामृत सेवनानें सदैव आनंदांत कालक्रमणा करीत. खरोखर, ह्या जगांत विद्येसारखी दुसरी कोणतीही कर्मणूक नाहीं. आणि ज्यानें कां एकदां विद्यामृताची चव घेतली आहे, त्याला ह्मणून दुसरा कोणताही विषय गोड लागणार नाहीं. रात्रंदिवस वेदपठण, व्याकरणशास्त्राध्ययन, न्यायशास्त्रमीमांसा, ज्योतिःशास्त्रान्वेषण, आयुर्वेदनिरूपण, साहित्यशास्त्रविवेचन, आणि नानाविधकलाकलाप वर्णन, यांतच त्यांचें सर्व आयुष्य खर्च होई. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे आमचे पूर्वीचे **ब्राम्हण** किती उत्साही, किती उद्योगी, आणि किती विद्वान् होते, याचें चांगलें दिग्दर्शन झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं.

वेदपठण.

आतां "**राजा कालस्य कारणम्**" ही ह्मण जरी सर्वांशीं खरी आहे, आणि आजकाल **इंग्रजी** राज्यसत्ता बहुतेक सर्वत्र असल्यामुळें **इंग्रजी**भाषा जरी सर्व ठिकाणीं चालू आहे, तरी देखील या अतिपुराण **भरतखंडांत**, आजमितीसही **वेदमंत्रपठणाचा ध्वनि**, आणि **शास्त्राध्ययनाचा घोष**, हे कर्णरन्ध्रात ठिकाठिकाणीं यथेष्ट दुमदुमून मनास अत्यानंद

देत आहेत. ज्या प्रमाणें **ब्राम्हणांस** अध्यापन व अध्ययन सांगितलें आहे, त्याचप्रमाणें **क्षत्रिय** आणि **वैश्य** या वर्गास अध्ययन सांगितलें आहे. (मनुस्मृति. अध्याय १ श्लोक ८९।९०). व ह्यांस अध्यापन करण्याचें काम प्राचीनकाळीं **ब्राह्मण** मोठ्या आनंदानें करीत. असें असतांही, **ब्राम्हण**-वर्णांतील **पुरोहित** वर्गानें, दुसऱ्या वर्णांस आज्ञानांधकारांत ठेवण्याच्या कपटबुद्धीनें, आपल्या जवळच ज्ञानभांडाराच्या किल्ल्या ठेविल्या, ह्मणून कांहीं अविचारी व कांहीं अज्ञान अशा **यूरोपस्थांचा** त्यांजवर आरोप आहे. आतां, हा आरोप किती अनृत आणि भ्रांतिमूलक आहे, हें **धर्म-शास्त्रावरून** व **ब्राम्हणांच्या** आचरणावरून तर निर्विवादच सिद्ध होत आहे; सबब त्याविषयीं जास्त विवेचन करण्याचें कारण नाहीं. मात्र, याठिकाणीं इतकें सांगणें जरूर आहे कीं, **मोक्षमूलरसारख्या गौरकाय** विद्वन्मणीनें देखील हा आरोप अगदीं खोडसाळ ठरविला आहे. ते ह्मणतात कीं:—

---

१ प्रत्येक वर्णाची इति कर्तव्यता खालीं लिहिल्याप्रमाणें सांगितली आहे.

अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहंचैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥ ८८ ॥
प्रजानां रक्षणं दान मिज्याध्ययन मेवच ।
विषयेष्वप्रसाक्तिश्च क्षत्रियस्य समासतः ॥ ८९ ॥
पशूनां रक्षणं दान मिज्याध्ययन मेवच ।
वणिक्पथं कुसीदंच वैश्यस्य कृषिमेवच ॥ ९० ॥

How for this license of ignorant assertion may be carried is shown by the same authorities who denied the importance of the Veda for a historial study of Indian thought, boldly charging those wily preists, the Brahmans, with having withheld their sacred literature from any but their own caste. Now so far from withholding it, the Brahamans have always been striving, and often striving invain, to make the study of their sacred literature obligatory on all castes except the Sudrás, and the passages just quoted from Manu show what penalties were threatened, if children of the second and third castes, the Kshatriya's and Vaisyas, were not instructed in the sacred literature of the Bràhamans.

(What can India teach us ? P. P. 142 143.).

चतुर्वर्णाची कर्मे.

ब्राह्मणांनीं १ अध्यापन, २ अध्ययन, ३ यजन, ४ याजन, ५ दान, आणि ६ प्रतिग्रह, हीं षट्कर्मे करावीं. क्षत्रियांनीं प्रजारक्षण, दान, गुरूपासून अध्ययन, व इंद्रियसंयमन, हीं आचरावीं. वैश्यांनीं पशूरक्षण, दान, गुरूपासून अध्ययन, वाणिज्य, कुसीद, आणि कृषिकर्म, हीं करावीं. व शेवटल्या शूद्र वर्गानें वरीष्ठ तीन वर्गाची सेवा करावी; अशी स्मृतिकारांची आज्ञा असून हा श्रमविभाग प्रत्येक

वर्णाची बुद्धिमत्ता, त्याची कर्तबगारी, आणि त्याची लायकी, ह्यांस अनुसरून ज्याच्या त्याच्या सामर्थ्यानुरूप विचारपूर्वकच केल्यासारखें दिसतें.

आश्रमचतुष्टय.

ह्याप्रमाणें वर्णव्यवस्था लाविल्यावर, आपलें स्वतःचें कर्तव्यकर्म पूर्णपणें बजाविलें जावें या हेतूनें, **ब्राह्मणांनीं** आपणांकरितां अतिकठिण व तीव्र नियम करून ठेविले, आणि **आश्रमचतुष्टयाचें** बंधन लावून घेतलें. उपनयन झाल्यावर प्रत्येक **ब्राम्हणानें** नित्य स्नान करून देवर्षि पितृतर्पण, देवताभ्यर्चन, आणि समिद्धोम केला पाहिजे.

ब्रह्मचर्य व्रत.

गंध, माल्य, व स्त्री, अशीं **ब्रम्हचर्यावस्थेंत** अगदीं वर्ज्य केलीं पाहिजेत. काम, क्रोध, लोभ, नर्तन, गीतवादन, द्यूत, जनवाद, अनृत भाषण, सानुराग स्त्रीप्रेक्षण, रेतस्कन्दन, आणि गुरुकुलभिक्षा, व बंधुकुलयाञ्चा, हीं सर्वथैव सोडलीं पाहिजेत. नित्यशः दूरच्या समिधा आणून त्यांचा सकाळीं व संध्याकाळीं होम केला पाहिजे. भिक्षा मागून आपली उपजीविका केली पाहिजे, व ही भिक्षाही एका ठिकाणची नसली पाहिजे. याप्रमाणें व्रतनियमादिकरून, छत्तीस वर्षांची उमर होई तोंपर्यंत गुरूच्या घरीं **वेदाध्ययन** केलें पाहिजे, आणि कायावाचामानसेंकरून गुरुप्रीति संपादन केली पाहिजे.

वेदमेव सदाभ्यस्येत्तपस्तप्स्यन्द्विजोत्तमः ।
वेदाभ्यासोहि विप्रस्य तपः परमिहोच्यते ॥ १६६ ॥
शरीरंचैव वाचंच बुद्धीन्द्रियमनांसिच ।
नियम्य प्राञ्जलिस्तिष्ठे द्वीक्षमाणो गुरोर्मुखम् ॥१९२॥

(मनुस्मृति अध्याय २.)

गृहस्थाश्रम.

तदनंतर गुरूची आज्ञा घेऊन **गृहस्थाश्रम** स्वीकारावा, आणि सुलक्षणान्वित अशी कन्या पाहून तिचें पाणिग्रहण करावें. ही कन्या असपिण्डा असली पाहिजे, व ती सवर्ण कुलांतील पाहून केली पाहिजे. म्हणजे **ब्राह्मणांनीं ब्राम्हणवर्णांतील**, **क्षत्रियांनीं क्षत्रियवर्णांतील**, **वैश्यांनीं वैश्यवर्णांतील**, आणि **शूद्रांनीं शूद्रवर्णांतील** कन्या करण्याविषयीं **मन्वाज्ञा** आहे. एकंदर लग्नाचे आठ प्रकार सांगितले आहेत; **१ ब्राम्ह, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गांधर्व, ७ राक्षस,** आणि **८ पैशाच**. यांपैकीं **ब्राम्हणांस** पहिले सहा प्रशस्त आहेत. **क्षत्रियांस** शेवटले चार, आणि **वैश्य** व **शूद्र** यांस **राक्षस**, शिवायकरून, बाकीचे सरते शेवटले तीन विवाह-प्रकार योग्य असल्याविषयीं **मनुस्मुतींत** सांगितले आहे.

ब्राम्हो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥२१॥

षडानुपूर्व्या विप्रस्य क्षत्रस्यचतुरोऽवरान् ।
विट्शूद्रयोस्तु तानेव विद्याद्धर्म्यानराक्षसान् ॥२३॥
(मनुस्मृति अध्याय ३.)

लग्नाचे प्रकार व त्यांतील भेदाभेद.

पहिल्या प्रकारच्या विवाहांत सालंकृत कन्यादान करतात. दुसऱ्यांत ज्योतिष्टोमादि यज्ञ करून अलंकारासहित कन्या देतात. तिसऱ्यांत यागादि सिद्धीसाठीं वराला गाय किंवा वृषभ देऊन कन्या अर्पण करतात. चवथ्यांत " सहयुवां धर्मं कुरुतम् " असें म्हणून कन्या देतात. पांचव्यांत ज्ञातीला व कन्येला यथाशक्ति द्रव्य देऊन तिला वराप्रत देतात. सहाव्यांत कन्या आणि वर यांच्या परस्पर अनुरागानें आलिंगनमैथुनादिव्यवहार होतात. सातव्यांत बलात्कारानें कन्येचें हरण करून तिच्याशीं लग्न लावतात. आणि आठव्यांत कन्या प्रसुप्त, मदविव्हल, मद्यप्रमत्त, संरक्षणरहित, व विजनदेशांत असतां, तिला बलात्कारानें नेऊन तिच्याशीं पाप हेतूनें विवाह होतो. आणि ह्मणूनच ह्या शेवटल्या प्रकारचा विवाह स्मृतिकारांनीं अति निंद्य मानला आहे.

गृहस्थाचें प्रत्यहीं आचरण.

विवाह झाल्यानंतर, व गृहस्थाश्रमी बनल्यावर, ब्राम्हणानें प्रत्यहीं अध्यापन, वेदाध्यायन, ब्रह्मयज्ञ, पितृयज्ञ, तर्पण, देवयज्ञ, भतयज्ञ, मनुष्ययज्ञ, होम आणि

अतिथिपूजन, असें केलें पाहिजे. तसेंच अहुत, हुत, प्रहुत, ब्राह्मच, व प्राशित, असें पंचमहायज्ञही केले पाहिजेत. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, या तिन्ही आश्रमाचें क्षेम गृहस्थाश्रमावरच मुख्यत्वेंकरून अवलंबून असल्यामुळें, ह्या द्वितीय आश्रमाची फारच महत्वी सांगितली आहे. कारण, शक्त्यनुसार संसारांतील सर्व गोष्टींची अनुकूलता ह्याच अश्रमांत असल्यामुळें, कोणीही अतिथी, अभ्यागत, ब्रम्हचारी, वानप्रस्थ, अथवा संन्याशी घरीं आल्यास, त्याचा योग्य सत्कार करून सामर्थ्यानुरूप त्याची संभावना करण्यास, गृहस्थाला उत्तम संधी असते. स्वाध्यायादि करून ऋषींची पूजा, होमादि क्रियांनीं देवतांचें अर्चन, श्राद्धादि क्रियांनीं पितृंचें तर्पण, अन्नदानानें मनुष्यांची तृप्ती, आणि बलि वगैरे देऊन भूतगणांची शांति, इत्यादि सर्व केलें पाहिजे; आणि दुसरीं नानाविध, कर्में आचरून नेहमींच शूचिर्भूत राहिलें पाहिजे.

गृहस्थाश्रमांची थोरवी.

याप्रमाणें गृहस्थाश्रमांत राहून यथाविधिकर्म आचरिल्यावर, कालवशात् जेव्हां गृहस्थाश्रम्याला असें वाटेल कीं, आपली वृद्धावस्था झाल्या कारणानें सर्व गात्रें शिथील होऊन केंसही पांढरे झाले, तेव्हां त्यानें संतती असल्यास, अरण्यांत जाऊन **वानप्रस्थाश्रम** स्वी-

वानप्रस्थाश्रम व त्यांतील विधि.

कारावा. ह्या आश्रमांत व्रीहियवादि ग्राम्य आहार, गवाश्व वाहन, आणि शय्यादि परिच्छद, हीं सर्व वर्ज केलीं पाहिजेत; व आपल्या भार्येच्या मनांत वनांत यावयाचें नसल्यास तिला पुत्रांच्या स्वाधीन करून मग वनांत गेलें पाहिजे. तदनंतर इंद्रियांचें दमन करून, नानाप्रकारच्या शाकमूलफलांनीं शास्त्रोक्तविधीनें पञ्चमहायज्ञ केले पाहिजेत. प्रत्यही प्रातःकाळीं व सायंकाळीं स्नान करून मृगादिचर्म, किंवा वृक्षवल्कलें धारण केलीं पाहिजेत. जटा, श्मश्रु, लोम, व नखें, हीं जशींच्या तशींच ठेविलीं पाहिजेत, जो विहित भक्ष्यपदार्थ खाण्यासाठीं मिळेल त्यांतून बलि व भिक्षा यथाशक्ति द्यावी, आणि आश्रमाच्या ठिकाणीं जो कोणी येईल त्याचें फलमूलभिक्षादानादि करून पूजन करावें. **वेदाभ्यास** नित्य करावा. सर्व भूतांवर दया करावी. यथाविधि जसें अन्न मिळेल तसें खावें. मग तें पक्क असो, किंवा अपक्क असो. आपलें शरीर झिजवून उग्र तप करावें. ग्रीष्म ऋतूंत उन्हांत आसन टाकून बसावें. वर्षा ऋतूंत मेघाखालीं राहावें. आणि हेमन्त ऋतूंत ओलीं वस्त्रें नेसून तप आचरावें. सारांश, सुखासाठीं कोणताही प्रयत्न न करितां, पृथ्वीचें आंथरुण व आकाशाचें पांघरूण करून वृक्षमूल आणि कंदफळें खाऊन, **वानप्रस्थांत** दिवस काढावें.

सन्यासाश्रम, व त्यांतील इतिकर्तव्यता.

याप्रमाणें आयुष्याचा तिसरा भाग वानप्रस्थाश्रमांत घालविल्यावर ब्राम्हणानें सर्वसंगपरित्याग करून चतुर्थाश्रम जो **सन्यास** तो स्वीकारावा. परंतु सन्यास धारण करण्यापूर्वीं शास्त्रोक्त **वेदाध्ययन**, धर्माप्रमाणें पुत्रोत्पादन आणि सामर्थ्यानुसार ज्योतिष्टोमादि यज्ञाचें अनुष्ठान, अशीं करावीं. तदनंतर प्रजापतिदेवताकामिष्टी करून सन्यास धारण करावा, आणि घराबाहेर पडावें. बाहेर पडल्यावर निरंतर एकटेंच असलें पाहिजे. आणि मरण किंवा जीवित, यांचें कोणत्याही प्रकारें अभिनंदन किंवा निन्दा न करतां, स्वकर्माधीन असून मरणकाळाची मार्गप्रतीक्षाच करीत राहिलें पाहिजे. आपल्या पादन्यासानें कीडमुंगी, किंवा जीवजंतु मेला जाऊं नये एतदर्थ, जागा पाहून पाऊल टाकिलें पाहिजे. गाळूनच पाणी प्यालें पाहिजे. नेहेमीं सत्य बोललें पाहिजे. आणि पवित्र अन्तरात्मा ज्याप्रमाणें मनाची प्रेरणा करील तसें वर्तलें पाहिजे. अतिवाद सोडून द्यावा, व कोणाशीं वैर करूं नये. जो क्रुद्ध झाला असेल त्याचें सान्त्वन करावें. अध्यात्मविषयाचा निरंतर व्यासंग करावा, व हम्मेश निरपेक्ष, आणि निरामिष राहवें. भूकंपादि उत्पाद, चक्षुःस्पन्दादिनिमित्तफल, ज्योतिर्विद्या, आणि नीतिमार्ग, हीं सांगून परिव्राजकानें कधींही भिक्षार्जन करूं नये. केश, नखें,

स्मश्रु, हीं नेहेमीं काढलीं पाहिजेत. धातुपात्र न घेतां, भोपळा, काष्टपात्र, मृत्पात्र, किंवा तरुत्वक्‌निर्मितपात्र, हींच सदैव ग्रहण करून त्यांत भिक्षा मागितली पाहिजे. कारण, धातुपात्रांत भिक्षा घेतली असतां नरकपतनाची भीति सांगितली आहे. तसेंच हातांत दण्डधारण करून, कोणाही भूतास पीडा न करतां परिभ्रमण केलें पाहिजे. अल्प आहार करून एकभुक्त असलें पाहिजे. आणि इन्द्रियांचें दमन करून नेहेमीं प्राणायाम केला पाहिजे.

आश्रम चतुष्टयांचें पालन, व तत्संबंधीं वेदकालापासून आजपर्यंत एकसारखी चालत आलेली स्थिति.

याप्रमाणें सदरीं लिहिलेल्या आश्रमचतुष्टयांतील कर्मविधि जरी अति कठिण आहे, तरी तो शास्त्रोक्त असल्यामुळें, व आमच्या लोकांची आमच्या धर्मावर अति श्रद्धा असल्या कारणानें, पूर्वीच्या काळीं तो मनःपूर्वक सर्व आचरीत. इतकेंच नाहीं तर, हल्लींच्या सुधारलेल्या एकोणिसाव्या शतकांतही, त्यांचें अवलंबन करणारे कांहीं गृहस्थ सांपडतील, असें प्रत्यक्षानुभवावरून कोणाही जिज्ञासूला आपल्या मनाची खात्री करून घेतां येईल. ब्राम्हणांचें हें आश्रमचतुष्टय, त्यांचें तें जितेन्द्रियत्व, त्यांची ती विद्यापरायणता, त्यांचें सोज्वळ आत्मज्ञान, आणि त्यांची अत्युत्कट संसारविरक्ति, हीं नेहेमी त्यांच्या डोळ्यापुढेंच असतात, असें आतां जास्त सांगण्याची अव-

श्यकता नाहीं. कारण, सर्व **संस्कृत भाण्डारांत** त्याविषयींचें बळवत्तर प्रमाण सांपडतें. इतिहासदृष्ट्या पाहिलें तर हा **ब्राह्मणांचा** चारितक्रम आज सुमारें नऊ दहा हजार वर्षे, किंबहुना त्यापेक्षांही जास्त कालपर्यंत, सतत व अप्रतिहत चालल्यासारखें दिसतें. **वेद**कालानंतर व इसवी सनापूर्वीं सहाव्या शतकांत, म्हणजे आज सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीं, **बुद्धचरित्रांत** देखील, ह्या आश्रमचतुष्टया प्रमाणेंच **ब्राह्मण** आपली आयुष्यक्रमणा करीत असल्याविषयीं अनेक उल्लेख आढळतात. **बुद्ध**कालानंतर सुमारें तीनशें वर्षांनीं **मिगॉस्‌थिनीज**लाही, हाच प्रकार दृष्टीस पडला. हा **ग्रीस** येथील **सेल्यूकस्** नामक राजाचा वकील असून तो **चन्द्रगुप्त** राजाच्या दरबारीं असे. **भरतखंडांत** पर्यटन करीत असतां, एकांत स्थळीं, व ठिकठिकाणीं पर्णकुटिकांत, जन्ममरण व जीवित मीमांसा, या विषयावर **ब्राह्मणांचे** थवेच्याथवे ऊहापोह करीत असल्याचें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें असून, त्याबद्दल त्यानें आपल्या लेखांतही उल्लेख केलेला आहे. तदनंतर **चिनी** प्रवाशी मधून मधून विद्यार्जनार्थ इकडे आले तेही इसवी शकाच्या दहाव्या शतकांपर्यंत **ब्राह्मणांच्या** धार्मिकवृत्तीविषयीं फार गौरवानें लिहितात, आणि त्यांच्या आश्रम चतुष्टयाचें वर्णन करतात. तदनंतरच्या काळांत, मठादिनिवासस्थानांतूनही, **ब्राम्हणांचें** तेंच चारित व तोच

आयुष्यक्रम दृष्टिगोचर होतो. आणि आजमित्तीसही **वारणाशी** सारख्या मोठमोठ्या क्षेत्रांत, आणि **बंगाल** इलाख्यांतील **नडिया** येथील **तोल** नामक पाठशालांत, केवळ ज्ञानासाठीं विद्यार्जन, व आत्मोन्नतीसाठीं अत्मसंयमन, हीं **ब्राह्मण** आपल्या वयाच्या वृद्धावस्थेंतही करीत असल्याचें दृष्टीस पडतें.

ब्राम्हणांविषयीं उल्लेख करीत असतां, प्रसिद्ध इतिहासकार **डाक्टर हन्टर** हे असें लिहितात कीं:—

"At this day, Brahaman Colleges, called 'tols', are carried on without fees on the old model, at Nadiya in Bengal, and eleswhere. The modern visitor to these retreats can testify to the stringent self discipline, and to the devotion to learning for its own sake, often protracted till past middle-life, and sometimes by greyhaired students."

"The Brâhamans therefore were a body of men, who in an early stage of this world's history, bound themselves by a rule of life the essential precepts of which were self-culture and self-restraint. As they married within their own caste, begot children only during their prime, and were not liable to lose the finest of their youth in war, they transmitted their best qualities in an ever increasing

measure to their descendants. The Brahmans of the present day are the result of nearly 3000 years of hereditary education and self restraint; and they have evolved a type of mankind quite distinct from the surrounding population. Even the passing traveller in India marks them out, alike from the bronze-cheeked, large-limbed, leisure-loving Rajput or warrior caste of Aryan descent; and from the dark skinned, flat-nosed, thick-lipped low castes of Non–Aryan origin, with their short bodies and bullet heads. The Brahman stands apart from both; tall and slim, with finely modelled lips and nose, fair complexion, high forehead, and somewhat cocoa-nut shaped skull—the man of self centered refinement. He is an example of a class becoming the ruling power in a country, not by force of arms, but by the vigour of hereditary culture and temperance. One race has swept across India after another, dynasties have risen and fallen, religions have spread themselves over the land and disappeared. But since the dawn of history, the Brahaman has calmly ruled, swaying the minds and receiving the homage of the people, and accepted by foreign nations as the highest type of Indian mankind."

"The paramount position which the Brah-

mans won, resulted, in no small measure, from the benifits which they bestowed. For their own Aryan countrymen, they developed, a noble language and literature. The Brahmans were not only the priests and philosophers. They were also the law givers, the administrators, the men of science, and the poets of their race. Their influence on the aboriginal peoples, the hill and forest races of India, was not less important. To these rude remnants of the flint and bronze ages they brought in ancient times a knowledge of the metals and of the gods. Within the historical period, the Brahmans have incorporated the mass of the backward races into the social and religious organization of Hinduism.

(Iudian Empire by W. W. Hunter, P. P. 96-97.)

एलफिन्स्टन् साहेब हे आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत ब्राम्हणांविषयीं असें लिहितात कीं:—

" * * * * And, from the early excellence of the Brahmans in all these branches of learning, it is probable that they had made considerable progress even when this code (Manu Smriti) was formed. "

* * * * * * *

" Their internal institutions were less rude ; their conduct to their enemies more humane ;

their general learning was much more considerable; and in the knowledge of the being and nature of God, they were already in possession of a light which was but faintly perceived even by the loftiest intellects in the best days of Athens."

(Elphinstone's India. P. P. 92-94-95.)

चिनी यात्रिक इत्सिंग याचें हिंदुस्थानांत आगमन, व त्याचा ब्राह्मणांविषयींचा अभिप्राय.

इ० स० ६७३ सालीं इत्सिंग नामक चिनी यात्रिक हिंदुस्थानांत आला. आणि नालंद येथील प्रसिद्ध विहार व पाठशालांत जाऊन, त्यानें संस्कृताचा अभ्यास केला. हा देखील, इतर सर्व वर्ग ब्राह्मणांस अति पूज्य मानित असल्याचें प्रत्यक्ष अनुभवास आल्याविषयीं लिहितो. व तें भट्ट मोक्षमूलर यांच्या लेखावरून चांगलें व्यक्त होतें.

"The Brahmans are regarded throughout the five divisions of India as the most respectable....They revere their Scriptures, the four Vedas, containing about 1,00,000 verses....The Vedas are handed down from mouth to mouth not written on paper. There are in every generation some intelligent Brahmans who can recite those 1,00,000 verses....I myself saw such men."

(What can India teach us ? By MaxMuller. P. 212.)

शेरिंग ह्मणतो कीं, ब्राम्हणाचें तें स्वयमेव श्रेष्ठत्व, त्याच्या रक्तांत अगदीं खिळून[1] गेलेलें असें त्याचें वर्चस्व, त्याचे ते सतेज नेत्र, त्याचें विशाल भाल, त्याचा निमगोरावर्ण, मनांत भरणारा असा त्याचा चेहेरा, त्याची ती व्यंजक मुद्रा, त्याचें तें भारदस्त गमन, त्याच्या शरीरांत मुसमुसलेला त्याचा मानीपणा व प्रागल्भ्य, इत्यादि पाहून, हा ह्या पृथिवीवरील एक अलौकिक प्राणी आहे असें वाटतें.

चार्‍ही आश्रमांत वेदाध्ययन करण्याविषयीं आज्ञा.

ब्राह्मणांनीं वेदाध्ययन चार्‍ही आश्रमांत सतत केलेंच पाहिजे, अशी मन्वाज्ञा आहे.

वेदमेवसदाभ्यसेत्तपस्तप्स्यन्द्विजोत्तमः ।
वेदाभ्यासोहिविप्रस्यतपःपरमिहोच्यते ॥ १६६ ॥

(मनुस्मृति. अध्याय २. ब्रह्मचर्य.)

---

1. " Light of complexion, his forehead ample, his countenance of striking significance, his lips thin and mouth expressive, his eyes quick and sharp, his fingers long, his carriage noble and almost sublime, the true Brahmin, uncontaminated by any European influence and manners, with his intense self consciousness, with the proud conviction of superiority, depicted in every muscle of his face, and manifest in every movement of his body, is a wonderful specimen of humanity walking on God's Earth."

(Sherring's Hindu Tribes and castes.)

अध्यापनंब्रम्हयज्ञःपितृयज्ञस्तुतर्पणम् ।
होमोदैवोबलिर्भौतोनृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥ ७० ॥

(मनुस्मृति. अध्याय ३. गृहस्थाश्रम.)

स्वाध्यायेनित्ययुक्तःस्याद्दान्तोमैत्रःसमाहितः ।
दातानित्यमनादातासर्वभूतानुकम्पकः ॥ ८ ॥

(मनुस्मृति. अध्याय ६. वानप्रस्थ.)

अधीत्यविधिवद्वेदान्पुत्रांश्चोत्पाद्यधर्मतः ।
इष्ट्वाचशक्तितोयज्ञैर्मनोमोक्षेनिवेशयेत् ॥ ३६ ॥

(मनुस्मृति. अध्याय ६. सन्यास.)

सदरीं अवतरण केलेल्या श्लोकांत, ज्या ठिकाणीं "अध्यापन्म" हा शब्द आलेला आहे, त्या ठिकाणीं तदन्तर्गतच "अध्ययन" आहे, असें समजावयाचें. आणि, **मनुस्मृतीवर कुल्लूक भट्टाचार्यांनीं** जी टीका केली आहे, त्यावरूनही तें अगदीं स्पष्ट होतें. सदरहु टीकेंत **आचार्य** मजकूर असें स्पष्ट लिहितात कीं, "अध्यापन शब्देनाध्ययनमपि गृह्यते. जपोऽहुत मिति वक्ष्यमाणत्वादलोऽध्यापनमध्ययनंच ब्रह्मयज्ञः"

वेदाध्ययनाचा मुख्य हेतु.

इतकी जी **वेदाध्ययना**विषयीं सक्ती आमच्या दूरदृष्टी **ऋषींनीं** केली, त्याचा मुख्य हेतु **वेदसंरक्षण** आणि **विद्यार्जन**, हाच होय. व त्याचा इष्ट परिणाम-

ही उदयास आल्याचें उघड दिसत आहे. **वेद** घोकून त्यांचें पठण जर आम्ही **ब्राम्हणांनीं** केलें नसतें तर, आज आठ दहा हजार वर्षांच्या घडामोडींत, ते केव्हांच लयास गेले असते. इतकेंच नाहीं तर, त्यांचा आज मितीस बिलकुल मागमुसही राहिला नसता. आणि **वेदासारखा** अमूल्य रत्नसंग्रह आपल्या **भरतखंडातून**, किंबहुना पृथिवीच्या पाठीवरून, जर अजींच नाहींसा झाला असता तर ह्या देशालाचसें काय, पण अखिल जगाला, व मनुष्यमात्रलाही, अगदीं अपरिहार्य नुकसान पोहोंचलें असतें. व तें झालें नाहीं याबद्दल आपण आपल्या पूर्वजांचे, अखिल श्रोत्रिय वर्गाचे, आणि सर्व भिक्षुक मंडळींचे अति उपकार मानले पाहिजेत आमच्या श्रोत्रियवर्गावर आणि भिक्षुकांवर कांहीं कांहीं

भिक्षुकांविषयीं अश्लाघ्य निंदा.

सुधारलेल्या व इंग्रजी शिकलेल्या मंडळींची मोठी करडी नजर आहे. ते या बिचाऱ्या गरीबांची " **भटभाई,** " " **परान्न पुष्ट,** " " **भारवाहक,** " वगैरे विशेषणांनीं बरीच पूजा करतात. परंतु ती सर्वथैव अयोग्य आहे. त्यांनीं **वेद** पठण करून, त्यांचें ओझें बाळगित बाळगीत आजमितीपर्यंत तें सलामत पोहोंचविलें, याबद्दल त्यांचें अत्युपकार न मानितां उलट त्यांची आपण निंदा केली तर, आपण खरोखरी कृतघ्नतेच्या दोषास मात्र

पात्र होऊं. कल्पना करा कीं, सदरीं निर्दिष्ट केलेल्या 'भारवाहकांनीं' जर षडंगवेदांचें ओझें आपल्या जिव्हाग्रीं आज हजारों वर्षें वागविलें नसतें, तर हा आमचा अमूल्य षडंगवेद या पूर्वीच कोणीकडे कसा लयास गेला असता, याविषयीं कांहीं तरी पत्ता लागला असता काय? जो वेदवृक्ष उत्तरोत्तर अति विस्तीर्ण होत गेल्यामुळें, त्याचीं मुळें थेट पाताळास जाऊन पोहोंहलीं, व ज्याच्या अग्रशाखा आकाशांत अंतर्धान पावल्या, तोच वृक्ष मध्यंतरींच रसातळास गेला असता तर आमची काय दशा झाली असती बरें? आमची मुळची स्थिति, आमचा धर्म, आमचे आचारविचार, आणि आमचें बुद्धिवैभव, (जीं केवळ पाहूनच या भूतलांवरील सर्व राष्ट्रें तोंडांत बोटें घालतात,) तीं ह्या जगाला कळविण्याला यत्किञ्चित् तरी मार्ग राहिला असता काय? खरोखर, वेद ठार बुडते तर, हिंदूंचें हिंदुत्व राहिलें नसतें. व आम्ही फारच शोचनीय दशेप्रत पोहोंचलों असतों. परधर्माचीं अनेक वावदळें आह्मांवरून जाऊन त्यांनीं आम्हांस संत्रस्त केलें, तरी देखील परधर्मापासून आह्माला यत्किंचित्‌ही धक्का न पोहोंचतां, आम्ही कायमच्या कायमच राहिलों आहों. हा प्रभाव केवळ वेदाच्या जबरदस्त कोटाचाच होय. व हा कोट आज हजारों वर्षें आमच्या नैष्ठिक भटसंन्यांनीं जोंबाळून ठेवून,

त्यांचे आम्हांवर उपकार.

त्याचा एक दगडही ढांसळूं दिला नाहीं, याबद्दल त्यांचे खरोखर आह्मी मोठेच उपकार मानले पाहिजेत.

चाऱ्ही वेद ज्यांस मुखोद्गत आहेत, असे कांहीं **ब्राम्हण** आज मितीसही भरतखंडांत आहेत. व त्यांचें **वेदाध्ययन** इतकें शुद्ध व अस्खलित आहे कीं, एखाद्या छापील पोथींतील अथवा पुस्तकांतील पाठ किंवा स्वर चुकीचा असल्यास, तो चुकीचा असल्याविषयीं ते बेधडक व निःशंकपणें सांगतात. ह्याचें कारण पाहूं गेलें तर, मुख्यत्वेंकरून वेदपठण करण्याची उत्तम शिक्षणपद्धति होय. आणि ही **शिक्षणपद्धति** तितक्याही पुरातन काळीं, इतक्या पूर्णत्वास पोहोंचली होती कीं, तिचें आजकाल **पाश्चिमात्य** लोकही सकौतुकाश्चर्य वर्णन करतात. **भट्ट मोक्षमुलर** ह्मणतात कीं:—

चार वेदांचें हल्लींच्या काळीं अध्ययन.

"Now the Rig-veda alone, which contains a collection of ten books of hymns addressed to various deities, consists of 1,017 (1,028) poems, 10,580 verses, and about 1,53,826 words. How were these poems composed—for they are composed in very perfect metre—and how, after having been composed, were they handed down from 1500 before christ to 1500 after christ, the time to which most of our best sanskrit Mss. belong ?"

" Entirely by memory. This may sound starting, but—what will sound still more starting, and yet is a fact that can easily be ascertained by any body who doubts it at the present moment, if every Ms. of the Rig-veda were lost, we should be able to recover the whole of it—from the memory of the Shrotriyas in India. These native students learn the Veda by heart, and they learn it from the mouth of their Guru, never from a Ms., still less from my printed edition,—and after a time they teach it again to their pupils. "

" I have had such students in my room at Oxford, who not only could repeat these hymns, but who repeated them with the proper accents (for the Vedic Sanskrit has accents like Greek), nay who when looking through my printed edition of the Rig-veda, could point out a misprint without the slightest hesitation. "

" I can tell you more. There are hardly any various readings in our Mss. of the Rig-veda, but various schools in India have their own readings of certain passages, and they hand down those readings with great care. So, instead of collating Mss. as we do in Greek and Latin, I have asked some friends of mine to

collate those Vedic students, who carry their own Rig-veda in their memory, and to let me have the various readings from these living authorities."

"Here then we are not dealing with theories, but with facts, which any body may verify. The whole of the Rig-veda, and a great deal more, still exists at the present moment in the oral tradition of a number of scholars who, if they liked, could write down every letter, and every accent, exactly as we find them in our old Mss."

"Of course this learning by heart is carried on under a strict discipline; it is, in fact, considered as sacred duty."

What can India teach us? P. P. 208 209.

वेद पठण व शिक्षणनैपुण्य.

ज्याला वैदिक किंवा श्रोत्रिय होण्याची इच्छा असेल, त्यानें समग्र ऋग्वेद संहिता प्रथम म्हटली पाहिजे. तदनंतर ब्राम्हणें, अरण्यकें, आणि सूत्रें, यांचें पठण केलें पाहिजे. व त्यानंतर शिक्षा, छंदस, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष, आणि कल्प, यांचें चांगलें अध्ययन केलें पाहिजे. हें अध्ययन गुरुच्या घरीं सुमारें आठ वर्षें करावें लागतें, आणि तें फारच श्रमाचें व मोठ्या मेहेन-

तीचें काम आहे. तथापि, गुरुदाक्षिण्य आणि शिक्षण-नैपुण्य, यांचाही अशा वेळीं पुष्कळ उपयोग होतो.

आर्यशिक्षण कला.

आमच्या शिक्षणपद्धतीविषयीं मोक्षमूलरभट्ट असें लिहितात कीं:—

"The art of teaching had even at that early time been reduced to a perfect system and at that time certainly there is not the slightest trace of any thing, such as a book, or skin, or parchment, a sheet of paper, pen, or ink, being known even by name to the people of India; while every expression connected with what we should call literature, points to a literature (we cannot help using that word) existing in memory only, and being handed down with the most scrupulous care by means of oral tradition."

(What can India teach us ? P. 214.)

वेदांची सर्वज्ञता.

आमचे चाऱ्ही वेद, वेदांगें, व उपांगें, यांचें समग्र आणि सावधान जो अवलोकन करील, त्यास असें सहज दिसून येईल कीं, आमच्या आर्य लोकांच्या तडाक्यांतून व तीक्ष्णान्वेषणांतून कोणताच विषय निसटून गेला नाहीं. त्यांनीं धर्मान्वेषण करून वर्णाश्रमधर्म, धर्ममीमांसा, योगमीमांसा, आणि अध्यात्मज्ञान, या विषयांवर मोठे मोठे ग्रंथ लिहिले. शास्त्रान्वेषण करून व्याकरण, न्याय, ज्योतिःशास्त्र, गणित, बीजगणित, भूमिति-

शास्त्र, अलंकारशास्त्र, छंदशास्त्र, अर्थशास्त्र, औषधिविद्या, शल्यशास्त्र, पशुचिकित्सा, इत्यादि विषयांवर हजारो ग्रंथसमूह रचला. व **कलान्वेषण**करून युद्धकला, गायनकला, वाद्यकला, नाट्यकला, निर्माणशिल्प, वास्तुकला, यंत्रकला, आणि चित्रकला, या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले. याशिवाय गद्यपद्यात्मक काव्यकलाप, म्हणजे महाकाव्यें, नाटकें, कादंबऱ्या, चंपु, शब्दकोश, कल्पितकथा, आणि इतर लहान लहान गद्यें, यांचीही खाण खणून ठेविली. एकंदरीत चौदा विद्या, व चौसष्ट कला, यांत हिंदुंचें विशारदत्व असल्याविषयीं आजमितीसही सर्वांस महशूर आहे.

उपनिषदांचें सामर्थ्य.

या सर्वांच्या शिरोभागी **वेदान्त** व **उपनिषदादि** भाग असून, त्यांतच आमच्या **ब्राह्मणांनीं** आपलें सर्व बुद्धिवैभव खर्च केल्यासारखें दिसतें. त्याविषयीं प्रसिद्ध **जर्मन् पंडित भट्टमोक्षमुलर** आणि **शोपेन् हॅायर** हे असें लिहितात कीः-

" * * * * * It found its true self in the Highest Self, and the oneness of the subjective with the objective Self was recognised as underlying all reality, as the dim dream of religion—as the pure light of philosophy."

" This fundamental idea is worked out with

systematic completeness in the Vedánta philosophy and no one who can appreciate the lessons contained in Berkeley's philosophy, will read the Upanishads and the Brahma-sutras and their commentaries without feeling a richer and a wiser man."

* * *

"If you think that I exaggerate, let me read you in conclusion what one of the greatest philosophical critics—and certainly not a man given to admiring the thoughts of others—says of the Vedànta and more particularly of the Upanishads. Schopen hauer writes:

'In the whole world there is no study so beneficial and so elevating as that of the Upanishads. It has been the solace of my life—it will be the solace of my death.'

(What can India teach us? P. P. 253-254.)

(Sacred Books of the East vol I. The Upanishads, translated by Max-muller. Introduction. P. LXI.)

उपनिषदांची अनुप्रमेयता.

याप्रमाणें नामांकित तत्वान्वेषी व गुणागुणज्ञ शोपेन हॉयर यास उपनिषदें हीं त्याच्या आयुष्याचें जीवन, आणि त्याच्या अन्तकालाचें विश्रांतिस्थानच होऊन राहिलीं होतीं. व खरोखर पाहतां मनुष्याचें अज्ञान, त्याचा उद्वेग, आणि त्याची तृष्णा, हीं सर्व मोडून त्यास शांति

व प्रफुल्लता देणारा, उपनिषदांसारखा दुसरा कोणताही ग्रंथ ह्या पृथिवीच्या पाठीवर नाहीं, असें ह्मटलें तर अयथार्थ होईल असें वाटत नाहीं.

ज्याप्रमाणें पारमार्थिक विषयांत आह्मी अगदीं उच्च शिखराप्रत जाऊन पोहोंचलों होतों, त्याप्रमाणेंच ऐहिक सुखांतही आमचें पाऊल पुढेंच होतें. त्याकाळीं विद्यार्जनांत व दुसऱ्या हरएक सद्धुद्योगांत, युवतीजनांची भरपूर व निष्प्रांजळ मदत, आणि पवित्र व उत्तम साहचर्य असल्यामुळें, आमच्या सुखास पारावार नव्हता. आमची उत्तम गृहस्थिति, अनुपम प्रेम, निष्कलंक पातिव्रत्य, आणि निःसीम पवित्रता, हीं पाहून सर्व जगास विस्मय वाटे, व हल्लींही कांहीं निःपक्षपाती लोकांस तो वाटत आहे. सर ज्यॉर्ज बर्डवूड हे एके ठिकाणीं हिंदुगृहस्थितीविषयीं असें लिहितात कीं:—

'The marriage laws of the Hindoos have served to Create the highest type of Family life known. For its Simplicity, affection, reverence, and purity, it is absolutely inapproachable by any other nation."

या प्रकारची स्थिति असल्यामुळें, हिंदूंचा व त्यांतही विशेषतः ब्राह्मणांचा, अर्थात्च सर्वांवर पगडा बसला. आणि ह्याचें मुख्य कारण म्हटलें ह्मणजे त्यांचें कडकडीत आचरण, मनःसंयमन, व बुद्धितेजच होय. याविषयीं जर्मनींतले प्रोफेसर वेबर असें लिहितात कीं:—

" We must, at any rate, assume among the Bràhmans of this period a very stirring intellectual life, in which even the women took an active part, and which accounts still further for the superiority maintained and exercised by the Brahmans over the rest of the people. "

*　　*　　*　　women who with enthusiastic ardour plunge into the mysteries of speculation, impressing and astonishing men by the depth and loftiness of their opinions, and who—while in a state which, judging from description, seems to have been a kind of somnambulism,—solve the questions proposed to them on sacred subjects. "

(History of Indian Literature.)

P. P. 21-22

भाग २१ वा.

वेदान्तशास्त्र.

वेदान्तविषय.

धर्मशास्त्रानंतर दुसरा महत्वाचा शास्त्रीय विषय ह्मटला ह्मणजे वेदान्तविषय होय. ह्या विषयासारखें समाधान दुसरीकडे कोठेंही नाहीं. सृष्टीचा मूळ हेतु; उत्पत्ति, स्थिति, आणि लय, यांचें **आदिकारण**; व आपण कोठून आलों, कशा करितां आलों, आणि कोठें जावयाचें, याविषयीं साधकबाधक कारणांची उत्तम व पूर्ण मीमांसा त्यांत असते. हा सर्व **वेदान्तविषय**, आणि **उपनिषदें**, जो अवलोकन करून त्यांचें पूर्ण मनन करील, त्याला **शान्तीचें** माहेरघर प्राप्त झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. ह्या वेदान्तविषयाचीं अनेक दर्शनें असून, त्यांत भिन्न भिन्न मतें प्रदर्शित केलेलीं आहेत.

षड्दर्शनें.

हीं दर्शनें मुख्य सहा आहेत. १ **सांख्यदर्शन**, २ **योगदर्शन**, ३ **जैमिनिदर्शन** (ज्याला **कर्ममीमांसा** अथवा **पूर्वमीमांसा** ह्मणतात), ४ **वेदान्तदर्शन** (ज्याला **ब्रह्ममी-**

मांसा अथवा उत्तरमीमांसा ह्मणतात), ५ **वैशेषिक-दर्शन**, आणि ६ **न्यायदर्शन**.

सांख्यदर्शनाला, निरीश्वरवाद असेंही नांव आहे. तथापि त्यांतही निरीश्वर आणि सेश्वर अशीं दोन मतें आहेत. **कपिल, आसुरी**, आणि **पंचशिख**, इत्यादि निरीश्वर मतांतले होते. व **पतञ्जलि, व्यास**, आणि **याज्ञवल्क्य**, इत्यादि सेश्वर मतांतले होते; त्यामुळें त्यांच्या मताचा **योगदर्शन** हा स्वतंत्र भाग झाला आहे.

सांख्यदर्शन.

ह्या सर्वांत अतिपुराण तत्वदर्शन ह्मटलें ह्मणजे **सांख्यदर्शन** होय. यांत सत्कार्यवाद अथवा परिणामवाद मानिला आहे. ह्मणजे कार्य हें कारणामध्यें सूक्ष्म रूपानें असून, तें कारण-सामुग्रीचें सान्निधान झालें असतां व्यक्त होतें. किंवा कारणच कार्यस्वरूपानें परिणाम पावतें. परंतु तें कार्य नवीन उत्पन्न होत नाहीं. जसें दहीं दुधामध्यें, पट तंतूंमध्यें, आणि घट मृत्तिकेमध्यें, सूक्ष्म रूपांनीं मूळचींच रहात असून, तीं कारण–सामुग्रीच्या संनिधानानें आविर्भूत होतात, किंवा परिणाम पावतात. ह्मणजे दुग्ध, तंतु, व मृत्तिका, हीं यथानुक्रमें अम्ल व काल, तुरी व वेम, आणि दण्ड व कुलाल, इत्यादि कारण–सामुग्रीच्या संनिधानानें परिणाम पावून, दधि, पट, व घट, या अवस्थेप्रत पोहोंचतात.

परिणामवाद.

त्याचा आदिं प्रवर्त्तक कपिल महामुनि.

सांख्यदर्शनाचा आदिप्रवर्त्तक **कपिल** महामुनि होय. ह्यानें “अथ त्रिविध दुःखात्यंत निवृत्तिरत्यन्तपुरुषार्थः ” या सूत्रापासून “ यद्वा तद्वातदुच्छित्तिः पुरुषार्थ स्तदुच्छित्तिः पुरुषार्थः ” या सूत्रापर्यंत, षड्ध्यायी **सांख्यप्रवचन** ग्रंथ केला, आणि तो आपल्या **आसुरि** नामक शिष्यास सांगितला. ह्यानें **पराशर** गोत्रांतील **पंचशिख** नांवाच्या शिष्यास उपदेश केला. तदनंतर ह्या शिष्यपरंपरेपासून जें सांख्यदर्शन प्राप्त झालें, त्याचें सार व सिद्धान्त हीं समग्र अवलोकन करून, **ईश्वरकृष्ण** या पण्डितानें **सांख्यकारिका** नांवाचा सुबोध ग्रंथ रचला. ह्या सांख्यकारिकेवर **गौडपादाचार्यानें** (**शंकराचार्यांच्या** परम गुरूनें) भाष्य केलें आहे. पूर्वोक्त **सांख्यप्रवचनाचे** सहा अध्याय आहेत. १ विषयाध्याय. २ प्रधानकार्य. ३ वैराग्य. ४ आख्यायिका. ५ परपक्षनिर्जय. आणि ६ तंत्राध्याय. तशींच ह्याचीं साठ तंत्रें आहेत, म्हणजे तितके पदार्थ मानिले आहेत. ते खालीं लिहिल्याप्रमाणें:—

त्याचा सांख्यप्रवचन नामक ग्रंथ.

“ **पुरुषः प्रकृतिर्बुद्धि हंकारो गुणास्त्रयः ।**
तन्मात्र मिन्द्रियंभूतं मौलिकार्थाः स्मृतादश ॥
विपर्यतः पंचाविधस्तथोक्ता नव तुष्टयः ।

करणानामसामर्थ्यमष्टा विंशतिधामतम् ॥

इति षाष्ठिः पदार्थानामष्टाभिः सहसिद्धिभिः।"इति।

ह्या साठ पदार्थांचें यथार्थ ज्ञान झालें असतां **जीव** त्रिविधतापांतून मुक्त होतो. आतां **आध्यात्मिक, आधिदैविक,** आणि **आधिभौतिक,** असे त्रिविधताप असून, शारीरिक व मानसिक दुःख पहिल्या वर्गांतलें; ग्रह-भूतादिजनित दुःख दुसऱ्या वर्गांतलें; आणि कीटक पशु-पक्ष्यादिजनित दुःख तिसऱ्या वर्गांतलें होय. पूर्वोक्त साठ पदार्थांपैकीं मुख्य तत्वें पंचवीस आहेत, तीं येणें-प्रमाणेंः—मूलप्रकृति, महत्तत्व किंवा बुद्धि, अहंकार, पंच-ज्ञानेन्द्रियें (चक्षु, रसना, घ्राण, त्वक्, आणि श्रोत्र), पंचकर्मेन्द्रियें (वायु अथवा शौचस्थान, उपस्थ अथवा मूत्रस्थान, हस्त, पाद, आणि वाक्), मन, पंचतन्मात्रें (शब्द, स्पर्श, रस, रूप, आणि गंध), पंचमहाभूतें (पृथिवी, आप, तेज, वायु, आणि आकाश), व पुरुष (किंवा जीव). हे सर्व पदार्थ **प्रकृतीला** ह्मणजे **मूल-कारणाला** सत्त्वरजस्तमोगुणांच्या योगानें व्यक्त करता येतात, किंवा लयाप्रत नेतां येतात.

सिंहावलोकन.

सांख्यशब्द प्रथमत **तैत्तिरीय** व **अथर्वोपनिषदांत** आढळतो. तसेंच तो **निरुक्तींत** आणि **भगवत्‌गीतेंतही** दृष्टीस पडतो. आतां सांख्यदर्शनाचे प्रवर्तक **कपिल,** व त्याचे परंपरेनें

झालेले शिष्य **आसुरि** आणि **पंचशिख** असे असून, त्यांचीं नांवें **कपिल** सूत्रांत **बृहदारण्यकांत**, व **शतपथ ब्राह्मणांत** आढळतात. तसेंच **बुद्धचरित्रासंबंधी जैन लोकांचीं** जीं धर्मपुस्तकें आहेत, त्यांत **कपिल** आणि **पंचशिख** यांचा विपुल उल्लेख केल्याचें आढळतें. त्यावरून **बुद्धाच्या** अगोदर **कपिल** महामुनि हा बरींच शतकें होऊन गेला असावा, यांत बिलकुल शंका नाहीं.

कपिलाचा काल.

आतां, **कपिलाचा** काल स्वतंत्र रीतीनें खात्रीपूर्वक समजण्यास हल्लीं जरी कांहीं सुद्धां साधनें उपलब्ध नाहीं, तरी **बुद्धाच्या** काळावरून त्याच्या कालाचें अनुमान होऊं शकेल. सबब **बुद्धाच्या** कालाविषयीं संक्षेपतः विचार करूं. **बुद्धाविषयीं** जे जे वृत्तान्त **बौद्धांनीं** लिहिलेले आहेत, ते असंबद्ध व भिन्न भिन्न आहेत. ह्मणजे इसवी सनाच्या पूर्वी २४२२ वर्षांपासून तों इ० स० च्या पूर्वी ५४३ पर्यंतच्या कालांत **बुद्ध** होऊन गेला असल्याविषयीं निरनिराळ्या ग्रंथकारांचें पृथक् पृथक् वर्णन आहे. तथापि, इ० स० पूर्वी ५४३ व्या वर्षी, **बुद्धाचा** निर्वाण-काल असल्याविषयीं, इतिहास प्रमाणांवरून हल्लीं सिद्धवत् मानिलें आहे. आणि ज्या अर्थी **सांख्यमतास** अनुसरूनच **बौद्ध** धर्माचीं निरीश्वरमतें होतीं, त्या अर्थी **बुद्धाचा** जन्म होण्यापूर्वी हें **सांख्यमत** पुष्कळ शतकें

उदयास आलें असून, तें अनेक शतकें प्रचारांतही असावें, असें ठरतें. व त्यावरूनच **कपिलाचा** काल इसवी शका-पूर्वी एक हजार वर्षांवर असावा असें अनुमान होतें.

योगदर्शन, व त्याचा प्रवर्त्तक पतंजलि.

योगदर्शन हें सदरीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें **सांख्य-दर्शनाचाच** भाग असून, कोठें कोठें त्या ऐवजीं **सांख्ययोग** असाही उपयोग केल्याचें आढळतें. मात्र इतकेंच कीं, **सांख्यदर्शनाप्रमाणें योगदर्शनांत** निरीश्वर मतवाद नाहीं. **योगदर्शनाचे** मुख्य प्रवर्त्तक **पतञ्जलि** आणि **याज्ञवल्क्य** असून ते ईश्वरवादी होते. सुप्रसिद्ध **महाभाष्य** ह्याच **पतञ्जलीनें** केलें असल्याविषयीं कल्पना आहे.

सिंहावलोकन.

योग या शब्दाचा अर्थ **ईश्वरसायुज्य**, अथवा निर्वाण, किंवा परेब्रह्मणिलय, असा असून तो **तैत्तिरीयारण्यक**, आणि **काथकोपनिषद्**, यांत, त्याच अर्थानें आढळतो.

पतंजलीनें ईश्वराचें लक्षण खालीं लिहिल्याप्रमाणें दिलें आहे:—

“ क्लेशकर्मविपाकाशयै
रपरामृष्टः पुरुषविशेषईश्वरः । ”

पंच क्लेश म्हणजे अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, आणि अभिनिवेश; कर्मचतुष्टय ह्मणजे शुक्ल, कृष्ण, शुक्लकृष्ण, आणि अशुक्लाकृष्ण; विपाक ह्मणजे कर्मफलें; व आशय

ह्मणजे संस्कार; हीं ज्या पुरुष विशेषाला कालत्रयीं देखील स्पर्श करीत नाहींत, तो ईश्वर होय.

पतंजलि हा इसवी सनापूर्वीं १४३ वर्षांवर, **कनिष्कराजाच्या** कारकीर्दीत उदयास आला होता.

जैमिनीदर्शन.

जैमिनिदर्शनाला पूर्वमीमांसा असें नांव आहे. तसेंच, ज्ञान प्राप्त होण्यासाठीं अगोदर कर्मच केलें पाहिजे अशाविषयीं या दर्शनांचा फारच कटाक्ष असल्यामुळें, त्यास **कर्मकांड**, किंवा **कर्ममीमांसाही** म्हणतात. यांत कर्माचे नित्य, नैमित्तिक, व काम्य, असे तीन भेद केले आहेत. उदाहरणार्थ, संध्यावंदनादि नित्य कर्म होय; ग्रहण स्नानादि नैमित्तिक; आणि ज्योतिष्टोमादि काम्य कर्म होय. त्याप्रमाणेंच विधीचेही अपूर्व, नियम, व परिसंख्या, असे तीन प्रकार सांगितले आहेत. **जैमिनीनें** " अथातो धर्म जिज्ञासा " येथून " अन्वाहार्येच दर्शनात " येथपर्यंत **पूर्वमीमांसादर्शनाचे** बारा अध्याय केले आहेत. ते सूत्रबद्ध असून त्यांजवर **शबरस्वामीचें** भाष्य आहे. शिवाय **कुमारिलभट्ट, विद्यारण्यस्वामी, मुरारिमिश्र,** इत्यादींनींही त्यांजवर टीकारूप ग्रंथ केले आहेत.

त्याचा काळ.

जैमिनी हा कर्ममीमांसा सूत्रांचा प्रवर्त्तक असून, शिवाय **सामवेदाचाही** प्रकाशक असल्याविषयीं **पुराणान्तरीं** माहिती

मिळते. व त्याचें नांव ऋग्वेदाच्या गृह्यसूत्रांत आढळतें. आतां, **जैमिनीची पूर्वमीमांसा** ही **वेदान्तदर्शन** किंवा **उत्तरमीमांसा** हिच्या अगोदरच प्रकट झाली होती, असें त्यांच्या नामधेयावरूनच प्रत्यक्ष सिद्ध होतें. आणि जर **उत्तरमीमांसा** ही इसवी शकापूर्वी १४०० वर्षांच्या सुमारास प्रणीत झाली होती असें मानलें, तर ह्या वर्षांपूर्वीही जैमिनिदर्शनाचा काळ होता, असें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं.

त्याचें मूलतत्व.

ह्या दर्शनाचें मूलतत्व असें आहे कीं, आत्मा हा सच्चिदानंद स्वरूप असून, त्याची सत्वरजस्तमोगुणात्मकीं प्रकृति आहे. ह्या प्रकृतीचे दोन भेद आहेत. एक माया, आणि दुसरी अविद्या. माया सत्वशुद्ध असून, अविद्या विशुद्ध आहे. मायेला आपल्या स्वाधीन करून घेऊन तिजवर आपला पगडा बसविल्यावर सर्वज्ञता, ईशशक्ति, आणि सर्व नियंतृत्व प्राप्त होतें. नाहींपेक्षां या कलेवराची परतंत्रता, व तत्संबंधीं आधिव्याधिजनित् दुःख, आणि त्रिविधताप, हे निरंतर अविद्येच्या कारणानें भोगावे लागतात. यासाठीं, तन्निवारणार्थ, प्रत्येक मनुष्यानें जीवेश्वराचें ऐक्य व्हावें या हेतूनें, कर्माचरण करून अंतःकरणशुद्धी मिळविली पाहिजे.

वेदान्तदर्शनाला उत्तरमीमांसा, ब्रह्ममीमांसा, शारीरकमीमांसा, किंवा **वेदान्त** अशींही नांवें आहेत.

वेदान्तदर्शन.

" मीमांसा " शब्दाचा अर्थ निरूपण असा असून, हा शब्द ब्राम्हणांत, याच अर्थानें आढळतो. वेदान्त शब्द तैत्तिरीय-आरण्यकांत, तसेंच काथकोपनिषद्, मंडुकोपनिषद, इत्यादि ठिकाणीं आढळतो. वेदान्त ह्मणजे सर्व उपनिषदांच्या इत्यर्थाचें एकीकरण होय. यांत परमेश्वर हा सर्वव्यापी असून, तो शुद्ध, बुद्ध, मुक्त, व सर्वज्ञ आहे, असें मानिलें आहे. तसेंच तो ह्या अखिल जगाचें आदिकारण असून, त्या जगाची उत्पत्ति, स्थिति, व लय, हीं केवळ इच्छा मात्रेंकरून करण्याचें त्याचें सामर्थ्य आहे.

त्यांतील तत्वें.

हा परमेश्वर परब्रह्म स्वरूप असून, भूत, वर्तमान, आणि भविष्य, ह्या तिन्ही काळीं अबाधित आहे. तो अनंत असून देश, काल, व वस्तुपरिच्छेद रहित आहे. तो केवळ आत्माच आहे, आणि सत् ह्या उपलक्षणानें अलंकृत असा आत्मा, सृष्टीच्या पूर्वीपासून आहे. आत्मा व ब्रह्म हें एकच आहे. त्याच्या ठिकाणीं नाना ह्मणजे अनेक, किंवा द्वैत, असें बिलकुल नाहीं. आतां जें जें म्हणून भिन्न भिन्न भासमान होतें, अथवा जो जो द्वैतभाव दृग्गोचर होतो, किंवा जी जी असमता दृष्टीस पडते, त्यापैकीं एकही खरें नसून, तें सर्व अज्ञान व भ्रांतिमूलक आहे. हें अज्ञान ह्मणजेच बंधन आणि ज्ञान ह्मणजेच

मोक्ष होय. ब्रह्मवेत्ताच परब्रह्म पावतो आणि ब्रह्मस्वरूपीं मिळतो. जो कोणी **ब्रह्म** व **आत्मा** हीं भिन्न समजतो, तो खचित भय पावतो. जो ब्रह्मास **असत्** ह्मणजे नाशवंत समजतो, तो स्वतःच असत् होतो. **ब्रह्म** निर्विकार असल्यामुळें तें तिन्ही अवस्थेंत आहे तसेंच राहतें. व पंचकोशरूपी गुहेंत साम्राज्य करीत असलेल्या **ब्रह्मा**प्रत जो जाणतो, त्याचेच इच्छित मनोरथ सिद्धीस जातात. ह्या प्रकारचें अद्वैत मत हेंच वेदान्तदर्शन असून, त्याविषयीं श्रुतीचीं वचनेंही आहेत; सबब त्यांतील मुख्याचे वेंचे याखालीं देतों:—

तत्संबंधीं श्रुतीचीं वचनें.

'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' । 'सदेव सौम्येदमग्र आसीत्' । 'आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्'।एकमेवाद्वितीयं ब्रह्म। 'नेह नानास्ति किंचन' । 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' । 'ब्रह्मविदाप्नोति परम्' । 'यदा ह्येवैष एतस्मिन्नुदरमन्तरं कुरुते अथ तस्य भयं भवति' । 'असन्नेव स भवति' 'असद्ब्रह्मेति वेद चेत्' । 'अस्ति ब्रह्मेति चेद्वेद संतमेनं ततो विदुरिति' । 'यो वेद निहितं गुहायां परमेव्योमन्से।श्नुतेसर्वान्कामान्सह'।'तत्त्वमसि'।'अहं ब्रह्मास्मि'। 'प्रज्ञानं ब्रह्म' । 'अयमात्मा ब्रह्म' ।

या दर्शनांत इच्छाशक्ति, ईशप्रसाद, कर्मविपाक, पुनर्जन्म, आणि श्रद्धामाहात्म्य, यांविषयींही विवेचन केलें आहे.

वेदान्तदर्शनाचा प्रवर्तक व्यास बादरायण हा असून, तो इसवी शकाच्या पूर्वी १४०० १५०० वर्षांच्या सुमारास झाला असल्याविषयीं कल्पना आहे. जैमिनीच्या कर्ममीमांसासूत्रांत, आत्रेय, बादरि, बादरायण, वगैरे आचार्यांचीं नांवें दृष्टीस पडतात.

वेदान्तदर्शनाचा प्रवर्तक व्यास.

वैशेषिकदर्शनास औलूक्यदर्शन, तर्कशास्त्र, किंवा **पदार्थविज्ञानशास्त्र,** असें म्हणतात. वैशेषिक म्हणजे ज्यानें एक प्रकारचा विशेष पदार्थ मानिला आहे तो होय. आणि त्याची व्याख्या खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

वैशेषिकदर्शन.

द्वित्वे च पाकजोत्पत्तौ विभागे च विभागजे ।
यस्य न स्खलिता बुद्धिस्तं वै वैशेषिकं विदुः ॥

हें शास्त्र **काश्यपगोत्रांतील कणाद** नांवाच्या ऋषीनें केलें असून, त्याचे " अथातो धर्मं व्याख्यास्यामः " येथपासून " तद्वचनादाम्नायस्य प्रामाण्यम् " येथपर्यंत सूत्रबद्ध दहा अध्याय आहेत; व प्रत्येक अध्यायांत दोन दोन आन्हिकें आहेत. त्यांतील विषय संक्षेपतः खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—१ समवेतपदार्थनिरूपण; २ द्रव्यनिरूपण; ३ आत्ममनोनिरूपण; ४ शरीरपरमाणु निरूपण; ५ शारीरक मानासिक कर्म निरूपण; ६ श्रौत-

त्याचा प्रवर्त्तक कणाद ऋषि.

धर्म निरूपण; ७ गुणसमवाय निरूपण; ८ निर्विकल्पसविकल्पप्रामाण्यव्यवस्थानिरूपण; ९ बुद्धि निरूपण; आणि १० अनुमान भेद निरूपण.

वैशेषिकदर्शनाचीं मूलतत्त्वें.

ह्या दर्शनांत एकंदर सहा पदार्थ मानिले आहेत. १ द्रव्य, २ गुण, ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष, आणि ६ समवाय. हे सर्व भावपदार्थ असून, ७ सातवा पदार्थ जो अभाव तोही कणादाला संमत असल्याविषयीं पंडितांची कल्पना आहे. द्रव्याचे नऊ प्रकार आहेत. १ पृथ्वी, २ जल, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ काल, ७ दिशा, ८ आत्मा, आणि ९ मन किंवा अंतःकरण. गुणाचे चोवीस भेद सांगितले आहेत. १ रूप. २ रस. ३ गंध. ४ स्पर्श. ५ संख्या. ६ परिणाम. ७ पृथक्त्व. ८ संयोग. ९ विभाग. १० परत्व. ११ अपरत्व. १२ गुरुत्व. १३ द्रवत्व. १४ स्नेह. १५ शब्द. १६ बुद्धि. १७ सुख. १८ दुःख. १९ इच्छा. २० द्वेष. २१ प्रयत्न. २२ धर्म. २३ अधर्म. आणि २४ संस्कार. कर्माचे पांच भेद आहेत. १ उत्क्षेपण. २ अपक्षेण. ३ आकुंचन. ४ प्रसरण. आणि ५ गमन. सामान्य किंवा जाति याचे दोन भेद आहेत. १ परसामान्य, ह्मणजे द्रव्यत्व; आणि २ अपरसामान्य, ह्मणजे पृथ्वी. आतां, "विशेष" या पदार्थाचें संक्षेपतः निरूपण असें आहे कीं, आकाश आणि परमाणु इत्यादि द्रव्यें नित्य, ह्मणजे

उत्पत्ति व नाशरहित, असल्याकारणानें तीं निरवयव आहेत. तेव्हां, त्या नित्यद्रव्यांचे परस्परांमध्यें भेदक असे अवयव नसल्यामुळें, त्यांचा भेदक असा " विशेष " या नांवाचा पदार्थ मानिला आहे. अभाव या पदार्थाचे १ प्रागभाव, २ प्रध्वंस किंवा नाश, ३ अत्यंताभाव, आणि ४ अन्योन्याभाव, असे चार भेद आहेत.

याप्रमाणें प्रत्येक पदार्थान्तर्गत असलेल्या गुणधर्मांचें सम्यग् ज्ञान झालें ह्मणजे शोक व मोह लयास जाऊन, शान्तीचा झरा अक्षय्य वाहूं लागतो. आणि यच्चयावत् मिथ्याज्ञानाची निवृत्ती होऊन, समाधानसुखैश्वर्याचें अखंड साम्राज्य प्राप्त होतें.

वैशेषिकसूत्रावर पादाचार्यांचें भाष्य.

वैशेषिक सूत्रांवर **पादाचार्यांनें** भाष्य केलें असून त्या भाष्यावर **उदयनाचार्यांची** टीका आहे. ह्या **उदयनाचार्यांनें** प्रसिद्ध **न्यायकुसुमांजलि** वगैरे ग्रंथ रचून सर्व नास्तिकमतांचें यथार्थ खंडन केलें आहे. ह्या वैशेषिक दर्शनांत सर्वसृष्टि परमाणूपासून ईशेच्छेनें निर्माण झाली असल्याविषयीं प्रतिपादन केलें आहे.

न्यायदर्शन व त्यांतील विषय.

न्यायदर्शनास आन्वीक्षिकी विद्याही ह्मणतात. न्यायदर्शन सूत्रबद्ध असून त्यांत एकंदर पांच अध्याय, व प्रत्येक अध्यायांत दोन दोन आन्हिकें आहेत.

यांत (१) पदार्थलक्षण; (२) अर्थापत्ति व संशयनिरूपण; (३) आत्मा, शरीर, इंद्रिय, बुद्धि, व मन, यांचे निरूपण; (४) प्रवृत्ति, दोष, प्रेत्यभाव, फल, दुःख, आणि अपवर्ग (मोक्ष), यांचें निरूपण; व (५) चोवीस जाती, आणि बावीस निग्रहस्थानें यांचें निरूपण; अशी विषययोजना आहे. तसेच ह्यांत प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन, दृष्टांत, सिद्धांत, अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितंडा, हेत्वाभास, छल, जाति, आणि निग्रहस्थान, असे सोळा पदार्थ सांगितले आहेत. ह्या सर्वांचें यथार्थ ज्ञान झालें ह्मणजे प्रवृत्ति, मिथ्याज्ञान, व अविद्या, यांचा साहजीकच नाश होऊन, चित्तास सदैव समाधान प्राप्त होतें.

न्यायदर्शनाचा प्रवर्तक गौतम.

न्यायदर्शनाचा प्रवर्तक **गौतम** असून, त्याला **अक्षपाद** अशीही संज्ञा आहे. यांत जगताची उत्पत्ति **ईशेच्छेनें** परमाणूपासून झाली असल्याविषयींचें प्रतिपादन आहे. ह्या दर्शनांतील "तर्क" शब्द **काठकोपनिषदांत** आढळतो. व "नैयायिक," आणि "केवळ नैयायिक," हीं पदें **पाणिनीच्या** सूत्रांत आढळतात, त्यावरून हें न्यायदर्शन **पाणिनीच्या** पूर्वी झालेलें असावें असें वाटतें. आतां **वेदान्त सूत्रांत, वैशेषिक दर्शनाचें** खण्डन केल्याचें, अनेक वेळां दिसून येत असून, त्यांत **गौतम** दर्शनाचा कोठेंही उल्लेख केल्याचें

आढळून येत नाहीं. त्यावरून वैशेषिक दर्शनानंतर न्यायदर्शन झालें असावें, असें अनुमान होतें. पाणिनीचा काल इ० स० पूर्वी सातशें वर्षें असल्याविषयीं, फार प्रसिद्ध आणि विद्वान पंडित डाक्तर भांडारकर[1] यांचें ठाम मत आहे.

हिंदूंपासून प्राप्त झालेलें ग्रीक लोकांचें ज्ञान.

हीं सर्व दर्शनें ग्रीक लोकांनीं आम्हां हिंदूंपासूनच शिकून घेतलीं असून, आरिस्टॉटल आणि पायथ्यागोरास यांच्या ग्रंथांत त्यांचें हुबेहूब प्रतिबिंब दिसून येतें. याविषयीं विद्वन्मणि कोलब्रूक असें लिहितात कीः–

"The Hindoos were, in this instance, the "teachers, and not the learners."

(Transactions of the Royal Asiastic Society, Vol. I. P. 579.)

षड्दर्शनांचें सार.

सदरहू षड्दर्शनांचा एकवट आणि सर्व बाजूंनीं विचार केला म्हणजे असें सहज लक्षांत येतें कीं, प्रथमतः शुद्ध ब्रह्म हें ओतप्रोत सर्वत्र भरलेलें असून, त्या आनंदमय, निर्वि-

---

1. "Panini, therefore, must have flourished in the beginning of the seventh Century before the Christian Era, if not earlier still; and against this conclusion I believe no argument has been or can be brought except a vague prejudice."

(Dr. Bhándárkar's History of the Dekkan P. 8.)

कल्प, आणि शुद्ध स्वरूपांत, जेव्हां एकाएकी, "**ब्रह्माहमास्मि। अथ एकाकी न रमते। एकोऽहं बहु स्याम्**" या श्रुतिवाक्यांतील कल्पनेचा उठाव झाला, तेव्हां लागलींच, अहंभावनेच्या विकारामुळें, सच्चिदानंदस्वरूप जो आत्मा, त्याजवर मायेचें पूर्ण आवरण होऊन, सृष्टिरचनेस प्रारंभ झाला. तो असा कीं:— "**तस्मादात्मन आकाशः संभूतः। आकाशाद्वायुः। वायोरग्निः। अग्नेरापः। अद्भ्यः पृथिवी। पृथिव्या ओषधयः। ओषधीभ्योऽन्नम्। अन्नात्पुरुषः**" या श्रुतींतील वाक्याप्रमाणें क्रमाक्रमानें, आत्म्यापासून आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथिवीपासून ओषधी, ओषधीपासून अन्न, आणि अन्नापासून पंचभूतात्मक देह झाला. याप्रमाणें मी ब्रह्म आहे, अशी भावना धरणारें जें शबलब्रह्म, म्हणजे मिथ्या, ब्रह्म, त्याला, "**एकोऽहं बहु स्याम्**" ही कल्पना होण्याबरोबर, अनंत सृष्टि होऊन, हें भासमान होणारें विलक्षण **विराट्स्वरूप** बनलें.

आतां, "अन्नात्पुरुषः," ह्मणजे अन्नापासून झालेला देह, हा मात्र, '**एकोऽहं बहु स्याम्**' अशी भावना कल्पिणारें समष्टिरूप ईश्वरतत्त्व जें कारण, त्या कारणाचा कार्यभाग झाला. परंतु तो प्रत्येक प्राण्याचें अहंभावना धारण करणारें "ज्ञान" नव्हे; असें, "**अन्नमय-**

प्राणमयमनोमयविज्ञानमयानन्दमयान्मे शुध्यतां ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा" या श्रुतिवाक्यावरून सिद्धवत् आहे. तसेंच शंकराचार्यांच्या खालीं लिहिलेल्या महा वाक्यावरूनही तें उघड दिसत आहे:—

आत्मा विनिष्कलो ह्येको देहो बुद्धिभिरावृतः ।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमतः परम् ॥

आणि ज्याप्रमाणें **शबलब्रह्म** मिथ्या आहे, त्याप्रमाणेंच प्रत्येक प्राणिमात्राच्या देहांतील अहंभाव धारण करणारें जें ज्ञान, तेंही मिथ्याच आहे. तथापि, तें आत्मज्ञानेंकरून मुक्त होण्यास पात्र आहे. ह्मणजे यावत्कालपर्यंत अज्ञानाच्या आवरणानें **आत्मा**, आणि **देह**, यांचें ऐक्य मानून, आपण बद्ध आहोंत, अशी या जिवाची मिथ्या कल्पना आहे, तावत्कालपर्यंत तो बंधनांतच आहे यांत संशय नाहीं. परंतु जेव्हां ह्या देहांत ज्ञानाचा प्रकाश पडून अशी समज होते कीं, या पंचभूतात्मक देहाचा व आत्म्याचा कांहींच संबंध नाहीं; देह अचेतन असून **आत्मा** चैतन्यरूप आहे; तसेंच तो निरञ्जन असून शुद्ध, बुद्ध, आणि मुक्त आहे; तेव्हांच मनाची स्थिरता होते. आणि तसा अनुभव येऊं लागला, ह्मणजेच तें बंधनापासून मुक्त होऊन **आत्मस्वरूपीं** लीन होतें, यांत तिळमात्रही शंका नाहीं.

खरोखर पाहतां, '**यस्य भासा सर्वमिदं विभाति**' या श्रुतिवाक्याप्रमाणें, ह्या सृष्टीचें मूलकारण शबलब्रम्ह

म्हणजे मिथ्या ब्रह्म असून, या जिवाचें आणि देहाचें मीपण धारण करणें, हें वंध्यासुतवत् मिथ्या आहे. म्हणजे मूळचें कांहींच नसून "मी आहे," अशी कल्पना झाल्यानें आत्म्याचें सच्चिदानंदस्वरूपावर अज्ञानाचें पडळ पडून, त्या अहंभावनेच्या योगानेंच हें सर्व जगत् खरें असल्याविषयीं लटका भास झाला आहे. आणि म्हणूनच "**अज्ञानमेवास्य हि मूलकारणम्**" ह्या **रामगीतेंतील** वाक्याप्रमाणें अखिल सृष्टीचें मूलकारण अज्ञान, म्हणजे अहंभाव माया होय. आणि हें बंधनमूलक अज्ञान जाऊन ज्ञान प्राप्त झालें, म्हणजेच मोक्ष प्राप्त होतो. कारण कीं, "**ज्ञानादेव तु कैवल्यम्**" हा **वेदाचा** परम सिद्धान्त असून, तो अनुभव सिद्ध, आणि निर्विवाद आहे.

एकंदरीनें पाहतां, **षड्दर्शनांतील** मतांचें हेंच सार दिसतें कीं, देहभावनेच्या योगानें जो त्रिविधताप होतो तो हरेकप्रकारांनीं नाहींसा करून, मन ज्या ज्या साधनांनीं **निर्विकल्प** राहील त्या सर्वांची योजना करून, त्यास निरंतर शान्तिसागरांत ठेवावयाचें.

निरीश्वर वादी.

असो. याशिवाय निरीश्वर मतवाद्यांचीही नास्तिकदर्शनें आहेत. तीं मुख्यत्वेंकरून सात आहेतः— १ चार्वाकदर्शन; २ बौद्ध दर्शन; ३ योगाचारदर्शन; ४ माध्यमिकदर्शन; ५ सौत्रां

तिकदर्शन; ६ वैभाषिकदर्शन; आणि ७ दिगंबर किंवा जैनदर्शन. ह्या नास्तिकमताचा मुख्य प्रवर्तक म्हटला म्हणजे प्रसिद्ध व पुराण **कपिलमुनि** होय. त्यानें निरीश्वर मताचें प्रथमतः प्रतिपादन करून त्याचें बीजारोपण केलें. त्याचाच कालवशात् वृक्ष बनून तो **बुद्धाच्या** वेळीं अति विसृत झाला. आतां **चार्वाक**, व **बौद्धादि** निरीश्वर मतांत, **चार्वाक** मत नीतिभ्रष्ट असल्यामुळें, अतिदोषार्ह आहे. त्यामुळें त्याचा परिणाम लोकसमाजावर कोणत्याही रीतीनें चांगला होण्याचा कधीं देखील बिलकुल संभव नाहीं.

चार्वाक, बुद्ध, प्रभृति.

कारण, या मतांत प्रत्यक्ष प्रमाण फक्त एकच मानलें असून, त्याचे विषय म्हटलें म्हणजे १ पृथिवी, २ आप, ३ तेज, आणि ४ वायु, असे चारच भासमान होणारे पदार्थ होत. आनुमानिक व शाब्दिक पदार्थ, ह्मणजे आकाश, काल, दिक्, आत्मा, मन, परमेश्वर, पुण्य, पाप, स्वर्ग, आणि नरक, इत्यादि या मतांत मानिलेले नाहींत. त्या कारणानें परपीडा, दुराचरण, आणि पापकर्म, इत्यादिकांस दंडभीति; तसेंच परोपकार, सदाचरण, आणि पुण्यकर्म, इत्यादिकांस स्वर्गादि फलप्राप्ति, वगैरे कांहींच सांगितलें नसल्यामुळें, सामाजिक नीतीवर, अथवा आचरणावर, कोणत्याही प्रकारचा दाब राहण्यास साधन राहिलें नाहीं. शिवाय पृथिवी, आप,

चार्वाकाचें नीतिभ्रष्ट मत.

तेज, आणि वायु, या चार महाभूतांचे कांहीं भाग नियमित प्रमाणानें एकत्र होऊन हा देह बनतो; व त्या समुदित भागापासून, रसायन क्रियेनें त्या देहांतच चैतन्य म्हणजे, अहंभाव व ज्ञान उत्पन्न होतें; असाही ह्या मतांतील आशय आहे. उदाहरणार्थ, मादक पदार्थांचा संयोग झाल्यानें मदशक्ति येते; गंधकादि पदार्थांचा संयोग झाल्यानें अग्निशक्ति उत्पन्न होते; आणि पूर्वोक्त चार महाभूतांपासून हा देह, व चैतन्यशक्ति किंवा जीव, उत्पन्न होतो. आणखी असें कीं, अर्थशास्त्र म्हणजे द्रव्यसंपादन, आणि कामशास्त्र म्हणजे कामशांति, हेच कायते दोन पुरुषार्थ, या चार्वाक मताप्रमाणें मानलेले असल्यामुळें, जिवांत जीव आहे तावत्कालपर्यंत मजा मारून, येनकेन प्रकारेण चमन् उडवावी, हेंच काय तें सुख; आणि या देहाहून भिन्न असा दुसरा आत्मा नसल्यामुळें, देहाचा नाशच कायतो मोक्ष; असा या दर्शनांतील अभिप्राय आहे.

आतां, कोणी अशी शंका काढील कीं, जर ह्या सृष्टीचें आदिकारण ईशशक्ति नाहीं, अथवा पुण्य किंवा पापही नाहीं तर, हें जग कसें उत्पन्न झालें, आणि सुख दुःखात्मक असमानता प्राप्त होण्याचें काय कारण? ह्या प्रश्नाला चार्वाक इतकेंच उत्तर देतो कीं, तें निसर्गतः तसेंच असल्यामुळें, त्याचा कर्ता करविता कोणीच नाहीं.

अग्निरुष्णो जलं शीतं शीतस्पर्शस्तथाऽनिलः ।
केनेदं रचितं ? तस्मात्स्वभावात्तद्व्यवस्थितिः ॥

चार्वाकमतांतील सिद्धान्त.

वेद ईश्वरप्रणीत असल्याविषयीं चार्वाकाची बिलकुल संमति नसून, त्यांतील कर्मकांड, ज्ञानकांड, व यज्ञयागादि क्रिया, वगैरे धूर्त लोकांनीं आपल्या उदरपोषणार्थच करून ठेविल्या आहेत, असें त्याचें ह्मणणें आहे. या चार्वाक मतांतील सिद्धान्त खालीं लिहिलेल्या श्लोकांवरून चांगले व्यक्त होतील.

"न स्वर्गो नापवर्गो वा नैवात्मा पारलौकिकः ।
नैव वर्णाश्रमादीनां क्रियाश्च फलदायिकाः ॥१॥
अग्निहोत्रं त्रयो वेदास्त्रिदण्डं भस्मगुण्ठनम् ।
बुद्धिपौरुषहीनानां जीविका धातृनिर्मिता ॥ २ ॥
पशुश्चेन्निहतः स्वर्गं ज्योतिष्टोमे गमिष्यति ।
स्वपिता यजमानेन तत्र कस्मान्न हिंस्यते ॥ ३ ॥
मृतानामपि जन्तूनां श्राद्धं चेत्तृप्तिकारणम् ।
गच्छतामिह जन्तूनां व्यर्थं पाथेयकल्पनम् ॥ ४॥
स्वर्गस्थिता यदा तृप्तिं गच्छेयुस्तत्र दानतः ।
प्रासादस्योपरिस्थानामत्र कस्मान्न दीयते ॥ ५ ॥
यावज्जीवेत्सुखं जीवेदृणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मी भूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥ ६ ॥
यदि गच्छेत्परं लोकं देहादेशविनिर्गतः ।

कस्माद्भूयो न चायाति बंधुस्नेहसमाकूलः ॥ ७ ॥
ततश्च जीवनोपायो ब्राह्मणैर्विहितास्त्विह ।
मृतानां प्रेतकार्याणि न त्वन्यद्विद्यते क्वचित् ॥ ८ ॥
त्रयो वेदस्य कर्तारो भण्डधूर्त निशाचराः ।
जर्फ(र्भ)री तुर्फरीत्यादि पंडितानां वचः स्मृतम् ॥९॥
अश्वस्यात्र हि शिस्नं तु पत्नीग्राह्यं प्रकीर्तितम् ।
भंडैस्तद्वत् परं चैव ग्राह्यजातं प्रकीर्तितम् ॥ १० ॥
मांसानां खादनं तद्वन्निशाचरसमीरितम्'' इत्यादि।

चार्वाकाचें जन्म अवंती देशांत, क्षिप्रा व चमला ह्या नद्यांच्या संगमावर शंखोद्धार नामक क्षेत्रांत झालें. त्याच्या बापाचे नांव इंदुकांत व आईचें नांव रुग्विणी असें असून, तो होऊन गेल्याला सुमारें अडीच हजार वर्षांवर वर्षे झालीं असावीं असें अनुमान आहे.

चार्वाकाची जन्मभूमि, व काल.

बौद्ध धर्माचें मूळ चार सिद्धान्त आहेत. ते हे कीं:—

१ सर्वं क्षणिकं क्षणिकम्. २ सर्वं दुःखं दुःखम्. ३ सर्वं स्वलक्षणं स्वलक्षणम्. व ४ सर्वं शून्यं शून्यम्. ह्या चार सिद्धान्तांस भावना अशी संज्ञा असून, १ सर्वशून्यत्व; २ बाह्य शून्यत्व; ३ बाह्यार्थानुमेयत्व; आणि ४ बाह्यार्थ प्रत्यक्षत्व; असे चार प्रकारचे वाद मानले आहेत. एकंदरींत हें जगत् क्षणिक, दुःखरूप, स्वलक्षण, आणि शून्य,

बौद्धमतसिद्धान्त.

असें मानावें म्हणजे सर्व संकल्पांचा क्षय होऊन, रागादि ज्ञानाची जी परंपरा तिचाही नाश होतो. आणि ह्याप्रमाणें वासनादिकांचा लय झाला म्हणजेच शून्यस्वरूपी उत्तम निर्वाण किंवा मोक्ष होय, असा या **बौद्ध** मताचा कटाक्ष आहे. ह्या मतांत १ माध्यमिकदर्शन, २ योगाचार दर्शन, ३ सौत्रांतिकदर्शन, आणि ४ वैभाषिकदर्शन, यांचा समावेश होतो. कारण, **माध्यमिक**, **योगाचार**, **सौत्रांतिक**, आणि **वैभाषिक**, असे **बुद्धाचे** चार शिष्ये असून, त्या वृद्ध गुरूच्या उपदेशावरूनच त्यांस विद्या प्राप्त झाली होती. परंतु प्रत्येकाच्या बुद्धितीव्रतेप्रमाणें त्यांच्यांत भिन्न भिन्न मतें पसरलीं. आतां **बुद्धाचें** इतिवृत्त, आणि त्याचा काळ, यांविषयीं सविस्तर विवेचन सातव्या पुस्तकांत, चाळीसाव्या भागांत **बौद्धधर्म** या सदराखालीं केलें आहे. सबब तत्संबंधीं जास्त हकीकत या ठिकाणीं लिहिण्याचें कारण नाहीं.

जैनमतांतील तत्त्व.

दिगंबर किंवा **जैन** मतांत, आत्मा अथवा जीव मानिला असून, तो शरीरपरिमाण, स्थिर, जगाचा कर्ता, नित्य, आणि सर्वव्यापि, असा आहे. त्यास **अर्हत्**, **जिन**, किंवा **परमेश्वर** असें म्हणतात. व तो सर्वज्ञ, रागादि दोषरहित, आणि यथार्थवादी असल्याविषयीं त्याचें वर्णन आहे. या मतांत सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, व सम्यक्चरित्र, अशीं तिन्हीं

समुदायरूपानें मोक्षाचीं साधनें असून, त्यांपैकीं एखादेंही उणें असल्यास मोक्ष होत नाहीं, असें हें मतवादी समजतात.

जैनमताचा प्रवर्तक अर्हत् नामक आचार्य, व त्याचा काळ.

या धर्माचा प्रवर्तक प्रसिद्ध अर्हत् नामक होऊन गेला. त्याचें जन्म बहार प्रांतांत पाटणा शहरीं झालें असून त्याचा काल बुद्धानंतरचा असल्याविषयीं अनुमान आहे.

हिंदूंची तत्वान्वेषण जिज्ञासा व तिचा काल.

हिंदूंची ही तत्वान्वेषण जिज्ञासा आजकालची नसून, तिचें बीज फारच पौराणिक कालांतलें आहे. आणि त्याविषयीं शोधकबुद्धीनें पाहिलें तर आपणास असें कळून येईल कीं, सृष्टीच्या आदिकारणाचे गहन विचार, व तत्संबंधीं ऊहापोह, हे अतिपुराण वैदिक कालांतही चाललेले असून, त्यांविषयीं त्यावेळीं देखील प्रचंड भवति न भवति होत असे. ऋग्वेद संहितेंत, अरण्यकांत, आणि उपनिषद् भागांत, तत्संबंधीं पूर्णत्वाचे विचार क्षणोक्षणीं आढळतात. इतकेंच नाहीं तर, त्या मूलनिर्झरापासूनच हल्लींचा तत्वज्ञानोदधि निर्माण झाल्याचें दिसतें; व तदवलोकनानेंच हिंदूंच्या बुद्धिप्रगल्भतेचें सर्व जगास आश्चर्य वाटतें, आणि त्यांच्या ज्ञानाविषयीं सर्वांस विस्मय होतो.

प्रोफेसर वेबर असें लिहितात कीं:—

" The beginnings of philosophical speculation go back, as we have already more than once seen (see especially P P. 26.–27), to a very remote age. Even in the Samhita of the Rik, although only in its later portions, we find hymns that bespeak a high degree of reflection. "

(The History of Indian Literature,)
P. 232.

" Lastly, Philosophical speculation also had its peculiar development contemporaneously with and subsequently to, the Brahmanas. It is in this field and in that of grammar that the Indian mind attainned the highest pitch of its marvellous fertility in subtile distinctions, however abstruse or naive on the other hand , the method may occasionaly be, "

(H. I. L. P. 26).

भाग २२ वा.

ज्योतिःशास्त्र, भूमितिशास्त्र, अंकगणित, व बीजगणितशास्त्र.

ज्योतिःशास्त्र.

तत्त्वविद्येप्रमाणें इतर शास्त्रांत हिंदूंची प्रवीणता.

तत्त्वविद्येप्रमाणेंच ज्योतिषादि शास्त्रांत, आणि इतर उपयुक्त कलांतही, हिंदूंची प्रवीणता होती. ज्योतिःशास्त्रांत हिंदूंचा शोध फार प्राचीनकालापासून होता, व तो करण्याची त्यांस अवश्यकताही पडली. कारण, वेदविहितमार्गाप्रमाणें आचरण करण्याचें खरें अगत्य त्यांस असल्यामुळें, भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न कर्मे करण्यासाठीं, आणि वेदाज्ञेस अनुसरून तीं पाळण्यासाठीं, ग्रहनक्षत्रावलोकनांनीं आकाशांतील गोलांचें यथामति अन्वेषण करणें, व त्यांचे यथावकाश वेध घेणें, हें तत्कालीन हिंदूंस केवळ जरूरीचें होतें. त्यामुळें त्या कामांत त्यांचा फार पुराणकालापासून सहजींच प्रवेश होऊन, उद्यमसातत्यानें कालवशात् त्यांस आपोआपच प्रवीणता प्राप्त झाली.

हिंदू ज्योतिर्विद्येचा व तिचा पुरातन शोध.

हिंदू ज्योतिर्विद्येचा हा पुरातन शोध, कमींत कमी तीन हजार वर्षांपूर्वी झाला असल्याविषयीं, पाश्चिमात्य पंडित, आणि त्यांतही विशेषतः हिंदुशास्त्रांचें व कलांचें यथार्थ पौराणत्व स्वीकारण्यांत अति पराङ्मुख, असे प्रोफेसर वेबर प्रभृति विद्वान् व गुणागुणज्ञ, देखील कबूल करतात. ज्योतिःशास्त्रांत हिंदूंचे प्रथमचे शोध सुमारें सहा सात हजार वर्षांपूर्वीचे अगदीं

हिंदुज्योतिर्विद्येचा पुरातन शोध असल्याविषयीं, नामांकित ग्रंथकारांचे अभिप्राय.

१ ज्योतिर्विद्येंत हिंदुंचा फार पुरातन शोध असल्याविषयीं लिहितांना, प्रसिद्ध इतिहासकार एलफिन्स्टन् असें म्हणतात कीं:—

" Cassini, Bailly, and Playfair maintain that observations taken upwards of 3000 years before Christ, are still extant, and prove a coniderable degree of progress already made at that period. "

* * * * *

" All astronomers, however, admit the great antiquity of the Hidu observations; and it seems indisputable that the exactness of the mean motions that they have assigned to the Sun and Moon could only have been attained by a comparison of modern observations with others made in remote antiquity. Even Mr. Bentley, the most strenuous opponent of the claims of the Hindus,

(पुढें चालू)

स्वतंत्र रीतीनें झाले असून, त्यांत त्यांचें पाऊल बरेंच पुढें सरसावल्यासारखें दिसतें. हा स्वतंत्र शोध इ० श० पूर्वी

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

pronounces, in his latest work, that their division of the ecliptic into twenty seven lunor mansions (which supposes much previous observaton) was made 1442 years before our Æra; without relying upon his authority in this instance, we should be inclined to believe that the Indian observations could not have commenced at a later period than thc fifteenth century before Christ. This would be from one to two centuries before the Argonautic expedition and the first mention of astronomy in Greece. "

" The astronomical rule relating to the calender, which has been quoted from the Vedas, is shown to have been drawn up in the fourteenth century before Christ; and Parashar, the first writer on astronomy, of whose writings any portion remains, appears to have flourished about the same time. "

(Elphinstone's History of India.)
P. P. 245–246.

यासंबंधानें प्रोफेसर वेबर असें लिहितात कीं,

" The mention of the Nakshatradarsa " stargazer ", in *v.* 10 and of the *ganaka*, " calculator " in v. 20, permits us, at all events, to conclude that astronomical, *i. e.*, astrological science was then actively pursued. "

(पुढें चालू)

११८१ वर्षांपलीकडेही अनेक शतके अगोदर झाला असावा, असें अनुमान आहे. कारण लगधाचार्यानें जो ज्योतिष ग्रंथ केला, त्यावरून त्याच्या वेळीं सूर्य कोणत्या अयनांशावर होता हें कळतें. तसेंच त्यानें आपल्या वेळचीं अयनवृत्तांचीं जीं संपातस्थळें सांगितलीं आहेत त्यावरून, त्या वेळच्या व हल्लींच्या संपातबिंदूत २३ तेवीस अंशाचें अंतर पडल्याचें दिसतें. आतां, संपातबिंदु ह्मणजे विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांचा ज्यांत परस्पर छेद होतो ते दोन बिंदु असून, त्यांस १° अंश क्रमण्यास सुमारें दोन हजार वर्षें लागतात. सबब, या मानानें पाहिलें तर, लगधाचा ज्योतिषग्रंथ इ० श० पूर्वी ११८१ वर्षांच्या सुमारास झाला असावा, यांत बिलकुल शंका नाहीं. आणि खरोखर पाहिलें तर लगधाच्या पूर्वीं देखील

आर्य ज्योतिःशास्त्राचा उदयकाळ, किंवा वैदिककाळ.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

"We have already seen that astronomy was cultivated to a considerable extent even in Vedic times, and we found it expressly specified by Strabo as a favourite pursuit of the Brahmans."

* * * * *

"To the elaboration of a quinquennial cycle with an intercalary month a pretty early date must be assigned, since the latter is mentioned in the Rik-Samhita."

(H. I. L. P. P. 112–113–246–247.)

बरींच शतकें अगोदर, ग्रहांचें अवलोकन होऊन त्यांचे वेधही त्या प्राचीन ऋषींनीं वेळोवेळीं घेतले असावेत, याविषयीं कांहीं संशय नाहीं. त्यांनीं एका वर्षाचे ३६० दिनविभाग कल्पून, प्रत्येक पांच वर्षांस एक अधिक मासाची योजना केली होती. व हें त्यांनीं काढलेलें वर्षकालमान बहुतेक अंशीं खऱ्या प्रमाणाचें होतें. याशिवाय कांहीं स्थिर ग्रह, व चंद्राची गति, आणि सत्तावीस नक्षत्रें, हीं देखील त्यांनीं शोधून काढली होतीं. आतां, सदरहू नक्षत्रें इसवी शकापूर्वी १४७२ वर्षांपासून तों ९३६ वर्षांच्या दरम्यान शोधून काढलीं असावीं, असें प्रोफेसर वेबरचें ह्मणणें आहे. **तैत्तिरीयसंहितेंत** सत्तावीस नक्षत्रांचीं नांवें दिलीं असून, **वाजसनेयिसंहितेंत** आणि **छंदोग्योपनिषदांत** " तारा प्रेक्षक " व " ज्योतिःशास्त्र " यांचा नामनिर्देश केल्याचें आढळून येतें.

त्याची वृद्धि, व यावनिक काळ.

वैदिक कालानंतर इसवी शकापूर्वी ३२७ व्या वर्षी, **शिकंदर बादशहानें हिंदुस्थानावर** स्वारी केली. त्यानंतर ग्रीक लोकांबरोबर हिंदूंचें बरेंच दळणवळण पडल्या कारणानें, ग्रीक विद्येचा भरतखंडावर, कांहीं अंशानें अंमल पसरला. त्यामुळें प्राचीन निर्मल अशा **आर्यज्योतिर्विद्येंत** संकर होऊन **यवन** (**ग्रीक**) ज्योतिर्विद्यांकुर, व तत्संबंधीं पारिभाषिक शब्द, यांचा आपोआपच प्रादुर्भाव झाला. तेव्हां अर्थातच,

त्या पाश्चिमात्य प्रकाशानें आर्यभट्ट, आणि वराहमिहिर, इत्यादि विद्वन्मुकुटमणींनीं आर्यज्योतिःशास्त्रास चलन देऊन, तदुत्कर्षार्थ अति परिश्रम केले. त्यायोगानें हें आर्यशास्त्र पूर्णतेस येऊन, तें इतकें महत्वास व गौरवास चढलें कीं, त्यांत हिंदूंची दिगंत कीर्ति झाली. आणि कांहीं कांहीं गोष्टींत तर हिंदूंचे ग्रीक लोकांपेक्षांही ज्यास्त शोध अस- ल्यामुळें, ग्रीक लोकांनीं देखील हिंदूंचें गुरुत्व घेतलें, व क्रॉनिकन् पास्चेल नामक ग्रंथांत हिंदुमताप्रमाणें त्यांनीं दुरुस्ती केली. (इ० श० ६१०–६४१). याप्रमाणें हिंदूंचे ग्रीक लोक हे चेले बनल्यावर, इसवी शकाच्या आठव्या आणि नवव्या शतकांत, आरब लोकांनीही हिंदूंपासून ज्योतिर्विद्येचीं मूलतत्वें शिकून घेतलीं. हिंदूंच्या विद्वत्तेमुळें आरबी लोक त्यांस अति पूज्य मानीत, आणि त्यांचें फार गौरवही करीत. आरब लोकांनीं ह्या विद्येचा अभ्यास करण्यासाठीं फारच प्रयत्न केले. आणि ज्योतिर्ज्ञान प्राप्त होण्याच्या हेतूनें इराणांतील कालिफांकडून हिंदूशास्त्रज्ञांस बगदाद येथील राजधानींत बोलावून आणून, त्यांच्या देखरेखीखालीं ज्योतिःसिद्धांताचें आरबी भाषेंत त्यांनीं भाषांतर करविलें, व त्यास सिन्धेन्द असें नांव दिलें. अशा प्रकारचा हिंदुज्योतिःशास्त्राचा उत्कर्ष भास्कराचार्यापर्यंत

त्याचा उत्कर्ष काळ.

त्याचा अस्तकाल.

सतत चालला. हा अति बुद्धिमान् गणिती इसवी शकाच्या बाराव्या शतकांत उदयास आला, आणि तदनंतर **मुसलमान** लोकांच्या स्वाऱ्या **हिंदुस्थानावर** वारंवार होऊं लागल्यामुळें हें शास्त्र तसेंच मागें पडलें. पुढें इ० स० ११९० पासून तों १८०० पर्यंत, **भरतखंडांत** क्वचित् क्वचित् ज्योतिःशास्त्रज्ञ होऊन गेले; पण त्या सर्वांत प्रसिद्ध ह्मटला ह्मणजे दुसरा राजाजयसिंग होय.

आर्य ज्योतिर्विद्येचे चार काळ.

ह्या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार केला ह्मणजे **आर्यांच्या** ज्योतिषकालाचे चार विभाग करणें फार सुगम होतें. इतकेंच नाहीं तर, तसें करणें मोठें सोयीस्करही पडतें. आतां, या चार विभागांस १ **उदयकाल** (किंवा **वैदिक** काल), २ **प्रगमन** काल (किंवा **यावनिक** काल), ३ **उत्कर्ष** काल, आणि ४ **अस्त** काल, अशीं नांवें देऊन, त्या सर्वांचा क्रमशः विचार करूं.

वैदिक किंवा उदय कालांतील शोध.

वेदकालांत **हिंदु** ज्योतिर्विद्येचा उदय असून **वेद**कवींनीं तितक्या पुरातनकालीं, त्या शास्त्रांत चांगले परिश्रम केले होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. चंद्राचें परिवर्त्तन, सूर्याचें आकर्षण, आणि ग्रहणाचें कारण, इत्यादि महत्वाचे शोध त्यांनीं लाविले होते. चंद्रगतीचा वेध घेऊन

त्यांनीं प्रथम सत्तावीस नक्षत्रें शोधून काढलीं. याविषयीं ऋक्‌संहिता, तैत्तिरीय संहिता, अथर्वसंहिता, आणि तैत्तिरीय ब्राह्मण, यांत उल्लेख आढळतो. ह्याच नक्षत्रांचें पुढें चिनी व आरबी लोकांनीं अनुकरण केलें. तदनंतर सूर्याचें सदैव आकर्षण पृथिवीवर आहे, हा सर्वमान्य सिद्धान्त त्यांनींच शोधून काढला. ह्याचें प्रमाण श्रुतींत, ऋक्‌संहितेच्या तिसऱ्या अष्टकांत चवथ्या अध्यायाच्या पांचव्या वर्गांत, सांपडतेंः—

सत्तावीस नक्षत्रें.

मित्रोजनान्यातयतिब्रुवाणोमित्रोदाधारपृथिवीमुतद्यां।
मित्रःकृष्टीरनिमिषाभिचष्टेमित्रायहव्यंघृत वज्जुहोत ॥

ह्या ऋचेचा तात्पर्यार्थ असा आहे कीं, सर्व प्रजेला मित्राचा म्हणजे सूर्याचाच आधार असून, तो पृथिवीला आपल्याकडेसच आकर्षण करतो; आणि ह्या त्याच्या आकर्षणांतून ती निमिषमात्रही सुटत नाहीं. सदरहू शोधानंतर कांहीं कालानें, अत्रि नामक ऋषीनें ग्रहण कसें लागतें याविषयीं प्रथम शोध लाविला.

सूर्याचें आकर्षण.

अत्रिःसूर्यस्यादिविचक्षुराधात्स्वर्भानोरपमायाऽ
अघुक्षत् ॥ यं वै सूर्यं स्वर्भानुस्तमसा विध्यसुरः।
अत्रयस्तमन्वविंदन्नह्यऽन्येऽअशक्नुवन् ॥

ऋक्‌संहिता. अष्टक ४. अध्याय २. वर्ग ८.

ह्याचा तात्पर्यार्थ इतकाच कीं, सूर्यमण्डल म्हणजे सुर अथवा स्वप्रकाशक गोल, याचें दर्शन होण्याला, असुर म्हणजे परप्रकाशक गोल (ज्यास स्वर्भानु किंवा स्तर्भानु अशी संज्ञा आहे ते), अटकाव करतात. हा वेध प्रथमतः अत्रींनेंच शोधून काढला असून, तत्संबंधीं ज्ञान पूर्वीं दुसऱ्या कोणासही नव्हतें.

ग्रहणाचें कारण.

तसेंच, सूर्याच्या रश्मितेजानें पाण्याची वाफ बनून ती आकाशांत सर्वत्र पसरते, व पुढें तिजपासूनच मेघ निर्माण होऊन त्या योगानेंच पर्जन्यवृष्टि होते, हा शोधही आमच्या वेद-कालीन हिंदूंस लागला होता. याविषयीं श्रुतीचा व स्मृतीचा आधार खालीं देतों:—

वारिरूपान्तर.

अग्निर्वाइतोवृष्टि मुदीरयाति मरुतः
स्तृष्टां नयंति यदा खलुवा असावादित्योन्यङ्
रश्मिभिः पर्यावर्ततेथ वर्षति ।

(यजुर्वेद. आपस्तंभ संहिता. दुसरें अष्टक.
चवथा अध्याय. अक्रावा अनुवाक.)

अग्नौ प्रास्ताहुतिः सम्यक् आदित्यमुपतिष्ठते ।
आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजा ॥

(स्मृति.)

ज्योतिःशास्त्रावरील नानाविध ग्रंथांचा, भरतखंडांतील

इतर ग्रंथसंपत्तीबरोबरच नाश झाला, यांत संशय नाहीं. कांहीं ग्रंथसमूह शत्रूंच्या हातीं लागल्यामुळें, त्यांनीं त्याचा चुराडा उडविला, आणि कांहीं वाळवीच्या भक्ष-स्थानीं पडल्याकारणानें, त्यांनीं तो खाऊन फस्त केला. थोड्या दिवसांपूर्वी " अद्भुतसागर " नांवाचा ज्योतिःशास्त्रावरील ग्रंथ वाळवीच्या तडाक्यांत सांपडलेला, एका गृहस्थास मिळाला. तदवलोकनानें आमच्या पूर्वजांचे अगाध शोध, त्यांचे उद्यमसातत्य, आणि अनुपम-ज्ञान यांचें उत्कृष्ठ दिग्दर्शन होतें.

इंद्र धनुष्य.

सदहू ग्रंथाच्या नांवाप्रमाणेंच त्यांतील विषय फारच गहन व अद्भुत आहे. इंद्र धनुष्य, सूर्यप्रकाशमीमांसा, धूमकेतु, इत्यादि संबंधीं ऊहापोह, आणि तत्वविवेचन त्यांत दिसून येतें; व इतक्या प्राचीन काळीं अशा परिपक्कतेचे शोध कसे लागले, याविषयीं नवल वाटतें; आणि त्यापुढें पाश्चात्यांच्या नवीन कल्पनाचातुर्याचें कांहींच आश्चर्य वाटेनासें होतें.

तें पडण्याचीं कारणें.

इंद्रधनुष्य कसें पडतें, याविषयीं " अद्भुतसागरांत" खालीं लिहिलेलें विवेचन आढळून येतें:—

सूर्यस्यविविधावर्णाः पवनोदकमेवच।
घटिताः साभ्रे धनुः संस्थानाद्येदृश्यंतेतादिंद्रधनुः॥

ह्मणजे सूर्याचे नानाप्रकारचे वर्ण (किरणें), वायु

आणि जल, ह्यांच्यांशीं संयोग पावून, मेघाच्छादित आकाश असतां, जी चमत्कृति दृष्टीस पडते, तेंच **इंद्रधनुष्य** होय.

“ रविकिरण जलदमरुतां संघातो
धनुखिस्थितो धनुर्मघोनः । ”

असें **काश्यप** ह्मणतो. ह्याचा भावार्थ इतकाच कीं, सूर्याचीं किरणें हीं, वायु आणि मेघ, यांच्यांशीं मिश्रित झाल्या कारणानें, स्थलांतरावर जी धनुष्याकृति दृष्टीस पडते, तिलाच इंद्रधनुष्य ह्मणतात.

हें **इंद्रधनुष्य** जसें दिवसा पडतें, तसेंच रात्रीं देखील पडतें.

दिनेच रात्राविंद्रधनुर्द्वौवदूभुतौ ।

ह्मणजे दिवसा आणि रात्रीं जीं **इंद्रधनुष्यें** पडतात, तीं दोन्हीं फारच अद्भुत असतात, असें **अद्भुतसागरांत** वर्णन केलें आहे.

रश्मिदंड.

इंद्रधनुष्याप्रमाणेंच **रश्मिदंडही** पडतो, आणि तो पडण्याचें कारण देखील इन्द्रधनुष्यासारिखेंच असतें. मात्र इन्द्रधनुष्य कोणत्याही स्थळीं पडतें, व **रश्मिदंड** हा दिशांच्या मधोमध, आणि आकाशाच्या मध्यभागीं, पूर्वपश्चिम किंवा दक्षिणोत्तर, असा पडतो. तथापि, हा **रश्मिदंड** क्वचित्च दृष्टिगोचरें होतो.

---

१ रविकिरण जलद मरुतां सन्निपातो नभे
दंडवद्रश्मिदंडः । इन्द्रधनुवद्रश्मिदंडः ।

२ रश्मिदंडाः क्वचिद् दृश्यंते ।

सूर्यप्रकाश, व त्याचीं कारणें.

सूर्य स्वयंप्रकाश आहे कीं नाहीं, अशाविषयीं आधुनिक **पाश्चात्य** विद्वानांत बरीच चळवळ सुरू असून, विशेष शोधाअंतीं तो स्वयंप्रकाश नसल्याबद्दल, त्यांचें मत होत चाललें आहे. शिवाय, ते अशीही कल्पना करितात कीं, **सूर्याचें** वातावरण **ज्योतिर्मय** असल्या कारणानें तो दीप्तिमान भासतो.

आतां प्राचीनकाळीं, एतद्विषयीं, **आर्यहिंदूंचे** कशा प्रकारचे शोध होते, याबद्दल विचार करूं. **अद्भुतसागरांत** एके ठिकाणीं असें विवेचन आहे कीं, " **भानोर्वायुवेष्टनं प्रखरतेजोयुक्तम्** । " म्हणजे सूर्याचें वातावरण प्रखर तेजानें युक्त आहे. त्यावरून फार पुरातन काळीं देखील आमच्या पूर्वजांनीं अति परिश्रमानें मोठमोठे व गहन शोध लाविले होते, असें दिसतें.

धूमकेतु, व तत्संबंधीं शोध.

धूमकेतूंचा देखील **हिंदूंनीं** फारच बारकाईनें शोध लाविला होता; आणि त्यांत ते **चिनी** व **इंग्रजादि पाश्चात्य**, यांच्याही पुढें सरसावल्यासारिखे दिसतात. **चिनी** लोकांनीं एकंदर तीनशें धूमकेतूंची संख्या दिली असून, **इंग्रज** लोकांच्या अगदीं नूतन शोधावरून ते सुमारें सातशांवर असल्याचें कळून येतें. परंतु **हिंदु** ज्योतिष्यांची

त्यांच्याही पुढें मजल गेली आहे. ते एक हजार धूमकेतु[1] असल्याविषयीं सांगतात. इतकेंच नाहीं तर, शंभरावर दुसरे[2] उपधूमकेतुही आहेत, व ते चंद्राप्रमाणें[3] प्रकाशतात, असें ते वर्णन करितात.

ग्रीस देशाच्या तुलनेनें हिंदु ज्योतिः-शास्त्राचें पौराणत्व.

युरोपांतील नामांकित ज्योतिषि व विद्वान, क्यासिनी, बेली, प्लेफेअर, इत्यादि वर सांगितल्याप्रमाणें असें प्रतिपादन करतात कीं, ख्रिस्ती शकापूर्वी तीन हजार वर्षांवर, ग्रहनक्षत्रादिकांचे हिंदूंनीं घेतलेले वेध आज मितीसही उपलब्ध आहेत. त्यावरून तितक्या पुरातन काळींही त्यानीं ज्योतिःशास्त्रांत पुष्कळ सुधारणा केली होती, यांत शंका नाहीं. ह्मणजे आज सुमारें चार हजार आठशें वर्षांपूर्वी देखील, आमच्या हिंदूंची त्या शास्त्रांत प्रवीणता व शोध होते, असें त्यांचें ह्मणणें आहे. आणि ह्या व दुसऱ्या प्रमाणांवरून एकंदर विचार करतां असें खचित ठरतें कीं, फार प्राचीन सुधारलेलें असें युरोप खंडांतील जें ग्रीक राष्ट्र, त्याचा या कामांत शोध होण्यापूर्वीही अनेक

---

१ धूमकेतूनामेक सहस्रसंख्येति ।

२ धूमकेतोः सुताघोराः शतमेकाधिकंचतत् ।

३ शशिवद्भासमानास्तीव्राः ।

शतकें अगोदर, ज्योतिःशास्त्रांत आमचा बराच प्रवेश झाला होता. आतां, **ग्रीक** ज्योतिःशास्त्राचें आदि-कथन कोठें आढळतें, याविषयीं शोध केला तर असें कळून येतें कीं, **ग्रीक** लोकांनीं **आर्गो** नामक गलबतांत बसून सोनेरी लोंकर पैदा करण्याकरतां, **काळ्या** समुद्राच्या पूर्वेस **कोल्किस** नामक देशावर जेव्हां स्वारी केली, तेव्हां त्याचें दिग्दर्शन झाल्याचें दिसतें. आणि ही गोष्ट इसवी शकापूर्वी सुमारें बाराव्या किंवा तेराव्या शतकांत घडून आली असावी, असा अजमास आहे.

पुराण ज्योतिषी पराशर.

हिंदूंत अति पुराण ज्योतिषी झटला म्हणजे **पराशर** असून, त्याची तशीच ख्यातीही आहे. त्यानंतर दुसऱ्या शेजेचा पुराणज्योतिषी **गार्ग** नामक ऋषि होय. तदनंतर **असुरमय, आर्यभट्ट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त,** आणि **भास्कराचार्य,** असे फार नामांकित पैकीं ज्योतिषी होऊन गेले. **पराशर** हा इ. श. पूर्वी चवदाव्या शतकांत झाला असून, **भास्कर** हा इ.स. ११५० साली उदयास आला.

यावनिक कालांतील ज्ञानप्राप्ति.

वैदिक कालांतील ज्योतिर्विद्या प्रथमतः **हिंदूं**पासूनच **पाश्चिमात्य** राष्ट्रांस प्राप्त झाल्यावर, कालान्तरानें **ग्रीक** लोकांचें त्या शास्त्रांत बरेंच पुढें पाऊल पडलें.

पुढें कालवशात् इ० श० पूर्वी ३२७ वर्षांनंतर शिकंदरानें जेव्हां हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां, हिंदु व ग्रीक राष्ट्रांचें संमिलन होऊन, त्यां परस्परांत हरतऱ्हेचें दळणवळण सुरूं झालें. त्यामुळें आपापसांत ज्ञानाचा मोबदला होऊन, त्या प्रकाशानें हिंदूंनीं आपल्या ज्योतिःशास्त्रास चलन दिलें. आणि त्याचें त्यांनीं शास्त्रिय पद्धतीनें अन्वेषण आरंभिलें. तेव्हां अर्थातच त्याला पाहिजे होती तितकी सूक्ष्मता आणि यथार्थ व्यापकता प्राप्त होऊन, त्यास आपोआपच सतेजता आली. इतका फायदा ह्या यावनिक कालांत, केवळ ग्रीक (यवन) लोकांच्या सहवासानें झाला. तथापि, या पाश्चिमात्य लोकांच्या ज्ञानदीपावर हिंदूंनीं आपल्या अपूर्व कल्पनासामर्थ्यानें, व बुद्धिप्रगल्भतेनें छाप बसवून, आपला यशोदुंदुभि आशिया आणि युरोपखंडांत सर्वत्र गर्जविला. व त्यायोगानें त्यांची दिगन्त कीर्ति झाली. याविषयीं प्रोफेसर वेबर असें लिहितात कीं,

(हिंदूज्योतिःशास्त्राचें चलन.)

(हिंदूंची ज्ञानोन्नत्ति व उत्कर्ष आणि तत्संबंधीं पाश्चिमात्यांचे अभिप्राय.)

" And accordingly we find that they turned these Greek aids to good account; rectifying, in the first place, the order of their lunar asterisms, which was no longer in accordance with reality, so that

the two which come last in the old order occupy the two first places in the new; and even, it would seem, in some points independently advancing astronomical science further than the Greeks themselves did. Their fame spread in turn to the West; and the Anduborius (or, probably, Arduborius), whom the Chronicon *Paschale* places in primeval times as the earliest Indian astronomer, is doubtless none other than Aryabhat, the rival of Pulisha, who is likewise extolled by the Arabs under the name Arjabahr. For, during the eighth and ninth centuries, the Arabs were in astronomy the desciples of the Hidus, from whom they borrowed the lunar mansions in their new order, and whose Sidhantas (Sindhends) they frequently worked up and translated, in part under the supervision of Indian astronomers themselves, whom the Khalifs of Bagdad, &c, invited to their Courts. "

(History of Indian Literature P. 255.)

उत्कर्ष कालांतील हिंदु ग्रंथकार, व त्यांचे शोध.

आर्य ज्योतिर्विद्येच्या उत्कर्षकालांत पहिला चमकणारा तारा आर्यभट होय. हा इ. स. ४७६ साली कुसुमपुर (हल्लींचे पाटलीपुत्र किंवा पाटणा) येथें जन्मला असून, त्यानें आपल्या वयाच्या तेविसाव्या वर्षी दशगीतिसूत्र व आर्याष्टशत, हे ग्रंथ केले. त्यानंतर बऱ्याच

वर्षांनीं त्यानें **आर्यसिद्धान्त** नामक ग्रंथ रचला. ह्याचे अठरा अध्याय असून, हा एक नामांकित पैकीं ग्रंथ आहे. **आर्यभटाशिवाय लाध, पुलिश, श्रीइेण, विष्णुचंद्र,** वगैरे ज्योतिषी होऊन गेले असून, त्यांनीं सौर-सिधान्त, पौलिशासिधान्त, रोमकसिधान्त, वशिष्ट-सिधान्त, व ब्रह्म सिधान्त किंवा पैतामह सिधान्त केले असल्याविषयीं सांगतात. **आर्यभटानंतर** इ० स० ६०४ सालीं **वराहमिहिर** जन्मला. याचे **बृहत्संहिता, समाससंहिता,** आणि **होराशास्त्र,** असे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. **बृहत्संहितेवर भट्टोत्पलाची** उत्तम टीका आहे. **वराहमिहिर** शके ५०९ (इ० स० ५८७) सालीं मरण पावला. त्यानंतर **ब्राम्हणांची** ज्योतिःशास्त्र ज्ञानासंबंधीं चोंहोकडे ख्याति झाल्यामुळें, त्यांची कीर्ति **ग्रीस** देशांतही पसरली. तेव्हां **ग्रीक** लोकानीं **क्रौंनिकन्पाश्चल** नामक ग्रंथांत **ब्राम्हणांच्या** ज्ञानप्रदीपानें कमजास्ती दुरुस्ती केली. पुढें सातव्या शतकांत (इ० स० ६६४ सालीं) **ब्रह्मगुप्त** नामक नामांकित ज्योतिषी होऊन गेला. ह्याशिवाय **पराशर, शक्तिपूर्व, विष्णुगुप्त** (चाणक्य), **देवस्वामी, सिद्धसेन, वज्र, जीवशर्मा, सत्य,** वगैरे मोठमोठे ज्योतिषी होऊन गेले असल्याचें **वराहमिहिराच्या** लेखावरून कळतें. **ब्रह्मगुप्तानंतर** इसवी शकाच्या आठव्या आणि नवव्या शतकांत, **आरब** लोक **हिंदुंचे**

चेले बनले, आणि त्यांनीं हिंदूंपासून ज्योतिर्विद्या प्राप्त करून घेतली, व ज्योतिःसिधान्ताचें आरबी भाषेंत सिन्धेन्ध नामक भाषांतरही करविलें. पुढें नवव्या शतकांत (ह्मणजे इ० स० ८९९ च्या सुमारास) धाकटा भास्कर नामक ज्योतिषी प्रसिद्धीस आला. त्यानें करणसार नांवाचा ग्रंथ त्याच सुमारास लिहिला असल्याचें आल्बीरूणीच्या लेखावरून समजतें. शिवाय त्यानें अहर्गण नामक ग्रंथ केला असल्याचेंही आल्बीरूणी लिहितो. त्यानंतर केवळ सूर्योपमच जो प्रसिद्ध भास्कराचार्य, हा बाराव्या शतकांत उदयास आला. ह्या भास्कराचें जन्म त्याच्याच स्वलिखिताप्रमाणें शके १०३६ (इ० स० १११४) सालीं झालें असून, त्यानें केलेला सिद्धांतशिरोमणि शके १०७२ (इ० स० ११५०) सालीं पुरा झाला; आणि करणकुतूहल शके ११०५ (इ० स० ११८३) सालीं पुरें झालें.

सिद्धान्तशिरोमणींतील मूलतत्वें.

सिद्धान्तशिरोमणींत पृथिवी गोल असल्याविषयीं खालीं लिहिलेलें प्रमाण सांपडतें.

भूमेः पिंडः शशांकज्ञकविरविकुजेज्यार्किनक्षत्रकक्षा
वृत्तैर्वृत्तोवृतः सन्मृदनिल सलिलव्योम तेजोमयोयम्।
नान्याधारः स्वशक्त्यैव वियतिनियतं तिष्ठतीहास्यपृष्ठे
निष्ठं विश्वंच शश्वत् सदनुजमनुजादित्य दैत्यं समंतात्॥

ह्याचा तात्पर्यार्थ इतकाच कीं, पृथिवीचा पिंड वाटोळा असून तो पंचमहाभूतात्मक आहे. तसेंच तो चंद्रापासून जवळ असून, चंद्रापुढें बुध, शुक्र, व रवि, असे लागतात. शिवाय मंगळ, गुरु, शनि, आणि नक्षत्रादि वर्तुळ गोल, यांनीं तो परिवेष्टित असून, तो कांहींएक आधाराशिवाय आपल्या आत्मशक्तीनें आकाशाच्या पोकळींत, देव, दैत्य, मनुष्य, व राक्षस, इत्यादिसहित, नियमितपणानें राहिला आहे.

पृथिवीची गोलाकृति.

पृथिवीचें आकर्षण.

पृथिवीच्या आकर्षण शक्तीविषयीं ज्योतिषग्रंथांत एक उत्तम आधार सांपडतो.

आकृष्टशक्तिश्च महीतयायत्
खस्थं गुरुस्वाभिमुखं स्वशक्त्या ।
आकृष्यते तत्पततीवभाति
समेसमंतात्क पतत्वियंखे ॥

ह्यावरून इतकें सिद्ध आहे कीं, पृथिवीच्या अंगीं आकर्षणशक्ति असल्यामुळें, ती आकाशांतील पदार्थांस आपणाकडे ओढते; व त्यायोगानें ते पडतात असें दिसतें. परंतु वास्तविक पाहतां तसें नसून, ते आकर्षणशक्तीनें पृथिवीकडे आकर्षिले जातात. आणि ही गोष्ट आमच्या हिंदूंस सात आठशे वर्षांपूर्वीं, किंबहुना त्याही पलीकडे

बरींच शतकें अगोदर, चांगल्या रीतीनें कळली होती हें निर्विवाद आहे. न्यायशास्त्रांत " गंधवती पृथ्वी, सानित्याअनित्याच, नित्या परमाणुरूपा, अनित्या कार्यरूपा, " अशी पृथिवीची व्याख्या दिली आहे. आणि ती परमाणुरूप असून, सर्व परमाणुमात्राच्या ठायीं आकर्षणशक्ति असल्यामुळें तिच्यांतही आकर्षण आहे असें त्यांनीं यथान्याय ठरविलें.

सूर्य फिरत नसून पृथिवी फिरते, व त्यामुळें सूर्यच फिरतो आहे असें वाटतें; तसेंच जितके गोल तितके सर्व फिरतात; इत्यादि शोध फार पुरातन काळीं लागले होते. इतकेंच नाहीं तर, त्या शोधांत एकामागून एक अशी नवीन भर पडतच चालली होती, आणि ते नवीन शोध शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, व कवि वगैरे लोक-समाजास, चांगले माहीत होते. साधुवर्य **ज्ञानेश्वर** हा एके ठिकाणीं असें लिहितो कीं:——

> आणि उदो अस्ताचेनि प्रमाणें ।
> जैसें न चलतां सूर्याचें चालणें ॥
> तैसें नैष्कर्म्य तत्व जाणें ।
> कर्मीचि असतां ॥
>
> (ज्ञा. अ. ४ ओं. ९९.)
>
> अथवा नावेहून रिगे ।
> तो थडियेचे रुख जातां देखे वेगें ॥

तोचि साचोकारें पाहों लागे।
रुख ह्मणे अचल ॥

(ज्ञा. अ. ४ ओं. ९७.)

घायें गडबडी धोंडे ब्रह्म गोळकांचे ॥

(ज्ञानेश्वरी अ. ७ ओं. ७९.)

प्राचीनकाळांतील हिंदूंच्या शोधाविषयीं, पाश्चिमात्यांचे विचार.

हिंदु ज्योतिर्विद्येच्या या **उत्कर्षकालांत** जे जे ह्मणून शोध लागले ते इतक्या महत्वाचे, सूक्ष्म, आणि परिपूर्ण होते कीं, ते हल्लींच्या सुधारलेल्या एकोणीसाव्या शतकांतही **पाश्चात्य** विद्वानांस अगदीं थक्क करून सोडतात; व ते कल्पक आणि अपूर्व असल्यामुळें, विस्मयास पात्र होतात. याविषयीं व्हिट्ने नामक गृहस्थ हे, **प्राच्य भाषादीपक** नांवाच्या ग्रंथांत, असें लिहितात कीं:—

The Surya Sidhanta is " one of the most ancient and original of the works which present the modern astronomical science of the Hindus. "

(Oriental and linguistic studies.)

H, I. L. P. 258. vide foot note 286,

हिंदुज्योतिर्विद्येचा अस्तकाल.

हिंदुज्योतिर्विद्येचा अस्तकाल झटला म्हणजे इ० स० १२०० पासून १८०० पर्यंत होय. जे या शास्त्रांत पूर्वी **आरब** लोकांचे गुरू होते, तेच **हिंदु** आता

त्यांचे शिष्ये बनले. ज्या अल्‌किंडीनें हिंदुज्योतिःशास्त्र, व गणितशास्त्र, यांच्या आधारें अनेक ग्रंथ, नवव्या शतकांत, आरबी भाषेंत लिहिले, त्याच अल्‌किंडीचे ग्रंथ आतां प्रमाणभूत होऊन त्यांचीं, व इतर यवनी ग्रंथांचीं संस्कृतांत भाषांतरेंही झालीं. आणि हें नवीन, परकीय, व पारिभाषिक शब्दांवरून, निःसंशय ठरतें. या कालांतही ज्योतिर्विद्येंत, हिंदुरत्नें चांगलीं चांगलीं मधून मधून चमकलीं. परंतु एकंदरीनें पाहतां तीं फारच विरळ होत. ज्योतिःशास्त्राप्रमाणेंच दैवज्ञविद्याही लयास जात चालली. शुभ शकुन, इंद्रजाल, मंत्र, वगैरे वैदिक कालापासूनच चालत आले असून, त्यांचा प्रचुर उल्लेख अथर्व वेद, गृह्यसूत्रें, कौशिकसूत्रें, सामविधान ब्राम्हण, शतपथब्राह्मण, आणि अथर्व परिशिष्टें, यांत आढळतो. याशिवाय वराहामिहिर यानें केलेली संहिता, व नागार्जुन, यांत त्याजविषयीं विशेष वर्णन आहे. हें आमच्या हिंदूंचें दैवज्ञशास्त्र भरतखंडांत पसरल्यावर त्याचा संचार पश्चिमेकडे होत होत, थेट युरोप व आफ्रिका खंडांत झाला. आणि ही गोष्ट पाश्चिमात्य राष्ट्रें देखील कबूल करतात. प्रोफेसर वेबर असें लिहितात कीः——

दैवज्ञविद्या.

तिचा युरोप व आफ्रिका खंडांत प्रसार.

" Many of their notions have long been naturalised in the West, through the medium of the Indian fables and fairy tales which were so popular in the Middle Ages—those, for instance, for the purse (of Fortunatus), the league-boots, the magic mirror, the magic ointment, the invisible caps, &c. "

(H. I. L. P. 264).

राजाजयसिंगच्या वेधशाला, व त्याचे शोध.

असो, **भास्कराचार्यानंतर मुसल्मान्** लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्यामुळें हिंदु-ज्योतिःशास्त्र अगदींच लयास जात चाललें. पुढें इसवी शकाच्या अठराव्या शतकांत, ह्मणजे इ० स० १७१०—१७३९ च्या दरम्यान, **दुसऱ्या जयसिंग राजानें** ग्रहाचे वेध घेण्याकरितां **जयपूर, दिल्ही, काशी, मथुरा, उज्जनी,** वगैरे ठिकाणीं वेधशाला स्थापन केल्या; त्यायोगानें **न्यूटननें** काढलेलीं ज्योतिःशास्त्राचीं मूलतत्वें सर्वत्र स्थापित होण्यापूर्वी, **डी. ला. हायरनें** जें ग्रहांचें कोष्टक इ० स० १७०२ सालीं तयार केलें होतें, त्यांत जरूर तितकी दुरुस्ती करण्याचें सामर्थ्य त्यास आलें. पुढें ग्रहमालिका तयार करण्यासाठीं आपण स्वतः परिश्रम घेऊन, **राजा जयसिंगनें " तिज महमदशाई "** नामक आपलें स्मारक करून ठेविलें. त्यानें बांधलेल्या वेधशालांपैकीं **काशींतील** वेधशाला अजूनही असून, बाकीच्यांचे

राहिलेले अवशिष्ट भाग जे हल्लीं दृष्टिगोचर होतात, त्यावरून त्याच्या बुद्धिविशालत्वाचें चांगलें दिग्दर्शन होतें.

युरोपांतील यावेळच्या स्थितीचें दिग्दर्शन.

याप्रमाणें इसवी शकापूर्वी चार पांच हजार वर्षांपासून तों इसवी शकानंतर एक हजार (१८००) आठशें वर्षेपर्यंत, किंवा सरासरीच्या ठोक प्रमाणानें, सुमारें सहा सात हजार वर्षांच्या घडामोडीत, **हिंदुज्योतिःसूर्य** उदय पावून, व आपल्या प्रखर आणि शुद्ध तेजानें अखिल जगत् दिपवून टाकून, कालगतीनें तो लयासही गेला. आतां, सदरहु मुदतींत ज्योतिर्विद्येसंबंधीं **यूरोपखंडांतील** कशी स्थिति होती याविषयीं थोडेंबहुत तरी दिग्दर्शन होण्यासाठीं, अंमळ विचार करूं.

ग्रीस देशांतील नक्षत्रावलोकनाचा काळ

आशियाखंडांत हिंदु ज्योतिःसूर्य उदय पावल्यावर सुमारें सत्तावीसशें किंवा अठ्ठावीसशें वर्षांनीं, **ग्रीस** देशांत कोठेंसें प्रथमतःच नक्षत्रावलोकन सुरूं झाल्याचें दिसतें. आतां हें नक्षत्र-कथन **ग्रीक** लोकांच्या **आर्गो** नामक स्वारींत प्रथम आढळून येत असून, ती गोष्ट इ-

भूगोलाविषयीं आरिस्टाटल व तालेमी यांचें मत.

सवी शकापूर्वी सुमारें बाराव्या किंवा तेराव्या शतकांत घडून आल्याविषयीं अजमास आहे. त्या कालानंतर **ग्रीस** देशांत **तालेमी** आणि **आरिस्टाटल** असे प्र-

सिद्ध पुरुष होऊन गेले; व त्यांचेंच मत सर्व युरोपखंडांत त्यावेळीं, व त्यानंतर इसवी शकाच्या पंधराव्या शतकापर्यंत प्रचारांत होतें. पृथिवी अचल असून तिच्या सभोंवतीं सूर्य व इतर ग्रह फिरतात, हेंच त्यांच्या मताचें मूलबीज होय. आरिस्टॉटल्चा शिवाय असाही सिद्धान्त होता कीं, एक जड आणि एक हलका असे एका जातीचे दोन पदार्थ सारख्या उंचीवरून एकदम सोडिले, तर जड पदार्थाचें वजन हलक्या पदार्थापेक्षां जितकें अधिक असेल, तितक्या प्रमाणानें तो जड पदार्थ हलक्या पदार्थापूर्वी भूमीवर पडेल. आतां, आमच्या अतिप्राचीन हिंदु ज्योतिःसिद्धान्ताशीं ह्या यावनिक सिद्धान्तांची तुलना करून पाहिली तर, हे यावनिक सिद्धान्त किती बालिश आणि खरेपणापासून दूर आहेत, हें जास्त सांगावयास नको. हीं ग्रीक लोकांचीं वेडगळ मतें, थेट गेल्या पंधराव्या शतकापर्यंत, यूरोपखंडांत सर्वत्र प्रचारांत होतीं.

त्यांच्या मताचें मिथ्यत्व.

ह्या मतांत बदल होण्याला पुष्कळ कारणें झालीं. इ० स० १४७३ सालीं, प्रशिया देशांत कोपर्निकस् नामक विद्वान गृहस्थ, थार्न् या गांवांत जन्मला. त्याला लहान पणापासून गणितविद्या फारच आवडत असल्यामुळें, तो ती मोठ्या उत्साहानें शिकला, व त्यानें शिवाय ज्योतिः-

त्यांत बदल होण्याचीं कारणें.

शास्त्राचाही अभ्यास केला. तसेंच त्यानें चांगले परिश्रम घेऊन ग्रीक व लाटीन या भाषांचें ही बरेंच ज्ञान संपादिलें. त्यामुळें त्या भाषांतील ज्योतिःशास्त्रावरील ग्रंथ अवलोकन करण्याचें त्यास सामर्थ्य आलें. हिंदुज्योतिर्विद्येचा उत्कर्ष झाल्यामुळें त्यांची कीर्ति आशिया व युरोपखंडांत पसरून त्यांनीं [म्हणजे हिंदूंनीं] केलेल्या नवीन शोधाप्रमाणें, क्रॉनिकन् पाश्चेल नामक ग्रंथांत, सातव्या शतकांत (इ० स० ६१०–६४१ सालीं) ग्रीक लोकांनीं दुरुस्तीही केलीच होती. तेव्हां त्याही ग्रंथाचा अभ्यास केल्यामुळें, सूर्यगोल, भूगोल, चंद्रगोल, वगैरे ग्रहांबद्दल, व तत्संबंधीं शोधाविषयीं, हिंदूंनीं जें कांहीं खरे सिद्धान्त प्राचीन काळींच ठरविले होते, ते सर्व ग्रीक ग्रंथद्वारें पाहून, त्यांच्या खरेपणाची प्रतीति घेण्यास त्याला चांगली संधी मिळाली. त्या योगानें कोपर्निकस् याची अशी बालंबाल खातरी झाली कीं, सूर्य हा ग्रहमालिकेचा मध्य-असून बुध, शुक्र, पृथिवी, मंगल, गुरु, आणि शनि, हे त्याच्या सभोंवतीं फिरतात. कोपर्निकस् इ. स. १५४३ सालीं मरण पावला, आणि त्याच्या मागून इ० स० १५६४ त,

कोपर्निकस याचें मत.

ग्यालिलियो नांवाचा पुरुष इताली देशांतील पिसा नामक शहरांत जन्मला. तो मोठा बुद्धिवान् होता या-

ग्यालिलियोचें मत.

मुळें गणितविद्येंत चांगला प्रवीण झाल्यावर, त्यानें अनुभव घेऊन **अरिस्टॉटल्चीं** कांहीं मतें खोटीं ठरविलीं; तेव्हां सर्व लोकांनीं त्याजवर गिल्ला करून त्याचे फार हाल केले. व त्या हालांत तो इ० स० १६४२ सालीं मरण पावला. त्याच सालीं, **न्यूटन्** नामक प्रसिद्ध विद्वान् ज्योतिषी, **इंग्लंडांत कोल्स्तवर्थे** गावीं जन्मला. यानें पृथिवीचें आकर्षण इत्यादि **आर्य** शोधांचें पुनरुज्जीवन केलें, व कांहीं नवीन शोधही लाविले. तदनंतर तो इ० स० १७२६ सालीं मरण पावला.

न्यूटन्चें मत.

यांप्रमाणें इसवी शकाच्या पंधराव्या शतकापर्यंत, **युरोपांत** सर्वत्र अज्ञानान्धकारच पसरला असल्यामुळें, लोकांच्या अडाणी समजुती जशाच्या तशाच राहिल्या होत्या. अशावेळीं **कोपर्निकस्, ग्यालिलियो, न्यूटन्,** यांचा उदय झाल्यामुळें, लोकांचें अज्ञान नाहींसें झालें, ही गोष्ट अभिनन्दनीय आहे. तथापि, पृथिवीचें सूर्यासभोंवतीं परिवर्तन, सूर्याचें आकर्षण, ग्रहणाचें कारण, पृथिवीचें आकर्षण, इत्यादिसंबंधीं त्यांनीं नवीन शोध काढले म्हणून जें **युरोपस्थांचें** म्हणणें आहे, तें केवळ मिथ्यावाद असून, त्यांनीं फक्त **हिंदुंनीं** फार प्राचीन काळीं लाविलेल्या शोधांचें पुनरुज्जीवनच केलें, असें म्हणण्यास हर-

आर्यज्योतिर्विद्या, व तिचें पाश्चिमात्य देशांत पुनरुज्जीवन.

कत नाहीं. हिंदूंचें ज्योतिःशास्त्रांतील शोध कोपर्निकसाच्या पूर्वी सुमारें हजार वर्षे, इतक्या पूर्णतेस आले होते कीं, त्यांच्या शोधाप्रमाणें ग्रीक लोकांनींही आपल्या ग्रंथांत दुरुस्ती केली, व आरब लोकांनीं देखील हिंदुशास्त्राचें ज्ञपाठ्यानें अध्ययन चालविलें. याविषयीं प्रसिद्ध इतिहासकार डाक्टर हंटर असे लिहितात कीं:—

"In certain points the Bràhmans advanced beyond Greek astronomy. Their fame spread throughout the West, and found entrance into the Chronicon Paschale (Commenced about 330 A. D. revised, under Heraclius 610—614 A. D.). In the 8th and 9th centuries, the Arabs became their disciples, borrowed the lunar mansions in the revised order from the Hindus, and translated the Sanskrit astronomical treatises '*Siddhantas*' under the name of Sindhends."

(Indian Empire P. 105)

ग्रीक हे हिंदूंचे चेले.

परंतु, अशा प्रकारें ग्रीक लोकांनीं हिंदूंपासून संपादन केलेलें ज्ञान कांहीं कालानें लयास गेलें. आणि एकंदर पांच सातशें वर्षांच्या मुदतींत यूरोपांत जो अज्ञानांधकार पसरला होता, त्यांत त्याचा मागमूस लागण्यास मोठी अडचण पडली. तथापि, अति परिश्रम घेऊन सदरहू पाश्चिमात्य विद्वन्मणिरत्नांनीं पूर्वीचे प्राच्य सिधान्त यूरोपांत सर्वत्र स्था-

पित केले. आणि ह्या त्यांच्या कृत्याबद्दल आम्ही त्यांचे खरोखरच आभार मानले पाहिजेत.

ज्योतिःशास्त्रांतील आह्मा हिंदूंचे शोध प्रथमचे आणि मूळचेच असून, त्या संबंधानें ते कोणत्याही राष्ट्राचे बिलकुल ऋणी नाहींत, अशाविषयीं साधकबाधक कारणांचें साद्यंत विवेचन मागें तेराव्या भागांत केलेलें आहे. सबब ह्या बाबतींत आतां येथें पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं.

वेदांतील प्राचीन शोध.

एक पाश्चात्य शोधक विद्वान् असें म्हणतो कीं, न्यूटन्चें सर्व तत्वज्ञान आणि शास्त्रमीमांसा, हीं वेदांत दृग्गोचर होत असून, त्यांतच विश्वाच्या सर्वाकर्षणशक्तीचा प्रभाव ठायीं ठायीं सूचित केला आहे.

एकंदरींत, उपलब्ध असलेली यच्चावत हकीकत पाहून प्रत्येक गोष्टीचा सर्व बाजूनें विचार करता असें दिसून

1 " Sir W. Jones ventures to affirm that the whole of Newton's Theology, and part of his Philosophy, may be found in the Vedas, which also abound with allusions to a force of universal attraction, "

(*vol. III*, P. 246)

(*vol. XXIX* P. 158.)

इतर राष्ट्राच्या तुलनेनें हिंदुंचें प्राचीनत्व.

येतें कीं, इतर सर्व राष्ट्रें अगदीं आज्ञानांत होतीं, त्यावेळीं ज्ञानार्जनांत हिंदूंचें पाऊल पुष्कळच पुढें असे. आणि त्यांची शास्त्रीयपद्धति व रीति, इतर राष्ट्रांहून

---

1 * * * "But on the other hand, in the first part of their progress, all other nations were in still greater ignorance than they "(Hindus); and in the more advanced stages, where they were more likely to have borrowed, not only is their mode of proceeding peculiar to themselves, but it is often founded on principles with which no other ancient people were acquainted ; and shows a knowledge of discoveries not made, even in Europe, till within the course of the last two centuries. As far as their astronomical conclusions depend on those discoveries, it is self-evident that they cannot have been borrowed; and, even where there is no such dependence, it cannot fairly be presumed that persons who had such resources within themselves must necessarilly have relied on the aid of other nations." *

"It seems probable that, if the Hindus borrowed at all, it was after their own astronomy had made considerable progress; * * * and * * it would rather seem as if they had taken up hints of im-

(पुढें चालू)

इतकी भिन्न आहे कीं, अन्य राष्ट्रांकडून त्यांजला ज्ञानप्राप्ति झाल्याचें यत्किंचित् देखील संभवत नाहीं. आणि ह्मणूनच मूळज्ञानसंपादनांत ते इतर राष्ट्राचे बिलकुल ऋणी नाहींत. मात्र, इतर राष्ट्रांशीं

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

provement than implicitly copied the doctrines of their instructors."

"In addition to the points already mentioned, in which the Hindus have gone beyond the other ancient nations, Mr. Colebrooke mentions two in astronomy: one is in their notions regarding precession of the equinoxes, in which they were more correct than Ptolemy, and as much so as the Arabs, who did not attain to their degree of improvement till a later period; the other relates to the diurnal revolution of the earth on its axis, which the Brahmans discuss in the fifth century, aud which although formerly suggested in ancient times by the Heraclius, had been long laid aside by the Greeks, and was never revised in Europe until the days of Copernicus."

"From what has been already said, it seems very improbable that the Indian Geometry and Arithmetic have been borrowed from the Greeks

(पुढें चालू)

त्यांचें दळणवळण सुरू झाल्यावर, ज्ञानाचा साहजिक मोबदला होऊन, त्यांच्या ज्ञानांत क्वचित् प्रसंगीं भर पडल्याचें दिसतें.

भूमितिशास्त्र, अंकगणित, व बीजगणित.

ज्योतिःशास्त्रापेक्षांही गणिताच्या इतर शास्त्रांत, हिंदूंनीं सर्व राष्ट्रांच्या अगोदर अतिमहत्वाचे शोध के-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

and there is no other nation which can contest the priority in those sciences. The peculiarity of their method gives every appearance of originality to their discoveries in Algebra also." * * *

"Whatever the Arabs possessed in common with the Hinuds, there are good grounds for thinking that they received from the latter nation, and however great their subsequent attainments and discoveries, it is to be remembered that they did not begin till the eighth century, when they first gained access to the treasures of the Greeks."

(Elphinstone's History of India, P.P. 250/257.)

पाश्चिमात्यांचा तत्संबंधीं अभिप्राय.

१ आमच्या एकंदर **गणितशास्त्र**-ज्ञानाविषयीं प्रसिद्ध इतिहासकार **एल्फिन्स्टन्** असें लिहितात कीं:—

"The progress made in other branches of Mathematical knowledge was still more remarkable

(पुढें चालू)

त्याचें दिसतें. सूर्यसिद्धान्तांत भूमितिशास्त्राच्या संबंधानें जे सिधान्त त्यांनीं स्थापित केले आहेत, त्यावरून इसवी शकाच्या पांचव्या आणि सहाव्या शतकांतही हिंदूंचें तत्संबंधीं ज्ञान फारच विकासाप्रत पावलें असून, त्याचा यत्किंचित् गंधही ग्रीक लोकांस त्यावेळीं नव्हता. इतकेंच नाहीं तर, त्यांत प्रतिपादन केलेल्या सिधान्तांचा शोध यूरोपखंडांत कोठेंच सोळाव्या शतकापर्यंतही झाला नव्हता, हें निर्विवाद आहे. त्रिकोणाचे धर्म, त्याच्या तीन बाजूच्या प्रमाणांनीं सिद्ध झालेलें क्षेत्रफळ, आणि परिघि व त्रिज्या यांचें परस्पर प्रमाण, याविषयीं सूर्यसिद्धान्तांतने जे शोध हिंदूंनीं केले, त्यांत त्यांचें विशेष नैपुण्य दिसून येतें. आणि ह्या शास्त्रांतही त्यांचें पाऊल इतर राष्ट्रापेक्षां

त्यांचें भूमितिशास्त्र.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

than in astronomy. In the "Surya sidhanta," * * * is contained a system of Trigonometry, which not only goes far beyond anything known to the Greeks, but involves theorems which were not discovered in Europe till the sixteenth century."

1 "Their Geometrical skill is shown, among other forms, by their demonstrations of various properties of triangles, especially one which expresses the area in the terms of the three sides, and was unknown in Europe till published by Clavius (in the sixteenth Century); and by their knowledge of the

(पुढें चालू)

जास्त पुढें सरसावल्यांसारखें दिसतें. कारण, तत्संबंधीं ज्ञान यूरोपखंडांत सोळाव्या शतकापर्यंत कोणासही नव्हतें.

त्यांचें अंकगणित व बीजगणितशास्त्र.

अंकगणितांत देखील दशांश रीति प्रथमतः हिंदूंनींच शोधून काढिली असल्यामुळें, त्यांचें श्रेष्ठत्व आपोआपच प्रसिद्धीस आलें. परंतु यापेक्षांही ब्राह्मणांची सर्वांवर "तान" म्हटली म्हणजे बीजगणितांत होय. या विषयांत त्यांनीं आपल्यावर दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राची मात्रा लागून बिलकुल चालूनच दिली नाहीं. इसवी शकाच्या पांचव्या शतकांत आर्यभटाच्या वेळीं, म्हणजे इ० स० ४७६ नंतर, हें शास्त्र अगदीं पूर्णत्वास येऊन पोहोंचलें असून, आर्यभटाच्या बीजारोपणावरच ब्रह्मगुप्त व भास्कराचार्य, यांनीं यथावकाश जलसिञ्चन करून, तो शास्त्रवृक्ष

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

proportion of the radius to the circumference of a circle, which they express in a mode peculiar to themselves, by applying one measure and one unit to the radius and circumference. This proportion which is confirmed by the most approved labours of Europeans, was not known out of India, until modern times."

1. "The Hindus are distinguished in Arithmetic by the acknowledged invention of the decimal notation; and it seems to be the possession of this

(पुढें चालू.)

पूर्ण विकासाप्रत आणिला. **आर्यभटाचा** समकालीन **डायोफान्टस्** असल्याविषयीं **कोलब्रूक** याचें म्हणणें आहे; आणि **डायोफान्टस्** हा **ग्रीस** देशांतला पहिला बीजगणिति होय. समीकरणें सोडविण्यांत **डायोफान्टस्** पेक्षां **आर्यभटाची** जास्त कुशाग्रबुद्धि असून, तो **डायोफान्टस्पेक्षां** एकंदरीनें श्रेष्ठतर होता, असें पाश्चिमात्यही कबूल करतात. **आर्यभटाच्या** वेळीं बीजगणितशास्त्र इतक्या पूर्णत्वास आलें होतें त्यावरून,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

discovery which has given them so great an advantage over the Greeks in the science of numbers."

1. "But it is in Algebra that the Bràhmans appear to have most excelled their contemporaries." In the time of Arya Bhat, "the science seems to have been at its height; and who, though not clearly traced further back than the fifth century, may, in Mr. Colebrooke's opinion, not improbably have lived nearly as early as Diophantus, the first Greek writer on Algebra; that is, about A. D. 360."

"But, whichever may have been the more ancient, there is no question of the superiority of the Hindus over their rivals in the perfection to which they brought the science. Not only is Arya Bhata superior to Diophantus, (as is shown by his knowledge of the resolution of equations involving several unknown quantities, and in a general method of resolving all intermediate problems of

(पुढें चालू)

कदाचित् त्याच्याही पूर्वी बरीच शतकें सदरहू शास्त्राचें अन्वेषण हिंदूंनीं सतत चालविलें असावें, असें साधारण अनुमान होतें. कारण, अनेक वर्षांचे सतत शोध चालू असल्याशिवाय अशीं शास्त्रें पूर्णत्वास येण्याचा क्वचित्च संभव असतो.

भरतखंडाच्या तुलनेनें यूरोपांतील अज्ञान.

जें समीकरण ब्रह्मगुप्तानें इ० स० च्या सहाव्या शतकांत तपशीलवार सोडविलें, त्याच तऱ्हेचें, किंबहुना तेंच समीकरण सोडविण्यास, **यूरोप खंडांत** शंभर वर्षांवर वर्षें लागलीं. आणि तितक्याही मुदतींत, तिकडील

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

at least the first degree,) but he and his successors pressed hard upon the discoveries of algebraists who lived almost in our own time. Nor is Arya Bhata the inventor of algebra among the Hindus; for there seems every reason to believe that the science was in his time in such a state, as it required the lapse of ages, and many repeated efforts of invention, to produce. It was in his time, indeed, or in the fifth century, at latest, that Indian science appears to have attained its highest perfection."

1 * * * "Another occurs in the same Review (vol. XXIX. P. 153.), where it is stated, from Mr. Colebrooke, that a particular solution given by Bháskara (A. D. 1150) is exactly the same that

(पुढें चालू.)

कित्येक विशाळ, व तीव्र मेंदू खर्ची पडले. प्रथमत: इ० स० १६५७ सालीं लॉर्ड ब्राउंकर यांच्या लक्षांत हें समीकरण आलें. त्यांनीं तें सोडविण्याच्या कामीं पुष्कळ यत्न केला. परंतु तो निष्फळ झाला. पुढें युलरनेंही प्रयत्न केला, पण तो देखील सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं इ० स० १७६७ सालीं, डी. ला. ग्रेंजनें तें दीर्घोद्योगानें सोडविलें.

सदरहू सर्व गोष्टींवरून इतकें कोणाच्याही लक्षांत येईल कीं, प्राचीन काळीं हिंदूंचें ज्ञान इतर सर्व राष्ट्रांपेक्षां श्रेष्ठतर असे; त्यांचे शोध अन्य राष्ट्रांच्या मानानें पुष्कळ प्राचीनतर होते; व त्यांच्या बुद्धिवैभवामुळें, इतर राष्ट्रें त्यांस फार पूज्य मानीत. आणि असें जर आहे तर,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

was hit on by Lord Brounker, in 1657; and that the general solution of the same problem was unsuccessfully attempted by Euler, and only accomplished by De. la. Grange, A. D. 1767; although it had been as completely given by Brahma Gupta in the sixth century of our aera."

"But the superiority of the Hindus over the Greek algebraists is scarcely so conspicuous in their discoveries as in the excellence of their method, which is although dissimillar to that of Diophantus (Strachey's Bija Ganita, quoted in the "Edinburgh Review", vol. XXI. P. P. 374. 375.), and in the per-

(पुढें चालू.)

कांहीं अविचारी व असमंजस पाश्चात्यांनीं केवळ दर्पानें हिंदूंस मूढ व रानटी म्हणावें, त्यांस अगदीं पशुतुल्य मानावें, त्यांचा निष्कारण तिरस्कार करावा, आणि आपण अर्ध्या हळकुंडानेंच पिंवळें होऊन फुगावें, यासारखी लाजिरवाणी गोष्ट ती दुसरी कोणती?

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

fection of their logorithm. (Colebrooke, Indian Algebra, quoted in the "Edinburgh Review," vol. XXIX. P. 162.) One of their most favourite processes (that called *cuttaca*) was not known in Europe till published by Bachet de Mezeriac, about the year 1624, and is virtually the same as that explained by Euler. (Edinburgh Review, vol. XXIX. P. 151). Their application of algebra to astronomical investigations and geometrical demonstrations is also an invention of their own; and their manner of conducting it is, even now entitled to admiration. (Colebrooke, quoted by Professor Wallace, ubi Suprá, 408 409.; and Edinburgh Review.)

भाग २३ वा.

वैद्यशास्त्र.

हिंदूंचें वैद्यक देखील त्यांच्या स्वतंत्र परिश्रमाचेंच फल होय. ज्याप्रमाणें कर्ममार्ग प्रवृत्तीच्या संबंधानें वेळाचें नियमन होण्यासाठीं, नक्षत्रावलोकन करून ज्योतिःशास्त्राच्या मूलतत्वाचा पाया हिंदूंनीं घातला, त्याप्रमाणेंच पशुयज्ञांत निरनिराळ्या देवतांस निरनिराळ्या भागाचें हवन करण्याच्या निमित्यानें, त्यांस सहजींच शारीरिक ज्ञान झालें; आणि त्या योगानेंच हळू हळू आयुर्वेदाची अति पुराण इमारत रचली गेली. वैद्यशास्त्र किंवा आयुर्वेद हा उपवेद असून, तो ईश्वरप्रणीत आहे असें हिंदु लोक मानतात. हिंदूवैद्यशास्त्र फार प्राचीन काळींच विकासाप्रत पावलें असावें, असें दिसून येतें. अथर्वण संहितेंत निरनिराळ्या रोगांचीं नांवें दिलीं असून, त्यांच्या उपशमनार्थ भिन्न भिन्न वनस्पतींची योजना केलेली आहे. ऋक्संहितेंतील अप्तृण सूर्यसूक्तांत पाली, सर्प, विंचू,

हिंदूंचें वैद्यक हें त्यांच्या स्वतंत्र परिश्रमाचें फल.

त्याचें पौराणत्व.

इत्यादि जंतूंच्या विषाचें नामनिर्दशन केलें असून, त्याच्या उपशमनार्थ पृथक् पृथक् प्रतिकारही सांगितलें आहेत; व त्यांतच कांहीं मंत्रांच्या प्रयोगाचीही योजना केल्यासारखें दिसतें:—

नवानां नवतीनां विषस्य रोपूषीणाम् ।

सर्वा सामग्रभं नामारे अस्य योजनं हरिष्ठा मधुत्वा मधुला च ॥

त्रिःसप्तमयूर्यः सप्त स्वसारो अग्रुवः ।

तास्ते विषंवि जाभ्रिर उदकं कुम्भिनी रिव ॥

इयत्तकः कुषुम्भकस्तकं भिनद्म्यश्मना ।

ततो विषंप्र वावृते पराचीरनु संवतः

कुषुम्भक स्तदब्रवीद्गिरेः प्रवर्तमानकः ।

वृश्चिकस्या रसं विषमरसं वृश्चिक ते विषम् ॥

(अ २. अ ५. व १६. मं १. अ २४. सू १९१.)

शतपथ ब्राम्हणांत (१३) "सर्पविद्येचें" कथन केलें असून, अश्वलायन श्रौतसूत्रांत "विषाविद्येचें" नामोच्चारण झाल्याचें दिसतें. शतपथ ब्राह्मणांत "वयोविद्या" ह्मणजे पक्षिशास्त्र, याचाही उल्लेख केल्याचें आढळून येतें. आणि पतंजलीच्या महाभाष्यावरून तर, प्राणिशास्त्राचेंही थोडेंबहुत विवेचन करण्याचा प्रयत्न त्या काळीं

केल्यासारखें भासतें. आणि **अथर्वपरिशिष्टांत** "लक्षणा" संबंधीं जे विभाग दर्शविले आहेत त्यावरून अंतरीक्ष विद्येविषयीं दिग्‌दर्शन केल्याचें दिसतें.

त्याचा विकास-काल.

हिंदूवैद्यक केव्हां विकासाप्रत पावलें तो काळ निश्चयपूर्वक कळत नाहीं. तथापि, बाह्यपुराव्याच्या साधनांनीं तो ठरवितां येतो. **पाणिनीच्या** व्याकरणांत भिन्न भिन्न रोगांचीं नांवें दिलीं आहेत. त्यावरून **पाणिनीच्या** कालापूर्वींच, ह्मणजे इसवी शकापूर्वी ७०० वर्षें, व त्याच्याही अगोदर, वैद्यशास्त्रांत **हिंदूंचा** चांगला अभिनिवेश झाल्याचें दिसतें. तसेंच, कोशांमध्यें अतिप्राचीन असा जो **अमरकोश**, त्यांतही शारीरिक अध्यायांत, वैद्यकाचें शास्त्रीयरीत्या संवर्धन आणि उत्कर्ष झाल्याचें दिसून येतें. **अमरसिंहाचा** काल खात्रीपूर्वक कळून येत नाहीं. तथापि, **भोजराजाच्या** पदरीं जीं नवरत्नें होतीं त्यांपैकींच हा असल्यास, त्याचा उदयकाल इसवी शकापूर्वी ५६ वर्षें, किंवा त्या सुमारास असावा असें वाटतें.

हिंदु वैद्यकावरील अति प्राचीन ग्रंथ.

हिंदुवैद्यकावर लिहिणारे अति प्राचीन ग्रंथकार ह्मटले ह्मणजे **आत्रेय, अग्निवेश, चरक, धन्वंतरि, सुश्रुत, वाग्भट्ट,** इत्यादि होत. त्यांपैकीं **चरक** हा सूत्रकालांत झाला असावा, असा अजमास आहे.

आतां, आमच्या वैद्यशास्त्राचीं मुळें किती दूरवर गेलीं आहेत, याचा विचार शोधकबुद्धीनें केला तर असें दिसून येईल कीं, तीं थेट वेदकालांतही खिळलेलीं दिसत असून त्यांचा प्रादुर्भाव, अखिल जगत्तलांवरील विशेष प्राचीन आणि अति पूज्य ग्रंथ जो ऋग्वेद यांत देखील, दृग्गोचर होतो. कारण, राजयक्ष्मा, हृद्रोग, वगैरे रोगांचीं नांवें, तसेंच यकृत्, प्लीहा, वगैरे शारीरिक भागांच्या संज्ञा, आमच्या ऋग्वेदांत आढळतात. त्यांवरून आमच्या वैद्यशास्त्राच्या उत्पत्तीचें व मूलतत्वांचें प्राचीनत्व किती आहे, हें वाचकांच्या सहजींच ध्यानांत येईल.

ऋग्वेदांत याचें आदिकथन.

वैद्यशास्त्राचें थोडें बहुत विवेचन आयुर्वेदांत केलेलें असून, त्यांत निदान, लक्षणें, व चिकित्सा, तसेंच रोगी आणि निरोगी, या दोन्ही अवस्थांचा विचार सांगितलेला आहे. ह्याविषयीं पौराणिक कथानक असें आहे कीं, हा आयुर्वेद पूर्वी इन्द्रास येत असून, त्यानें तो भरद्वाजास, तो अति बुद्धिमान् असे समजून, थोडक्यांत सांगितला. ह्यानें त्या स्कंधत्रयात्मक आयुर्वेदाचें यथार्थ ज्ञान, आपल्या बुद्धिप्रभावानें लवकरच प्राप्त करून घेतलें. त्यायोगानें तो रोगरहित, व चिरायु होऊन, त्यानें हा वेद इतर ऋषींस शिकविला. त्यांपैकीं,

आयुर्वेदांत त्याचें विवेचन, व तत्संबंधीं पौराणिक कथानक.

अत्रि पुत्र जो पुनर्वसु, यानें केवळ लोकहितासाठींच, ह्या वेदाचें आपल्या सहा शिष्यांकडून फारच प्रेमानें पठण करविलें. ह्या षट्शिष्यांचीं नांवें अग्निवेश, भेड, जातुकर्ण, पराशर, हारीत, आणि क्षारपाणि, अशीं होतीं. सर्वांत अग्निवेश हा फारच बुद्धिमान् असल्या कारणानें, त्यानेंच प्रथम वैद्यशास्त्रावर ग्रंथ लिहिला असून, तोच ह्या शास्त्रावरील आद्यग्रंथ आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अग्निवेशानंतर भेडादि शिष्यांनींही आपापले ग्रंथ तयार केले; व ते आत्रेयादि महर्षींनीं पसंत केल्यावरून, तेच " षड्भिषक् संहिता " या नांवानें सर्वत्र प्रसिद्ध झाले.

अग्निवेशतंत्र.

याप्रमाणें, वैद्यशास्त्रावरील ग्रंथकारांची पौराणिक कालांतील परंपरा अशा प्रकारची असून, चरकांतील चिकित्सास्थानाच्या १८ व्या अध्यायांत, आत्रेयाला " आयुर्वेदविदांश्रेष्ठं भिषग्विद्याप्रवर्त्तकम्, " असें ह्मटलें आहे. तथापि, अग्निवेश तंत्रापुढें कोणाचेंही तेज पडतनासें झाल्यामुळें, त्याच्या पूर्वीं, वैद्यकावर जीं जीं ह्मणून तंत्रें झालीं, तीं तीं सर्व लुप्त होऊन, त्यांचा हल्लीं मागमूस देखील राहिला नाहीं.

अथर्ववेदांत औषधांचें गुण वर्णन करणारीं कांहीं सूक्तें आढळतात. आणि वैद्यशास्त्र हें ह्या वेदाचेंच उपांग असल्याविषयीं चरकादिकांचें म्हणणें आहे. तसेंच

ऋग्वेदांत देखील कांहीं रोगांचीं नांवें, व शारीरिक भागांचें वर्णन आढळतें, त्यावरून अग्निवेशापूर्वींही वैद्यकावर कांहीं ग्रंथ झाले असावेत, असें अनुमान होतें. तथापि, ते सर्व ग्रंथ सूत्राप्रमाणें थोडक्यांत आणि संक्षेपानें लिहिलेले असून, त्यांपैकीं एकाचा देखील अग्निवेशकृत तंत्रापुढें, कांहींच प्रकाश पडतनासा झाल्यामुळें, ते आपोआपच नष्ट झाले असावे, असें वाटतें.

काय चिकित्सा व शल्यचिकित्सा.

अग्निवेशादिकांच्या, वर निर्दिष्ट केलेल्या, ज्या सहा संहिता प्रसिद्ध आहेत, त्या कायचिकित्सेच्या संबंधाच्या आहेत. शल्यचिकित्सेच्यासंबंधानें औपधेनव, औरभ्र, पौष्कलावत, आणि सौश्रुत, अशा चार संहिता प्रसिद्ध असून, त्यांत देखील श्रेष्ठतम अशी शेवटलीच होय. हें शल्यशास्त्र सुश्रुताला दिवोदास म्हणून काशीचा राजा होता त्याजकडून प्राप्त झालें असून, हा राजा धन्वतरी देवतेचा अवतार असल्याविषयीं आख्यायिका आहे. शल्य चिकित्सेचाच एक भाग शालाक्य या नांवानें प्रसिद्ध असून, त्यांत मानेवरील भागांच्या रोगाची, म्हणजे नेत्र रोगाची वगैरे चिकित्सा सांगितली आहे. ह्या भागाचेंही सुश्रुतांत इत्थंभूत वर्णन आहे. तथापि, ह्या भागाचा प्रवर्तक दिवोदास नसून विदेह देशाचा निमि नामक राजाच त्याचा आद्यगुरु आहे, असें मानितात.

चरक व त्याचा काल.

चरकानें वैद्यकावर स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला नसून फक्त अग्निवेश तंत्रांतच कांहीं फेरफार व कमी जास्ती करून, आणि जरूर ती भर घालून त्यानें चरकसंहिता तयार केली. चरकाचा काल पाणिनीच्या पूर्वी निदान दोनशें वर्षें तरी असावा असें डाक्टर गर्दे यांचें म्हणणें आहे. चरकानंतर बऱ्याच कालानें सुश्रुत झाला. ह्याच्या शारीरस्थानांत चरकापेक्षां जास्त माहिती असून, त्याची विषयविवेचनपद्धति देखील विशेष व्यवस्थेची दिसते. प्रसिद्ध वार्तिककार जो कात्यायन, यानें सुश्रुताचा उल्लेख केल्याचें आढळतें. त्यावरून त्याच्या पूर्वीचाही सुश्रुत असावा असें उघड होतें. डाक्तर गर्दे यांच्या समजुतीप्रमाणें सुश्रुत हा इ० स० पू० सुमारें ७०० वर्षें, म्हणजे बुद्धावतार होण्यापूर्वी अजमासें एक दोन शतकें, झाला असावा असें दिसतें. (सार्थवाग्भट पान २९ प्रस्तावना पहा.)

सुश्रुत व त्याचा काल.

---

१ डाक्तर गर्देकृत सार्थवाग्भट पहा. डाक्तर भांडारकर प्रभृति आधुनिक विद्वानांचें असें मत आहे कीं, पाणिनि हा इसवी सनापूर्वी सुमारें ७०० सातशें वर्षें होऊन गेला असावा. पाश्चात्य व इतर पंडितांच्या मतें तो इ० स० पूर्वी सुमारें ३५० वर्षे होऊन गेला. (वाग्भट. पान १३।१४ प्रस्तावना.)

H. I. Literature. By Dr. Weber. P. 219.
(Goldstucker on Panini.)

रसवैद्यक, व त्याचीं मूलतत्वें.

ज्याला इंग्रजींत होमिओप्याथि ह्मणतात, तेंच आमचें रसवैद्यक होय. ह्याचीं मूलतत्वें चरकाला देखील चांगल्या प्रकारें माहीत होतीं, असें निर्विवाद सिद्ध होतें. कारण, त्यांचा उल्लेख चरक चिकित्सेंत केल्याचें दिसून येतें.

तथान्तः सिद्धिमार्गाणां दोषाणांगूढचारिणाम् ।
भवेत्कदाचित्कार्यापि विरुद्धाभिमता क्रिया ॥
अन्तर्गतं पित्तधातुं स्वेदसेकोपनाहनैः ।
नयन्तो बहिरुष्णैर्हि तथोष्णं शमयन्तितत् ॥
बाह्यैश्चशीतैः सेकाद्यै रूष्मान्तर्याति पीडितः ।
सोन्तर्गूढं कफंहन्ति शीतैः शीतं तथा जयेत् ॥
श्लक्ष्णपिष्टघनो लेपश्चन्दनस्यापि दाहकृत् ।
त्वग्गतस्योष्मणो रोधात् शीतकृच्चान्यथा गुरुः ॥
छर्दिघ्नी मक्षिकाविष्टा मक्षिकैव तुवामयेत् ।

(च. चि. अ. ३०)

ह्याचा भावार्थ इतकाच कीं, 'शरीराच्या आंतील भागांत किंवा सांध्यामध्यें, फार खोल संचार करणाऱ्या दोषांवर, नेहमीच्या पद्धतीविरुद्ध अशा क्रिया, केव्हां केव्हां अगदीं प्रशस्त दिसतात. उदाहरणार्थ, एखादा पित्तविकार अन्तर्भागांत झाला असतां तो भाग शेकून, अथवा तो सिञ्चन करून, किंवा त्याजवर पोटीस बांधून,

अथवा अशा प्रकारचे अन्य ऊष्ण उपाय करून, आंतील पित्त बाहेर निघून जातें; आणि तज्जन्य विकार बरा होतो. ह्मणजे ऊष्णानें ऊष्ण बरें होतें. तसेंच, एखाद्या खोल ठिकाणीं झालेला कफविकार थंड घड्या वगैरे ठेवून केवळ बाह्योपचारानें बरा होतो. ह्या क्रियेंत उष्मा थंडीच्या दाबानें आंत शिरून तो कफास मारितो. याप्रमाणें शीतानें शीत नाहींसें होतें. चन्दन बारीक उगाळून त्याचा दाट लेप अंगावर पसरल्यास, त्यानें देखाल त्वचेंतील उष्मा कोंडला जाऊन दाह होतो. त्या प्रमाणेंच, अगर उगाळून लाविल्यानें, तो स्वयमेव ऊष्ण असूनही शैत्य करतो. माशीची विष्टा उलटी बंद करिते. परंतु पाहूं गेलें असतां, तीच माशी वामक आहे.'

ह्यावरून इतकें खचित सिद्ध होतें कीं, रसवैद्यकांतील प्रायः सर्व औषधें व्याधीच्या गुणांशीं मिळती असून, तीं तद्विपरीत गुणाचीं नाहींत. ह्मणजे तत्वदृष्टीनें पाहूं गेलें असतां त्याचें मूलबीज असें दृष्टीस पडतें कीं, ज्या औषधांपासून जे विकार उत्पन्न होतात, त्यांनींच ते हटकून बरे होतात. मात्र, औषध अगदीं अल्प प्रमाणानें दिलें पाहिजे. कारण,

मात्रया भक्षितं देवि विषमप्यमृतायते ।
मात्राधिकं वरारोहे ह्यमृतं वा विषंभवेत्॥
(रसरत्नसमुच्चय अध्याय २९.)

रसवैद्यकाचा काल.

रसक्रियेंतील बहुतेक औषधें ह्याच नियमास अनुसरून असल्यामुळें, त्यांचें खरें तत्व, व त्या क्रियेंतील मूलबीज, हीं आमच्या हिंदूंस आज सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी उत्तम प्रकारें माहीत होतीं, याचें चांगलें दिग्दर्शन होतें. होमिओप्याथीचा प्रवर्तक हान्मन नांवाचा एक जर्मन् शोधक असल्याविषयीं युरोपखंडांत प्रसिद्धि आहे. परंतु याचा शोध देखील, आमच्या रसक्रियेवरच अवलंबून असल्याचें उघड दिसतें. कारण, एकंदर वैद्यकाचें ज्ञान यूरोपस्थांस आम्हां पासूनच आरबी लोकांच्या मार्फत प्राप्त झालें असून, ती गोष्ट इतिहास[१]प्रसिद्धही आहे.

---

1. "These authors" (Charaka and Susruta) "were translated into Arabic, and probably soon after, that nation turned its attention to literature. The Arab writers openly acknowledge their obligations to the Medical writers of India, and place their knowledge on a level with that of the Greeks. It helps to fix the date of their becoming known to the Arabs, to find that two Hindus, named Manka and Saleh, were physicians to Hárun al Ràshid in the eighth century."

"Their acquaintance with medicines seems to have been very extensive. We are not surprised at

(पुढें चालू)

चरक आणि सुश्रुत या भिषग्वरांनंतर, विशेष महत्वाचा असा वाग्भट होय. हा पंजाबच्या वायव्येकडील प्रांतांत राहणारा असून, त्याच्या बापाचें नांव सिंहगुप्त होतें. त्याचा आजा फार प्रसिद्ध वैद्य असून, त्याचें एकंदर घराणें पिढीजादाच वैद्यकांत प्रवीण होतें. वाग्भटाचे अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदय असे दोन फार नामांकित ग्रंथ आहेत; आणि ते दोन्हीही चरक व सुश्रुत यांच्या आधारें रचलेले आहेत. हे ग्रंथ रचण्यांत, भिषग्वर वाग्भट याचा इतकाच हेतु होता कीं, वैद्यशास्त्रासंबंधी जी माहिती अनेक आर्षग्रंथांतून इतस्ततः अस्ताव्यस्त पसरलेली आहे ती सर्व एकत्र करून, पुरातन वैद्यकीय ज्ञान भाराभर ग्रंथ न वाचतां, अल्पायासानें व्हावें. सदरहू दोहों ग्रंथांपैकीं, अष्टांगहृदय विशेष सन्माननीय आहे. कारण

वाग्भट, व

त्याचे ग्रंथ

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

their knowledge of simples, in which they gave early lessons to Europe, and more recently taught us the benefit of smoking datura in asthma, and the use of cowitch against worms: their chymical skill is a fact more striking and more unexpected."

(Elphinstone's India P. 279-280).

(vide also an essay by Dr. Royle on the antiquity of Indian materia medica).

त्यांत पाल्हाळ मजकूर बिलकूल नसून, थोडक्यांत पुष्कळ माहितीचा कार्यभाग व्हावा, अशी पद्धतशीर व्यवस्था केली आहे.

अष्टांगहृदय.

अष्टांगहृदय ग्रंथाचीं एकंदर सहा स्थानें किंवा भाग आहेतः—१ सूत्र; २ शारीर; ३ निदान; ४ चिकित्सा; ५ कल्प; आणि ६ उत्तरस्थान अष्टांग ह्मणजे आयुर्वेद किंवा वैद्यशास्त्र होय. त्याचीं आठ अंगें आहेतः—१ कायचिकित्सा, २ बालरोगचिकित्सा, ३ भूतचिकित्सा, ४ शालाक्य, ५ शल्यतंत्र, ६ विषचिकित्सा, ७ रसायनतंत्र, आणि ८ वाजीकरण. ह्या सर्वांचा अष्टांगहृदयांत समावेश होत असून, सदरहू ग्रंथांतील पहिलें जें सूत्रस्थान त्यांत, १ सर्व शास्त्रार्थाची मूलतत्वें, २ आरोग्यशास्त्र, ३ औषधिविद्या, ४ द्रव्यरसांचें वर्गीकरण, व त्यांची पृथक् पृथक् विकारावर योजना, आणि ५ यंत्रशस्त्रादिकांची माहिती, वगैरे संक्षेपतः व व्यवस्थित रीतीनें दिली आहे. ह्या सूत्रस्थानाचे एकंदर तीस अध्याय आहेत.

दुसरें जें शारीरस्थान त्यांत १ गर्भविवेचन, २ प्रसूतिसंकट, ३ त्याचा प्रतिकार, ४ प्रकृतिविचार, ५ मरण चिन्हें, आणि ६ रोगाविषयीं साध्यासाध्य विचार, या विषयांचें वर्णन असून, त्याचे एकंदर आठ अध्याय आहेत.

तिसरें जें निदानस्थान त्यांत रोगाचें सामान्य निदान,

किंवा कारण सांगितलें असून, त्याचे एकंदर सोळा अध्याय आहेत.

चौथें जें चिकित्सास्थान त्यांत निदानस्थानांतील एकंदर रोगांची चिकित्सा, विस्तारानें सांगितली आहे. ह्याचे बावीस अध्याय आहेत.

पांचवें जें कल्पस्थान त्यांत औषधांचे कल्प, त्यांचीं वजनें, मापें, आणि त्यांचें कषाय, इत्यादि गोष्टींचें विवेचन आहे. त्याचे सहा अध्याय आहेत.

सहावें व शेवटलें जें उत्तरस्थान, यांत १ अवशिष्ट रोगांची निदानें, २ शालाक्यतंत्र, ३ शल्यतंत्रसंबंधी रोग, ४ विषचिकित्सा, ५ रसायनतंत्र, आणि ६ वाजीकरण, या विषयांवर, विवेचन असून, त्याचे एकंदर चाळीस अध्याय आहेत.

ह्यावरून, वाचकांच्या इतकें सहज लक्षांत येईल कीं,

हिंदु वैद्यकाची पर्याप्ति.

हिंदु वैद्यकांत देहचिकित्सेच्या संबंधानें सर्व कांहीं सांगितलें असून, त्यांत त्याविषयीं इत्थंभूत वर्णन आहे. औषधिविद्येंत नानाप्रकारचीं खनिज, वनस्पतिज, आणि प्राणिज भेषजें सांगितलीं असून, त्यांत औषधें तयार करण्याविषयीं अनेक तऱ्हेच्या चतुर उपायांचें सविस्तर विवेचन केलें आहे. तसेंच रोगनिदान, व तत्संबंधीं पथ्यापथ्य विचार, आणि रोग चिन्ह व तत्संबंधीं साध्यासाध्य विचार, याविषयींही साद्यन्त वर्णन आहे.

शल्यशास्त्रांत देखील हिंदूंचें नैपुण्य विशेष दिसून येतें. उदर, कुक्षि, गर्भकोश, वगैरे ठिकाणीं जरूर त्या प्रसंगीं ते शस्त्रक्रियेचें अवलंबन करीत असत. मूत्राश्माचा छेद करण्यासाठीं ते शस्त्रक्रिया चालवीत; आणि अंत्रवृद्धि, अर्श, व भगंदर, हे रोग ते बरे करीत. संधिभंग झाला असल्यास, तो सांधा ते मोठ्या दक्षतेनें बसवीत. वातशूळ, नासिकाकरण, गर्भविमोचन, वगैरे जोखमीचीं कामें ते फारच विलक्षण धैर्यानें व प्रकृतिनैपुण्यानें करीत. सर्पफण, शरपुंखमुख, गर्भशंकु, तालयंत्र, शंकु, कंकमुख, स्वस्तिकयंत्र, मंडलाग्र, अर्धचंद्रमुखशलाका, सूचि, एषणी, मुचुंडीयंत्र, सनिग्रहसन्दशयंत्र, अर्शोयंत्र (रोगपाहण्याचें), योनिव्रणेक्षण, वृद्धिपत्र, शरारिमुख, वेतसपत्र, आटिमुख, त्रिकूर्दक, कुठारी, अध्यर्धधार, उत्पलपत्र, व्रीहीमुख, अंगुलीशस्त्र, बडीश (गळ), वगैरे[1] शस्त्रास्त्रांवरून, सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं आमचें आर्यवैद्यक किती परिपक्वतेस आलें होतें, याचें अनुमान सहजींच होण्यासारिखें आहे.

हिंदूंचीं वैद्यकीय शस्त्रें.

वाग्भटाचा काल इसवी शकाच्या तिसऱ्या शतकांत

१ डा० गर्देकृत सार्थवाग्भट.

हिंदुशल्यशास्त्रांत एकंदर १२७ हत्यारांचें वर्णन केलें आहे; आणि छेदन, भेदन, लेखन, व्याधन, एष्यम्, अहर्य, विश्रवण, सेवन, इत्यादि शस्त्रक्रियेचे भेद सांगितले आहेत.

वाग्भटाचा काल, व तदनंतरचे वैद्यकावरील ग्रंथकार.

असावा असें अनुमान आहे. वाग्भटानंतर वृंदमाधव, वैद्यरहस्य, चिकित्सासार, भैषज्यरत्नावली, शार्ङ्गधर, भावप्रकाश, तोडरानंद, निघंट, माधवनिदान, वातव्याधिचिकित्सा, वगैरे ग्रंथांचे प्रवर्तक होऊन गेले. ह्यांपैकीं, महत्वाचा आणि जुना ग्रंथ ह्मटला म्हणजे सहाव्या शतकांतील **धन्वंतरीकृत निघंट** होय. ह्यांत पहिल्यानें द्रव्याचे सर्व पर्यायशब्द सांगितले असून, नंतर त्याचे गुणदोष वर्णन केले आहेत. तदनंतर सुमारें सातशें वर्षांनीं, ह्मणजे इसवी सनाच्या चौदाव्या शतकांत, "**वीरसिंहावलोक**" नामक ग्रंथ **तोमर** वंशांतील **वीरसिंह** नांवाच्या ग्वाल्हेरच्या राजानें केला. हा राजा इ० सन १३७९ च्या सुमारास राज्य करीत होता. त्यानंतर इसवी सनाच्या सतराव्या शतकांत, ह्मणजे अजमासें दोनशें वर्षांमागें, **वैद्यविलास** नामक ग्रंथ **चौल** येथील **रघुनाथ** पंडितानीं केला होता. याप्रमाणें, आमच्या **आर्यवैद्यकाचें** इतिवृत्त, अति पुरातन काळापासून तों तहत सतराव्या शतकापर्यंत, थोडक्यांत वाचकांपुढें सादर केलें आहे.

होरेस् विल्सन् हा एके ठिकाणीं असें लिहितो कीं, 'हिंदूंस वैद्यक, आणि शस्त्रक्रिया, हीं उत्तम प्रकारचीं माहीत होतीं.'[1]

---

1 " In medicine, as well as in astronomy

(पुढें चालू)

हिंदू वैद्यकावरून पाहतां, ते या शास्त्रांत कोणाचेही ऋणी नाहींत, असें निर्विवादपणें सिद्ध होतें. कारण, ज्योतिर्ग्रंथाप्रमाणें यांत यवनादिकांचा कोणत्याही प्रकारें, व केंव्हांही, बिलकुल उल्लेख केला नाहीं. इतकेंच नाहीं तर, पाश्चिमात्य राष्ट्रांत हिंदू वैद्यकाबद्दल मोठी ख्याति व प्रौढी असून, लाटीन भाषेंत हिंदू वैद्यकावरून जीं जीं भाषांतरें झालेलीं आहेत, त्या सर्वांत चरकाचें नांव वारंवार दृष्टीस पडतें. आमचें आर्यवैद्यक शिकण्याची लालसा प्रथमतः आरबी लोकांनीं प्रदर्शित केली. त्यानंतर त्यांनीं चरक व सुश्रुत या प्रसिद्ध आणि सर्वमान्य भिषजांच्या ग्रंथांचें आरबी भाषेंत भाषांतर करविलें. आणि तेंव्हांपासून आर्यवैद्यशास्त्राचा

हिंदुवैद्यकापासून इतर राष्ट्रांस प्राप्ति.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

and metaphysics, the Hindus once kept pace with the most enlightened nations of the world; and that they attained as thorough a proficiency in medicine and surgery as any people whose acquisitions are recorded, and as indeed was practicable, before anatomy was made known to us by the discoveries of modern inquirers. That surgery (as well as other departments of medical science) was once extensively cultivated and highly esteemed by the Hindus."

Vol. II. (Dádá Bhái Nawroji's Speeches).

अभ्यास करण्याचा त्यांनीं सतत प्रयत्न चालविला. पुढें आरबी लोकांपासून युरोपस्थांनीं ही भिषग्विद्या संपादन केली; आणि इब्नसिना, अल्रासी, इबन-सिराबी, वगैरे आरबी ग्रंथांचें लाटीन भाषेंत भाषांतर करून, त्यांस त्यांनीं आव्हिसेना, ऱ्हेजेस्, आणि सिरापिअन, वगैरे लाटीन नांवें दिलीं. याप्रमाणें आह्मां आर्यांपासून आरब लोकांनीं, आणि आरबां-पासून युरोपस्थांनीं, या वैद्यकाचें ज्ञान, परंपरेनें संपा-दिलें असून, हा पौरस्त्यांकडील ज्ञान निर्झर पाश्चिमा-त्यांस थेट सतराव्या शतकापर्यंत सतत प्राप्त होत होता, यांत बिलकूल शंका नाहीं. चरक व सुश्रुत यांचें आरबी भाषेंत भाषांतर इसवी शकाच्या आठव्या शतकापूर्वी झालें असून, संस्कृतांतील वैद्यक ग्रंथांचें भाषांतर बग-दादच्या कालिफांनीं इ० सन ७५०-९६० सालीं के-ल्याचें दिसतें.

हिंदुवैद्यकाची च-ढती व उतरती कला.

हिंदू वैद्यकाची चढती कला इसवी शकापूर्वी २५० वर्षांपासून तों इसवी शकाच्या ७५० वर्षांपर्यंत होती. त्यानंतर त्याला उतरती कळा लागली असून, त्याचें पूनरुज्जीवन अजूनपर्यंत झालें नाहीं. तथापि, दिव-सानुदिवस त्याचें पुनरुज्जीवन करण्याकडे, बंगाल, मुं-बई, आणि मद्रास इलाख्यांतील विद्वज्जनांचें लक्ष्य चांगलें

लागत चाललें आहे. ह्यावरून, आमच्या **आर्यवैद्यका**-च्या उपयुक्ततेबद्दल साशंक होण्याचें बिलकूल कारणच राहिलें नाहीं. पुरातन वैद्यकाच्या परीक्षणार्थ जी कसोटी लावावयाची, ती तत्कालानुरूपच लाविली पाहिजे. त्या मन्वंतरांतील लोकस्थिति, विद्याप्रसार, आणि शास्त्रान्वेषण, इत्यादि गोष्टींकडे लक्ष दिलें ह्मणजे, त्यावेळच्या वैद्यकप्रवर्तक ऋषींचे अश्रांत परिश्रम, दीर्घ उद्योग, अलौकिक मानसोत्साह, कुशाग्रबुद्धि, विचारपरिशीलन, आणि हस्तकौशल्य, इत्यादि गुणांचें फारच आश्चर्य वाटून, त्यांचेच वंशज आह्मी असतां, आमच्यांत त्या गुणांचा लेश मात्र देखील कां राहिला नाहीं, व आह्मी इतक्या हीन दशेप्रत कां पोहोंचलों आहों, यबद्दल अतीव विस्मय होतो. पूर्वी **शस्त्रक्रिया** ही प्राचीन वैद्यकाचें एक महत्वाचें अंग होतें. परंतु तीच हल्लींच्या आमच्या वैद्यकांत अगदीं नष्ट झाली आहे. मुतखडा काढणें, मोतिबिंदु खालीं दडपणें, ग्रंथि कांपणें, जलोदर वेधणें, गर्भविमोचन करणें, नाक बसविणें, वगैरे अनेक शस्त्रक्रिया, आमचे पूर्वज फारच चलाखीनें व कुशलतेनें करीत. पशुचिकित्सेंत देखील त्यांचें पाऊल बरेंच पुढें सरसावलेलें असून, त्यावर **शालिहोत्राचा** प्रसिद्ध ग्रंथही आहे. आमचें **शल्यशास्त्र** व औषधिविद्या, हीं दोन्ही आमच्याकडूनच **पाश्चि**-

मात्यांस प्राप्त झाली असून, ती गोष्ट ते कबूलही करितात.

वैद्यकांत, हिंदूंची क्षणोक्षणीं इतरांस मदत.

पाश्चात्यांच्या सहवासामुळें, ज्याप्रमाणें आपणांस हल्लीं हरएक बाबतींत त्यांचेंच साहाय्य घेण्याची संवय झाली आहे, त्याचप्रमाणें प्राचीनकाळीं, पाश्चात्य आणि पौरस्त्य वगैरे यच्चावत् राष्ट्रें प्रत्येक गोष्टींत ब्राह्मणांची

---

1 "The medical science of the Bràhmans was also an independent development. The national astronomy and the national medicine of India alike derived their first impulses from the exigencies of national worship. Observations of the heavenly bodies were required to fix the dates of the recurring festivals; anatomical knowledge took its origin in the dissection of the victim at the sacrifice, with a view to dedicating the different parts to the proper gods."

"Unlike the astronomical treatises of the Bráhmans, the Hindu medical works never refer to the Yavanas, or Greeks: as authorities; and, with one doubtful exception, they contain no names which point to a foreign origin. The chief seat of the science was at Benares, far to the east of Greek influence in India. Indeed, Indian Pharmacy employed the weights and measures of Provinces still farther to the south-east, namely, Magadha and

(पुढें चालू)

मदत मागत असत. इसवी सनाच्या आठव्या शतकांत, **बगदादचा** प्रसिद्ध **कालिफ हरूण अलरशीद** यानें आपल्या खानगी तैनातींत, खुद्द स्वतःसाठीं **हिंदुस्थानांतले** दोन नामांकित **ब्राह्मण** वैद्यच ठेविले होते. ह्यांस तिकडे **मणका व साले** असें म्हणत. याच्याही अगोदर सुमारें सातशें वर्षे, म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या शतकांत, **डिआस्कोरायडीज्नें** वैद्यकावर म्हणून जो ग्रंथ लिहिला, त्यांत बहुतेक **आर्यौषधोपचारच** सांगितले आहेत. **थिओ-**

(मागील पृष्टावरून पुढें चालू)

Kalinga. Arabic medicine was founded on the translations from the Sanskrit treatises, made by Command of the Kaliphs of Bagdád, 750-960 A.D. European medicine, down to the 17th century, was based upon the Arabic; and the name of the Indian physician Charaka repeatedly occurs in the Latin translations of Avicenna (Ibn Sina), Rhazes (Al Rasi), and Sarapion (Ibn serabi)."

"Indian medicine dealt with the whole area of the science." * * *

"The surgery of the ancient Indian physicians appears to have been bold and skilful. They conducted amputations; * * * practised lithotamy; performed operations in the abdomen and uterus; cured hernia, fistula, piles; set broken bones and

(पुढें चालू)

फ्रेजस् हा इ० स० पूर्वी तिसऱ्या शतकांत होऊन गेला असून, त्याच्या लेखावरून देखील त्यानें हिंदु वैद्यकाचा पुष्कळच उपयोग केला असल्याचें दिसतें. ह्याच्याही पूर्वी सुमारें शंभर वर्षे, ह्मणजे इ० स० पूर्वी चौथ्या शतकांत खुद्द शिकंदर बादशहानें देखील आपल्या-पदरीं दोन ब्राह्मण वैद्यच ठेविले होते. आणि तेही मुख्यत्वेंकरून अशा हेतूनें कीं, ग्रीक वैद्यांच्या हातून

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

dislocations ; and were dexterous in the extraction of foreign substances from the body. A special branch of surgery was devoted to rhinoplasty, or operations for improving deformed ears and noses, and forming new bones ; a useful operation, * * and one which European surgeons have borrowed."

"The ancient Indian surgeons also mention a cure for neuralgia. * * * They were expert in midwifery, not shrinking from the most critical operations, and in the diseases of women and children. They devoted great care to the making of surgical instruments, and to the training of students by means of operations performed on wax * *, or on the tissues of the vegitable kingdom, and upon dead animals. * * * Considerable advances were also made in veterinary science, and monographs exist on the diseases of horses and elephants"

(Indian empire P. P. 106-108).

जे रोग बरे होत ना, त्यांचें त्यांनीं उपशमन करावें. सर्प-दंशाचा व्याधि आमचे आर्यवैद्य तेव्हांच बरा करीत. परंतु ग्रीक लोकांस तें साधत नसे. कारण, त्यांस तत्संबंधीं औषधीच माहीत नव्हती. त्याचप्रमाणें कित्येक आधि-व्याधींच्या कारणांनीं, जेव्हां जेव्हां ग्रीक लोकांस अस्वस्थता वाटे, तेव्हां तेव्हां ते तदुपशमनार्थ ब्राम्हणांकडेसच जात.

आर्यवैद्यक, व त्याचा इतर राष्ट्रांवर अनुग्रह.

तात्पर्य इतकेंच कीं, अखिल जगांतील वैद्यकाची मूळ खाण, अथवा आदिनिर्झर, केवळ हिंदूंचें होत; व त्यांच्यापासूनच यच्चावत् इतर राष्ट्रांस ज्ञानप्राप्ति. आणि असेंच जर आहे तर, आमचें ऋण प्रत्येक

1 Romesh Chander Dutt's Ancient India. P. 736.

2 "The Grecian physicians found no remedy against the bite of snakes, but the Indians cured those who happened to incur that misfortune." (Nearchus).

3 The Greeks "when indisposed, applied to their Sophists (Brâhmans) who, by wonderful, and even more than human means, cured whatever would admit of cure." (Arrian).

4 "It is to the Hindus, we owe the first system of medicine." (Review of the History of medicine, 1867. vide also the commentary on the ancient Hindu system of medicine. 1845. By Dr. Wise, of the Bengal medical service).

राष्ट्रानें प्रांजलबुद्धीनें कबूल करणें अगदीं यथान्याय आहे. परंतु दुराग्रह व अहंभाव, हा कांहीं कांहीं पाश्चात्यांत जणूं काय खिळूनच गेला असल्यामुळें, आम्हां भारतीयांचें ऋण कबूल करण्याची त्यांजला लाज वाटते; आणि ह्मणूनच प्रत्येक शास्त्राचा किंवा कलेचा उत्पादकपणा ग्रीस अथवा रोमच्या डोसक्यांवरच लादण्याचा ते सतत प्रयत्न करितात. परंतु त्यांचें ते सर्व प्रयत्न अंतीं निष्फळच होतात. इतकेंच नाहीं तर, जास्त

---

1 "In Europe the antiquity of Hindu medicine is not yet generally known and recognized, and the habit of tracing the origin of all Aryan culture to the Greeks, still impedes an impartial inquiry." (Dutt's Ancient India. P. P. 727-728).

"Facts regarding the ancient history of medicine have been sought for, only in the classical authors of Greece and Rome; and have been arranged to suit a traditional theory which repudiated all systems which did not proceed from a Grecian source. We are familiar from our youth with classical history and love to recall events illustrated by the torch of genius and depicted on our memories; and it requires a thorough examination of a subject, a careful weighing of new evidence, and a degree of ingeniousness not always to be found, to alter early impressions. Still candour and truth require us to examine the value of new facts in history as

(पुढें चालू.)

शोधानें सर्व शास्त्रकलापांचा, व कलासमूहांचा उत्पादक-पणा, हिंदूंच्या कडेसच येतो. आणि ज्या हिपोक्रेटीज्‌ला युरोपस्थ हे वैद्यशास्त्राचा उत्पादक ह्मणून समजत, त्यानें सुद्धां आमच्या हिंदुवैद्यकाचें चांगलें अध्ययन केलें असल्याचें, त्याच्याच ग्रंथावरून चांगलें शाबीद होतें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

they are discovered, so as to arrive at just conclusions."

(Review of the History of medicine. By Dr. Wise.)

1 Dr. Royle's Essay on "The antiquity of Hindu medicine." 1837.

भाग २४ वा.

नीतिशास्त्र.

संस्कृतांतील नीति-ग्रंथ.

आमच्या भारतीयांस बहुत उपदेशप्रद, आणि अखिल जगास विशेष बोधावह, असे अत्युपयुक्त नीतिग्रंथ देखील संस्कृतांत आहेत. आतां, हे ग्रंथ जरी स्वतंत्र आहेत तरी त्यांचीं मूलतत्त्वें पाहूं गेलें असतां, तीं वेद, रामायण, व महाभारत, यांत दिसून येतात. त्यावरून नीतिशास्त्राचें पौराणत्व वाचकांच्या ध्यानांत सहज येईल; सदहू दोहों महाकाव्यांपैकीं महाभारत ह्मटलें ह्मणजे, नानाविध दिव्यरत्नांचा एक महोदधीच असून, त्यांत महत्वाच्या अशा बहुतेक सर्व विषयांचें विवेचन केल्याचें दिसून येतें. धर्मशास्त्र व नीतिशास्त्र; राजधर्म व क्षात्रियधर्म; ज्ञानकांड व कर्मकांड; उपासनामार्ग व भक्तिमार्ग; धर्मसंस्था व लोकसंस्था; तसेंच वाग्विलास, सभापांडित्य, इतिहास, भूगोल, आणि इतर उपयुक्त विषय, या सर्वांचा थोडा बहुत विचार त्यांत केला आहे.

कामन्दकीय नीतिशास्त्र म्हणून नीतिशास्त्रावर एक स्व-

कामन्दकीय नीतिशास्त्र.

तंत्रच ग्रंथ असून, त्याचे एकोणीस अध्याय आहेत. ह्याच नांवाचा व अशाच प्रकारचा दुसरा ग्रंथ, **हिंदूंनीं जाव्हास** देशान्तर केलें त्यावेळीं, त्यांनीं आपल्या बरोबर इ० स० च्या चौथ्या शतकांत नेला असल्याविषयीं, **राजेन्द्र लालमित्र** यांचें ह्मणणें आहे. त्यावरून पाहतां, **कामन्दकीय** नीतिशास्त्र हें चौथ्या शकापूर्वीं निदान एक दोन शतकें तरी रचलें असावें, असें वाटतें.

पंचतंत्र, हितोपदेश, व दुसरीं नीतिकाव्यें.

ह्याशिवाय पांचव्या शतकांत, **विष्णुशर्मा** ब्राह्मणानें रचलेलें **पंचतंत्र**; सातव्या शतकांतील भर्तृहरिकृत **नीतिशतक** व **वैराग्यशतक**; अकराव्या शतकांतील भोजदेवकृत **सरस्वतिकंठाभरण**; हालकृत **सप्तशतक**; गोवर्धनकृत **सप्तशति** (१२ वें शतक; यावरूनच प्रसिद्ध अर्वाचीन हिंदु कवि बिहारिलाल यानें **सत्तसई** नामक काव्य रचलें आहे). श्रीहर्षदासकृत **सदुक्तिकर्णामृत** (शके ११२७. इ० स० १२०५; यांत ४४६ कवींच्या कृतींतून पृथक् पृथक् अवतरणें घेतलेलीं आहेत); **शार्ङ्धरपध्दति** (१४ वें शतक. यांत ६००० वेंचे, सुमारें २६४ कवि व ग्रंथकार यांच्या ग्रंथांतून, घेतले आहेत); चौदाव्या शतकांतील **नारायणकृत हितोपदेश**; वगैरे अनेक नीतिबोधक ग्रंथ आहेत.

ह्या सर्वांत, पंचतंत्र व हितोपदेश हीं अग्रेसर होत.

भारतीयांचा कथा-मृतानिर्झर.

नीतिमार्ग प्रदर्शक यासंबंधानें, हे दोन्ही ग्रंथ इतके उत्कृष्ठ साधले आहेत कीं, प्राच्य व प्राश्चात्य देशांत त्यांचीं भाषांतरें बहुतेक सर्व भाषांत तयार होऊन प्रसिद्ध झालीं आहेत. आणि हा आमच्या भारतीयांचा कथामृतनिर्झर प्राची दिशेकडून प्रतीची दिशेकडे सतत वाहत, जाऊन तो अखिल प्राश्चात्यांची नीतिजीवनकला उदयास आणण्यास, व ती प्रफुल्लित करण्यास, कारणीभूत झाला.

पंचतंत्राचीं भाषांतरें.

पल्हवींत,

पंचतंत्राचें भाषांतर प्रथमतः इसवी शकाच्या सहाव्या शतकांत, इराणचा शहा अनुशीर्वाण याच्या बुझरजुम्हेर नामक प्रसिद्ध वजीरानें पल्हवी भाषेंत केलें. ह्या शाहानें, व त्याच्या मागून जेवढे राजे गादीवर बसले तितक्यांनीं, हें पुस्तक एक अमूल्य रत्न समजून, आपल्या संग्रहीं ठेविलें. इतकेंच नाहीं तर, त्याची बहुत जोपासना करून तत्कथित नीतिदीप प्रकाशानें त्यानें आपलें राजकीय, सामाजिक, धार्मिक, आणि स्वकीय वर्तन, सुसंस्कृत केलें. पुढें कांहीं कालानें, कालीफ अबूजाफरनिकी यानें अतिपरिश्रमानें त्याची एक प्रत पल्हवी भाषेंतच मिळवून,

तत्कालीन प्रसिद्ध विद्वान् इमानहुसेनअबदुल मोकाफ याजकडून तिचें अरबीभाषेंत भाषांतर करविलें. तदनंतर हिजरा शकाच्या ३८० सालीं, ह्मणजे इसवी सनाच्या दहाव्या शतकांत, सुलतान महमद गिझनी यानें तें पद्यात्मक रचिलें. व पुढें सदरहू शकाच्या ५१५ व्या वर्षी, बेहरामशाहाच्या हुकुमानें त्याचेंच आरबी भाषेंतून इराणींत भाषांतर झालें असून, तेंच हल्लीं "कालिलद्मन" (पंचतंत्रांतील पिंगल नामक मृगाधिपाचे मंत्रिद्वय १ करटक आणि २ दमनक) या नांवानें सुप्रसिद्ध असलेलें उपलब्ध आहे.

अरबींत,

इराणींत,

अरबी भाषेंत झालेल्या भाषांतरांत पद्यात्मक रचना विशेष असून, त्यांत अप्रसिद्ध, आणि व्यवहारातीत, अशा शब्दांचा फारच उपयोग केला असल्यामुळें, तें अति दुर्बोध झालें होतें. सबब, मुलनाअल्ली हुसेन यानें तें आधुनिक भाषेंत रचून, त्याला अन्वर सोहेली हें नांव दिलें. पुढें इसवी सन १००२ सालीं, जलालउद्दीन अहमद आकबर यानें, तें सर्व लोकांस सुगम होऊन समजेल अशा भाषेंत तयार करण्याविषयीं, आपला विद्वान वजीर अबुल फाजिल यास सांगून, त्याजकडून तें तयार करविलें; आणि त्यास आयरदनीश अथवा ज्ञानोदधि असें नांव दिलें.

इसवी सन १७०९ सालीं, सदरीं लिहिलेल्या 'कलिल दमन' नामक पारसीक पाठभेदाचे

फ्रेंच भाषेंत,

फ्रेंच भाषेंत भाषांतर होऊन, त्याला " भारतीय ज्ञाननिष्ठ पिल्पेकृत नीतिकथामृत सागर " अशा आशयाचें त्याच भाषेंत नामधेय

इंग्रजींत,

मिळालें. व त्याचेंच पुढें इंग्रजींत भाषांतर होऊन, तद्रसास्वादकुतूहल हें पाश्चिमात्यांत अति तीव्र आणि प्रखर झाल्यामुळें, इ० स० १७७५ सालीं, त्याच्या एकावर एक अशा पांच आवृत्ति काढाव्या लागल्या.

अमरसोहिलीचें टर्की भाषेंत इ० स० १५४० सालीं भाषांतर झालें असून, तें तयार हो-

व तुर्कीत.

ण्याच्या कामीं भाषांतर करणार अलीबेनसाले, याला वीस वर्षें सतत परिश्रम करावे लागले असें सांगतात. ह्याचेंच भाषांतर इ० स० १७७८ सालीं, एमकारडॉन् नामक फ्रेंच विद्वानानें फ्रेंच भाषेंत करून, त्याला "बिडपेकृत भारतीय नीतिसार" अशा अर्थाचें नांव दिलें.

याप्रमाणें, जगद्विख्यात भारतीय पंचतंत्राचा संक्षिप्त इतिहास असून, त्या अनुपम नीतिसागरापासूनच पाश्चात्य ज्ञानोदकांत नीतिसिंचन होऊन, त्याचीं फळें सर्वत्र दिसूं लागलीं.

प्राचीचें पाश्चात्यांस ऋण.

आतां ही गोष्ट पाश्चिमात्यांस देखील कबूल करणें भाग पडतें. प्रोफेसर मोक्षमुलर ह्मणतात कीं:—

"Even the study of fables owes its new life to India, from whence the various migrations of fables have been traced at various times and through channels from East to West. Buddhism is now known to be the principal source of our legends and parables."

(What can India teach us ? P. 9)

प्रोफेसर वेबर लिहितात कीं:—

"Of the Ethico-Didactic Poetry—the so-called Nitishàstràs—but little has survived in a complete form (some pieces also in the Tibetan Tandjur), no doubt because the great epic, the Máhá Bhàrata, in consequence of the character of universality which was gradually stamped upon it, is itself to be regarded as such a Nitishàstra. Still, relics enough of the aphoristic ethical poetry have been preserved to enable us to judge that it was a very favourite form, and achieved very excellent results. Closely allied to it, is the literature of the 'Beast Fable', which has a very special interest for us, as it forms a substantial link of connection with the West. We have already pointed out that the oldest animal-

fables known to us at present occur in the Chhándogyopanishad. Nor are these at all limited there to the representation of the gods as assuming the forms of animals, and in this shape associating with men, of which we have even earlier illustrations, but animals are themselves introduced as the speakers and actors. In Pànini's time, complete cycles of fables may possibly have already existed, but this is by no means certain as yet. The oldest fables, out of India, are those of Babrius, for some of which at least the Indian original may be pointed out. But the most ancient book of fables extant is the Pancha Tantra." * * * *

"Allied to the fables are the Fairy Tales and Romances, in which the luxuriant fancy of the Hindus has in the most wonderful degree put forth all its peculiar grace and charm. These too share with the fables the characteristic form of setting just referred to, and thereby, as well as by numerous points of detail, they are sufficiently marked out as the original source of most of the Arabian, Persian, and Western fairy tales and stories."

(History of Indian Literature.
P. P. 210/ 211. 212. 213.)

ऋक्संहितेंत सूर्याला गृध्र किंवा श्येन, यांची उपमा दिल्याचें आढळतें. तसेंच छान्दोग्योपनिषदांत देवादि-

प्राच्य कथांचें पौराणत्व.

कांनीं पशुरूपाचा अंगिकार करून मनुष्यांबरोबर आहारविहार केल्याचें दिसून येतें. इंद्रानें मर्कट, कपिंजल, मेष, इत्यादिकांचें रूप धारण केल्याचें, आणि मानवीसुखासाठीं व तद्रक्षणार्थ ईश्वरानें देखील मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंहादि अवतार घेतल्याचें सर्वांस महशूर आहेच. यावरून आमच्या कल्पित कथांचें एतिहासिक पौराणत्व कोणाच्याही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

प्राच्य कथा-पर्यटन.

आतां, हें कथापर्यटन प्राची दिशेकडून प्रतीची दिशेकडे कसें झालें, आणि त्याचें स्थलांतर, स्थित्यंतर, व देशांतर, हें कोणत्या मार्गानें झालें, याविषयीं दोन शब्द लिहिणें अगदीं अगत्याचें आहे. वर सांगितल्याप्रमाणें या कथानिर्झराचा उगम प्रथमतः भरतखंडांत झाला. हें भरतखंड, ज्याला हल्लीं हिंदुस्थान म्हणतात तें, प्राचीन कालीं चौदाविद्यां आणि चौसष्टकलांचें केवळ माहेरघरच होतें. तेव्हां उघडच, येथील शास्त्रकलांचा रसास्वाद घेण्याचा उपक्रम इराणच्या शहानें केल्यामुळें, पंचतंत्राचें भाषांतर प्रथमतः अरबी भाषेंत सहाव्या शतकांत होऊन, हा कथौघ क्रमाक्रमानें अफ-

१ भाग ३० वा पृष्ट २१३ पहा.

आशियाखंडांत.

गाणिस्थान, इराण, अरबस्थान, सीरिया, पालेस्टाईन, आणि **लघु आशिया** किंवा **आशियामायनर,** येथें पसरला. या ठिकाणीं अनेक विद्वानांनीं अनेक भाषांत त्याचें भाषांतर करून, यथामति देशसेवा करण्यासाठीं बहुत परिश्रम घेतले, व यश संपादिलें. **ख्रिस्ती** धर्मशास्त्र जें **बायबल** त्यांत देखील हस्तिदंत, कपि, चंदन, केकी (मयूर), वगैरे **संस्कृत** शब्दांचे अपभ्रंश दृष्टीस पडतात. त्यावरून हे पदार्थ **हिंदुस्थानांतून सीरिया, पालेस्टाईन,** व **आशियामायनर** इकडे, इराणचें आखात, **तांबडा** समुद्र, व भूमध्यसमुद्र, यांतून निर्गत होत असल्याचें ठरत असून, सदरहू देशांमध्यें इकडील ज्ञानाचा मोबदला होण्यास हाच दळणवळणाचा मार्ग खुला होता, असें आतां निर्विवाद सिद्ध होत आहे.

यूरोपखंडांत, आणि

याप्रमाणें **पंचतंत्रांतील नीतिवैभवाची** कीर्ति थेट **आशियामायनर** आणि भूमध्यसमुद्रापर्यंत जाऊन थडकल्यामुळें, **यूरोपांतील तुर्क** लोकांचें कुतूहल तदामोदसेवनाविषयीं जागृत होऊन, त्यांनीं आपली जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं, **अमरसोहिलीचें** भाषांतर

1 Lectures on the science of Language. Vol.1 P. 231.

अमेरिकेंत.

तुर्की भाषेंत, इसवी सन १९४० साली करविलें. तदनंतर सर्व यूरोपखंडांत त्याचा प्रसारहोत जाऊन, बहुतेक सर्व भाषांत त्याचीं तेथें भाषांतरें झालीं; आणि तिकडूनच त्याचा पातालांत (अमेरिकेंत) ही फैलाव झाला.

ग्रीक गंधाविषयीं मिथ्या व निर्मूलक कल्पना.

कांहीं पाश्चात्य पंडित (वेबर प्रभृति), प्राच्य कथानकांत ईसाबनीतीचा ग्रीक गंध असल्याविषयीं कल्पना करितात. परंतु ही त्यांची कल्पना केवळ निराधार आहे. इतकेंच नाहीं तर, ईसाबे नांवाचा कोणी ग्रीक होता किंवा नाहीं, यावि-

---

1 * * * "And as the very existence of Æsop, whom the Arabs believe to have been an Abyssinian, appears rather doubt-ful, I am not disinclined to suppose that the first moral fables which appeared in Europe were of Indian or Ethiopian origin."

(Sir William Jones. Asiatic antiquities. 1786.)

"An important part of the Hindu Literature, however, still remains to be noticed, in their tales and fables; in both of which species of composition they appear to have been the instructors of all the rest of mankind. The most ancient known fables (those of Bidpài) have been found almost all chang-

(पुढें चालू)

षयींच विद्वज्जनांत अलीकडे अनेक कारणांनीं संशय

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

ed in their Sanskrit dress; and to them almost all the fabulous relations of other countries have been clearly traced. The complicated scheme of story-telling, tale within tale, like the "Arabian Nights," seems also to be of their invention, as are the subjects of many well-known tales and romances both Oriental and European."

(Elphinstone's History of India P. 302.)

"And the Sanskrit Beast-stories now occupy an even more significant place in the History of Indo-European literature than they did then. Many fables of animals familiar to the Western world, from the time of Æsop downwards had their original home in India. The relation between the fox and the lion in the Greek versions has no reality in nature. It was based, however, upon the actual relation between the lion and his follower the jackal, in the Sanskrit stories. Weber thinks that complete cycles of Indian fables may have existed in the time of Panini (B. C. 350)" * * *

"The most ancient animal fables of India are at the present day the nursery stories of England and America. The graceful Hindu imagination delighted also in fairly tales; and the Sanskrit compositions of this class are the original source of many of the fairy tales of Persia, Arabia, and Christendom."

(Dr. Hunter's Indian Empire P. P. 127-128).

उत्पन्न होऊन, मतभेद झाला आहे. सर विल्यम जोन्स सारखे महाविद्वान व अतिशोधक गृहस्थ देखील तत्संबंधीं आपली आशंका प्रदर्शित करितात.

असो. पंचतंत्राविषयीं पाश्चात्यांचे अभिप्राय या खालीं थोडक्यांत देतों, त्यावरून त्याचें महत्व आणि सर्वमान्यता, हीं वाचकांच्या सहज लक्षांत येतील.

"The following translation, * * * is a faithful portrait of a beautiful work, which * * * is the Sanskrit original of those celebrated fables which after passing through most of the oriental languages, ancient and modern, with various alterations to accommodate them to the taste and genius of those for whose benifit or amusement they were designed, and under different appellations, at length were introduced to the knowledge of the European world with a title importing them to have been originally written by Pilpay or Bidpài, an ancient Brahman."

(Wilkins.)

"Their (the Hindoos) Nitisástra, or system of ethics, is yet preserved, and the fables of Vishnuserma, whom we ridiculously call Pilpay, are the most beautiful, if not the most ancient, collection of Apologues in the world."

(Sir William Jone's discourse 1786, on the antiquities, arts, sciences and Literature of Asia).

"The ancient Brahmins of India, after a great deal of time and labour, compiled a treatise (which they called Kurtuk and Damnak) in which were inserted the choicest treasures of wisdom, and the perfectest rules for governing a people."

(Fraser. Catalogue of Oriental manuscript.)

पंचतंत्रांतील नीतितत्वांची कीर्ति.

आतां, ज्या पंचतंत्राची धवलकीर्ति अखिल जगांत पसरली; ज्याचा परिमल सर्वत्र सुटला; ज्याचा आमोद ह्या भूतलावरील सुधारलेल्या सर्व राष्ट्रांनीं घेतला; ज्यांतील अमृतपान सर्व लोकांनीं केलें; आणि ज्यांतील उत्कृष्ठ मकरंद सर्वांनीं चाखला; त्या पंचतंत्राच्या मूळइतिहासाविषयीं दोन शब्द लिहून हा भाग पुरा करितों. दक्षिण देशांत महिलारोप्य नामक नगरीं, इ० स० च्या सुमारें पांचव्या शतकांत, अमरशक्ति नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला वसुशक्ति, उग्रशक्ति, आणि अनेकशक्ति, असे तीन पुत्र असून, ते तिन्ही अगदीं मतिमंद, व केवळ पशुतुल्य होते; त्यामुळें तो फार दिलगीर होऊन, त्याचें मोठें राज्यही त्याला शून्यवत् भासूं लागलें. पुढें, ह्या पुत्रांची अशी मुढावस्था त्या राजाला दुःसह झाल्याकारणानें, ते हरएक प्रयत्नानें व कोणत्या तरी उपायांनीं शहाणे व्हावे, एतदर्थ, त्यानें एके दिवशीं आपल्या दरबारांतील सर्व मंत्री मंडळास

पाचारण केलें. राजाज्ञेप्रमाणें सर्व सचिववर्ग एकत्र झाल्यावर, आपले पुत्र शास्त्रविमुख आणि विवेकशून्य असल्याविषयीं, राजानें त्यांस कळवून, त्यांच्या बुद्धीवर जेणेंकरून प्रकाश पडेल, असा उपाय योजण्याविषयीं आज्ञा केली. तदनंतर त्या ठिकाणीं जमलेल्या पांचशें पंडितगणांत उभे राहून एकानें असें प्रत्युत्तर केलें कीं, हे राजा, ज्ञानार्जन आणि विद्याव्यासंग हीं फार कठिण आहेत. कारण कीं, फक्त व्याकरणाचेंच अध्ययन करण्यास बारा वर्षें लागतात. त्यानंतर मन्वादि ऋषींचीं धर्मशास्त्रें, चाणाक्यासारख्या राजकार्य धुरंधरांचीं अर्थशास्त्रें, आणि वात्स्यायनादींचीं कामशास्त्रें, यांचें सम्यक् अध्ययन करावें लागतें; आणि हीं सर्व यथासांग झालीं ह्मणजे धर्मार्थ कामशास्त्रांत निपुणता येऊन, मनुष्यास व्यवहारज्ञान प्राप्त होतें.

हें सर्व ऐकून घेऊन, दुसऱ्या एका बुद्धिमान् पंडितानें असें सुचविलें कीं, अशा प्रकारच्या शिक्षणक्रमानें राजाचा हेतु सिद्धीस न जाऊन, त्याच्या पुत्रांचा देखील कार्यभाग होणार नाहीं. कारण,

अनंत पारं किलशब्दशास्त्रम्
स्वल्पं तथायुर्बहवश्चविघ्नाः ।
सारं ततो ग्राह्य मपास्य फल्गु
हंसैर्यथा क्षीरमिवांबु मध्यात् ॥

सबब, या ज्ञानोदधीच्या अनंतत्वांत आपल्या अत्यल्प

आयुष्याचें क्षेम, असंख्य विघ्न राशींचें निवारण करूनही, येनकेन प्रकारेण अवश्य करून घेतलें पाहिजे. याकरितां, ह्या राजपुत्रांच्या अत्युद्धार उपदेशार्थ व नीतिशिक्षणासाठीं, **विष्णुशर्मा** नामक विद्वान् पंडिताची योजना झाल्यानेंच, थोडक्या कालांत ह्या राजपुत्रांची सर्व विषयांत प्रवीणता होईल. तें ऐकून **राजानें विष्णुशर्म्यास** बोलावून आणून आपल्या पुत्रांस त्याच्या स्वाधीन केलें. तदनंतर त्या विद्वान् पंडितानें **पंचतंत्र** या नांवाचा ग्रंथ रचून, त्या राजपुत्रांस नीतिशास्त्रांत फार निपुण केलें. आणि तेव्हांपासूनच ह्या **पंचतंत्रांची** प्रसिद्धि उत्तरोत्तर वाढत जाऊन, तो अप्रतीम ग्रंथ, **प्राच्य** व **पाश्चात्य** राष्ट्रांत, सर्वमान्य झाला.

हिंदुधर्मांतील नीतिशास्त्राचीं मूलतत्वें.

असो. याप्रमाणें नीतिशास्त्रांतील मूळतत्वें हिंदुग्रंथांत, व **हिंदुधर्मांत**, सर्वत्र पसरलीं असून, तीं **वेदां**पासून तो तहत **महाभारत** व **रामायणासारख्या** महाकाव्यांत, **पुराणांत**, आणि **तंत्रांत**, ठायीं ठायीं मूर्तिमंत दिसतात. यामुळें, **हिंदुपिंडांत** तीं सर्व जशीं कांहीं खिळूनच गेलीं आहेत. त्या कारणानें,

त्यावर परधर्मी यांचे हल्ले.

मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांचा, आणि **परधर्मी** लोकांच्या जुलुमाचा, आह्मांवर एकसारखा कहर व गर्दी होऊन गेली अस-

व त्याचा परिणाम.

तांही, तिचा यत्किंचितूही, किंवा निदान ह्मणण्यासारखा तरी परिणाम आमच्या हिंदुधर्मावर किंवा नीतीवर घडला नाहीं. इतकेंच नाहीं तर, हिंदूनीं आपलें पूर्वींचें ब्रीद, आणि नीतिश्रेष्ठत्व, हीं आजमितीसही कायम राखिलीं आहेत.

भाग २५ वा.

आर्यकला.

आर्यकला.

आमच्या सर्वमान्य आणि जगद्वंद्य आर्यांनीं ज्ञानामृताच्या विशाल उदधींत सर्वत्र सखोल शिरून, त्यांतील प्रत्येक ठिकाणचा सुंदर आस्वाद, व अवर्णनीय आमोद घेतल्याचें दिसतें. त्यामुळें, ते ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत प्रवीण असून, त्यांचें विशारदत्व, चौदाविद्या आणि चौसष्ट कलांत असल्याविषयीं सर्वांस महशूर, व इतिहासप्रसिद्ध आहे. ह्या चौदा विद्या, आणि चौसष्ट कला कोणत्या, या विषयींचें स्पष्टिकरण मागील विसाव्या भागांत प्रथमारंभीच केलें आहे. त्यावरून तत्संबंधीं सर्व तपशील ध्यानांत येण्यासारखा आहे.

त्यांतील विषय.

आर्यकलांत धनुर्वेद, गांधर्ववेद, आणि अर्थशास्त्र, यांचा समावेश होतो. धनुर्वेदांत युद्धकला व तत्संबंधीं सर्व विवेचन आहे. गांधर्ववेदांत गायनकला, नृत्यकला, नाट्यकला व वाद्यकला, यांचा समावेश होतो. आणि अर्थशास्त्रांत

इतर शिल्पकलांची अभिव्याप्ति होते. सबब या सर्वांचा आतां पृथक् पृथक् विचार करूं.

धनुर्वेद.

धनुर्वेद, व तत्संबंधीं ग्रंथ.

युद्धकलेचा शास्ता **विश्वामित्र** असून, तद्विषयक संपूर्ण माहिती **प्रस्थानभेद** नामक ग्रंथांत आहे. हयगजश्रेणी कोणत्या उपायांनीं, कशी तयार राखावी, याविषयींचें विवेचन **भारद्वाज (द्रोण ?)** याच्या ग्रंथांत आहे. युद्धकलेच्या संबंधाची बहुतेक माहिती **कामन्दकीय नीतिशास्त्रां**तही विपुल असून, **राजा** आणि **क्षत्रिय** वर्गाची कर्तव्यकर्मं, व तत्संबंधीं साद्यंत शिक्षण, हीं **महाभारतां**त विस्तारेंकरून सांगितलीं आहेत. तसेंच **अग्निपुराणां**तही या विषयाच्या संबंधानें इत्थंभूत माहिती आहे.

युद्धकलेचें शास्त्रीय विवेचन.

महाभारतादि महाकाव्यांत, आणि इतर स्वतंत्र ग्रंथांत, **युद्धकलेच्या** संबंधानें जें शास्त्रीय विवेचन करण्यांत आलें आहे, त्यावरून असें वाटतें कीं, **युद्धकला** ह्मणजे एक अति महत्वाचा शास्त्रीय विषयच आहे, असें त्यावेळचे लोक समजत असत. आणि त्या कारणानेंच त्यांत, याविषयींचें पद्धतशीर विवेचन, तपशीलवार वर्णन, आणि तत्संबंधीं अनेक शाखांतील अमूल्य वृत्तान्ताचा साद्यन्त उहापोह केल्याचें दिसतें.

भाग २६वा.

आर्यकला-संगीतशास्त्र.

गायनकला.

गायनकला व तिचें मोहकत्व.

सजीव कोटींतील प्राणिवर्गावर[1] गायनाचा कसा परिणाम होतो, हें बहुतकरून प्रत्येक मनुष्याला (मग तो सुशिक्षित असो अगर रानटी स्थितींतील असो त्यास) माहीत आहे.

जर पशु, पक्षी, कीटक, इत्यादि, केवळ नादानेंच इतके लुब्ध होतात तर, मनुष्यमात्राला गायन किंवा संगीत प्रिय असावें, यांत नवल तें काय? आणि म्हणूनच ज्याला तें प्रिय नाहीं, त्याची गणेना[2] भर्तृहरीनें पशूंत केली आहे. गायनानें मनुष्याच्या स्वभावावर निसर्गतःच उदात्त परिणाम होतो. अतएव, ज्याला संगीताची गोडी

---

1 "Music hath charms to sooth the savage breast. To soften rocks or bend a knotted oak.

(An English poet.)

२ साहित्य संगीत कला विहीनः ।
साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः ।।

नाहीं, त्याचें अंतःकरण, दुर्वासना, कुकल्पना, व अत्यंत नीच विचार, ह्यांनींच भरलेलें असलें पाहिजे, असें शेक्सपियरचें म्हणणें आहे.

दोलायां शायितो बालो रुदन्नास्ते यदा क्वचित्।
तदा गीतामृतं पीत्वा हर्षोत्कर्षं प्रपद्यते ॥ १ ॥
क्रुद्धो विषं वमन्सर्पः फणामान्दोलयन्मुहुः।
गानं जांगलिकाच्छ्रुत्वा हर्षोत्कर्षं प्रपद्यते ॥ २ ॥
मृगः सोऽपि तृणाहारो विचरन्नटवीं सदा।
लुब्धकादपि संगीतं श्रुत्वा प्राणान्प्रयच्छति ॥ ३ ॥

(संगीत पारिजातः)

एखादें लहान मूल पाळण्यांत रडत असलें तर, गायनामृत पिऊन उगीच राहतें, व त्याला अत्यानंद होतो. क्रोधाग्नीनें फूत्कार करीत असलेला विषारी सर्प देखील, गारोड्याच्या पोंग्यानें नादलुब्ध होऊन, माठ्या प्रेमानें आपली फणा डोलवितो. तसेंच केवळ चारा खाऊन आपली उपजीविका करणारा मृग सुद्धां, व्याधाचें संगीत ऐकून, आपल्या प्राणास अर्पण करितो.

गायनं पंचमो वेदः; म्हणजे गायन हा पांचवा वेदच

1 "The man that hath no music in himself,"
"Nor is not moved with concord of sweet sounds"
"Is fit for treason, stratagems, and spoils."

आर्यसंगीताचें प्राचीनत्व.

होय. आणि गायनाला **गांधर्ववेद** किंवा **गंधर्वविद्या** ह्मणण्याचा परिपाठही आहे. त्यावरून गायनकलेची महत्वी वाचकांच्या सहजीं ध्यानांत येईल. ही गायनकला आपणांस **गंधर्वां**पासून मिळाल्याविषयीं आख्यायिका आहे.

गायनाची गोडी आमच्या **भरतखंडांत** अनादि कालापासून आहे. वेद्कालांतील आमचे पुराण ऋषि मोठ्या प्रेमानें ऋचा आणि मंत्र गाऊन, देवतांची स्तुति करीत. " **अर्चिनो गायंति** "। " **गाथिनो गायंति** "। " **सामिनो गायंति** "। इत्यादि पाठ, आणि नानाविधवाद्यांचे उल्लेख, **ऋग्वेदांत** आपल्या पाहण्यांत येतात;

---

1 "In this country music was studied and cultivated both as a science and an art, from the Vedic period up-wards of 3,000 years ago. The system of civilization established and developed by the Indian branch of the Aryans after they left their Caspian home, had in it its infancy, youth, prime of life, and old age. Music had at the Vedic time attained the dignity of a science just as other branches of human knowledge had". "There were specialists called Gandharwas, whose treatise on music was styled 'Gandharva Veda,' and the influence which it had in improving the tone of 'Sangita Sástra' was simply immense."

(Hindu music and the Gayana Samaja. Madras. 1887).

त्यावरून गायनाची **अभिरुचि** तितक्याही पुरातनकाळीं **भारतीयांस** असल्याचें सहजींच व्यक्त होतें.

रामायण कालांत **रावण** हा नृत्य, गायन, आणि वादन, यांच्या आनंदांत अगदीं निमग्न असे, असें **वाल्मीकिरामायणांत**[1] वर्णन आहे.

कृष्णाच्या मुरलीरवानें गोपिका किती तल्लीन होऊन जात असत, हें तर आमच्या **भारतीयांस** सुप्रसिद्धच आहे. त्या मुरलीचा सुस्वर इतका मोहक होता कीं, चतुष्पाद जनावरें देखील त्या योगानें लुब्ध होऊन तटस्थ रहात. त्यांच्या तोंडांतला घांस तोंडांतच राही. तीं दृष्टीनें निरखून पहात. आणि भूक, तहान, वगैरे सर्व विसरून, एकाग्र चित्तानें केवळ चित्राप्रमाणें तीं **वेणुध्वनिच** श्रवण करीत.[2]

---

१ नृत्यवादित्रकुशला राक्षसेंद्रभुजांकगा ।
काचिद्वीणां परिष्वज्य प्रसुप्ता संप्रकाशते ॥ १ ॥
पटहं चारुसर्वांगी न्यस्य शेते शुभस्तनी ।
विपंचीं परिगृह्यान्या नियता नृत्यशालिनी ॥ २ ॥
(वा. रा. सुन्दरकांड.)

२ वृंदशो व्रजवृषा मृगगावो वेणुवाद्यहृतचेतस एत्य ।
दंतदष्टकवला धृतकर्णा निद्रिता लिखितचित्रमिवासन् ॥ १
बर्हिणस्तबक धातुपलाशैर्बद्धमल्लपरिबर्हविडंबः ।
कर्हिचित्सबलआलिसगोपैर्गाःसमाह्वयति यत्र मुकुन्दः ॥ २
तर्हि भग्नगतयः सरितो वै तत्पदांबुजरजोऽनिलनीतम् ।
आमृशन्पयासि वा बहुपुण्याः प्रेमवेपितभुजा हृतवेगाः ॥ ३ ॥
(श्रीमद्भागवते दशमस्कंदे).

याप्रमाणें वैदिक आणि पौराणिक कालांतील हकीकत असून, ऐतिहासिक कालांत देखील बहुतेक सर्व राजपुत्र व राजकन्या, श्रीमान लोक आणि सत्स्त्रिया, इत्यादि, गायन विद्येचा व्यासंग करीत, आणि तें ज्ञानाचें एक अवश्य अंगच आहे असें ते समजत असत. ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण आपणांस संस्कृत काव्यांत आणि विशेषतः नाट-

हिंदुसंगीताचा पौराणिक, व ऐतिहासिक काल.

1 "There is one remarkable circumstance concerning the grant before us which deserves notice. It was at the instance of a woman that king Soma made the grant. In the audience-hall where were assembled eminent and influential men of his and other kingdoms, and persons proficient in the art of music and dancing, and men of taste were gathered together, and instrumental music was going on, she sang a beautiful song in a most skilful manner, and obtained from the king who was very much pleased, as a reward, his consent to give the land in charity, and granted it herself on the occasion ; but afterwards got the king to do so more formally in the usual manner." * * * * *

" There is, therefore, no doubt that Savaldevi was a married queen of Soma ; and if so, we have evidence here that in the last quarter of the twelfth century of the Christion era, music and dancing formed a part of the education of kshatriya girls and that a married kshatriya woman could be present,

(पुढें चालू)

कांत चांगल्या प्रकारें दिसून येतें. **चारुदत्तासारख्यां** दरिद्र्याच्या घरीं देखील, वीणादि वाद्यें असल्याचा **मृच्छ-कटिकांत** उल्लेख आहे. तसेंच **मालविकेसारख्या** उच्च कुळां-तील राजकन्येला गायन व नर्तन शिकविण्यास, गणदासाची योजना झाली होती. आणि **महाश्वेतेचा** वीणा-ध्वनि तर **चंद्रा-पीडाप्रमाणें**, **कादंबरीरसामृताचा** घुटका घेणाऱ्या प्रत्येक सहृदय वाचकाच्या कर्णरन्ध्रांत दुमदुमत असेल. इसवी स-नाच्या बाराव्या शतकांत, **सोम** राजाची **राणी सवलदेवी** हिनें चार संभावित, रसिक, आणि मर्मज्ञ गृहस्थ भर सभेंत जमले असतां, आपल्या प्रियपतीच्या सन्निध बसून, फार कुशलतेनें सर्वांच्या देखत सुरस व मधुर गान केलें. व तसें करणें त्याकाळीं अगदीं प्रशस्तही समजत असत. हल्लींच्या प्रमाणें गोषांतील पद्धत त्यावेळीं खचित नव्हती. **मुसलमानांचा** अम्मल **भरतखंडांत** सुरू झाल्यानंतरच हें त्याचें भलतेंच वळण आम्हांस नवीनच लागलें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

at an assembly of eminent men, and sing before them without impropriety. The strict purdah system which the Maratha princes and chiefs observe at the present day, and which even the most highly educa, ted among them have not the courage to give up, did not exist in those days." (A paper read by Dr. Bhandarkar before the B. B. R. A. S. on the 30th July 1892)

हिंदु संगीताची चढती, व उतरती कळा.

एकंदरींत भरतखंडवासी आर्यांची गायनप्रियता फारच उत्कट होती, असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध होतें. पृथिवीवरील इतर सर्व राष्ट्रें अज्ञान सागरांत डरडरा घोरत होतीं, अशा वेळीं गायनकलेचें इकडे चांगलें लालनपालन होऊन, तिला बहुतेक पूर्णावस्थाच प्राप्त झाली होती. रसिकत्वाविषयीं आह्मां हिंदूंचीं पूर्वीपासूनच ख्याति आहे. आणि जावत्कालपर्यंत आह्मी स्वतंत्र, व उन्नतावस्थेचा पूर्ण उपभोग घेत होतों, तावत्कालपर्यंत ह्या गायनकलेचा उत्कर्षच होत चालला होता.

कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राचा इतिहास पाहिला, तर असें दिसून येतें कीं, हम्मेष मानसिक उन्नतीबरोबरच ह्या संगीत विद्येचा उत्कर्ष होतो, व तत्संबंधी अभिरुचि उत्तरोत्तर वाढत जाते; आणि देशाला विपन्नदशा येतांच तिचा तत्काल लोप होतो. त्याप्रमाणेंच आमच्या गायनकलेची अवस्था झाली आहे.

हिंदुस्वातंत्र्य व साम्राज्य असतां, आमची गायनविद्या पूर्ण विकासाप्रत पावली होती. परंतु इस्लामशाहीच्या धामधुमींत तिचा पूर्ण लोप होऊन, गायनाची इतकी कमी किंमत झाली कीं, गायनाचा व्यासंग करणें ह्मणजे केवळ हलकट धंदा स्वीकारणें होय, अशी लोकांची समजूत झाली. तथापि, सांप्रतच्या इंग्रजी साम्राज्यांत तिचा

जीर्णोद्धार होऊन, ती दिवसानुदिवस पुनश्च वाढीस लागली आहे.

गायनाचे प्रकार, व सूर

गायनांत १ आर्चिक[1], २ गाथिक, ३ सामिक, आणि स्वरांतर, असे चार भेद असून, त्यांत **स** (षड्ज), **रि** (ऋषभ), **ग** (गांधार), **म** (मध्यम), **प** (पंचम), **ध** (धैवत), **नि** (निषाद), मिळून सप्तसुरांची योजना केली आहे. १ **उदात्त**[2], २ **अनुदात्त**, आणि ३ **स्वरित**, असे जे मुख्य तीन स्वर, त्यांच्या मिश्रणानेंच हे सप्तसूर बनले आहेत.

सदरहू सप्तस्वर कोणत्या स्थानापासून कसे बनले आहेत, याविषयींचें वर्णन **समर्यांकरांत**[3] आहे.

---

१ आर्चिकं गाथिकं चैव सामिकं च स्वरांतरम् ।
एकांतरः स्वरो ह्यृक्षु गाथासु द्व्यंतरः स्वरः ॥
सामसु त्र्यन्तरो विद्यादेतावत्स्वरतोन्तरम् । नारदी शिक्षा ।

२ उदात्तांत ' नि ' आणि ' ग ' यांचा समावेश होतो. अनुदात्तांत ' रि ' आणि ' ध ' यांचा समावेश होतो; व स्वरितांत ' स ' ' म ' ' प ' यांचा समावेश होतो.

३ नासा कंठ उरस्तालुर्जिह्वा दंतास्तथैव च ।
षड्भिः संजायते यस्मात्तस्मा त्षडज इति स्मृतः ॥
नाभे स्समुदितो वायुः कण्ठशीर्षसमाहितः ।
ऋषभवन्नदेद्यस्मात्तस्मादृषभ ईरितः ॥
नाभे स्समुदितो वायुः कण्ठशीर्षसमाहतः ।

(पुढें चालू)

संगीताचीं अंगें.

संगीताचीं १ गीत, २ वाद्य, व ३ नृत्य, अशीं तीन अंगें असून, एकंदर संगीतशास्त्राचे १ मार्गी आणि २ देशी असे दोन

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

गंधर्वसुखहेतुः स्याद्गांधारस्तेन कथ्यते ॥
वायुस्समुत्थितो नाभेर्हृदयेषु समाहतः ।
मध्यस्थानोद्भवत्वाच्च मध्यमस्तेन कीर्तितः ॥
वायुस्समुत्थितो नाभेरोष्टकंठशिरोहृदः ।
* * * पंचमस्तेन संमतः ॥
नाभेस्समुत्थितो वायुः कण्ठतालुशिरोहृदि ।
तत्तत्स्थाने धृतो यस्मात्ततोऽसौ धैवतो मतः ॥
नाभेस्समुत्थितो वायुः कण्ठतालुशिरोहतः ।
निषीदंति स्वराः सर्वे निषादस्तेन कथ्यते ॥
(समयाकर)

१ गीतं वाद्यं नर्तनं च त्रयं संगीतमुच्यते ।
(संगीतदर्पण)
गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते ।
(संगीतरत्नाकरः)

२ मार्गदेशीयभेदेन द्वेधा संगीतमुच्यते ।
द्वेधा मार्गाख्यसंगीतं भरतायाब्रवीत्स्वयम् ॥
ब्रह्मणोऽधीत्य भरतः संगीतं मार्गसंज्ञितम् ।
अप्सरोभिश्च गंधर्वैः शंभोरग्रे प्रयुक्तवान् ॥ मतंगः ॥
अबलाबालगोपालैः क्षितिपालैर्निजेच्छया ।
गीयते याऽनुरागेण स्वदेशे देशिरुच्यते ॥ मतंगः ॥
देशे देशे जनानां च यत्स्याद्धृदयरंजकम् ।
गानं च वादनं नृत्यं हृद्देशीत्याभिधीयते ॥
(संगीतरत्नाकरः)

प्रकार आहेत. आर्यप्रणीत गायनाच्या प्रकाराला **मार्गी** म्हणतात, व लोकांच्या भिन्न भिन्न अभिरुची प्रमाणें, मनोरंजन प्रीत्यर्थ, जी गायनपद्धति बनली, तिला **देशी**[1] म्हणतात.

वाद्यकला.

वादनकला.

हिंदूंच्या गायनकलेबरोबरच वादनकला परिपक्कतेस आली होती. एक ब्राह्मण गात असतां, दोन **ब्राह्मणांनीं** वीणा वाजवावा, असें श्रुतीच[2] सांगते. **वीणा**[3]वाद्य हें रुद्र, **नारद**, इत्यादिकांस फार प्रिय होतें. विण्याशिवाय दुसरीं अनेक वाद्यें, व मृदंग, पखवाज, ढक्का, इत्यादिकांचाही वाद्यांत समावेश होतो.

नाट्यकला.

नृत्यकलेचे १ **तांडव**[4] आणि २ **लास्य** असे मुख्य दोन

---

१ निबद्धश्चानिबद्धश्च मार्गोऽयं द्विविधो मतः ।
आलापादिनिबद्धो यः स च मार्गः प्रकीर्तितः ।
आलापादिविहीनस्तु स च देशी प्रकीर्तितः ॥
(मतंगः)

२ ब्राह्मणौ वीणागाथिनौ गायतः
ब्राह्मणोऽन्यो गायेदिति श्रुतिः ।

३ श्रुत्या स्मृत्या दृष्टां रुद्रेष्टां नारदादिभिर्जुष्टाम् ।
कलयंत्वलयं वीणां संतः संतोषपोषार्थम् ॥
(रागविबोधः)

४ प्रयोगमुद्धतं स्मृत्वा स्वप्रयुक्तं ततो हरः ।
तंडुना स्वगणाग्रण्या भरताय व्यदीदृशत् ॥
(पुढें चालू)

नाट्यकला.

प्रकार असून, त्याचे आणखी नाट्यं, नृत्य, व नृत्त, असे तीन भेद आहेत. तांडव हें मर्दानी, व लास्य हें जनानी नृत्य होय.

नाट्यांत नानाविधभाव, अनेक अभिनय, व कित्येक अंगविक्षेप असतात. त्यापैकीं, हिंदुनाट्यकलेच्या पूर्णतेचें दिग्दर्शन होण्याकरितां, येथें थोडे देतों:—

अंगप्रत्यंगोपांगः, अभिनयलक्षण, २९ असंयुतहस्तभेद, २४ संयुतहस्तभेद, ११ बांधव्यहस्तभेद, १६ देवहस्तभेद, ९ नवग्रहहस्तभेद, १० दशावतारहस्तभेद, ४ चतुर्वर्णहस्तभेद, हरिश्चंद्र व पुण्यराजहस्तभेद, वृक्षजातिहस्तभेद, सिंह आणि मृगहस्तभेद, गरुड व पक्षिहस्तभेद, सर्पहस्तभेद, भूराद्यधोलोकहस्तभेद, हस्तद्वादशप्राणभेद, श्रृंगारादिरसभेद, रसालंबनायिकानायकदूतिभेद, इत्यादि.

ताल.

तालाची अवश्यकता हिंदुसंगीतांत विशेष मानली

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

लास्यमाल्याग्रतः प्रीत्या पार्वत्या समदीदृशत् ।
बुद्ध्वा तु तांडवं तंडो मर्त्येभ्यो मुनयोऽवदन् ॥
पार्वत्यप्यनुशास्तिस्म लास्यं बाणसुतामुषांम् ।
(संगीतरत्नाकरः)

१ नाट्यं नृत्यं तथा नृत्तं त्रिधा तादिति कीर्तितम् ।
नाट्यभेदं ददौ पूर्वं भरताय चतुर्मुखः ॥
(संगीतरत्नाकरः)

ताल.

आहे. ताल[1] म्हणजे काल, क्रिया, आणि मान, यांचें संमिलन होय. तालाचे काल, मार्ग, क्रिया, अंग, ग्रह, जाति, कला, लय, गति, आणि प्रस्तारक, असे दहा[2] प्राण आहेत.

असो. आमच्या गायनकलेंतील सुरांचा नामनिर्देश प्रथमतः वेदांगांत, (म्हणजे छंद आणि शिक्षा यांत), व अथर्ववेदांतील गर्भोपनिषदांत, दिसून येतो. तसेंच सुरांचें दिग्दर्शन पिंगलसूत्रांत झाल्याचें दिसतें.

स, रि, ग, म, प, ध, नि, म्हणून जे हिंदूंचे सुप्रसिद्ध सप्तसूर आहेत, तेच आमच्यापासून पारसीकांनीं म्हणजे इराणी लोकांनीं, व परंपरेनें त्यांजकडून आरबांनीं उचलले असून, त्यांचेंच अनुकरण क्रमशः, यूरोपस्थांनीं केलें, यांत बिलकुल शंका नाहीं. व ही गोष्ट यूरोपस्थ[3]ही कबूल करितात. ह्या सप्तसुरांची सुरवात यूरो-

---

१ कालः क्रिया च मानं च संभवंति यथा सह ।
तथा तालस्य संभूतिरिति ज्ञेयं विचक्षणैः ।।
कालः क्षणादिको ज्ञेयस्तालयोर्घटनं क्रिया ।
क्रिययोरंतरं यत्तु विश्रामो मान उच्यते ।।
(चामरसिंहः)

२ कालो मार्गाः क्रियांगानि ग्रहो जातिः कलालयौ ।
गतिः प्रस्तारकश्चेति तालप्राणा दश स्मृताः ।।
(संगीतदर्पणम्)

3 History of Indian Literature by Dr. Weber P. 272. note 315.

गायनकलेंत हिंदूंचें इतर राष्ट्रांनीं केलेलें अनुकरण.

परखंडांत प्रथमतः गायडो. डी. आरेझो यानें, इसवी शकाच्या अकराव्या शतकाच्या आरंभींच, केल्याचें कळून येतें. आमच्या सप्तसुरांस अनुसरूनच इराणी लोकांनीं आपले सूर बसविले असून ते दा, री, मी, फा, सा, ला, बी, असे आहेत. संस्कृतांत गायनस्वराच्या कलेचा वाचक जो ग्राम शब्द, तोच यूरोपस्थांच्या भाषांत 'ग्यामट्', 'ग्यामा', 'ग्यामी', या अपभ्रंश झालेल्या रूपानें आपल्या दृष्टीस पडतो. आणि ह्या अपभ्रष्ट झालेल्या सर्व शब्दांचें मूलरूप म्हटलें म्हणजे 'ग्राम' शब्दच होय, यांत संशय नाहीं.

गायनकलेंतील ग्रंथकार.

गायन विद्येवर ज्यांनीं ह्मणून थोडे बहूत परिश्रम करून विवेचन केलें आहे, असे ग्रंथकार थोडे असून भरत, ईश्वर, पवन कल्लिनाथ, व नारद, वगैरे त्यांपैकींच होत. शार्ङ्गदेव कृत संगीतरत्नाकरांत, अभिनवगुप्त, कीर्तिधर, कोहल, आणि सोमेश्वर, इत्यादि ग्रंथकार, प्रमाणभूत ह्मणून शार्ङ्गदेवानें दाखल केले आहेत. ह्या संगीतरत्नाकरांतील विषय ह्मटला ह्मणजे केवळ गायनच नसून, तदंगभूत असें जें नृत्य, व नाट्य, याविषयींही त्यांत सविस्तर विवेचन आहे.

संगीतविषयावर जेवढे ह्मणून नामांकित व प्रमाण

ग्रंथकार होऊन गेले, त्यांची नांवनिशी संगीत ग्रंथांत दिली आहे, ती वाचकांच्या माहितीसाठीं, याखालीं देतों:—

सदाशिवः शिवोब्रह्माभरतः कश्यपोमुनिः ।
मतंगः पार्ष्णिगोदुर्गाशक्तिः शार्दूलकोहलौ ॥
विशाखिलोदंतिलश्चकंबलोऽश्वतरस्तथा ।
वायुर्विश्वावसूरंभाऽर्जुनो नारदतुंबुरू ॥
आंजनेयो मातृगुप्तो वारुणो नन्दिकेश्वरः ।
स्वातिर्गणो देवराजः क्षेत्रराजश्चराहलः ॥
दुर्जयोनामभूपालो भोजो भूवल्लभस्तथा ।
परमंदीच सोमेशो जगदेकमहीपतिः ॥
व्याखातारो भारतीये लोल्लुटोद्भटशंकुकाः ।
भट्टाभिनव गुप्तश्च श्रीमत्कीर्तिधरोपरः ॥
अन्येचबहवः पूर्वेये संगीतविशारदाः ।

(संगीतरत्नाकरः)

* * * हाहा हूहूश्चरावणः ।
रंभाबाणसुताचोषा फाल्गुनः फणिनांपति ॥

(संगीतपारिजातः)

याविषयावरील कांहीं कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें इराणी भाषेंत झालीं असून, तीं ह्या भाषेंत होण्यापूर्वींही, त्यांचीं भाषांतरें आरबी भाषेंत झालीं होतीं.

पाणिनीच्या पूर्वीं, ह्मणजे इसवी शकापूर्वीं ७००

गायनकलेची अभिवृद्धी, व तिचा ऱ्हास.

सातशें वर्षें, किंबहुना त्याच्याही अगोदर, गायनकलेचा उत्कर्ष हिंदुस्थानांत होत चालला असून, गायनांकनपद्धति ब्राह्मणांनीं चांगल्या पूर्णतेस आणिली होती. व तीच पूर्वी निर्दिष्ट केल्याप्रमाणें, ब्राह्मणांपासून परंपेरनें युरोपस्थांस प्राप्त होऊन, ती प्रथमतः गायडो डी. आरेझोनें त्या खडांत प्रचारांत आणिली. याप्रमाणें दिवसानुदिवस आमची गायनकला अभिवृद्धीप्रत पावत असतां, तिला मुसलमान कारकीर्दीत इतर कलांप्रमाणेंच, उतरती कळा लागली. त्यामुळें हिंदुगायकांची संख्या उत्तरोत्तर कमीच होत गेली. ती इतकी कीं, आकबर बादशहाच्या पदरीं निवडक म्हणून जे उत्तम गायक ३६ छत्तीस होते, त्यांपैकीं फक्त पांचजणच काय ते हिंदु होते.

हिंदू राग.

हिंदु गायनांत कल्याण, बिहाग, कानडा, मालकंस, बहिरव, आणि सारंग, असे मुख्य सहा राग असून, धनश्री, पूर्वी, केदार, छायानाट, सोनी, देस, परज, सोरट, कालिंगडा, भूप, बेहेरवी, बागेसरी, बिलावल, खमास, वगैरे उपराग व रागिण्या आहेत. वाद्यांत वीणा, सतार, ताऊस सारंगी, सारमंडल, बीन, वगैरे तंतुवाद्यें; जलतरंगासारखीं जलवाद्यें; मृदंग, तबला, इत्यादि चर्म-

वाद्यें; आणि सनई व अलगुजा सारखीं काष्टवाद्यें; अशीं नानाप्रकारचीं आहेत.

-गायनकलेची सांप्रतची स्थिति.

नामांकित गायक, व उत्तम बजवय्ये, असे सांप्रतच्या स्थितींत हिंदुस्थानांत फारच थोडे सांपडतील. कारण, हल्लींच्या काळांत संस्थानिकांशिवाय त्यांचा कोणीही पोषिंदा नसल्यामुळें, त्यांच्या धंद्यास बिलकुल उत्तेजनच राहिलें नाहीं. तथापि, कांहीं वर्षांनीं ह्या कलेचें पुनरुज्जीवन होईल, अशीं शुभ चिन्हें दिसूं लागलीं आहेत ठिकाठिकाणीं गायनसमाज, आणि वादित्र स्थलें, यांची योजना होत चालली आहे. राजा सर सुरेंद्र मोहन टागोर सारख्या देशाभिमानी हिंदूंनीं नानाविध ग्रंथ छापून, ह्या गांधर्वविद्येस जरूर तें उत्तेजन देण्याचें योजिलें आहे; व पुण्यपत्तनांतील गायनसमाजही हल्लीं चांगल्या भरभराटीच्या स्थितींत असल्याचें दिसत आहे.

तत्संबंधीं पाश्चिमात्यांचें अज्ञान, व तज्जन्य अवहेलना.

आमचें गाणें, व बजावणें, पाश्चिमात्यांस बिलकुल मधूर लागत नाहीं. इतकेंच नाहीं तर, तें अगदींच बेसूर आहे ह्मणून ते लोक समजतात. आणि कांहीं कांहीं तर त्याची केवल अवहेलनाच करतात. ह्याचें कारण त्यांचें तत्संबंधीं अज्ञान, व नासमजपणा होय; याशिवाय दुसरें

कांहीं एक नाहीं. ह्या संबंधानें डाक्टर हन्टरनीं दिलेला खालीं लिहिलेला अभिप्राय केवळ यथार्थ आहे:—

"No Englishman has yet brought an adequate acquaintance with the technique of Indian instrumentation to the study of Hindu music. The art still awaits investigation by some eminent Western professor; and the contempt with which Europeans in India record it, merely proves their ignorance of the system on which Hindu music is built up."

(Indian Empire P. P. 111-112.)

भाग २७ वा.

आर्यकला.

अर्थशास्त्र.

अर्थशास्त्र, व त्यांतील विषय.

या शास्त्रांत चित्रकला, शिल्पकला, निर्माणविद्या, वास्तुविद्या, यंत्रकला, पटनिर्माणविद्या, पात्रनिर्माणकला, गंधद्रव्यक्रिया, पाकशास्त्र, द्यूतविद्या, आणि अक्षविद्या, इत्यादिकांचा समावेश होतो. सबब त्याविषयीं पृथक् पृथक् विवेचन करूं.

चित्रशास्त्र.

चित्रकला, व तिचें प्राचीनत्व.

चित्रकलेविषयीं नाटकांत आणि काव्यांत, वारंवार उल्लेख केल्याचें दृष्टीस पडतें. आणि ह्या कलेंत प्राचीनकालापासून हिंदूंस इतकी प्रवीणता, व हातोटी साधलेली होती कीं, इच्छित मनुष्याचें हवें त्यावेळीं, व नियमित कालांत चित्र काढून, अगदीं हुबेहूब आकृति बनविण्यांत येत असे. ह्या विद्येचा व्यासंग राजेलोकही

मोठ्या उत्सुकतेनें करीत असत, असें प्राचीन ग्रंथांवरून उघड होतें. कालिदासकृत शाकुंतल नाटकांतील सहाव्या अंकांत सानुमती ह्मणते, "अहो एषा राजर्षेर्निपुणता । जाने सखी अग्रतो मेवर्तत इति" । सानुमती ही अप्सरा असून, ती गुप्तरूपें दुष्यत राजाच्या मागें आकाशांतच उभी होती. शकुंतलेचें तें अगदीं हुबेहूब राजानें काढलेलें चित्र पाहून, सानुमतीस मोठें नवल वाटून ती विस्मयानें ह्मणाली, "अगबाई ! ह्या दुंष्यन्त राजर्षीची चित्रकलेंत सुद्धां कायहो ही निपुणता ! माझी सखी (शकुन्तला) ही जणूं काय माझ्यासमोरं उभीच आहे, असें मला वाटतें." ह्यावरून त्याकाळीं, चित्रकला ही चांगल्या पूर्णतेप्रत पावल्याचें दिसत असून, राजे लोकही तिचा आदरपूर्वक आभ्यास करीत असत, असें सिद्ध होतें.

हिंदुचित्रकलेंतील उणीव.

तथापि हिंदुचित्रकलेंत, उन्मीलन चातुर्य आणि प्रभासौन्दर्य, यांची उणीवच दृष्टीस पडत असून, समुद्र, पर्वत, नद्या, वनें, उपवनें, आणि विहारस्थानें, इत्यादिकांचे रमणीय देखावे हुबेहूब वठविण्यांत हिंदूंचें नैपुण्य कमीच दिसतें. तसेंच, वर्षाऋतूंतील कृष्णवर्ण मेघांचें अमित ऐश्वर्य, व तत्कालीन निर्झरोदकाची अनुपमश्री, आणि अतिवृष्टीच्या योगानें प्रळय काळच्या वेळेसारखा होणारा

भयंकर देखावा, इत्यादिकांचें सुंदर व मार्मिक आलेख्य, किंवा तद्विषयक हृदयद्रावक असें तूलिकापाटव, यांचाही अभावच भासमान होतो.

पाणिनी व अशोक, यांच्या वेळची चित्रकलेची स्थिति.

जगद्विख्यात चक्रवर्ती **अशोक राजा** आणि **नागार्जुन**, यांच्या कारकीर्दीत **चित्रकला** अगदीं भरभराटीच्या स्थितींत असून, त्याकालीं यक्ष व **नाग** नामक शिल्पी फार प्रसिद्ध होते. ह्मणजे इसवी शकापूर्वी २९९ वर्षांपासून तों इ० स० ४० वर्षांपर्यंत, ह्या विद्येचा चांगला ऊर्जित काल होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि यापूर्वी, **पाणिनी**च्या वेळीं (इ० श० पूर्वी ७०० वर्षें) देखील, ही विद्या पुष्कळ प्रचारांत होती, यांत बिलकुल शंका नाहीं. कारण, **देवतांच्या** प्रतिमा करून त्या हमखास विकण्याची त्यावेळेस चाल होती. व अशीं नानाविध चित्रें कागदांवर काढून, किंवा तीं छापून विकण्याची अजूनही इकडे चाल आहे. आतां **हिंदुलोकांत** बहुतकरून प्रत्येक

हिंदु गृहांतील चित्रनिर्मिति.

गृहीं, अनेक तऱ्हेचीं चित्रें भिंतीवर काढण्याचा, आजमितीसही बहुतेक सर्वत्र रिवाज आहे. त्यांतील विषय ह्मटले ह्मणजे देवतांच्या लीला, **पौराणीक** गोष्टी, **ऐतिहासिक** कथा, आणि **सांसारिक** व्यवहार, हे होत.

भाग २८ वा.

आर्यकला.

शिल्पकला.

शिल्पकला, व त्यांतील विषय.

शिल्पकलेंत हिंदूंचें चातुर्य व त्यांची करामत, हीं चित्रकलेपेक्षां पुष्कळांशीं जास्त दिसून येतात. आमचे लोक मूर्तिपूजक असल्यामुळें, आराध्यदेवतेची सुंदर आणि मनोहर मूर्ति घडविण्यांत, ते फार परिश्रम व काळजी घेतात. त्याकारणानें मोठमोठ्या आणि प्रसिद्ध देवालयांत, शृंगार, हास्य, व करुणादि नानाविध रसांतच जणूं-काय ओतलेल्या अशा भव्य, विशाल, मनोरम, आणि सुरेख मूर्ति दृष्टीस पडतात. कांहीं कांहीं ठिकाणीं कृष्णावताराच्या सुरम्यलीला प्रदर्शित केल्या असल्यामुळें, शृंगाररस दृग्गोचर होतो. कित्येक जागीं अट्टहास दाखविला असल्यामुळें हास्यरस दृष्टीस पडतो. आणि कोठें कोठें तर महाभारतांतील रसाळ कथानकांचें हृदयद्रावक असें आविष्करण केलेलें असल्यामुळें, करुणा, रौद्र, वीर,

भयानक, बीभत्स, अद्भुत, शान्ति, वात्सल्य, व भक्ति, हे सर्व रस, भाव आणि अभिनय, इत्यादि योगानें केवळ मूर्तिमंतच भासतात. तथापि, कांहीं कांहीं ठिकाणीं, व क्वचित् प्रसंगीं, अवयवसंगति आणि अंगसौष्ठव, यांच्याकडे कमीच लक्ष्य पुरविल्याचें दिसतें. आणि त्याकारणानें शरीरव्यवच्छेदाच्या ज्ञानाचा अभाव असल्याचें भासमान होतें.

याविषयावर नानाविध ग्रंथ, प्रबंध, व शिक्षाकल्प असून, त्यांत मूर्ति-निर्मितीविषयीं विवेचन आहे. **वराहमिहिरकृत बृहत्संहितेंतही** तत्संबंधीं बरेंच वर्णन असून, शिवाय कोठें कोठें क्वचित आलिखनाक्रियाही त्यांत सांगितली आहे.

निर्माणविद्या.

हिंदूंची निर्माण-विद्या.

निर्माणविद्येंत हिंदूंचें पाटव, **शिलपकलेपेक्षां** फारच जास्त, आणि विस्मय वाटण्यासारखें, निःसंशय दिसून येतें. त्यांचा अश्रांत व दीर्घ परिश्रम–विलास, त्यांची उत्कट बुद्धिमत्ता, आणि त्यांचें अपार हस्तकौशल्य, ह्यांचें प्रत्यक्ष प्रमाण ह्मटलें ह्मणजे ह्या **भरतभूमींतील** ठिकठिकाणचीं विशाल, भव्य, आणि रमणीय **विवर–मंदिरें** होत. ह्या **विवरमंदिरांसच कोरींवलेणीं,** किंवा कोणी **पांडवकृत चमत्कृति** ह्मणतात. हीं पाहिलीं ह्मणजे **निर्माणविद्येचें** पूर्ण शास्त्रीयज्ञान, आमच्या **हिंदूंस** फार प्राचीनकाळापासूनच असल्याचें दिसून येतें. इ-

तर्केंच नाहीं तर, तें ज्ञान त्यांनीं जणू काय या प्रचंड शिलोत्खातगृहांतच सर्वत्र ओंतून, आपली कीर्ति विद्यावृक्षाच्या याही शाखेंत अजरामर राही, अशी तजवीज केल्याचें भासतें.

त्यांनीं खोदून निर्माण केलेलीं विवरमंदिरें, अथवा कोरींव लेणीं.

अशा या विवर–मंदिरांतील नानाप्रकारचे शोभायमान स्तंभ, त्यांच्या उपस्तंभाची उदारश्री, त्यांचे उच्चशीर्षभाग, त्यांतील ठिकठिकाणचें सूक्ष्म शिल्पपाटव, आणि एकंदरींत सर्वांचेंच विशालप्रमाण, हीं पाहून सकौतुकाश्चर्य वाटतें; आपल्या कल्पनेची शक्ति अगदींच कुंठित होते; आपली मति गुंग होऊन जाते; आपल्या मनाचा उद्वेग तत्काल नाहींसा होतो; आणि मानवी साहसाच्या अचाट सामर्थ्याची फारच धन्यता वाटूं लागते.

मद्रास इलाख्यांतील लेणीं.

हीं विवरमंदिरें किंवा कोरिवलेणीं, हिंदुस्थानांतील राजकीय विभागाचे जे मुख्य तीन इलाखे, बंगाल, मुंबई, व मद्रास, या सर्वांत आहेत. मद्रासच्या दक्षिणेस महाबलिपूरम् ह्मणून जें प्रसिद्ध स्थान आहे, तेथें असलीं लेणीं पुष्कळ असून तीं फार प्राचीनकाळचीं आहेत, असें सांगतात. तथापि, विल्सन् प्रभृति पाश्चात्य पण्डितांची अशी समज आहे कीं, हीं इसवी शकानंतर

बाराव्या किंवा तेराव्या शतकांत झालीं असावीं. परंतु ह्या ह्मणण्यास बलवत्तर व निरुत्तर असा विशेष कांहींच आधार दिसून येत नाहीं.

मुंबई इलाख्यांतील लेणीं.

सर्वांत अद्भुत आणि भव्य शिल्पनिर्मिति ह्मटली ह्मणजे मुंबई इलाख्यांतील "वेरूळ" व "कान्हेरी" येथील कोरींव लेणीं होत. अखिल पृथिवीवरील प्राचीन आणि अर्वाचीन अशा यच्चयावत् मानुषीय चमत्कृतींत, हीं 'लेणीं,' केवळ अद्वितीय आहेत. इतकेंच नाहीं तर, तीं आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून पाहिलीं, त्यांचीं मनें विस्मयानें अगदीं थक्क होऊन गेलीं. त्यांची कल्पना कुंठित झाली. आणि त्यांचें चांचल्य स्थिरतेप्रत पावलें.

यांची उच्च व शोभायमान विवरपटलें, त्यांचें उदार शिल्पलावण्य, भव्य आणि विशाल मंडप, स्थूलाकार शिलास्तंभ, व विलक्षण आणि रमणीय वीथिका, हीं खरोखर सर्वच अतीव प्रेक्षणीय आहेत. कोठें कोठें हे स्तंभ गोल व भाजनाकृति आहेत. कोठें चतुष्कोन शृंखलालंकृत दृष्टीस पडतात. कोठें तें अष्टपैलु आहेत. कोठें शिखावलंबि व मालावृत असे ते भासतात. क्वचित् क्वचित् मनुष्य व पशु, पुष्पें आणि फलें, वृक्षशाखा व लता, इत्यादिकांच्या नानाविध आणि कमनीय आकृतींनीं ते मण्डित असल्यामुळें, अतृप्त नेत्रकमलांचें जणू काय तें पारणेंच फेडतात. आणि कांहीं कांहीं ठिकाणीं

तर, ह्या सर्वांचें सुरम्य मिश्रण व मनोरम व्यतिकर झाल्यामुळें, तज्जन्य अनुपम श्री स्वस्थानापन्न होते. तात्पर्य, अशा प्रकारचें प्राचीन हस्तकौशल्य, व कलापाटव, ह्या जगांत अन्य ठिकाणीं क्वचित्च दृष्टीस पडतें.

कोरींव लेण्यांचीं मुख्य स्थलें.

वेरूळ हें वेरूळ परगण्यांत, निजाम सरकारच्या मुलुखांत आहे. हें **दौलताबादे**च्या उत्तरेस असून त्याला "**अद्भुत चमत्कृतीचा प्रदेश**," अशी संज्ञा आहे. **कान्हेरी** हें स्थल कुर्लें व मुंबई यांच्या दरम्यान् **साष्टी** तालुक्यांत डोंगरावर आहे. याशिवाय **घारापुरी**, **माहाड**, **मांदाड** (तालुके माणगांव), **पांडवगड** (तालुके वाई), आणि **जुन्नर** वगैरे ठिकाणीं देखील कोरींव लेणीं आहेत; परंतु तीं लहान आहेत. तथापि, त्यांतही कांहीं कांहींचें खोदींव सभामण्डप इतके विशाळ आहेत कीं, त्यांत पांचशेंपासून हजारपर्यंत लोकसमूह मावूं शकेल. या मण्डपांत देखील तऱ्हेतऱ्हेचें व सुबक खोदींव काम सर्वत्र दृष्टीस पडतें. त्यामुळें ही निर्माणविद्या म्हणजे जणूं काय आमच्या पूर्वजांच्या हाताचा मळच कीं काय, असें भासूं लागतें.

सदरहू नामांकित **कोरींव लेण्यांविषयीं**, एका **फ्रेंच** फिरस्त्याचें खालीं लिहिल्याप्रमाणें उद्गार असल्या-

त्यांविषयीं परकीयांचें अभिप्राय.

बद्दल, डाक्टर बरजेस् यांच्या अवतरणावरून दिसून येतें. ते ह्मणतात कीं:—

"All commentary grows pale" "before the magnificent ruins of the temples of Ellora, which more than any other ruins confuse the human imagination. Though it was in the seventh century before Christ that Gautama Budha had flourished, Budhism remained for about 400 years like a ship in the occean of Brahminism, until the time of the great Ashok, the Buddhist Constantine. The work of cave-excavations seems to have begun after his time. The Brahmans out of religious rivalry followed next, and then the Jains. The caves of Ellora ran from south to north on the western side of a hill near Roza in the order ot their antiquity. The Brahman caves though not eqaal to the Buddhist in point of originality and truthfulness of their design, were superior in point of extent and richness of decoration."

एडिन्बर्गरिव्ह्यू नामक प्रसिद्ध पत्राचा एक पुराण लेखक या वेरूळास "the region of wonders," ह्मणजे "अद्भुत चमत्कृतीचा प्रदेश" असें ह्मणत असून, दुसरा एक प्रवाशी त्यांतील कोरींवलेण्यांच्या संबंधानें असें लिहितो कीं:—

No drawings, however elaborate and skilful, and no descriptions, however faithful and graphic, can create in the mind an impression at all equal to the effect produced by a glance on the spot at this chef d' aeuvre of antiquity. *

या निर्मितीविषयीं प्रसिद्ध एल्फिन्स्टन् इतिहासकार यांचा अभिप्राय.

एल्फिन्स्टन् साहेब या प्राचीन निर्मितीविषयीं आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत असें लिहितात कीं, अशा मासल्याचें सौंदर्य व सुबकपणा पृथिवीच्या पाठीवर अन्यत्र कोठेंही पहावयास सांपडणार नाहीं. भरतखंडांत प्रत्येक ठिकाणीं उत्कृष्ठ तऱ्हेचें खोदींव काम दृष्टीस पडत असून, त्यांतील शिल्पपाटव चांगल्या पूर्णतेस आल्याचें भासतें. तसेंच शिल्पशास्त्रांचीं मूलतत्वें फार प्राचीनकाळींही हिंदूस चांगलीं अवगत होतीं असें दिसतें. ते असें म्हणतात कीं:-

"These arabesques, the running patterns of plants and creepers in particular are often of an elegance scarcely equalled in any other part of the world."

" There are some beautiful specimens of Hindu architecture in Tod's Ràjasthàn.' The work of

* Observations of a tourist who contributed a leries of articles on the subject, to the columns of the "old Bombay Telegraph and courier," since colsected together in the form of a pamphlet (1856).

Ràm Ráz shows the details every where employed, as well as the general architecture of the south ; but the splendid works of Daniells exhibit in perfection every species of cave or temple in all the wide range of India." * * * *

"Though in temples of recent formation there is sometimes a mixture of the Mahometan style, yet the general character of these buildings is strikingly original, and unlike the structures of other nations. We may infer from this that the principles of the art were established in early times."

(Elphinstone's History of India,
P. P. 310. 311. 312).

अशा प्रकारचीं लेणीं **घारापुरी, कान्हेरी, कारलें, महाड, मांदाड** (तालुके **माणगांव**), **जुन्नर, वांई** आणि **वेरूळ**, वगैरे ठिकाणीं असल्याबद्दल सदरीं लिहिलें असून, त्या सर्वांत **वेरूळ**च्या लेण्यांची गणना उत्कृष्टांत असल्याकारणानें, तत्संबंधीं दोन शब्द येथें लिहितों.

देवगड नांवाचें फार नामांकित भरभराटीचें शहर पूर्वी दक्षिणेंत होतें. ह्यालाच सांप्रतकाळीं **दौलताबाद** अशी संज्ञा आहे. ह्या शहराच्या नजीकच **वेरूळ** नांवाचें एक लहान खेडें असून, त्याच्या पूर्वेच्या बाजूस सुमारें अर्ध्या कोसावर, एक अर्धचंद्राकृति डोंगर आहे. ह्या डोंगराचा विस्तार दक्षिणोत्तर असून, त्याचीं दोहों बाजूचीं

टोंकें मध्यभागापेक्षां पुष्कळच उंच आहेत. उत्तर टोंकाच्या शेवटास जें लेणें आहे त्याला **पारसनाथसभा** असें नांव असून, दक्षिण टोंकाकडील लेण्यास **धेडवाडा** असें म्हणतात. हें ठिकाण फारच सुरेख आणि पाहण्यासारिखें आहे; परंतु तें विटाळाचें समजून हिंदू लोक तें पाहण्यास सहसा जात नाहींत. ह्या शिखरद्वयांच्या दरम्यानही ठिकठिकाणीं खालवर आणि पृथक् पृथक् लेणीं आहेत; व तीं बहुत करून खडक लागल्या ठिकाणीं खोदल्याचें दिसतें.

ह्या लेण्यांत **इंद्रसभा** व **कैलास** नांवाचीं लेणीं फारच नामांकित पैकीं आहेत. आणि त्यांतही **कैलास** हें सर्वोत्कृष्ठ होय.

' हें देऊळ भोंवतालून खडक फोडून, मध्येंच कोरून तयार केलें आहे. ह्याचा आंत जावयाचा जो थोरला दरवाजा आहे, तो फारच सुरेख व भव्य आहे. त्याच्या दोन्ही बाजूस बहुत नक्षी व कोरींव काम आहे. हा दरवाजा फार मोठा आहे, व त्याच्या दोन्हीकडे देवड्या आहेत. दरवाज्यावर मोठें दालन आहे. ही **नगारखान्याची** जागा असावी असें वाटतें. ह्या **नगारखान्याचे** पुढले खांब फार शोभायमान आहेत. दरवाज्यांतून आंत जातांना दोहों बाजूंस बहुत कोरींव काम आहे. त्यामध्यें उजव्या बाजूस **अष्टभुजा भवानीचें** चित्र आहे. व डाव्या बाजूस **गणपतीचें** चित्र आहे. आंत गेलें म्हणजे मोठें विस्तीर्ण पटांगण

दिसतें. हें सर्व खडक वरून फोडीत आणून केलें आहे; व त्या पटांगणांत, मध्येंच खडक राखून, त्यांतूनच कांहींसें शंकाकृति असें मोठें देवालय कोरिलें आहे. ह्या देवळाची रचना व त्यावर जे तऱ्हेतऱ्हेचें बारीक व मनस्वी कोरींव आणि सुरेख काम आहे, त्यांचें कितीही वर्णन केलें तरी पुरें व्हावयाचें नाहीं. हें मुख्य देऊळ व दरवाज्यावरचा मजला हीं पुलानें जोडिलेलीं आहेत. हा पूल, इमारत खोदतांना मधलाच खडक राखून केला आहे. ह्या पुलाखालीं, दरवाज्याच्या समोरासमोर शेवटीं, कमळावर बसलेली भवानीची मूर्ति आहे, व तिच्या दोन्ही बाजूस दोन हत्ती आहेत. ह्यांनीं आपल्या सोंडा उचलून देवीच्यावर एकमेकींस लाविल्या आहेत. दरवाज्यांतून आंत जातांना दोन्ही बाजूस हत्ती आहेत. परंतु ते छिन्नभिन्न झाले आहेत. हत्तींच्या मागें दोन्ही बाजूंस दालनें आहेत, व त्यांमध्यें डाव्या बाजूचीं फारच सुरेख आहेत; त्यांत पुष्कळच कोरींव काम आहे. पटांगणांत दोन्ही बाजूंस दोन चौकोनी सुटे खांब आहेत. ह्या खांबांच्या शिखरांवर कोरींव काम असेल असें वाटतें; परंतु हल्लीं तीं शिखरें मोडून गेलीं आहेत. त्या शिखरावर एकेक सिंहाचें चित्र असेल, असें डाव्या हातच्या खांबाच्या शिखरावर जो कांहीं मोडका भाग राहिला आहे, त्यावरून अनुमान होतें.'

'थोरल्या दरवाज्यावरचा नगारखाना व मुख्य

देऊळ ह्यांच्यामध्यें पूल आहे, म्हणून सांगितलें; त्या पुलाच्या सुमारें मध्यभागीं नंदीचें चतुष्कोण देऊळ आहे. ह्या देवळाच्या दोन्ही बाजूंस दोन खिडक्या आहेत. व त्या खिडक्यांच्या समोरासमोर वर सांगितलेले दोन चौकोनी सुटे खांब आहेत. नंदीच्या देवळांतून निघून पुलावरून पुढें गेलें ह्मणजे मुख्य देवळाचें पुढलें उघडें दालन लागतें. तें पुलापेक्षां उंच आहे. हें दालन फारच सुरेख आहे. त्या दालनास दोन शानदार खांब आहेत, व त्या खांबावर पुढल्या बाजूस दोन सिंह आहेत; व आंतल्या अंगांत दुसरीं चित्रें आहेत. ह्या उघड्या दालनांतून मुख्य देवळाच्या मुख्य सभामंडपांत जावयाचा जो दरवाजा आहे तो फारच सुंदर आहे, व त्याच्या दोन्ही बाजूस मोठमोठीं चित्रें कोरलीं आहेत. ह्या उघड्या दालनांत खालच्या पटांगणांतून यावयास दोहों बाजूंस पायऱ्या आहेत. मुख्य देवळाचा चौथरा सुमारें एक मजला उंच आहे. त्याच्या दोहों बाजूस बाहेरच्या अंगावर एकीकडे **रामरावणांची** व एकीकडे **कौरवपांडवांची** अशा लढाया कोरल्या आहेत, व ह्या चित्रांच्या मध्यें हत्ती, सिंह, वाघ, वगैरे प्राण्यांचीं डोकीं कोरून त्यांवर मुख्य देऊळ आहे, असें दाखविलें आहे.'

'उघड्या दालनांतून सभामंडपांत जातां येतें. ह्या मंडपास दोहों बाजूंस खांबांच्या दोन दोन ओळी आहेत. सभा-

मंडपाचें मधलें दालन चौकोनी आहे. ह्या मंडपांत एकंदर सोळा खांब आहेत. ह्या मंडपाच्या शेवटच्या बाजूस गाभारा आहे. त्यांत **शिवाचें लिंग** आहे. गाभाऱ्याच्या दाराच्या दोहों बाजूंस पुष्कळ कोरींव सुरेख काम आहे. सभामंडपाच्या मध्यभागीं उभें राहिलें असतां दोहों बाजूंस दोन दारें लागतात. ह्यांच्या बाहेर दोन उघडीं दालनें आहेत. ह्या दालनाच्या ठिकाणीं देवळाचा चौथरा दोहों बाजूंस बराच पुढें गेला आहे. ह्या दालनांपैकीं उजव्या हाताकडलें दालन व त्याच्या समोरचा, ह्मणजे पटांगणांतला उजव्या हाताकडला सोपा, ह्यांच्यामध्यें पूर्वी पूल होता, तो सुमारें शंभर वर्षांपूर्वी पडला. तसेंच मुख्य गाभाऱ्याच्या तिन्ही बाजूंस मोकळा चौथरा आहे. त्या चौथऱ्यावर सभामंडपांत जाण्याकरितां मुख्य गाभाऱ्याच्या दोहों बाजूंस दोन दारें आहेत. ह्याप्रमाणें सभामंडपांत येण्यास पांच दारें लागतात. तसेंच ह्या उघड्या चौथऱ्यावर मुख्य गाभाऱ्याच्या दोहों बाजूंस दोन, व मागल्या बाजूस तीन, अशीं पांच देवळें आहेत. त्यांवर नक्षीचें काम व कोरींव चित्रें बहुत आहेत, परंतु त्या देवळांत देवांच्या मूर्ति नाहींत.'

'पटांगणांत मुख्य देवळाच्या दोहों बाजूंस मोठ-मोठे सोपे आहेत. ही इमारत बहुतकरून दुमजली आहे. उत्तरेकडील सोप्याच्या दुसऱ्या मजल्यावर मोठें दालन

कोरलें आहे. ह्याचे खांब फार नक्षीचे व सुरेख आहेत, व दालनाच्या मध्यभागीं **ब्रह्मा, विष्णु,** आणि **महेश्वर,** ह्यांच्या मूर्ति शेजारीं शेजारीं आहेत. ह्याखेरीज तेथें दुसरीं पुष्कळ कोरींव चित्रें आहेत. व त्यांपैकीं कांहीं फारच उत्कृष्ठ आहेत. ह्या भागाच्या शेवटीं गाभाऱ्यांत **शिवाचें लिंग** आहे; व जिन्याचे वरच्या दाराजवळ **नंदी** आहे. दक्षिणेकडल्या बाजूस जो सोपा आहे, तो तिमजली आहे. ह्यांतही अनेक प्रकारचीं चित्रें आहेत. ह्या सोप्यांत मुख्य देवळाच्या सभामंडपांतून जावयास एक पूल राखिला होता, तो शंभर वर्षांपूर्वीं पडला ह्मणून वर सांगितलेंच आहे. ह्या सोप्यांत हल्लीं शिडी लाविल्यावांचून जातां येत नाहीं. **औरंगजेब बादशहानें** व दुसऱ्या मुसलमान **राजांनीं** ह्या देवळाची बहुत खराबी केली, व पुष्कळ मूर्ति छिन्नभिन्न करून टाकिल्या.

'**कैलास** हें देऊळ बाहेरून पाहिलें असतां तटाच्या भिंतीसारखें सरासरी भिकार दिसतें; परंतु आंत जाऊन तेथलें मुळांपासून शिखरापर्यंत कोरींव कामानें भरलेलें मुख्य देऊळ व भोंवतालचे सोपे, व सुटे खांब, व हत्ती व दुसरीं हजारों चित्रें, हें सर्व जेव्हां दृष्टीस पडतें, तेव्हां चित्तास फारच चमत्कार वाटतो. ह्या येवढ्या अफाट कामाचा नकाशा पूर्वीं मनांत आणून तें ज्यांनीं तयार केलें असेल, ते लोक मोठे कल्पक, मोठे सामर्थ्यवान्, व दृढनिश्चयी असले पाहि-

ञेत; व हे गुण हल्लींच्या हिंदु लोकांत त्या लोकांच्या मानानें, शतांश किंवा लक्षांश सुद्धां उरले नाहींत.'

एक **इंग्रज ग्रंथकार** ह्या लेण्यांविषयीं असें लिहितो कीं, ह्या भयाण इमारती प्रथम दर्शनीं मोठ्या भव्य दिसतात. व त्यापासून मन थक्क आणि उदास होतें. ह्या देवळांची संख्या, त्यांची शोभा, व कांहींकांची विस्तीर्णता व उंची, कांहींकांतलें अनेक प्रकारचे नक्षीचें काम, त्यांवरील नानाप्रकारची व चमत्कारिक वेलबुट्टी, त्यांच्या खांबावरचें उत्तम प्रकारचें खोदींव काम, अनेक प्रकारचीं भींतीवर कोरलेलीं चित्रें, व मोठमोठ्या विशाळ मूर्ति, इत्यादि सर्व विषय दृष्टीस पडले ह्मणजे, पाहणाऱ्याच्या चित्तास मोठें आश्चर्य वाटतें, आणि त्याचें मन व्यग्र होतें. ह्या इमारती पुष्कळ आहेत, व त्यांत पुष्कळ तऱ्हा आहेत; तेणेंकरून त्यांची एकवटीनें मनांत कल्पनाच आणितां येत नाहीं. ह्याविषयीं, प्रथम दर्शनी अंतःकरणांत ज्या भावना होतात म्हणून वर सांगितलें, त्या लवकरच नाहिशा होऊन, मनांत असा विचार उद्भवतो कीं, हीं एवढीं अचाट कामें ज्या लोकांनीं बांधिलीं, व त्याकरितां ज्यांनीं इतका परिश्रम केला, व त्यांवर इतकें कौशल्य प्रगट केलें, ते लोक अडाणी तर खचीत नव्हते; पण ते कोण होते, व कोणत्या काळीं ते येवढ्या वैभवास

१ हीं भव्य आणि अप्रतीम मंदिरें, इसवी सनाच्या आठव्या शतकांत तयार झालीं असल्याविषयीं, दाखला मिळतो.

(पुढें चालू)

चढले, आणि त्यांचें पुढें काय झालें, व त्यांचा कांहींच मागमूस कसा राहिला नाहीं, इत्यादि विचार मनांत येऊन फारच आश्चर्य वाटते.'

प्राचीन काळचीं अशा प्रकारचीं भव्य आणि मनोहर कामें ह्या भरतखंडाशिवाय अन्यत्र कोठेंही दृष्टीस पडत नाहींत. आतां, मिसर देशांत मात्र प्रचंड मनोरे पाह-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

"In the Baroda grant it is stated that Krishnarája 'caused to be constructed a temple of a wonderful form on the mountain at Elàpura. When the gods moving in their aerial cars saw it, they were struck with wonder, and constantly thought much over the matter, saying to themselves, 'This temple of Siva is self-existant ; for such beauty is not to be found in a work of art.' Even the architect who constructed it was struck with wonder, saying when his heart misgave him as regards making another similar attempt, 'wonderful ! I do not know how it was that I could construct it." * * * *

"Thus it appears that it was Krishna Rajà that caused the Kailasà to be constructed, and the date assigned to it by Drs Fergusson and Burgess simply on architectural grounds is verified. Krishna Rajá must have reigned in the last quarter of the seventh century of the Sáka era, *i. e,* between 753 and 775 A. D."

(Early History of the Dekkan by Dr. Bhandarkar P. P. 48/49).

ण्यांत येतात; परंतु त्यांत सुबकपणा व रमणीयता कोठें देखील दृग्गोचर होत नाहीं. तथापि, अर्वाचीन काळीं, सुमारें दोनशें वर्षांपलीकडे, मुसलमानी कारकीर्दीत, कांहीं कांहीं इमारतीचीं कामें फारच सुरम्य आणि वर्णनीय झालेलीं आहेत. विजापुरास इब्राहीम अदिलशहाची फार भव्य व मोठी मशीद आहे. औरंगाबादेस मुकुरबा नामक बहुत शोभायमान मशीद पाहण्यांत येते. आणि उत्तर हिंदुस्थानांत तर अशा इमारती अनेक आहेत; व त्यांत ताजमहाल ही तर सर्वोत्कृष्टच होय.

'ही इमारत आग्रा नामक शहरापासून दीड कोसावर यमुना नदीच्या पश्चिम तीरावर आहे. ह्या इमारतीपेक्षां विशेष शोभायमान, विशेष भव्य, व विशेष सुंदर इमारत सर्व पृथ्वीवर दुसरी कोठेंही नाहीं. ही इमारत फार मोठी आहे, असें नाहीं; पण तिचें सौंदर्य, तिच्या निरनिराळ्या अवयवांचें यथायोग्य परिमाण, त्या प्रत्येक अवयवांच्या बांधणींत व्यक्त झालेलें बांधणारांचें अनुपमेय कसब, व एकंदर इमारतीचा अलौकिक व नाजूक घाट, इत्यादि गोष्टी पाहिल्या असतां, पाहणारा आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन जातो; व त्यापासून झालेला आनंद त्याचे मनांत मावेनासा होतो ही मशीद बांधून सुमारें दोनशांपेक्षां अधिक वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी ती जशी कांहीं कालच बांधली आहे, अशी नवीन व नाजूक अद्यापिही दिसते, असें सांगतात. ही सर्व

इमारत पांढऱ्या संगमरवरी दगडांची आहे. हे दगड पांढरे असून त्यांत किंचित् काळसर रंगाची झांक मारिते. तेणेंकरून ते फारच शानदार दिसतात. ही इमारत संगमरवरी दगडांच्या चौथऱ्यावर आहे, व त्या चौथऱ्याच्या चार कोंपऱ्यांवर चार, त्याच जातीच्या दगडांचे मनोरे आहेत. व एकंदर सर्व इमारतीवर आंतून व बाहेरून उत्तम प्रकारची नक्षी खोदिली आहे. पांढऱ्या भुईवर नानाप्रकारच्या चित्रविचित्र रंगाचे खडे बसवून, भिंतीवर वगैरे फारच सुबक वेलबुट्टी काढिली आहे. दारांच्या व खिडक्यांच्या महिरपांवरून पांढऱ्या दगडांत काळेखडे बसवून, शाईनें पांढऱ्या कागदावर लिहिल्यासारखी अरबी लिपींतलीं अक्षरें दाखविलीं आहेत. व त्या अक्षरांनीं **कुराणांतलीं** वाक्यें लिहिलीं आहेत, असें म्हणतात. मशीदीचें मुख्य घुमट, व चार लहान घुमटें, व त्या सर्वांवरचें कळस, ह्यांवरही उत्तम प्रकारची नक्षी खोदिली आहे, व नानाप्रकारच्या रंगांचे खडे बसवून चमत्कारिक फुलें दाखविलीं आहेत. घुमटाचा आकार आंड्यासारखा लांबट व वाटोळा आहे; व हा आकार **शिल्पशास्त्रवेत्ते** व मार्मिक पुरुष फारच चाहतात.

'ह्या मशीदींत शिरल्याबरोबर तेथील अंधक उजेड पाहून, व गंभीर प्रतिध्वनि ऐकून, मनुष्याच्या मनांत एकदम कांहीं एक चमत्कारिक वृत्ति उत्पन्न होते. जसें ए-

ह्याद्या देवळांतल्या गाभाऱ्यांत शिरावें, आणि तेथें थोडा उजेड व थोडा अंधकार असावा, व किती एक तपस्वी लोक गंभीर मुद्रेनें ध्यान करीत आहेत, कितीएक भजन पूजनांत गुंतले आहेत, असें दृष्टीस पडावें, आणि तें सर्व पाहून अंतःकरणांत कांहीं भय, कांहीं पूज्यबुद्धि, असा कांहीं चमत्कारिक भाव उत्पन्न होतो, व संसारांतले विचारांची विस्मृति पडते, तसें ह्या मशीदींत गेलें असतां चित्ताची भावना कांहीं वेळ होते. ह्या ठिकाणीं जें बोलावें तें व तो गाभारा उलटून बोलतो, असें वाटतें. व ह्या प्रतिध्वनीचा आवाज मेघगर्जनेसारिखा गंभीर ऐकूं येतो.'

'प्रत्येक कमानीला खिडकी आहे, व त्यांच्या चौकटी संगमरवरी दगडांच्या आहेत. मुख्य गाभाऱ्यांत बादशहा व राणी ह्यांचीं थडगीं आहेत ह्मणून वर सांगितलें; पण हीं थडगीं वास्तविक नव्हत. तर ह्या गाभाऱ्याखालीं एक तळघर आहे. त्यांत ह्या दोघांच्या कफनी पुरून त्यांचीं वास्तविक थडगीं तेथेंच खालीं आहेत, व वरच्या महालां-तलीं थडगीं दर्शनी मात्र होत. मुसलमान लोकांत खालीं व वर अशा दोन ठिकाणीं थडगीं करण्याची चाल आहे. असो, हें तळघर चौकोनी आहे, व संगमरवरी दगडांचें बांधिलेलें नाहीं. ह्या तळघरांत जाण्याकरितां पूर्वी रुप्याचा दरवाजा होता; हल्लीं तो दरवाजा लांकडी आहे.

'ही इमारत चौकोनी आहे, ह्मणून वर सांगितलेंच

आहे. हिच्या प्रत्येक बाजूस मध्यें एक मोठी कमान व दोहों अंगांस दोन लहान लहान कमानी, अशा तीन कमानी आहेत, व कोपरे छाटून घेऊन चार कोपऱ्यांस चार लहान लहान कमानी दिल्या आहेत. ह्या कोपऱ्यांतल्या कमानी, ज्या बाजूसमोर आपण उभें रहावें, त्या बाजूच्या आहेत असें वाटतें. मधल्या गाभाऱ्याच्या सभोंवतीं मुख्य चार दिशांस चार चौकोनी जागा, व चार कोपऱ्यांस चार अष्टकोनी जागा, अशा आठ जागा आहेत, व या सर्व फारच मनोहर आहेत. दुसऱ्या मजल्यावरही अशाच आठ जागा आहेत.'

'ही इमारत ज्या संगमरवरी चौथऱ्यावर आहे, त्याचें क्षेत्र तीनशें पन्नास फूट आहे, व त्याची उंची वीस फुटांपेक्षां अधिक आहे, ह्या चौथऱ्याच्या चारी कोपऱ्यांवर चार मनोरे आहेत. ह्या मनोऱ्यांच्या बैठकी अष्टकोनी आहेत, व त्यांचा घेर ऐंशीं फूट आहे. प्रत्येक मनोऱ्याच्या सोटाचा व्यास मुळाशीं वीस फूट आहे, व एकंदर मनोऱ्याची उंची सुमारें दीडशें फूट आहे. हे मनोरे पांढऱ्या संगमरवरी दगडांचे असून त्यांवर चित्रविचित्र रंगाचे खडे बसवून मोठी रमणीय नक्षी केली आहे, व त्यांची बांधणी फारच सुंदर व नाजूक आहे. ह्या चौथऱ्याखालीं साध्या दगडांची चिरेबंदी आहे. तिचें एकंदर क्षेत्र सुमारें नऊशें फूट असेल, असें वाटतें. त्या चिरेबं-

दीच्या चोहींबाजूंस चार मशिदी आहेत, व चार कोपऱ्यांस चार अष्टकोनी शानदार बुरूज आहेत.'

आपली राणी **अर्जमंदबानू** हिचें नांव अजरामर राहण्याकरितांच, **शहाजहान** बादशहानें ही इमारत बांधली होती.

श्रीरंग पट्टण, व

श्रीरंगपट्टण येथील देवालयांच्या प्रांगणाचा परिधी सुमारें दोन कोस आहे. त्याच्या अन्तर्गाभ्यांतील स्तंभसमुच्चय फारच विस्तृत असून उच्च आहे, व सुमध्यम असून सुकुमार आहे.

बंगाल इलाख्यांतील, भुवनेश्वर येथील देवालयें.

ओरिसा प्रांतात **भुवनेश्वरा**जवळील देवालयांची व मंदिरांची ती विशीर्णावस्था आणि उध्वस्त दशा पाहून, परम दुःख झाल्याशिवाय राहत नाहीं. येथील देवालयांचे शिलाट्ट चाळीसपासून पन्नासपर्यंत असून, त्या प्रत्येकाची उंची पन्नास फुटींपेक्षां, ह्मणजे सरासरीच्या मानानें तेहेतीस हातांपेक्षां बिल्कुल कमी नाहीं. ह्यांत कांहीं कांहीं तर १९० पासून १८० फुट पर्यंतही उंचीचे आहेत.

विजया नगरचा प्रध्वंस.

तुंगभद्रा नदीच्या तीरीं वामतटीं, सुप्रसिद्ध **विजयानगर** नामक शहराच्या तटबंदीचा, त्यांतील विशाल सरोवरांचा, सेतूंचा, आणि नामांकित, भव्य, उदार, व

मोठमोठ्या जुनाट अशा देवालयांचा प्रध्वंस दृष्टीस पडतो. ही सर्व पाहिलीं ह्मणजे सर्व भक्षी कालाच्या विचित्र गतीचा विस्मय वाटल्यावांचून खचितच राहत नाहीं. जें शहर सुमारें चार शतकें (इ० स० १११८ पासून १५६५) पर्यंत चांगल्या भरभराटीच्या स्थितींत होतें, त्याची आजमितीस इतकी निकृष्ट दशा होऊन, तें अशा जर्जरावस्थेप्रत पोहोंचलें आहे. तथापि, त्यांतील मोडकळीस आलेल्या विशाळ इमारती, भव्य मंदिरें, व सुंदर देवालयें, हीं प्राचीनत्वाच्या संबंधानें हल्लीं देखील फार महत्वाचीं आहेत.

हिंदुस्थान व मिसर, या दोन देशांतील निर्मितीमध्यें तुलना.

इतक्या विशाल प्रमाणाच्या भव्य, सुरेख, आणि उदार चमत्कृति, मिसर (इजिप्त) देशाशिवाय, अन्यत्र कोठेंही नाहींत. तथापि, शिल्पपाटवचातुर्याच्या संबंधानें या दोहोंत तुलना पाहूं गेलें तर, जमीन अस्मानाचें अंतर दिसतें. मिसर देशांतील मनोरे अवाढव्य व स्थूल आहेत; परंतु त्यांत सौंदर्य आणि शोभा हीं यत्किंचित् सुद्धां भासमान होत नाहींत. हिंदुस्तानांतील निर्मिति अशा जगड्वाळ नाहींत; तथापि, त्यांत वैदग्ध्य व चातुर्य यांचें प्रतिबिंब पूर्णपणें वठल्याचें ठिकाठिकाणीं दृग्गोचर होतें. मिसर देशांतील मनोऱ्यांविषयीं अशी आख्यायिका आहे कीं त्यांच्या रचनेची सुरवात इसवी शकापूर्वी ३०९१ वर्षांपासून

झाली असून ते पुरे होण्यास सुमारें ६१ वर्षें लागलीं, ह्या मनोऱ्याखालीं अजमासें तेरा एकर जमीन व्याप्त झाल्याचें कळतें.

वेरूळ येथील अप्रतीम मंदिरें, व त्यांचा काल.

वेरूळ येथील विवरमंदिरांत, अप्रतीम अशीं मंदिरें झटलीं ह्मणजे **विश्वकर्म, कैलास,** आणि **इंद्रसभा,** हीं होत. हीं सर्व हिंदूनींच एकमेकांच्या चढाओढीनें, व प्रतिस्पर्धेस पेटल्यामुळें, निर्माण केलीं आहेत. यांपैकीं " **विश्वकर्म** " नामक विवरमंदिर **बौद्धांनीं** तयार केलें. व तें पाहून त्यावर तान व्हावी अशी ईर्षा उत्पन्न झाल्यामुळें **ब्राह्मणांनीं** " **कैलास** " नामक शिलोत्खात मंदिर बनविलें. हें खरोखर अति प्रेक्षणीय असून नक्षी, व खोदीव कामाची त्यांत अगदीं लयलूट केली आहे; व तें सर्वोत्कृष्ठ तऱ्हेनें साधलें आहे. तदनंतर कांहीं कालानें **जैन** लोकांसही हौस आली. व त्यांनीं देखील नजीकच आपल्या मर्जीप्रमाणें " **इंद्रसभा** " नामक मंदिर खोंदलें. हें तर अप्रतीमच आहे. हीं विशाल कामें केव्हां झालीं असावीं, अशाविषयींचा काल, निश्चयात्मक रीतीनें ठरविण्यास, विश्वसनीय साधन कांहींच उपलब्ध नाहीं. तथापि कांहीं कांहीं ठिकाणीं शिलालेख सांपडतात, त्यावरून तद्विषयनिपुण शास्त्रज्ञ असें अनुमान करतात कीं, हीं विवरें इ० स० ३९० पासून १३०० पर्यंतच्या कालांत

निर्माण झालीं असावीं; व त्यांपैकीं प्रत्येक तयार करण्यास निदान ८० पासून १०० वर्षें तरी लागलीं असावीं, असा अजमास आहे.

जगन्नाथचें देवालय व त्याचा काल.

सर्वांत अति प्राचीन व फार विख्यात असें देवालय श्रीजगन्नाथाचें होय. तरी ह्याचें काम इ० स० ११९८ सालीं संपूर्ण झाल्याचें सुप्रसिद्ध आहे. यापेक्षांही दुसरीं जुनाट देवालयें पुष्कळ आहेत, व त्यांतही अबूच्या पाहाडांत नामांकीत पैकीं आहेत.

हिंदूंची तडागरचना.

तडाग रचनेंत देखील हिंदूंचें उत्तम कौशल्य दिसून येतें. ही रचना बहुत करून दोन प्रकारची असते. ह्मणजे कांहीं तलाव, जलसंचयाकरितां, भूमींत खोद काम करून तयार केलेले असतात, व कांहीं दरीच्या तोंडाला मोठमोठे बंधारे घालून बांधलेले असतात. पहिल्या कृतींत, ह्या तलावांस बहुत करून चौफेर पाहिऱ्या असून, तलावांत त्या थेटपर्यंत खोल नेलेल्या असतात, व त्या मजबूत दगडाच्या घडींव बनविलेल्या दिसतात. बंधारे घालून निर्माण केलेल्या तलावांचा उपयोग कुल्यासिञ्चनाकडे होतो. पाणी दुर्मिळ असतें अशा ठिकाणीं, मोठमोठे कालवे अथवा पाट बांधून नेल्यानें, मनुष्यें व जनावरें ह्यांच्या उपजीविकेच्या साधनांचा

अमित साठा होऊन सर्वत्र आबादानी व्हावी या हेतूनें, सदरहू तलावाचा उपयोग, त्याच कामाकडे केल्याचें दिसतें. हे तलाव फार प्रेक्षणीय आणि विशाळ आहेत. व त्यांतील कांहीं कांहीं तर इतके मोठे आहेत कीं त्यांचा परिधि कित्येक कोस लांबीचा असून, त्यांतील जलसेकानें शेंकडों कोस प्रदेश असूनही परिप्लुत होत आहेत.

कूपरचना.

तलावाप्रमाणें कूपरचनाही सुंदर आहे. कांहीं विहिरी फार खोल, रुंद, आणि चतुष्कोन असतात, व कांही वर्तुलाकार असतात. बहुतकरून अति जुनाट विहिरी चतुष्कोनच असतात. ह्या विहिरी मंचालंकृत असून, शोभायमान अशा अलिन्दांनीं परिवेष्टित असतात. त्यांत ठिकठिकाणीं बसण्यासाठीं व आरामाकरितां प्रशस्त जागा केलेल्या असतात. आणि आंत उतरण्यासाठीं सुगम अशी शिलासोपानपंक्तिही असते. त्यामुळें त्या फारच भव्य व रमणीय दिसतात.

सेतुरचना, व

सेतुरचना अगदीं साधीच दिसते. बहुतकरून बाजूला शिलास्तंभाची योजना केली असल्याचें भासमान होत असून, त्यांजवर दगडांचींच अडवीं बहालें टाकलेलीं असतात. आणि हीं एकाएकीं, अथवा सहजगत्या, पडलीं जाऊं नयेत म्हणून, त्यांस मधून मधून दगडी खांबाचे चांगले टेंके दि-

लेले असतात. अशा प्रकारचे सेतु दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळ दृष्टीस पडतात. श्रीरामचंद्रानें लंकाधिपती रावणावर स्वारी केली, तेव्हां इतिहासप्रसिद्ध असा सागरोदकांत रचलेला सेतु सर्वांस महशूर असून, त्याचे विशीर्ण शिलाखंड, व अवशिष्ट भाग, आजमितीसही सेतुबंधरामेश्वराजवळ दृग्गोचर होतात.

तोरणें, आणि जयस्तंभ.

याशिवाय तोरणें, जयस्तंभ, आणि अलिन्द, इत्यादिकांतही हिंदुंचें मुळचें शिल्पपाटव सहजीं दिसून येतें. चितुरास विजयश्री प्रकाशक, असा एक विशाल आणि फारच सुरेख जयस्तंभ आहे. ह्याची उंची १२० फूट आहे, व त्याचें वर्णन टॉड्कृत राजस्थानच्या इतिहासांत फार सुरेख दिलें आहे. गुजराथेच्या उत्तरेसही अशा मासल्याचीं तोरणें दृष्टीस पडतात. या पैकीं बारनगर येथील अत्युत्कृष्ठ पैकीं होय.

आर्यशिल्पाची स्वभावसिद्धता.

आमची आर्यविद्या, आमचें आर्यशास्त्र, आमच्या आर्यकला, आणि त्या सर्वांचीं अमूल्य उपसाहित्यें, हीं यच्चयावत् स्वप्रभावनिर्मितच असून, त्या प्रत्येकांत मुळचाच तीव्र बुध्यंकुर, व प्रज्वलित स्वयंप्रकाश, स्वभावतःच दिसून येतात. आतां, ह्या गोष्टीचें प्रतिपादन करण्याची अवश्यकता नसून, तीआमच्या ग्रंथांवरून, लेखांवरून,

व विवरमंदिरासारख्या शाश्वत प्रत्यक्ष प्रमाणांवरून, निर्विवाद सिद्ध होतें. असें असूनही, कांहीं पाश्चात्य पंडितांचें असें ह्मणणें आहे कीं, ह्या सर्वांत यावनिक[१] गंध, व तद्गुण प्रभाव, हे भासमान होतात. परंतु ही गोष्ट कोणत्याही प्रकारें सिद्ध होत नसून, बिलकुल प्रमाण नसतांही, केवळ दुराग्रहानेंच तिचें पुष्टीकरण केल्यासारखें दिसतें. आतां, ही गोष्ट आम्ही निष्प्राञ्जलपणें कबूल करतों कीं, अन्य राष्ट्रांचें गुणदोष पाहून, त्या धोरणानें आम्ही आपल्या शास्त्ररचनेंत, किंवा शिल्पवैदग्ध्यांत, कालांतरानें कमिजास्ती फेरफार केला आहे. तथापि, त्या सर्वांत आमचा अंकूर, तेज, व प्रभाव, हीं मूळचीं आणि स्वोदित असल्यामुळें, आम्ही विद्येच्या कोणत्याही शाखेंत, कोणत्याही राष्ट्रांचें, यत्किंचितूही ऋणी नाहीं. इतकेंच नाहीं तर, सर्व विद्येंत, सर्व शास्त्रांत, आणि सर्व कलांत, इतर सर्व राष्ट्रांस आह्मांपासूनच ज्ञान प्राप्त झालें असल्यामुळें, तीं इतर राष्ट्रेंच आमचीं सर्व प्रकारें ऋणीं आहेत, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आणि ही गोष्ट पाश्चात्य विद्वानें देखील कबूल करतात.

---

१ यवन शब्दांत आरब, इराणी, वगैरे मुसलमान, व ग्रीक, आणि रोमन, तसेंच वायव्य सरहद्दीवरील रानटी जाती, रोमन, यांचा समावेश होतो, असें समजण्याचें आहे.

1 What can India teach us ? By Pro. Max-muller.

(पुढें चालू)

आर्यविद्येंत, व आर्यशास्त्रांत, आणि आर्यकलांत, आह्मी इतर राष्ट्रांचे ऋणी नाहीं, अशाविषयीं, मागील ११।१२।१३ आणि २० ते २७ या भागांत, सविस्तर विवेचन केलें आहे. आतां चालू भागांत फक्त आर्यशिल्पकलांविषयींचाच विचार करूं.

यवनांनीं आर्यशिल्पाचें केलेलें अनुकरण.

आमच्या कित्येक इमारतींचे नमुने यवनांनीं उचलून घेतले असल्याचें, त्यांच्या विद्यमान असलल्या प्राचीन मशिदींवरून, व देवालयांवरून सिद्ध होतें. मुसलमान लोकांच्या मशिदीची, आणि ग्रीक व रामन लोकांच्या देवालयाची, जी घमटासारखी आकृति दृष्टीस पडते, ती केवळ आमच्या बौद्धांच्या स्तपांचच प्रतिबिंब होय. आणि ही आमच्या हिंदूंची निमाण चमत्कृती पाहून, तिचेंच अनुकरण यवनादि पाश्चात्यांनीं केल्याचें अगदीं उघड दिसतें. ह्मणजे विद्येच्या या शाखेंत देखील ज्ञानाचा ओघ नेहमींच्या नैसर्गिक स्थितीप्रमाणें पूर्वेकडून पश्चिमेकडेसच गेला असून, त्याच्या उलट दिशेनें प्रवाह वाहिल्याचें यत्किंचितही प्रमाण दिसत नाहीं. राजेंद्रलाल मित्रानें ओरिसा येथील प्राक्कालीन वृत्ताविषयीं एक उत्तम

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

2 Elphinstone's History of India.

3 Dr. Hunters' Indian Empire.

4 The History of Indian Literature. By Pro. A. Weber.

पुस्तक छापिलें आहे, त्यांत आमच्या प्राचीन शिल्पकलांत यवनांच्या गुणप्रभावाचा यत्किंचित्‌ही गंध नसल्याविषयीं चांगलें प्रतिपादन केलें आहे. आणि, कांहीं[3] पाश्चात्य पंडित सदरहू गोष्ट निर्वेधपणें कबूलही करि-

---

1 "The antiquities of Orissa."

2 "Rájendra Lál mitra, it is true, in vol. I. of his splendid work, "The antiquities of orissa" (1875), holds out patriotically against the idea of any Greek influence whatever on the development of Indian architecture, &c."

(The History of Indian Literature. By Pro. A. Weber. P. 274. Note 321 a).

3 "A far higher degree of development was attained by Architecture, of which some most admirable monuments still remain: It received its chief cultivation at the hands of the Buddhists, as these required monasteries, topes (stúpas), and temples for their cult. It is not, indeed, improbable that our Western steeples owe their origin to an imitation of the Buddhist topes."

"The painful minuteness, indeed, with which the erection of brick alters is described in the Vedic sacificial ritual (of the Sùlva-Sútras) might lead us to suppose that such structures were still at that time rare. But, on the one hand, this would take us back to a much earlier time than we are here speaking of; and, on the other, this scrupulous minute-

(पुढें चालू)

तात. तथापि कांहीं[१] पंडित तत्संबंधीं आपली आशंकाच प्रदर्शित करतात. परंतु, हा विकल्प प्राचीन निर्मितीस कोणत्याही प्रकारें बिलकुल लागू होत नसून, तो फक्त अर्वाचीन इमारतींबद्दलच मनांत आणण्यासारखा आहे.

रामराजानें[२] हिंदुशिल्पशास्त्रावर इ० स० १८३४ सालीं फार उत्तम निबंध लिहिलेला असून, त्यांत त्याविषयीं फारच सूक्ष्म आणि सविस्तर विवेचन केलें आहे. ही तपशीलवार माहिती 'मानसारां'तील अट्ठावन अ-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

ness of description may simply be due to the circumstance that a specially sacred structure is here in question, in connection with which, therefore, every single detail was of direct consequence."

(History of Indian Literature. P. 274.)

1 "In the fifth volume of his Archieological Survey of India, P. 185, ff., Cunningham distinguishes the Indo-Persian style, the prevalence of which he assigns to the period of the Persian supremacy over the vally of the Indus (500-330), and three Indo-Grecian-styles, of which the Ionic prevailed in Takshila, the Corinthian in Gandhara, and the Doric in Kàshmir."

(History of Inian Literature. P. 274.
Note 321 A.)

2 Rám Ráz's Essay on the Architecture of the Hindoos. (1834).

ध्यायांतून, व मायमत[1], काश्यप, वैखानस, आणि अगस्त्यकृत सकलाधिकार, यांतून घेतल्याचें दिसतें. वराहमिहिर संहितेंतही एक सबंध अध्याय या शिल्प-विवेचनासंबंधींच आहे.

1 Mayas' system, on which see Rajendra Lál mitra; Notices, II. 306.

भाग २९ वा.

आर्यकला.

पटनिर्माणविद्या व रागकौशल्य.

भारतीयकला व जीवनसाधन.

स्थूलमानानें पाहूं गेलें असतां, भरतखंडांतील प्रजा कृषिकर्मजीवी आहे, हें खरें. तथापि, ती इतर उपयुक्त आणि चारुकलांत मूढ आहे, असें कोणीही बिलकुल समजूं नये. कारण, मानवी सुखोपभोगाच्या संबंधानें ज्या ज्या साधनांची, ऐषआरामाची, आणि ऐश्वर्याची, यत्किंचितही अवश्यकता आहे, तीं तीं यच्चयावत इकडील प्रजाजनांनीं पैदा केलीं असून, त्यांत ते आपलें अनुपम हस्तपाटव, अद्भुत् रसिकता, व प्रशंसनीय रसज्ञता, आजपर्यंत दाखवीत आले आहेत.

भरतखंडाची इतर देशांशीं तुलना.

इंग्लंडांतील ल्यांक्याशायर वगैरे मोठमोठ्या शहरांप्रमाणें आमच्या भरतभूमींत जरी असंख्य गिरण्या नाहींत, तरी पटनिर्माणविद्येंत हा देश अजूनही

पृथ्वींतील एका राष्ट्रास देखील हार गेला नाहीं. इतकेंच नाहीं तर, ह्या देशासारखें उत्कृष्ठ, तसेंच बारीक विणीचें, सुबक, आणि मुलाईम कापड पृथ्वीच्या पाठीवर अन्यत्र कोठेंही पैदा होत नाहीं. यूरोपखंडांतील लोक, व्यापार-निमित्य, जेव्हां हिंदुस्थानांत आले, तेव्हां येथील लोकांची सुधारणा, त्यांची उन्नतावस्था, त्यांचें शिल्पपाटव, विणकर कामाचें चातुर्य, कनकप्रावीण्य, रत्नादिकोश, भाजननिर्माणवैदग्ध्य, आणि गंधद्रव्यक्रिया, हीं पाहून त्यांस मोठें नवल वाटलें.

ह्या आमच्या चारुकला फार प्राचीनकालच्या अस-

तत्संबंधीं डाकर इंटरचा अभिप्राय.

१ त्यासंबंधीं लिहितांना डाक्टर इंटर असें ह्मणतात कीं:—

"When the first European traders reached the coast of India in the 16th century, they found a civilization both among 'Moors' and 'Gentoos' at least as highly advanced as their own. In arhitecture, in fabries of cotton and silk, in gold-smith's work and jewellery, the people of India were then unsurpassed."

(Indian Empire P. 598).

"I delicacy of texture, in purity and fastness of colour, in grace of design, Indian cotton may still hold their own against the world."

(Indian Empire. P, P, 599/560).

आर्यचारुकलांचें ऐतिहासिक दृष्टीनें अन्वेषण.

तांही, त्यांचा अखंड प्रवाह आज तीन चार हजार वर्षांच्या प्रचंड घडामोडींत कसा राहिला, व कालाच्या असंख्य उलथापालथींत तो आजपर्यंत सतत, आणि अप्रतिहत, असा काय कारणांनीं, व कोणत्या साधनांनीं टिकला, हें समजण्याची जिज्ञासा प्रत्येक विचारी मनुष्यास झाल्यावांचून खचीत रहाणार नाहीं. व अशा प्रकारें झालेलें यथायोग्य कुतूहल पुरविण्यासाठीं, सदहू प्रवाहाच्या उगमाशींच जाणें अगदीं अत्यवश्य असून, त्या कलांच्या मूल संस्थांविषयीं ऐतिहासिक दृष्टीनें अन्वेषण करणें फारच महत्वाचें, व चित्तरंजक, आणि मनोवेधक आहे.

ह्या हिंदुग्रामसंस्थांच्या इतिहासाचें समग्र विवेचन या पुढें योग्य स्थळीं[1] करण्यांत आलें आहे.

हिंदुग्रामसंस्थांविषयीं दोन शब्द.

मात्र या ठिकाणीं इतकेंच दिग्दर्शन करितों कीं, या अफाट देशांतील बहुतेक प्रत्येक मोठ्या गावांत, एखादा शिल्पकार अथवा सोनार, तांबट अथवा लोहार, कोष्टी अथवा कुंभार, आणि सुतार, तेली, नापीत, किंवा चांभार, वगैरे नाना प्रकारच्या धंद्याचे लोक, कोणीना कोणी तरी असतातच. ह्या सर्वांस ज्याच्या त्याच्या उद्योगाच्या मानानें गिऱ्हाइकीही मिळे. त्यामुळें, ज्या त्या धंदेवाल्यांनीं उत्पन्न केलेल्या मालाचा

---

१ भाग ३४ वा पहा.

खप होण्यास, यत्किंचित्‌ही अडचण पडत नसे. तशांत ह्यांचा माल, दिवसानुदिवस, जसजसा चांगला, सुबक, आणि खुमासदार होऊं लागला, तसतशी त्याची उत्तरोत्तर प्रसिद्धी होऊन, तो मोठमोठ्या ठिकाणीं, श्रीमान्‌ लोकांच्या घरीं, बड्या दरबारांत, व विलासी राजवाड्यांत, पुष्कळच खप लागला. त्या कारणानें, अशा प्रकारचा माल तयार करण्यास चांगलेंच उत्तेजन येत चाललें; आणि पूर्वींचे राजे व श्रीमान्‌ लोक हे चांगले गुणज्ञ, व फारच रसिक असल्यामुळें, ते केवळ ह्या अप्रतीम कलांचे पोषिंदेच बनले. त्यामुळें, कलोत्कर्षाकडे करोडो रुपयांचा खर्च प्रतिवर्षी होत गेल्यानें, ह्या कालपर्यंत त्या जिवंत राहिल्या. परंतु पुढें पुढें, परद्वीपस्थांच्या कारकीर्दींत आमचें स्वातंत्र्य अगदींच नष्ट होत गेल्यानें, आमचे राजे, मांडलिक प्रभु, आणि त्यांचें सामंतचक्र, हीं सर्वच लयास जात चाललीं. त्या योगानें, ह्या कलांस त्यांजकडून मिळणारें उत्तेजन व पोषण, हीं साहजीकच कमी होत जाऊन, तें प्राचीन कलावैभव आजमितीस अगदींच संपुष्टांत आल्यासारखें झालें आहे. तशांत यूरोपखंडांतील, व त्यांतही विशेषतः इंग्लंडांतील बाष्पयंत्रांनीं, सर्व प्रकारचा माल फारच स्वस्ता करून टाकिल्या कारणानें, हा विलायती अल्पमूल्य व चटकदार माल टाकून, आमचा उज्ज्वल व

आर्यकलांचा उत्कर्ष व ऱ्हास व त्यांचीं कारणें.

टिकाऊ, परंतु बहुमूल्य, असा देशी माल घेण्यास, निर्धनतेमुळें कोणी देखील धजावत नाहीं.

त्याचें पुनरुज्जीवन.

तथापि, ही एक गोष्ट मोठ्याच सुदैवाची समजली पाहिजे कीं, आमच्या देशाच्या ह्या निकृष्टावस्थेंत व दीनदशेंत, इकडील कलांस आणि उद्योगास परद्वीपस्थांकडून, दिवसानुदिवस, थोडें बहुत तरी उत्तेजन मिळत चाललें आहे. तसेंच आमच्या प्राचीन कलांची ही सांप्रतची दुर्दशा पाहून, आमचे देखील आतांशा कोठेंसे डोळे उघडत चालले आहेत. त्यामुळें, ह्या पुराण आर्यकलांचें पुनरुज्जीवन होण्याचा बराच संभव दिसत आहे.

कापासनिर्मितीचा पौराणिक काल.

कापसाचें विणकर काम ह्मटलें ह्मणजे हिंदुस्थानांतील प्राचीन उद्यमापैकींच एक उद्यम होय. हा उद्यम इतका पुरातन आहे कीं, तो महाभारतकालाच्या पूर्वीपासूनही प्रचारांत आहे. हिंदुस्थानांत कापसाचा व इतर तयार झालेला माल, पूर्वी देखील दूरदेशीं रवाना करण्यांत येत असे. ग्रीक भाषेंत कापास वस्त्राला सिंडान् अशी संज्ञा आहे; आणि ह्या शब्दाची शब्दव्युत्पत्ति

1 * * * "In Indian, cotton-weaving was practised" before the time of Mahà Bhàrata."

(Dr. Hunter's Indian Empire. P. 599).

पाहूं गेलें असतां असें दिसतें कीं, सिंध किंवा हिंद या पासूनच हा शब्द झाला आहे. कारण, ज्याप्रमाणें **कालिकत** बंदरांतून पैदा झालेल्या कापसाच्या वस्त्रांस **इंग्रजींत "कालिको"** असें ह्मणतात, तद्वतच **हिंद** अथवा **हिंदुस्थान** देशांतून प्राप्त झालेल्या कापसाच्या मालास **सिंडान्** हें नांव पडलें असावें. आमच्या **भरतखंडाच्या** प्राचीन व्यापारासंबंधीं अगदीं पुराण असा प्रथमचा प्रमाण लेख ह्मटला ह्मणजे **पेरिप्लस** नामक ग्रंथ होय. ह्या ग्रंथावरून असें दिसतें कीं, फार पुरातन काळीं देखील **हिंदुस्थानांतून** नानाप्रकारचें कापड दूरदेशीं निर्गत होत असे.

देशी मालाचा कारखाना, व त्याची निर्गत.

हें सर्व कापड हस्तनिर्मितच असे. कारण त्यावेळीं बाष्पयंत्रनिर्मिति कोणाच्या स्वप्नांत देखील नव्हती. इ० स० १८७० सालीं, **मद्रास इलाख्यांत** २,७९,२२० माग होते. ह्यांपैकीं, २,२०,०१५ माग खेड्यापाड्यांतील असून, बाकी ५९,२०५ शहरांतील होते; व त्यांपासून सुमारें साडेतीन कोट रुपयांपासून तों चार कोट रुपयांपर्यंत कापड निघालें असावें, असा अजमास आहे. सदरहू सालीं **मद्रास इलाख्यांतून** सुमारें २२,००,००० रुपयांचें देशी कापड परमुलुखीं रवाना

मद्रास इलाख्यांतील,

झालें. परंतु हें देशीकापडाच्या निर्गतीचें मान चढतें किंवा कायमही राहिलें नाहीं. तें दिवसानुदिवस कमीच होत गेलें. तें इतकें कीं, इ० स० १८८२।८३ सालीं, मद्रासेहून फक्त ४,५१,९६० रुपयांचेंच देशी कापड निर्गत झालें. मद्रासेंत एकंदर चार कापसाच्या गिरण्या आहेत. बिलारी परगण्यांत एक आहे, व इतर ठिकाणीं चार आहेत.

मध्यप्रांतांतील, व

मध्यप्रांतांत ह्या देशी धंद्याला अजून देखील चांगली तेजी आहे. इसवी सन १८७७।७८ सालीं ८७,५८८ माग, व १,४५८९६ विणकरी होते. आणि एकंदर माल सुमारें ८२,८०,००० रुपयांचा पैदा झाला होता. इ० स० १८८२।८३ सालीं, मध्यप्रांतांत कापसाच्या तीन मोठमोठ्या गिरण्या नागपूर वगैरे ठिकाणीं असून, शिवाय आणखी १,४३, ८०१ मागही होते. ह्या सालीं एकंदर माल सुमारें ८५, ८२,१९० रुपयांचा पैदा झाला. आणि येथूनच इ० स० १८७८–७९ सालीं, अजमासें १६,२६,४२० रुपयांचा माल इतर प्रांतीं रवाना केला.

मुंबईतील.

मुंबई इलाख्यांत विलायतेकडील मालाचा पुष्कळ खप होत असल्यामुळें, इकडे देशी मागांची संख्या दिवसानुदिवस फारच कमी होत चालली आहे. तथापि, हळू हळू गिरण्यांचा जंगी कारखाना इतस्ततः बहुतेक ठिकाणीं पसरत

चालल्या कारणानें, देशाचें हीत बरेंच होत जाऊन, इकडील माल सुद्धां बऱ्याच प्रमाणानें, चीन, जपान, अरबस्थान, आणि आफ्रिका, वगैरे ठिकाणीं रवाना होतो.

हिंदुस्थानांतील गिरण्यांचा अहवाल.

वाफेच्या यंत्रानें चालणारी, अशी कापसाची व कापडाची पहिली गिरणी, मुंबई शहरांत इ० स० १८५४ सालीं स्थापन झाली. त्यानंतर त्यांचा क्रमाक्रमानें इतका फैलाव झाला कीं, इ० स० १८७९ सालीं, हिंदुस्थनांतील एकंदर गिरण्यांची संख्या (५८) अठ्ठावण पर्यंत येऊन पोहोंचली. यांपैकीं ३० गिरण्या तर फक्त मुंबई बेटांतीलच असून, १४ गुजराथेंतील कापूस पिकणाऱ्या प्रांतांत, ६ कलकत्ता व नजीकच्या प्रदेशांत, ३ मद्रासेंत, २ वायव्यप्रांतांत कानपुरास, १ मध्यप्रांतांत नागपुरास, १ इंदूरास, आणि १ निजाम हैदराबादेस, अशा होत्या. ह्या एकंदर गिरण्यांवर पुरुष, बायका, व मुलें, मिळून सुमारें चाळीस ४०,००० हजार मनुष्यांचा उदरनिर्वाह चाले. गिरणीच्या ह्या संख्येंतही उत्तरोत्तर भर पडत जाऊन, त्याची मजल इ० स० १८८४ सालीं ८१ पर्यंत येऊन ठेपली; त्याचा तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें:—

इ० स० १८७९ सालचा.

मुंबई बेटांत ४३; सदरहू इलाख्यांतील इतर भागांत

इ० स० १८८४ सालचा.

१८; बंगाल इलाख्यांत ६; वायव्य प्रांतांत ३; मध्यप्रांतांत १; निजाम हैद्राबादेस १; व मद्रासइलाख्यांत ९; याप्रमाणें गिरण्यांची परिसंख्या प्रांतवार वांटली जाऊन, त्या बांधण्यास ६८,६७,०८६ पाऊंड, ह्मणजे सुमारें सात कोट रुपये खर्च आला. त्यांत एकंदर १९,२०,०९९ चाती, आणि १९,७२९ माग असून, त्यांत त्या मागील बारा महिन्यांत ९१,३०० टन कापूस खपला; आणि त्या सर्वांवर, सरासरीच्या मानानें, रोज ६२,८३६ मनुष्यांचें पोषण झालें.

बंगाल इलाख्यांतील देशी माग.

बंगाल इलाख्यांत हाताचें विणकर काम मुंबई प्रमाणेंच मागें पडल्यासारखें झालें आहे. तथापि, युरोपखंडांतून सुताचे गट्ठे पुष्कळच आयात होतात, त्यावरून देशी मागांवर विणण्याचें काम बऱ्याच प्रमाणानें चालतें, असें वाटतें. मिडनापूर, नडिया, आणि बर्दवान, या ठिकाणीं हिंदी कोष्टी असून, ते अजून सुद्धां इकडील मागांवर पुष्कळ कापड काढतात. हा माल बहुत करून जाडा भरडा असतो. कारण, स्वस्ततेच्या संबंधानें ह्याला गिऱ्हाइकी पुष्कळ असते, व तो फार खपला जातो.

हिंदुस्थानांत बारीक विणीचें मुलाईम कापड फार थोड्या ठिकाणीं होतें. तथापि, जें होतें तें इतकें सुबक

वस्त्रालंकरणांत हिंदूंचें पाटव.

होतें कीं, तसें अन्यत्र कोठेंही पैदा होत नाहीं. युरोपखंडांतील गिरण्यांनीं, आणि इतर नानाविध कारखान्यांनीं, जरी इकडील हरतऱ्हेचा माल स्वस्तः केला आहे तरी, कापड, धातु, व लांकूडकाम, यांवरील नानाप्रकारचें अति सूक्ष्म, दुर्ग्राह्य, आणि मनोहर अशा नक्षीकामाचें हस्तपाटव, व सुरम्यकौशल्य, हीं कार्यकुशलधुरंधर गौरकार्यांस देखील अजून साधलीं नाहींत. अर्थात्च, हीं सर्व बहुत परिश्रमानें, व अति खर्चानें तयार होत असल्याकारणानें, त्यांस श्रीमंत, धनाढ्य, व राजे ह्यांशिवाय दुसरें गिऱ्हाईकच मिळण्याचा संभव नाहीं.

ढाका येथील मलमल.

ढाका येथें अति सूक्ष्म विणीचें असें मलमलीचें कापड तयार होतें. तें हरएक जातीचें, व जसें सांगावें त्या प्रकारचें, तेथील लोक तयार करितात. ह्या कापडाच्या सुबकपणाविषयीं सर्व जगभर प्रसिद्धी आहे. हें विणकर काम करणारे बहुतेक हिंदूच असून, ह्या कामांत त्यांचें हस्तचातुर्य फारच विकासाप्रत पावल्यानें दिसतें, व तें प्रत्येकाच्या अनुभवासही येतें. हे विणकर ज्या हत्यारांचा उपयोग करतात; तीं कमीत कमी एकंदर (१२६) सव्वीस असतात; यावरून त्यांच्या उद्योग वैदग्ध्याचें सहजींच अनुमान होईल. तिप्परा परगण्यां

सरई येथें, व **नडिया** परगण्यांत **शांतिपूर** येथें, बारीक विणीचें कापड, पूर्वीपासूनच फार नामांकितपैकीं तयार होत असतें. हें कधीं कधीं अगदीं साधें तथापि सुबक व मुलाईम होत असून, कधीं कधीं त्याजवर सूक्ष्म नक्षी, आणि सुंदर कशिदाही काढितात; व त्या मुळें तें फारच शोभिवंत दिसतें.

मद्रास येथील मलमल.

मद्रास इलाख्यांत उत्तम **मलमलीचीं** व इतर उंची वस्त्राचीं प्रसिद्ध अशीं ठिकाणें ह्मटलीं ह्मणज **अरणी**, **मच्छलीपट्टण**, विज.ापट्टण, **नेलोर**, आणि बंगलोर, हीं होत. **मलबार** किनाऱ्यावर **नायर** जातीचे लोक नामांकितपैकीं मलमलीचें कापड विणतात. **मच्छलीपट्टण** येथें उत्तम प्रकारचें चीट तयार होतें. **विजयापट्टण** येथें "**पंजम्**" नांवाचें एकशेंवीस धाग्याचें कापड तयार होत असून, **नेलोर** येथें **सालंपूर** जातीचें निळें कापड पैदा होतें.

मलमलीवरील भरगच्चीचें काम.

मलमलीवर कोठें कोठें रेशिमाची वेलबुट्टी काढून, फार सुरेख नक्षीचें काम करितात. केव्हां केव्हां ह्याजवर जरतारीचें काम करितात; किंवा कधीं कधीं सोन्याच्या भरजरी कामानेंच हें वस्त्र अलंकृत व सुशोभित करितात. मूळ कापडाची वीण फारच बारीक आणि सुरेख

असल्यामुळें, ह्याजवर जितकें भरगच्चीचें काम करावें तितकें तें फारच खुलतें, व अतीव शोभायमान दिसतें. अशा प्रकारचें सुवर्णरोप्यमिश्रित विणकरकाम **दिल्ली, पाटणा, डाका, सिंध,** आणि **कच्छ,** येथें होतें.

मुंबईतील कापडां-चीं प्रसिद्ध ठिकाणें.

मुंबई इलाख्यांत कापडाचीं प्रख्यात अशीं ठिकाणें **अमदाबाद, भडोच, सुरत, पुणें, नाशीक, येवलें, सोलापूर, नगर,** व **धारवाड,** वगैरे होत. आणि **मध्यप्रांतांत चांदा, नागपूर,** व **हुसंगाबाद,** हीं होत. येथें विणण्याचे मोठमोठे माग असून, त्यांत नानाप्रकारचीं लुगडीं, उंची साड्या, जरीकांठी खण, रेशीमकांठी धोतरजोडे, भरजरीचे शेले, सुबक उपरणीं, किंमतीं पागोटीं, सुंदर कलाबतू, आणि मौल्यवान् किनखाप, वगैरे हरतऱ्हेचें सामान तयार होतें.

रेशीम व त्याचे कारखाने

रेशीम तयार करण्याचे देखील इकडे मोठमोठे माग, व कारखाने आहेत. **बंगाल इलाख्यांत** रेशीम उत्पन्न करण्यासाठीं **रेशमी** किडे पाळण्याचा मोठाच व्यवसाय असून, त्या किड्यांचें पोषण होण्यासाठीं तिकडे तुतीच्या झाडांचीही पुष्कळच लागवड होत चालली आहे. इकडे तयार झालेलें रेशीम **वायव्यप्रांत,** आणि **युरोप**खंड, इकडे कच्च्या अवस्थेंतच रवाना होत असून, मुंबई-

च्या खपाकरितां **चीन** देशांतील **रेशीम** आयात होतें. **आसाम** व **ब्रह्मदेशांत** रेशमी कपड्यांचा आणि वस्त्रांचा सर्व साधारणच उपयोग होत असून, हें कापड घरांतील बायकामाणसेंच विणतात. हल्लीं थोड्याच वर्षांपूर्वीं, **मुंबईस** एका वाफेच्या रेशमी गिरणीची स्थापना झाली. हींत **ब्रह्मी** लोकांच्या उपयोगाचीं नानाप्रकारचीं रेशमीं वस्त्रें तयार होतात. इ० स० १८८२–८३ सालीं, हिंदु- **स्थानांतून** सुमारें ३०,६२,२८० रुपयांचा माल दूरदेशीं निर्गत झाला.

किनखाब.

उत्तम व नामांकित **रेशमीवस्त्रें पंजाब**, **सिंध**, **आग्रा**, **दक्षिणहैदराबाद**, **तंजावर**, **त्रिचनापल्ली**, **बनारस**, **मुर्शिदाबाद**, **अमदाबाद**, आणि **सुरत**, वगैरे ठिकाणीं होतात. या पैकीं उज्ज्वल आणि भरजडावाचे **किनखाब** फक्त बनारस, मुर्शिदाबाद, अमदाबाद, व त्रिचनापल्ली येथेंच तयार करितात.

मखमाल.

दक्षिणेंतील इतिहासप्रसिद्ध अशीं जीं प्राचीन राजधानीचीं शहरें **कलबुर्गें**, व **औरंगाबाद**, येथें भरजरीची, अप्रतीम नक्षीची, आणि तेजानें व रंगानें झक, अशी **मखमाल** तयार होत असून, तिचे नानातऱ्हेचे **दरबारचे** पोषाक,

हरएक प्रकारचे वस्त्रालंकार, विचित्र तंबू, आणि सुंदर छत्रें, वगैरे बनवितात.

छोगे व शाली.

नामांकित लोंकरीचे कपडे, आणि अमूल्य ऊर्णावस्त्रें, हीं **सिंध, पंजाब,** व **काश्मीर,** येथें होतात. प्रसिद्ध व सर्वश्रुत **छोगे** हे सदरहू ठिकाणींच तयार होत असून, ते पतु ह्मणजे उंटाच्या केंसाचे बनवितात. त्यांची कीर्ति आजकाल **इंग्लंडांत**ही पसरली असल्यामुळें, त्यांचा तिकडे लोक फार उपयोग करितात; व त्या कारणानें इकडल्या प्रमाणेंच ते तिकडे प्रचारांत आहेत. **काश्मीर**च्या **शाली** तर सर्वत्रच प्रसिद्ध आहेत. ह्या खुद्द **काश्मीरांत** अथवा **लुढियानें**त, किंवा **पंजाबांत** तयार होतात; व शालीकरितां मुद्दाम राखून ठेविलेलीं जीं **पशमिना** नांवाचीं बकरीं असतात, त्यांच्या लोंकरीपासून त्या बनवितात. ह्या बकऱ्यांचें मूलनिवासस्थान **हिमालयावरील पठार** होय.

भरजरीचीं ऊर्णावस्त्रें.

ह्या **शालींत** जरतरीचें व भरगच्चीचें काम करून, ती इतकी शोभायमान करितात कीं, ती एकदां कां पाहण्यांत आली ह्मणजे तिच्याकडे दोन घटिका पाहावेंसेंच वाटतें. ठिकठिकाणीं बारीक नक्षीची वेलबुट्टी काढून, तिच्या मनोहर रचनेंत लतासौन्दर्य प्रदर्शित केलेलें असतें. जागोजागीं जरतरीचें व भरगच्चीचें काम केलेलें

दृष्टीस पडतें. त्यांतच मधून मधून सोन्याच्या कोंदणांत पाणीदार मौक्तिकें बसविलेलीं असतात. दरम्यानच्या फटींत तेजोमय हिरकण्यांची योजना केलेली असते. आणि इतस्ततः हिरवागार पाच बसविलेला असून, बाजूनें अन्य जातीची जरतरी असल्यामुळें, तेजःपुंज अशा मौल्यवान् खड्यांचें शोभायमान कोंदण सर्वत्रच एकदम भासमान होऊं लागतें. मिळून, जिकडे पहावें तिकडे सर्व कांहीं प्रभामयच वाटतें. ह्यांत केवळ एकटे पटकारच आपलें हस्तपाटव, व निःसीमवृत्तिचातुर्य दाखवितात असें नाहीं. तर, त्यांच्यावर आणखी जास्त ताण करण्याकरितां सुवर्णकारही आपलें अप्रतीम कौशल्य, आणि शिल्पवैदग्ध्य प्रदर्शित करितात. व ह्या सर्वांवर केवळ आपलीच छाप बसावी या हेतूनें, जणु कायं ईर्षेस पेटूनच, रत्नकारही आपल्या व्यवसायाचें पूर्ण मर्म, व अनुपम लावण्य, मोठ्या शिताबीनें दाखवितातसें दिसतें.

रत्नखचित चादर.

अशा मासल्याची रत्नखचित चादर, पूर्वीं एकदां, सुमारें एक कोट रुपये खर्च करून, **गायकवाडसरकारांनीं** तयार करविली होती. ती अजूनही **बडोद्यास** त्यांच्या संग्रहीं आहे. ह्या **चादरीविषयीं** लिहितांना **सर ज्यॉर्ज बर्डवूड** असें ह्मणतात कीं:—

"It was composed entirely of inwrought pearls

and pracious stones, disposed in an arabesque fashion, and is said to have cost a kror of Rupees (say one million sterling). Although the richest stones were worked in it, the effect was most harmonious. When spread out in the sun, it seemed suffused with an iridescent bloom, as grateful to the eye as were the exquisite forms of its arabesques."

ही चादर इतस्ततः मोत्यांनीं भरलेली असून, तिच्या नांवाप्रमाणें ती खरोखरच रत्नखचित आहे. तसेंच तिच्यावर सुंदर प्रकारची मनोहर अशी वेलबुट्टी सर्वत्र काढलेली आहे. ह्यांतील सुवर्णाची कांति व तेज, उज्ज्वल मोत्यांचा चकचकाट, आणि रत्नखंडांची शुभ्र प्रभा, इत्यादि योगानें नयनोत्सवाचें साफल्य होतें. व त्यांतही सूर्यकिरणांचें तेज त्यांजवर पडलें ह्मणजे तर ती विचित्र प्रभा समंतात् भागांत फांकली जाऊन, कांहीं विलक्षण सौन्दर्य दृग्विषयीभूत होतें.

सत्रंज्या, गालीचे, व नमदे.

इकडे नानाप्रकारच्या किंमती सत्रंज्या, हरतऱ्हेचे मुलाईम गालीचे, व अनेक जातींचे विचित्र नमदे सुद्धां तयार होतात. हीं सर्व मुख्यत्वेंकरून काश्मीर, पंजाब, सिंध, आग्रा, मिर्झापूर, जबलपूर, वारंगळ, मलबार, आणि मच्छलीपट्टण, येथें बनविण्यांत येतात. लाहोर, जबलपूर, मिर्झापूर, बनारस, आणि

बंगलोर, येथील तुरुंगांत हे नमदे पुष्कळच तयार होत असल्यामुळें, ते दूर देशीं रवाना होतात; व इंग्लंडांत ते, प्रत्येकास चारपासून पांच रुपयेपर्यंत, विकले जातात. मखमालीचे गालीचे, बनारस व मुर्शिदाबाद येथें तयार होत असून, रेशमी गालीचे तंजावर आणि सालेम येथें काढितात. गालीच्यांचें मूल ठिकाण इराण व तुर्कस्थान असून, मुसलमान लोकांच्या आगमनाबरोबरच त्यांचा इकडे प्रचार झाल्याचें कळतें. इ० स० १८९१ सालीं, लंडनमध्यें प्रदर्शन झालें, त्यांत अत्युत्कृष्ठ नमदे वारंगळचे होते. हें प्राचीनकाळच्या अन्ध्र राजांच्या राजधानीचें शहर असून, तें दक्षिणहैदराबादेच्या पूर्वेस सुमारें चाळीस कोसावर आहे.

लोंकरीच्या गिरण्या.

हिंदुस्थानांत हल्लीं लोंकरीच्या गिरण्याही झाल्या असून, त्या गुरुदासपूर परगणा (पंजाब), कानपूर (वायव्य प्रांत), आणि मुंबई, येथें स्थापन झाल्या आहेत.

तागाचे कारखाने व खप.

तागाचे देशी माग अजूनही बंगाल्यांत, पुर्णिया आणि दिनाजपूर परगण्यांत, आहेत. तागाचे कपडे व गोणताट हे, कोच, राजवंसी, किंवा पाली, वगैरे जातीचे लोक विणतात. तागाचे यंत्राचे कारखाने

कलकत्त्याच्या आसपास, नदीच्या पलीकडे हौरा परगण्यांत, ब्रह्मपुत्रा नदीच्या वरच्या बाजूला, कांठाजवळ सिराजगंज येथें, मुंबईस, व मद्रासेंत आहेत. इ० स० १८८२।८३ सालीं, हिंदुस्थानांत एकंदर तागाच्या गिरण्या २१ एकवीस होत्या. यांपैकीं १९ एकोणीस बंगाल इलाख्यांत असून, १ एक (मुंबई) कुलाब्यास, आणि १ एक मद्रास इलाख्यांत विजयापट्टण परगण्यांत चित्तविलास येथें होती. ह्या कारखान्यांवर सदरहू सालीं, पुरूष, स्त्रिया, व मुलें मिळून, एकंदर ४७,८६८ मनुष्यांस धंदा मिळून, त्यांचा चरितार्थ चालत होता. हिंदुस्थानांत जितका म्हणून गोणताटाचा खप आहे, त्याचा सर्व पुरवठा कलकत्त्याहूनच होतो, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इ० स० १८७७–७८ सालीं एकंदर ८,००,००,००० गोण तयार झाले. त्यांपैकीं ६०,००,००० गोण हातमागानें बनविलेले होते. सदरहू आठ कोटि गोणांपैकीं, पांच कोटि सत्तर लक्ष दूरदेशीं निर्गत झालें असून, बाकीचे दोन कोटि तीस लक्ष वायव्यप्रांत, मुख्यत्वेंकरून पाटणा, कानपूर, वगैरे ठिकाणीं, आणि पंजाबांत लुधियान वगैरे ठिकाणीं, रवाना झाले. जो माल दूरदेशीं (५,७०,००,०००) निर्गत झाला, त्यापैकीं दोन कोटि पन्नास लक्ष बाहेर प्रदेशीं गेला असून, एक कोटी साठ लक्ष मुंबईस, एककोटि वीस लक्ष ब्रह्मदेशांत, आणि

चाळीस लक्ष इतर बंदरांत पाठविण्यांत आला. इ० स० १८८३ साली तर १०,४३,४१,७६२ गोण कलकत्याहून रवाना झाले. ह्यांपैकीं ५,९३,२३,५७३ दूर प्रदेशीं गेले असून, ४,५०,१८,१८९ गोण इतर बंदरांत पाठविले. एकंदर पैदा झालेले गोण १२,३२,१९,४७७ असून त्यांत १,६४,७८,६७७ गोण हातमागाचे होते.

कातड्याचे कारखाने.

कातड्याचे हिंदी कृतीचे कारखाने अयोध्या, वायव्यप्रांत, सुरत, मुंबई, वगैरे ठिकाणीं आहेत. कानपूरास तर कातड्याची गिरणी [illegible] सरकारच्या खर्चानेंच चालू आहे. येथें हरतऱ्हेचें घोड्याचें सामान आणि दुसऱ्या कातड्याच्या जिन्नसा तयार होतात, व त्या उत्तम प्रकारच्या असतात. कशिद्याच्या नानाविध चर्मवस्तु गुजराथ प्रांतांतही बनवितात.

कागदाचे कारखाने

थोड्या वर्षांपूर्वी ह्या देशांत कागद तयार करण्याचे जागोजागीं कारखाने असत. हे कागद फक्त टिकाऊ मात्र असत. सफाई, सौन्दर्य, व गुळगुळीतपणा, ह्या संबंधानें त्यांत कांहींच वर्णन करण्यासारिखें नव्हतें. मुंबई व कलकत्ता येथें कागदाच्या गिरण्या झाल्या कारणानें, त्या कागदाचा अगदींच लोप होत चालला आहे. हल्लीं पुणें येथेंही कागदाची नवीनच गिरणी झाली आहे.

हिंदुस्थानांतील जडावाचें काम.

हिरे, माणिकें, रत्नें, आणि इतर मौल्यवान् खडे, यांचे नानाप्रकारचे अलंकार, हरतऱ्हेचीं भूषणें, व अनेक जातीच्या आंगठ्या, **हिंदुस्थानांत** बनवितात. हे दागिने बहुतकरून सोन्याच्या कोंदणांत बसविलेले असून, ते फारच सुबक आणि विचित्र नक्षीनें तयार करितात. ह्यांत मोत्यांची देखील रेलचेल करून सोडतात. त्यामुळें त्यांस फारच रमणीयता व विशेष शोभा प्राप्त होते.

हा देश सुवर्णमयच असल्यामुळें, सोन्याच्या दागिन्यास तर इकडे पारावारच नाहीं. ते तयार करण्यांत कुशलसुवर्णकार आपली कर्तबगारी दाखवितात यांत कांहींच नवल नाहीं. परंतु **मध्यहिंदुस्थानांतील** व **हिमालयावरील** रानटीजाती देखील, या कामांत आपली थोडीबहुत प्रवीणता प्रदर्शित करतात.

सुवर्णाचें काम.

सोन्याचे भरींव किंवा लाखेवरील दागिनेही इकडे तयार करतात. अथवा, त्याची लांब आणि बारीक तार काढून, त्याचे अप्रतीम अलंकार बनवितात. ही तार, सोनार लोक आपल्या कसबाच्या योगानें इतकी बारीक ओढतात कीं, एक तोळाभर सोन्याची २४०० फूट, किंवा सुमारें १६०० हात लांब तार निघते. नंतर ती गुंफून तिचें भरगच्चीचें अथवा जरतारीचें काम करितात. किंवा भरींव सुवर्णाच्या तुकड्याचें

तिकोनी, चतुष्कोनी, षट्कोनी, अथवा अष्टपैलू कोंदण करून, त्यांत अपरिमित व दीप्तिमान् खड्यांची योजना करितात. कोठें पाच तर कोठें माणिक, क्वचित् हिरा आणि क्वचित् नीळ, याप्रमाणें व्यवस्थित बसवून, त्याजवर शोभतील त्याप्रमाणानें, तुरळक तुरळक, किंवा भरगच्च असे, तेजःपुंज मोत्यें लावितात. तदनंतर ही सर्व रचना एखाद्या रत्नखचित किंवा सुवर्णपत्रालंकृत जडावाच्या कामांत, अति सूक्ष्म पटुतेनें व कल्पनाचातुर्यानें, गुंफून टाकितात. त्यामुळें, कान्तिसौंदर्याची एक तेजोमय मूसच ओंतली आहे कीं काय असें भासमान होऊन, कलावैदग्ध्याचें सकौतुकाश्चर्य वाटतें.

याविषयीं बर्डवूड साहेब असें लिहितात कीं:—

"But nothing can exceed the skill, artistic feeling, and effectiveness with which gems are used in India both in jewellery proper and in the jewelled decoration of arms and jade."

सोनेरी मुलाम्याचीं, व रत्नखचित जडावाचीं उत्तम आणि नामांकित कामें, काश्मीर, कटक, व त्रिचनापल्ली येथें होतात.

रुप्याचें काम.

रुप्याचें बगरकारागिरीचें साधारण काम, सामान्यतः सर्व ठिकाणींच होतें. परंतु मुलाईम-काम ह्मटलें ह्मणजे, मोठमोठ्या शह-

राशिवाय अन्यत्र कोठेंही होत नाहीं. रुप्याचीं उत्तम प्रकारचीं भांडीं, व हरतऱ्हेचीं उपकरणीं, हीं मुख्यत्वेंकरून **त्रिचनापल्ली, कटक, नाशीक, पुणें, कच्छ,** आणि **काश्मिर** येथें तयार होतात. **त्रिचानापल्ली** येथें ज्या नानाविध वस्तु निर्माण करितात, त्या **इंग्रज** लोकांच्या आभरुचीस पात्र होतील अशा तऱ्हेच्याच केलेल्या असल्यामुळें, अनुपम कल्पकता, अथवा मुळची पद्धत, किंवा अस्सल नमुना सुटला जाऊन, त्यांत **विलायती** मिश्रण झाल्यासारखेंच भासतें. **कटक** येथें जें सुंदर नक्षीचें काम होतें, त्या मासल्याचेंच पूर्वीं **ग्रीस** देशांत होत असून, तसें आज मितीसही **माल्टा** येथें होतें. कच्छसारखेंच **लखनौ** व **ढाका** येथेंही काम होतें. **काश्मीर** देशांत जें मुलाम्याचें व रुप्याचें घडींव काम करण्यांत येतें, त्याविषयीं **बर्डवूड** साहेब असें लिहितात कीं:—

Its airy shapes and exquisite tracery, graven through the guilding to the dead white silver below, softening the lustre of the gold to a pearly radiance, give a most charming effect to this refined and graceful work."

ताम्रपित्तल-भाजनें.

ग्रामसंस्थेच्या नेहेमींच्या उपयोगाचीं सर्व साधारण तांब्याचीं आणि पितळ्याचीं भांडीं, गांवचा तांबटच तयार करितो. परंतु उत्तम भांडीं ह्मटलीं ह्मणजे मोठ-

मोठ्या शहरांशिवाय अन्यत्र कोठेंच होत नाहींत. ताम्रपित्तलाच्या भाजनसौंदर्याच्या संबंधानें श्रीक्षेत्र काशी, अमदाबाद, नाशीक, पुणें, मदुरा, आणि तंजावर, हीं ठिकाणें फारच सुप्रसिद्ध आहेत. इंडियाम्यूझिअम् नामक सर्व संग्रहालयांत, कूलु येथील बौद्धांच्या विवरांत सांपडलेलें एक फार प्राचीन पात्र ठविलेलें आहे. हें सुमारें पंधराशें वर्षांचें जुनें असून, त्याजवर सिद्धार्थ राजाच्या मोठ्या थाटाच्या स्वारीचें प्रदर्शन केलेलें आहे.

पंचरस धातु, व बिडाचें काम.

पंचरस धातूच्या, आणि बिडाच्याही, नानाप्रकारच्या वस्तु, हरतऱ्हेचीं पात्रें, व अनेक जातीच्या घंटा तयार करतात. पंचरस धातु ह्मटली ह्मणजे तांबें, कथिल, जस्त, व कधीं कधीं रुपें, आणि क्वचित् सोनें, वगैरे धातूंचें मिश्रण करून ती बनवितात. ह्या धातूच्या घंटांचा ध्वनी फार गंभीर आणि खणखणीत असतो. नाशीक येथें पंचवटींत नारो शंकरची सुप्रसिद्ध घांट असून, ती अतिशय मोठी आहे. पंचरस धातूच्या पात्रावर रुप्याचा आणि सोन्याचा मुलामाही देतात. हीं व दुसरीं बिडाचीं कामें, मोरादाबाद (वायव्यप्रांत), भिलवाडा (संस्थान उदयपूर), पूर्णिया (बंगाल), व मुर्शिदाबाद, येथें होतात. तथापि, दिवसानुदिवस विलायती मालाचा जास्त खप होऊं लागल्यामुळें, हिंदी कला व हिंदी माल

यांचा उत्तरोत्तर ऱ्हासच होत चालला आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

लोहकर्म व शिकल काम.

बहुतेक प्रत्येक गांवांत, किंवा दहापांच गांवांमिळून एखाद्या खेड्यांत, लोहाराचें दुकान हें असावयाचेंच. कारण कीं, आमच्या देशांत कृषिकर्मावर बहुतकरून सर्वांचा उदरनिर्वाह असल्यामुळें, तत्संबंधींची सामग्री सज्ज ठेविण्यासाठीं, लोहाराची खरी अवश्यकता असते. त्यामुळें लोहाराशिवाय अगदीं चालतच नाहीं. आतां, हा लोहार केवळ लोहकर्म करण्यांतच निष्णात असतो असें नाहीं. ह्याला थोडें बहुत सुतारकामही येत असतें. त्यायोगानें शेतीचीं आउतें तयार करणें, त्यांची दुरुस्ती व मोडतोड पाहणें, वगैरे गांवांतील प्रजाजनसमूहाचें जरूर तेवढें सर्व काम हाच करतो; आणि तेणेंकरून गांवची उणीव तो कशीबशी पुरी पाडतो. तथापि, मोठमोठ्या आणि प्राचीन शहरांत, लोहकाम करणारे नामांकित कारागीर व शिल्पकार असतात. शिकलगारींत, हिंदुस्थानासारखा नमुना पृथिवीवर अन्यत्र कोठेंही होत नाहीं. इकडील तलवारीच्या पातीचें पाणी विलक्षण तेजदार असून, तिच्या मुठीला उत्तम प्रकारच्या नक्षीचें व जडावाचें काम केलेलें असतें. कधीं कधीं तिजवरील

इकडील तलवारीच्या पाण्याविषयीं ख्याति.

कांहीं भागावर नामधेय आणि तिथि कोरून काढितात; किंवा क्वचित् प्रसंगीं मृगयास्थलांचेंही निदर्शन करितात. तोडच्याच्या बंदुका व इतर अग्निशस्त्रें पंजाब, मोंगीर (बंगाल), सिंध, आणि विजयानगर (मद्रास), वगैरे ठिकाणीं अजूनही तयार करतात. अहमदनगर येथें चांगले भाले होतात ह्मणून प्रसिद्धि आहे.

कलाबतूसारखें चिलखताचें बारीक काम, काश्मीर, राजपुताना, आणि कच्छ, येथें होतें.

शस्त्रास्त्रावराल बेदरी क्रिया.

बेदरी काम मुख्यत्वेंकरून काश्मीर, सियालकोट (पंजाब), गुजराथ, आणि बेदर (निजाम इलाखा), येथें होतें. बेदर हें प्राचीन राजधानीचें शहर असून, त्या नांवावरूनच तेथें होणाऱ्या हेमरस क्रियेस ‘ बेदरी ’ क्रिया असें नांव पडलें आहे.

मृत्तिकेचीं नामांकित पात्रें व इतर वस्तु, मुलतान, लाहोर (पंजाब), सैयदपूर,

मृद्भांडक्रिया.

बुब्री, हैदराबाद, कराची, तत्त, हाल (सिंध), स्कूल ऑफ आर्ट ह्मणजे आद्यौगिक शिक्षणशाला (मुंबई , मदूरा (मद्रास), आणि मंगलोर, वगैरे ठिकाणीं होतात. मातीचीं सुरेख आणि हुबेहूब चित्रें बंगाल्यांत कृष्णागर येथें, आणि लखनौ व पुणें, या ठिकाणीं, मुख्यत्वेंकरून तयार करितात.

दारुतक्षण, व

हिंदुस्थानांतील लांकडाचें कोरींव काम फार प्राचीनकाळापासूनच प्रचारांत असल्याचें दिसतें. बौद्धांच्या ज्या प्राचीन अवशिष्ट दगडी इमारती कोठेंकोठें दिसतात, त्यांतील खोदकाम या पुरातन लांकडी साच्यावरूनच उचललयाचें समजून येतें. हिंदु लोकांप्रमाणें ब्रह्मी लोकांस देखील तक्षणशिल्पाची अभिरुचि आहे असें दिसतें. कोरींव कामाच्या विशेष उपयोगाचें असें लांकूड ह्मटलें ह्मणजे चंदन, फणस, किंवा शिसव, होय. सांप्रतकाळीं फार उत्तम असें कोरींव काम सुरत, व अमदाबाद, येथें होतें.

खचित क्रिया.

लांकडांवरील व हस्तिदंतावरील खचितकाम हिंदुस्थानांत नवीनच होऊं लागलें आहे. ही चमत्कारिक व अपूर्व टूम, शिराज येथून गेल्या शतकांतच इकडे आली असल्याविषयीं कल्पना आहे. वायव्य प्रांतांत मैनपुरींत लांकडांच्या पेट्यांवर पितळ्याचें खचितकाम तयार करतात. हस्तिदंताचें कोरींव काम अमृतसर, बनारस, मुर्शिदाबाद, विजयापट्टण, आणि त्रावणकोर, येथें पाहिजेल त्या प्रकारचें, व इच्छित नमुन्या बरहुकूम, तयार होतें.

1 But Indian wood carving is an art of very great antiquity.

(Indian Empire P. 607),

भाग ३० वा.

आर्यकला.

वास्तुविद्या व यंत्रकला.

वास्तुविद्या.

अग्निपुराणांत, गृहदेवालयादि रचना, आणि तन्निर्माणचातुर्य, यांविषयीं कांहीं भागांत वर्णन आहे. रथकाराच्या मार्गदर्शनाकरितां शंख नामक विद्वन्मणीनें रथसूत्र, व वास्तुविद्या हीं केलीं आहेत. व यानेंच कात्यायनावर ही टीका केल्याचें दिसतें. रंगभूमिरचनेविषयीं नटसूत्रांत उल्लेख केला आहे. आणि विश्वकर्मप्रकाश, व विश्वकर्मीय शिल्प, याविषयीं राजेन्द्रलाल[1] मित्राचे जे स्फुट लेख आहेत, त्यांत बरीच माहिती दिली आहे.

अर्वाचीन भवन सौन्दर्य.

मागें सांगितलेल्या कोरींव लेण्याशिवाय, अगदीं प्राचीन कालचे भव्य प्रासाद, आणि विस्तीर्ण मंदिरें हल्लीं कोठेंही दृष्टीस पडत नाहींत. तथापि, चारशें पांचशें वर्षांच्या

1 See Rájendra Lal mitra. Notices of Sanskrit MSS. II. 17, 142.

अलीकडील कांहीं कामें, अजूनही **हिंदुस्थानांत** क्वचित् क्वचित् आढळत असून त्यांत रचनासौन्दर्य, शिल्पविलास, लावण्यसोष्ठव, अनुपमश्री, आणि अप्रतीम हस्तपाटव दिसून येतें. **ग्वालेर** येथील शिल्पश्रीनें विभूषित असा प्रासाद, **श्रीक्षेत्र काशी** येथील पुरातन देवालयें, **अबूपहडावरील जैन** भवनें, **नाशीक** येथील **पंचवटींतील** सुरम्य स्थळें, **वांई**-तील सुरेख आणि अप्रतीम मंदिरें, प्रसिद्ध व जगाद्विख्यात **नानाफडणवीस** यांनीं बांधलेले **माहुली** येथील रमणीय व टुमदार घाट आणि प्रशंसनीय देवालयें, **पुणें** येथील सार्वभौम **पेशवाईंतील** प्रध्वस्त झालेला **शनवारचा राज-वाडा, बुधवारचा** नामावशेष असा प्रचंड व सर्वांच्या डोळ्यांत भरणारा **वाडा**. **विश्रामबाग**, बेलबाग, आणि **पर्वती**. **श्रीक्षेत्र करवीर (कोल्हापूर)** येथील देवीचें देवालय, व **दक्षिण हिंदुस्थानांतील** अनेक भवनें, हीं खरोखर प्रेक्षणीय आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं **महम-दीय** शिल्पवैचित्र्याचें थोडें बहूत अनुकरण केल्याचें दिसतें. तथापि **हिंदूंची** स्वतंत्र कल्पना व अपूर्व रचना, त्यांची कल्पना आणि वैभवश्री, हीं सर्वत्र दिसून येतात. **आग्रा, दिल्ली, अमदाबाद, विजापूर**, वगैरे ठिकाणीं **मुसलमानी** अमदानींत बांधलेलीं दिव्य मंदिरें, व सुशो-भित आणि भव्य मशिदी, अजून देखील दृष्टीस पडतात. ह्या सर्वांत **ताजमहालच्या** इमारतींत जें कांहीं नक्षीचें

काम व अप्रतीम सौंदर्य ओंतलेलें सांपडतें, तसें कचित्च अन्य ठिकाणीं आढळतें. ही सर्व इमारत संगमरवरी दग-डाची असून त्यांजवर सर्व कुराण खोदलेलें आहे. आग्रा येथें निमाझ पढण्या साठीं मोतीमशीद नांवाची एक इमारत आहे. तसेंच दिल्लीस जुमा मशीद आहे. ह्या सर्व अप्रतीम असून त्यांचे रचनावैचित्र्य फारच मनोरम आहे.

गंधद्रव्यक्रिया.

गंधद्रव्यक्रिया.

गंधद्रव्यें तयार करण्याच्या संबंधानें स्वतंत्र सूत्रांतच विवेचन केल्याचें दिसतें. भाष्य कालाच्या वेळीं या विषयावर निराळींच सूत्रें होऊन, त्यांत हीं द्रव्यें कशीं बनवावीं याविषयीं पृथक् मीमांसा आहे. सामस्त भाष्य याच वर्गांतील होय.

आमचे हिंदी लोक अत्तराचे मोठे षोकी आहेत. ते नानाप्रकारच्या फुलांचीं अत्तरें काढितात. राजेरजवाडे, श्रीमंत, आणि षोकी लोक अत्तराचा, व इतर सुगंधि द्रव्याचा पुष्कळ उपयोग करितात.

अत्तरें अनेक प्रकारचीं आहेत. त्यांपैकीं, इस्तंबूल, गुलाब, मोतिया, पाच, हिना, केवडा, बकुळी, दवणा, अंबर, कस्तुरी, केशर, खस, चंदन, इत्यादि मुख्य होत. अत्तरें काढण्याची मोठी मेहेनत व खटपट आहे.

इस्तंबूल ह्मणून केवळ गुलाबाचा अर्कच असतो; तो सर्वांत उत्तम होय. हा फारच महाग असतो, व तो कुस्तंतुनियेंत पैदा होतो. ह्याची केवळ सोन्याच्या भावाप्रमाणें किंमत असते, आणि ज्या मानानें तो उंची असतो, त्या मानानें त्याला दर तोळ्यास दहा पासून पंचवीस रुपयेपर्यंत किंमत पडते.

भरतखंडांत सांप्रतकाळीं देखील, पूर्वीप्रमाणेंच अत्तराचे कारखाने पुष्कळ ठिकाणीं आहेत.

पाकशास्त्र.

पाकशास्त्र.

पाकनिष्पत्तीच्या संबंधानें हिंदूंची कीर्ति फार प्राचीन कालापासून आहे. पुराण काळचे भीमपाक आणि नळपाक हे आजमितीसही ल्हान मुलांबाळांच्यासुद्धां कर्णरंध्रांत दुमदुमत

1 "The art of perfumery appears to have been already taught in a special Sùtra at the time of the Bháshya."

(History of Indian Literature. P. 175).

"The skill of the Indians, * * * in the preparation of essences, and in all manner of technical arts has from early times enjoyed a world-wide celebrity and for these subjects also, we have the names of various treatises and monographs."

(H. I. L. P. 275).

आहेत. या विषयावर देखील प्राचीन ग्रंथ आहेत. पाकनिष्पत्ति करण्यांत कुशलता असणें ह्मणजे पूर्वी मोठेंच भूषण समजण्यांत येत असे.

खाद्यपदार्थांत पक्वान्नें व पक्वान्नेतर, यांचा समावेश होतो. पक्वान्नें तयार करण्यास मुख्यत्वेंकरून तूप आणि साखर यांची अवश्यकता असते, आणि पक्वान्नेतरांत तिखट, मीठ, व तुरट, आंबट, आणि कडु, इत्यादि पदार्थांची जरूर लागते.

पक्वान्नें नानाप्रकारचीं आहेत. त्यांत मुख्य ह्मटलीं ह्मणजे घिवर, मोतीचूर, बुंदी, साखरभात, श्रीखंड, जिलबी, बासुंदी इत्यादि होत. ह्यांच्या खालोखालचीं पक्वान्नें तर अनंत आहेत.

पक्वान्नेतर पदार्थ हे तिक्त, कटु, लवण, व आम्ल मिश्रित असल्याकारणानें, ते नानाप्रकारचे व असंख्य प्रमाणानें तयार करितां येतात.

द्यूतचातुर्य व इतर कला.

द्यूताच्या संबंधानें देखील शास्त्रीय विवेचन केल्याचें

---

1 "Mention is likewise made of writings on cookery and every kind of requirement of domestic life, as dress, ornaments, the table ;"

(History of Indian Literature. P. 275).

द्यूतादिकला.

संस्कृत ग्रंथांत दृष्टीस पडते. शब्दकल्पद्रुमांत एकंदर चौसष्ट कलाविषयीं सविस्तर हकीकत दिलेली आहे; आणि ह्या चौसष्टकला कोणत्या, तें चवथ्या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत सांगितलें आहे. सबब त्याबद्दल आतां जास्त ऊहापोह न करितां, प्रोफेसर वेबरचें हिंदुकलांविषयीं एकंदर काय मत आहे तें थोडक्यांत देऊन, हा भाग पुरा करितों. ते ह्मणतात कीं:—

"The skill of the Indians in the production of delicate woven fabrics, in the mixing of colours, the working of metals and precious stones, the preparation of essences, and in all manner of technical arts, has from early times enjoyed a world-wide celebrity: and for these subjects also, we have the names of various treatises and monographs. Mention is likewise made of writings an cookery and every kind of requirement of domestic life, as dress, ornaments, the table; on games of every description, dice, for example;"

(History of Indian Literature by Weber. P. P. 21, 275).

पान २१३ पहा.

भाग ३१ वा.

आर्यकला.

लेखनकला.

लेखनकला.

उपयुक्त अशा बहुतेक कलांविषयीं मागील भागांत थोडें बहुत विवेचन केलें असून, आतां फक्त लेखनकलेविषयींच दोन शब्द सांगणें राहिले आहेत. ही कला किती उपयोगाची आहे, व ही नसती तर जगाची केवढी मोठी हानि होऊन, सुधारणेचें पाऊल किती मागें पडलें असतें, याविषयीं प्रत्येक सुजाण व सुशिक्षित मनुष्याला चांगली कल्पना होण्यासारखी आहे. सबब त्यापासून होणाऱ्या फायद्याबद्दल ज्यास्त विवेचन न करितां, तत्संबंधीं उद्गमाविषयीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून चार ओळी यथावकाश लिहितों.

तिचा उद्गम.

ज्याप्रमाणें इतर शास्त्रीय विषयांत आणि कला कलापांत, आमचे आर्यलोक फार शोधक आणि उत्पादक होते, त्याचप्रमाणें आपले विचार लेखनद्वारा चिरकाल राहण्यासाठीं,

हरएक प्रकारें युक्ती काढण्याच्या कामीं देखील, ते अग्रेसरच होते, असें ह्मणण्यास बिलकुल हरकत नाहीं.[1]

आतां ही लेखनकला प्रथमतः आर्यांनींच शोधून काढिली असें प्रतिपादन करण्यास काय आधार आहे, किंवा तें खरे मानण्यास काय प्रमाण आहे, असें कोणी विचारील तर, त्याला श्रुतिस्मृत्यादि ग्रंथसमुहाकडे बोट दाखविलें, ह्मणजे त्याची जिज्ञासा परिपूर्ण होण्यासारखी आहे. मात्र तो शोधक आणि परीक्षक असून, दुराग्रही नसला पाहिजे.

ज्या आर्य लोकांनीं हरएक प्रकारच्या बाबतींत सर्व प्रकारें शोध केला, त्यांनीं सर्वोपयोगी लेखनकला शोधून काढण्याच्या कामीं कांहींच अक्कल लढविली नसेल, अथवा

---

१ याविषयीं गोल्डस्टकरनें पाणिनीवर जो उत्तम लेख लिहिला आहे, तो खरोखर समग्र वाचण्यासारिखा आहे.

2 "The inference to be drawn from these premises is obvious. It seems to derive some corroboration from collateral fact. The Vedik *writings* from immemorial times being communicated by the teacher to his pupil orally." * *

"There were authorities, consequently before Pânini's time, who maintained the doctrine that the hymns were revealed-not to the sense of hearing, but to the sense of sight."

(Theoder Goldstucker on Panini.
P. P. 65/64.)

ही लेखनयुक्ति त्यांच्या कुशाग्रबुद्धीच्या अन्वेषणखलां-तून अजिबात निसटून गेली असेल, असें प्रथमदर्शनीं तरी बिलकुल अनुमान होत नाहीं. कारण, ही लेखनविद्या नसली म्हणजे ठिकठिकाणीं अडचण येऊं पाहते, व विद्याभिनिवेशाचा प्रवाह अगदींच बंद पडतो. आणि जर आमचा हा बुद्धिवैभवनिर्झर एकसारखा सुरूच आहे, तर त्याचा चाललेला सतत प्रवाह धारण करण्यास, कांहीं तरी प्रचंड साठवण केलें पाहिजे; अथवा त्याचें प्रस्रवण होण्यास नियमित मार्ग तरी खुला करून दिला पाहिजे. कारण, तो बलवत्तर असल्याकारणानें निरुद्ध किंवा कुंठित होणें तर अगदीं असंभवनीयच आहे.

1 "No one, I believe, will easily imagine a people in such a state of civilization unacquainted with the art of writing, though no mention of this art be made in the hymns to the gods. And is it really plausible that even 600 or 700 years later, the greatest grammarion of India composed a most artificial and most scientific system of grammer, utterly ignorant of the simplest tool which might have assited him in his work. Should it be possible to realize an advanced stage of social development without a knowledge of writing, then it is needless, of course, to refer to the arts, sciences, measures, and coins mentioned in the Sutra's of Panini."

(Theoder Gold stucker on Panini P. P. 15/16).

लेखनकलेच्या उद्गमाचीं कारणें.

आतां, आमच्या आर्यांच्या प्रथमावस्थेंतील स्थिति याच मासल्याची होती. प्रथमतः त्यांना जी जी ह्मणून स्फूर्ति झाली; व हें सृष्टिवैभव पाहून त्यांस जो कांहीं आनंद झाला, अथवा आश्चर्य वाटलें; किंवा तत्संबंधीं त्यांनीं जे जे ह्मणून उद्गार काढिले; ते ते सर्व स्मृतिद्वारा, ह्मणजे स्मरणशक्तीच्या योगानें, त्यांनीं आपल्या शिरःकमलांत सांठवून ठेविले. तदनंतर, उत्तरोत्तर त्यांची अभिवृद्धि होऊन, जशी जशी त्यांच्या ज्ञानाची जास्त भर पडूं लागली, तसतसें तें सांठवण संकुल झालें; आणि त्या कारणानेंच सदरहू सांठवणाचें नुकसान न होतां, हा बुद्धिनिर्झर ज्या ज्या उपायांनीं कायम व चिरकाल राहील, त्या त्या उपायांचें अवलंबन करणें अवश्य पडलें; व त्यासाठीं एक निराळीच दिशा पाहणेंही भाग झालें. इंग्रजींत एक अशी ह्मण आहे कीं, " अवश्यकता पडली म्हणजे आपोआपच कल्पना सुचते. " त्याप्रमाणेंच, स्मरणशक्तीचें सीमोल्लंघन होऊन, नुसत्या घोंकणीनें निर्वाह लागत नाहीं असें ज्यावेळीं आमच्या आर्यांस वाटलें, त्यावेळीं त्यांच्य मनांत ह्या लेखनविद्येसंबंधीं प्रादुर्भाव लागलींच उत्पन्ना

---

1 Necessity is the mother of invention.

"अवश्यकता ही कल्पनेचें बीज किंवा उगमस्थानच होय."

होऊन, ते तिच्या शोधास शनैः शनैः प्रवृत्त झाले असावे; व पुढें सांकेतिक चिन्हांनीं आपला अडलेला कार्यभाग करून घेण्याची लागलीच प्रवृत्ति पडली असावी, अशी कल्पना आहे. आतां, ह्या सांकेतिक चिन्हांचा उपयोग करण्याचें ठरल्यावर ज्या द्रव्यांच्या योगानें सदरहू ठरींव संज्ञा एकमेकांस समजण्यास सुगम होईल, अशीं द्रव्यें उपलब्ध होण्यास त्या प्राथमिककालीं मोठीच अडचण पडली असेल; व त्या कारणानेंच मूळच्या स्थितींत असलेल्या द्रव्यांवरच कांहीं कालपर्यंत आपली गरज भागविणें अगदीं अवश्यकतेचें झालें असावें. कारण, त्यावेळीं तसें केल्याशिवाय दुसरें गत्यंतरच नव्हतें. आणि त्यामुळेंच फार पुराणकाळचे लेख हे भूर्जपत्र, तालपत्र, किंवा शिळा, इत्यादि साधनांवरच बहुतकरून लिहिलेले सांपडतात.

आति पुराण शिळालेख.

उपलब्ध असलेल्या शिलालेखांत अतिप्राचीन शिलालेख ह्मटला म्हणजे **विराट** नगरच्या टेंकडीवर **बर्ट** साहेबांस सांपडलेला होय. हा लेख प्रथमतः, इ० स० १०२२ सालीं **महंमदानें** जुन्या **विराट** शहरावर स्वारी करून, **नारायणपूर** गांवांतील **नारायण देवाचा** ज्यावेळीं विध्वंस केला, त्यावेळीं सांपडला. सदरहू लेखावरून तें **नारायणाचें** देवालय, व तो शिलालेख, अशीं

चाळीस हजार वर्षांपूर्वीचीं असल्याचें सिद्ध होतें, असें कांहीं पाश्चात्य विद्वानांचें मत आहे.

ऋग्वेद व यजुः संहितेंतील लेखन क्रियेचा अंतर्भाव.

पद्यांतील अक्षरें, या अर्थानेंच अक्षर या शब्दाचा उपयोग ऋग्वेदांत[2] केला असून, यजुः[3]-संहितेंत देखील त्याच अर्थानें, ह्मणजे लेखनक्रियेचा उद्बोध व्हावा असा हेतु मनांत आणूनच, त्याचा उपयोग केल्याचें दिसतें. "क्षर" न होणारें तें "अक्षर". ह्मणजे नाश न पावणारें तें अक्षर, असा धात्वर्थ मनांत आणूनच त्या शब्दाचा उपयोग केला आहे. कारण, "मुखोद्गत" किंवा "आलि-

---

1 The Buddista Period map, or General Cunningham's Ancient Geography of India.

भ. स्थ.

2 "In the Errata to the first German edition it was pointed out, on the authority of a communication received from Professor Aufrecht, that Akshara is twice used in the Rik of the 'measuring of speech', viz. I. 164. 24 (47), and IX 13. 3, and consequently may there mean 'Syllable.'"

(History of Indian Literature, P. 16).

3 "The connecting link between this primary signification and the meaning 'Syllable', which is first met with in the Samhità of the Yajus, might perhaps be the idea of writing, the latter being the making imperishable, as it were, of otherwise fleeting and evanescent words and syllables (?)"

खित " पदें, अथवा त्यांतील अक्षरें, हीं कालांतरानें स्मृतींतून नाहींशीं होणारीं आहेत; सबब तीं लेखनद्वारा "अक्षर" ह्मणजे अमर करावीं, इतक्याच अभिप्रायानें त्यांची अन्वर्थ योजना झाली असावी.

सूत्रांवरून लेखन-कलेचें अंतः-प्रमाण.

ऋग्वेदांतील गृह्यसूत्रांत, आणि यजुर्वेदांतील मधुकांडांत, सूत्र शब्दाचा उपयोग केल्याचें आढळतें. तसेंच पाणिनींत देखील " सूत्र " व " ग्रंथ " हे

१ थीओडर गोल्डस्टकर यांचें असें ह्मणणें आहे कीं, संस्कृतांतील कित्येक शब्दांवरूनच आर्यांची लेखनकला अतिप्राचीन असल्याचें सिद्ध होतें. उदाहरणार्थ लिपिकार, काम्येष्टिकांड, पत्र, पटल, सूत्र, ग्रंथ, वर्ण, अक्षर, अदर्शनं लोपः, इत्यादि सर्व शब्द लेखनक्रियेचेच केवळ व्यंजक होत.

(Goldstucker on Panini. P. P. 17-20 21-27-34-43-60-65-67).

2 "The word Sùtra in the above sense occurs first in the Madhukànd, one of the latest supplements to the Bráhmana of White Yajus, next in the two Grihya Sutràs of the Rik, and finally in Pánini. It means 'thread' 'band', cf Lat. Suere. Would it be correct to regard it as an expression analogous to the German band (volume) ? If so, the term would have to be understood of the fastening together of the leaves, and would necessarily presuppose the existence of writing (in the same way, perhaps, as Grantha does, a term first occuring in Panini) ? "

शब्द दिसून येतात. आणि सदरहू दोन्ही शब्दांवरून लेखनाक्रियाच ध्वनित होते. आतां, प्रत्यक्ष अनुभवाव-रून देखील हें सर्वांसच महशूर आहे कीं, आमचे पूर्वज आर्यलोक हे लिहिण्याच्या कामांत वृक्षपत्रांचा उपयोग हम्मेश करीत असत; आणि तीं अस्ताव्यस्त पडूं नयेत ह्मणून सूत्रानें सर्व एकत्र करून, त्यांचा ग्रंथ बांधून ठेवीत. व असे ग्रंथ अजूनही आपल्या दृष्टीस पडतात. त्यावरून आणि प्रथमारंभीं निर्दिष्ट केलेल्या शिलालेखाव-रून, आर्यलेखनकलेचें प्राचीनत्व कोणाच्याही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

मनुस्मृतीवरून लेखनकलेचें प्राचीनत्व.

मनुस्मृतींत तर ह्या लेखनक्रियेचा उल्लेख अगदीं स्पष्टच केला आहे. ऋणविमोचनासंबंधीं विवेचन करीत असतां, हा आद्य स्मृतिकार असें लिहितो कीं, 'ज्याला ऋण फेडण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यानें पुनश्च लेखी-दस्तैवज धनकोस करून द्यावा.' ह्यावरून मनुस्मृती-

1 "Goldstücker (Pànini, 1860, P. 26 ff) contends that the word Sútra and Grantha must absolutely be connected with writing."

(Weber. H. I. Literature).

२ ऋणंदातुमशक्तोयः कर्तुमिच्छेत् पुनः क्रियाम् ।
सदत्वा निर्जितां वृद्धिं करणं परिवर्तयेत् ।। १५४ ।।

(मनुस्मृति. अ. ८)

(पुढें चालू)

कालांत तर हा लेखीव्यवहार चांगलाच प्रचारांत होता, असें सहजीं लक्षांत येईल.

आतां, पाणिनीचा काल इसवी सनापूर्वी ७०० वर्षे असून, मनु हा इ० स० पूर्वी १००० वर्षे झाला होता; व गृह्यसूत्रें, आणि श्रौतसूत्रें, यांचा काल इ० स० पूर्वी सुमारें १९०० वर्षें होता. तेव्हां, सदरीं निर्दिष्ट

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

यो धनदानासामर्थ्यात पुनर्लेख्यादि क्रियां कर्तुमिच्छेत्तस्य
सत्यतया आत्मसात् कृतां वृद्धिं दत्वा लेख्यं पुनः कुर्यात् ॥

॥ कुल्लूकभट्ट ॥

अर्थेऽपव्ययमानंतु " करणेन " विभावितम् ॥ ५१ ॥
अभियोक्तादिशेद्देश्यं " करणं " वान्युदुद्दिशेत् ॥ ५२ ॥

(मनुस्मृति. अ. ८)

1 "On a combination of these data, we may perhaps be allowed to fix the age of the supposed Manu, very loosely at some time about half way between Alexander (in the fourth century before Christ), and the Vedas [in the fourteenth century]."

"This would make the auther of the Code live about 900 years before Christ."

[Elphinstone's History of India].

2 * * * "The Vedic literature in its three well-defined periods, the Mantra, Bráhmana, and Sutra periods, goes back to at least a thousand years before our era."

[What can India teach us ? By Maxmuller].
Vide also Orion by B. G. Tilak. P. 208.

केलेल्या सर्व प्रमाणांवरून, भारतीयलेखनकला इसवी सनापूर्वी निदान दोन तीन २०००।३००० हजार वर्षांवर प्रचारांत होती, असें सिद्ध होतें.

आर्य लेखनकला फार प्राचीन असल्याविषयीं नूतन शोध.

मद्रास इलाख्यांत **कृष्णा** परगण्यांत, जे कांहीं शिलालेख नवीन शोध केल्यांत मिळाले आहेत, त्यावरून विद्वन्मणि डॉक्टर **बुल्हर** यांचा असा अभिप्राय झाला आहे कीं, **चंद्रगुप्त** राजा **पाटलीपुत्र** येथील गादीवर बसण्यापूर्वी देखील अनेक शतकें, सदरहू लेखनकला **भरतखंडांत** चांगली प्रचारांत होती. आतां, **चंद्रगुप्त** हा इ० स० पूर्वी ३९० वर्षांच्या सुमारास राज्य करीत होता. त्यापूर्वींही अनेक शतकें हिंदूंना लेखनकलेचें चागलें परिज्ञान होतें. ह्यावरून इसवीसनापूर्वी सुमारें नऊ दहा शतकें, किंबहुना अधिकही, ती लेखनकला आपल्या **हिंदुस्थानांत** प्रचारांत असल्याचें चांगलें सिद्ध होतें. आणि **बेर्ट** साहेबास सांपडलेल्या शिलालेखावरून

---

1 "Dr. Bühler belives that the art of writing had been practised in India for centuries 'before the accession of Chandragupta to the throne of Pàtali-Putra', or in other words before the time of Alexandder the Great."

[T. I. 15/6/92].

2 General Cunningham's ancient Geography of India.

तर, ही कला चाळीस हजार ४०,००० वर्षांपेक्षां देखील जास्त प्राचीन असल्याचें ठरतें.

भरतखंडांतून पाश्चिमात्य देशांत लेखन कलेचें गमन.

सदरहू प्रमाणांवरून लेखनकलेचा उद्भव या भरतखंडांतच झाला असून, येथूनच ती विद्या पाश्चिमदिशेकडे प्रसृत झाल्याचें दिसतें. **सीरिया, एशियामायनर,** आणि **ईजिप्त** किंवा **मिसरदेश,** या ठिकाणीं लेखनक्रियेचा बराच प्रचार असून, **फिनिशियन** लोकांच्या द्वारेंच ही विद्या **एशियामायनर** मधून **ग्रीस** देशांतील **आयोनियन** लोकांस प्रथम प्राप्त झाली. (इ० स० पूर्वी ६१०–५४७). कदाचित् **मिसरदेशाचा** स्वतंत्रही शोध असेल.

तथापि, **मोक्षमुलर** प्रभृतींचे असें मत आहे कीं,

1 "The whole of this incipient literary activity belonged to Asia Minor." * * *

2 "We can well understand that the Phinicians should have taught the Ionians in Asia Minor a knowledge of the alphabet partly for commercial purposes, *i. e*, for making contracts, partly for enabling them to use those useful little sheets, called Periplus, or circumnavigations, which at that time were as precious to sailors as maps were to the adventurous Seamen of the Middle ages."

[What can India teach us? By Professor Maxmuller]

3 "Here then we have the first fact, viz. that

(पुढें चालू)

तत्संबंधीं कांहीं पाश्चात्य पंडितांचें मत.

हिंदुस्थानांत इ० स० पू० तिसऱ्या शतकाच्या अगोदर, लेखनकला बिलकुल कोणास देखील माहीत नव्हती; व ती त्यांस शेमी लोकांपासून प्राप्त झाली आहे. परंतु हें त्यांचें ह्मणणें अगदींच सयुक्तिक दिसत नाहीं; आणि वर जीं प्रमाणें दाखविलीं आहेत, त्यांवरून तर सदरीं प्रतिपादन केलेला

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

writing, even for monumental purposes, was unknown in India before the third century B. C."

"But writing for commercial purposes was known in India before that time. P. 206-207.

[What can India teach us ?
By Maxmuller.]

1 "These inscriptions are written in two alphabets — one written from right to left, and clearly derived from an Aramaean, that is a Semitic alphabet ; the other written from left to right, and clearly an adaptation, and an artificial or systamatic adaptation, of a Semitic alphabet to the requirements of an Indian language. That second alphabet became the source of all Indian alphabets, and of many alphabets carried chiefly by Buddhist teachers far beyond the limits of India, though it is possible that the earliest Tamil alphabet may have been directly derived from the same Semitic source which supplied both the dextrorsum and the sinistrorsum alphabets of India."

(India, What can it teach us ? P. 206.)

मोक्षमुलरांचा सिद्धांत सप्रमाणही ठरत नाहीं.[१] कारण, जर हिंदूंनीं ह्या लेखनकलेंत अन्यदेशीयांचें अनुकरण केलें असतें तर, त्यांनीं ह्या घेतलेल्या ऋणाची अक्षरव्यंजकता तशीच कायम ठेविली असती. परंतु तसा कांहींच प्रकार नसून, हिंदूंची लिपिपद्धति, व अक्षरद्योतकता, हीं अगदींच भिन्न आहेत. आणि ह्मणूनच, हिंदूंची लेखनकला देखील त्यांच्याच कल्पकतेचा एक स्वतंत्र विषय होता, असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. व आधुनिक विद्वान आणि शोधक गृहस्थांचें देखील तसेंच मत आहे.

जनरल कनिंगहम्[२] यांनीं या विषयावर अगदीं स्वतंत्रपणें, व मुद्दाम शोधकबुद्धीनें, आणि विषेश प्रकारचा

---

१ गोल्डूस्टकरनें पाणिनीवर लिहिलेला अत्युत्तमलेख पहा. त्यानें मोक्षमुलरचा विसंवादी लेख उघडकीस आणिला. व त्यामुळें, इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकाच्या अगोदर, हिंदूंस लेखनकला माहीत नव्हती, असें जें मोक्षमुलरनें प्रतिपादन केलें, तें सर्व त्यानें परत घेतलें. ते पुनश्च असें लिहितात कीं:—

"Pànini was acquainted with the art of writing."

2 "General Cunningham maintains, with Mr. Thomas, the Indian origin of the Indo-Páli character."

(History of the civilization of Ancient India. By Romesh Chunder Dutt. P. 477.)

व्यासंग केला आहे. ह्यांचा अभिप्राय देखील अशाच मासल्याचा असून, यांच्या मतांशीं मिस्तर टॉमस् यांचें

1 "A similar process would appear to have taken place in India, as I will presently attempt to show by a separate examination of the alphabetical letters of Asoka's age with the pictures of various objects from which I believe them to have been directly descended." * * *

"My own conclusion is that the Indian alphabet is of purely Indian origin, just as much as the Egyptian hieroglyphics were the purely local invention of the people of Egypt." * * *

"I admit that several of the letters have almost exactly the same *forms* as those which are found amongst the Egyptian heiroglyphics for the same things, but their *values* are quite different, as they form different syllables in the two languages. Thus a pair of legs, separated as in walking, was the Egyptian symbol for walking or motion, and the same form, like the two sides of a pair of compasses, is the Indian letter *g*, which as *ga* is the commonest of all the Sanscrit roots for walking or motion of any kind. But the value of the Egyptian Symbol is *s*; and I contend that if the symbol had been borrowed by the Indians, it would have retained its original value. This indeed, is the very thing that happened with the Accadian Cuneiform symbols when they were adopted by the Assyrians." * * *

"But as the Indian symbols have totally dif-

(पुढें चालू)

मत मिळतें आहे; आणि हे असें प्रतिपादन करितात कीं, भरतखंडांतील पालिलिपि स्वयंभू, व अतएव आर्यनिर्मितच आहे.

जनरल कनिंगह्मची अशी कल्पना आहे कीं, पालिलिपींतील कित्येक अक्षरें वस्तुद्योतक, अथवा क्रियाद्योतक, आहेत. उदाहरणार्थ, "ख" ची आकृति कुदळीसारखी अ-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

ferent values from those of Egypt, it seems almost certain that the Indians must have worked out their system quite independently, although, they followed the same process. They did not, therefore, borrow their alphabet from the Egyptians." * * *

"Now, if the Indians did not borrow their alphabet from the Egyptians, it must have been the local invention of the people themselves, for the simple reason that there was no other people from whom they could have obtained it. Their nearest neighbours were the peoples of Ariana and Persia, of whom the former used a Semitic character of Phænician origin, reading from right to left, and the latter, a cuneiform character formed of separate detached strokes, which has nothing whatever in common with the compact forms of the Indian alphabet."

(General Cunningham's Corpus Inscriptionum Indicarum. vol. I. 1877, P. P. 52-53. 60-61.)

मून, त्या अक्षरापासून खननक्रिया प्रदर्शित केली असावी. तसेंच, य (यवाकृति), द (दंताकृति), ध (धनुषाकृति), प (पाणि ह्मणजे हस्ताकृति), म (मुखाकृति), व (वीणाकृति), र (रज्ज्वाकृति), ह (हस्ताकृति), स्र (श्रवणाकृति), इत्यादि अक्षरें, ते ते वर्णध्वनित किंवा व्यक्त करण्याच्या हेतूनें, शनैः शनैः योजण्याचा प्रचार पडला असावा.

मोक्षमुलरच्या मताचें निरसन.

शिकंदरानें हिंदुस्थानावर इ० स० पू० ३२७ सालीं स्वारी केली होती; व त्यावेळीं त्याच्याबरोबर नियार्कस नामक नौकाधिपतीही होता. हा इहवृत्त लिहितांना असें वर्णन करितो कीं, "हिंदु लोक कार्पासपटावर पत्रव्यवहार करितात." त्यावरून त्याकालीं, व त्याच्या अगोदरही अनेक शतकें, ही लेखनकला भरतखंडांत खचित जागृत होती, असें मानण्यास कांहींच हरकत नाहीं.

शिवाय, दिवसानुदिवस सतत चालत असलेल्या शोधावरून, भूमिनिक्षिप्त असलेले जे जे शिलालेख किंवा ताम्रपत्रें सांप्रतकाळीं उदयास येत आहेत, त्यावरून पाश्चात्यपंडितांची देखील अशी खात्री होत चालली आहे कीं, शिकंदराची हिंदुस्थानावर स्वारी होण्यापूर्वी देखील अनेक शतकें, ही आर्यलेखनकला या देशांत चांगल्याप्रकारें प्रचारांत होती.

"Dr Bühler has succeeded in deciphering the inscriptions on the relic caskets which Mr. Rea, Archæological Surveyor to the Madras Government, had recently the good fortune to discover, in an old tope, already searched in the Kistna district. Mr. Rea had noticed that the caskets found by the explorers who preceded him were at the side rather than at the centre of the mound, and a judicious further exploration led to the discovery of these additional caskets. The inscriptions on the caskets are, according to Dr. Bühler, not later than 200 B. C., and may be a little older. They reveal a system of writing which is in some respects radically different from the writing on the rock of Asoka's edicts at Junagar and elsewhere, and prove, therefore, that these cannot be, as they have been supposed to be, the earliest attempts of the Hindoos to write. Dr. Bühler believes that the art of writing had been practised in India for centuries "before the accession of Chandragupta to the throne of Patali putra," or, in other words, before the time of Alexander the Great. There is semething strangely pathetic in the records, that thus, thanks to Mr. Rea and Dr. Bühler, leap in these latter days to light. We quote one which declares that "Kura, Kura's father, and Kura's mother have joined to defray the cost of this casket and box of crystal in order to hold some

relics of Buddha." The casket and the box of crystal have kept their charge till now ; and there is little reason to doubt that the dust and fragment of bone they have now given up are the dust and the bone of the great Teacher."

(Times of India. 15-6-92.)

शुद्धिपत्रक

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
३	२३	मार्कडयेय.	मार्कंड्येय.
६	१३	मोठें.	मोठे.
१०	१९	विद्वांसो विद्वांसो.	विद्वांसो.
१२	१२	आज मितिस.	आज मितीस.
१३	१	युवास्थेपर्यंत.	युवावस्थेपर्यंत.
१४	४	८९।९०	८८।८९।९०
१५	१	Howfor	How far
,,	८	Brahamans.	Brahmans.
,,	२४	त्ररीष्ट.	बरील.
१७	१७	यांस राक्षस,	यांस, राक्षस
१८	१८	स्मुति	स्मृति
,,	२०	वेदाध्यायन	वेदाध्ययन
,,	२१	भतयज्ञ.	भूतयज्ञ.
१९	८	अश्रमांत	आश्रमांत
,,	१०	त्याचा	त्यांचा
,,	११	त्याची	त्यांची
२०	२	वर्जं	वर्ज्यं
,,	१०	पाहिजेत	पाहिजेत.
२१	६	पुत्रोत्पादन	पुत्रोत्पादन,
२४	४	अत्मसंयमन	आत्मसंयमन
३०	९	मात्रला	मात्राला
३३	३	startting	starting

पृष्ट.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
४१	१४	सामुग्री	सामग्री
,,	१८	सामुग्री	सामग्री
,,	२१	सामुग्री	सामग्री
४२	५	षड्ध्यायी	षडध्यायी
,,	१९	बुद्धिहंकारो	बुद्धिरहंकारो
४३	१५	अप	आप
४५	२१	चतुष्टय	चतुष्टय
५५	१४	मिथ्या, ब्रह्म,	मिथ्याब्रह्म,
५६	१०	यावत्	जावत्
६०	१२	त्रिण्डं	त्रिदण्डं
,,	१३	पारुषह्लानानां	पौरुषहीनानां
६१	१५	धर्मांचें	धर्मांचे
६४	१३	Subtile	Subtle
६७	४	lunor	lunar
८५	२२	आता	आर्ता
८९	१६	यूराप	यूरोप
९९	२८	पुेढ	पुढें
१०४	२	सांगितलें	सांगितले
१०७	२०	औषधांचें	औषधांचे
१०९	१	३२ वा	२३ वा.
११३	४	होते	होतें
११४	७	उत्तरस्थान	उत्तरस्थान.
११६	१७	याचे	याचें
१२९	८	वाहत, जाऊन	वाहजजाऊन,
,,	१९	त्यानें	त्यांनीं
१३०	९	कालिल	कलिल
१४६	१४	माठ्या	मोठ्या

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१५२	४	स्वरांतर	४ स्वरांतर
१५५	२१	नत्तं	नृत्तं
१५८	१३	वह्वः	बह्वः
,,	१६	पति	पतिः
१६२	१०	चित्रशास्त्र.	चित्रकला.
१६३	५	दुष्यत	दुष्यंत
,,	८	दुंष्यन्त	दुष्यन्त
१६५	९	प्रतिद्ध	प्रसिद्ध
१६८	१२	तें	ते
१६९	१९	फिरस्त्याचें	फिरस्त्याचे
१७१	२३	leries	series
१७५	१०	अंगांत	अंगास
१८०	१९	होतो	होतो.
१८६	१	लागलीं,	लागलीं.
१९०	२१	रोमन, यांचा	यांचा
,,	२२	1	२
१९१	११	घमटा	घुमटा
,,	१२	स्तपांचें	स्तूपांचें
,,	१३	निमाण	निर्माण
१९२	२३	sacificial	sacrificial
१९६	२१	I	In
२०६	३	रोप्य	रौप्य
२१६	६	आभिरुचीस	अभिरुचीस
२३०	९	ज्ञानाची जास्त	ज्ञानाची त्यांत जास्त.
,,	१८	त्यांच्य	त्यांच्या
,,	१९	उत्पन्ना	उत्पन्न

भारतीय साम्राज्य.

नारायण भवानराव पावगी.

यानें रचिलें असे.

तें

पुणें येथें "सत्यप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

शके १८१९

विजयनाम संवत्सरे.

किंमत १४ आणे.

श्री

सद्गुरु चरणारविंदीं

नमन करून

ही

ग्रंथरूपी

यथाशक्ति व यथामति केलेली

अत्यल्प

देशसेवा.

नारायण भवानराव पावगी

यानें

आपल्या दयितआर्यभूमीच्या ठिकाणीं

असलेल्या अत्युत्कट

प्रीत्यर्थ

सकल

आर्यभगिनींस व आर्यबांधवांस

प्रीतिपूर्वक

अत्यादरानें समर्पिली असे.

भारतीय साम्राज्य.

पुस्तक सहावें.

प्रस्तावना.

शमोदमस्तपः शौचंक्षांतिं रार्जवमेवच ।
ज्ञानंविज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्मस्वभावजम् ॥
शौर्यंतेजोधृतिर्दाक्ष्यं युद्धेचाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रंकर्मस्वभावजम् ॥
श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपियोनरः ।
सोऽपिमुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥

१ भारतीय साम्राज्याच्या प्रथम पुस्तकांत आर्य-देश व तत्संबंधीं वृत्तांत याविषयींची हकीकत दिली असून त्यांत एकंदर नऊ भाग आहेतः—

१ देशस्थिति व वर्णन. २ उद्भिज्जसंपत्ति, व मुख्य उत्पन्न होणारे पदार्थ. ३ उद्भिज्जसंपत्ति व शाक पुष्पफलवैचित्र्य. ४ कृषिकर्म व तत्संबंधीं खतें, राब, व साधनें. ५ कृषिकर्म व तत्संबंधीं जनावरें, आणि जमिनीचा मगदूर. ६ प्राणिजातिसंपत्ति. ७ खनिज

संपत्तिः ८ वातावरणमीमांसा. आणि ९ भरतखंड-भूरचना.

२ द्वितीय पुस्तकांत आर्य लोक व त्यांचे बुद्धि-वैभव यांचेंच दिग्दर्शन केलें आहे, व त्याचे पांच भाग आहेत:—

१० आर्यांचें मूलनिवासस्थान, व त्यांचें वैभव. ११ आर्यांची सामाजिकरचना, व धर्मसंस्था. १२ आर्यभाषा, व तिचें श्रेष्ठत्व. १३ वेद, व वेदांगें. आणि १४ महाकाव्यें, व गद्यपद्यादि भाषाशास्त्र.

३ तृतीय पुस्तकांत आर्येतिहास व भूगोल, याविषयींचा वृत्तांत दिला आहे, व त्याचे पांच भाग केले आहेत:—

१५ इतिहास व भूगोलासारख्या ग्रंथासंबंधीं आर्यांचें न्यूनत्व, व त्यांचीं कारणें. १६ वेदकालीन इतिहास. १७ उत्तर हिंदुस्थानांतील प्राचीन नृपावलि. १८ दक्षिण हिंदुस्थानांतील प्राचीन नृपावलि. आणि १९ प्राचीन आर्यभूगोल.

४ चवथ्या पुस्तकांत, आर्यशास्त्र व कला यांविषयींचें सविस्तर विवेचन आहे, व त्याचे बारा भाग केले आहेत:—

२० धर्मशास्त्र. २१ वेदान्तशास्त्र. २२ ज्योतिः-शास्त्र, भूमितिशास्त्र, अंकगणित, व बीजगणित. २३

वैद्यशास्त्र. २४ नीतिशास्त्र. २५ धनुर्वेद. २६ गांधर्ववेद अथवा गायनकला. २७ चित्रकला. २८ शिल्पकला व निर्माणविद्या. २९ पटचातुर्य व रागकौशल्य. ३० वास्तुविद्या, यंत्रकला, गंधद्रव्यक्रिया, पाकशास्त्र, द्यूतचातुर्य, व इतर कला. आणि ३१ लेखनकला.

५ पांचव्या पुस्तकांत, आर्यशासनपद्धति व संस्था, यांविषयींचें इत्थंभूत वर्णन दिलें आहे, व त्याचे एकंदर तीन भाग केले आहेत:—

३२ आर्यांची राज्यव्यवस्था. ३३ आर्यांची शासनपद्धति. आणि ३४ आर्यांचें स्थानिकस्वराज्य.

६ प्रस्तुतच्या सहाव्या पुस्तकांत, आर्यगृहस्थिति, नीति, शौर्य, साहस, व्यापार, व उन्नति, यांचें सविस्तर विवेचन केलें असून, त्याचे चार भाग केले आहेत:—

३५ आर्यगृहस्थिति. ३६ आर्यनीति, व प्रकृतिसौजन्य. ३७ आर्यशौर्य व साहस. आणि ३८ आर्यव्यापार व उन्नति.

७ अशा प्रकारें, अतिपरिश्रमानें तयार केलेला भारतीय साम्राज्याचा हा पूर्वार्ध, रसिक वाचकांपुढें अत्यादरानें सादर केला आहे. आतां, त्यांत अनेक दोषही आहेत, हें मी कबूल करितों. परंतु त्याबद्दल मजला बहुश्रुत वाचकांनीं क्षमा करून, तत्संबंधीं मजवर अनुग्रहच केला पाहिजे.

८ शेवटीं, ज्या ईशकृपेनें हा पूर्वार्ध पुरा झाला, त्या श्रीसद्गुरूचे अत्यंत आभार मानून, ही प्रस्तावना मी पुरी करितों.

मुक्काम पुणें, मंगळवार.
मार्गशीर्ष शुद्ध ११ शके
१८१५ विजयनाम संवत्सरे.

नारायण भवानराव
पावगी.

अनुक्रमणिका.

पूर्वार्ध.

पुस्तक सहावें.

भाग ३५ वा.

गृहस्थिति.

व शारीरिकश्रमाचा निकट संबंध—सायंप्रातः समिद्धोमानुष्ठान—अतिथी, आणि अभ्यागत, यांचा समाचार—प्रात्यहिक पंचमहा यज्ञ—मद्यमांस निषेध—मनःसंयमन–शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध, इत्यादि विषय, व त्यांचा परित्याग—लोकशिक्षण—वेदांचें अध्ययन व त्याचें कारण—वेद आणि वेदांगें, यांतील विषय—शिक्षणानुग्रहाची पात्रता—विद्यार्जनाविषयीं आमची अनास्था, व सद्यःस्थिति—तत्संबंधीं प्राचीन स्थिति—अभिवादनविधि—श्रेष्ठत्वाचें मूल, विद्या आणि गुण, इत्यादि होत—अतिथींचें आदरातिथ्य, व तत्कालीन सुधारणेचें दिग्दर्शन—स्त्रीधर्म—अबलारक्षण, व परकीयांची तत्संबंधी चुकीची समज—स्त्रीवात्सल्य—त्याची प्राचीन स्थिति—वेदकालांतील—स्मृतिकालांतील—स्त्रियांचें रक्षण करण्याच्या संबंधानें पिता, पति, व पुत्र, यांची इतिकर्तव्यता—स्त्रियांविषयीं योग्य व सारासार विचार—समजुतीची चूक—कांहीं कांहीं बाबतींत आमच्या भारतीय स्त्रियांची शोचनीयावस्था—एकांतवास, व केशवपन—सती—इस्लामशाही, व तज्जन्य स्त्रीप्रतिबंध—त्याचा दुष्ट परिणाम—एकान्तवासाचें फल—व ज्ञानार्जनाची अवश्यकता—लग्नकाल—बालविवाह, व तत्संबंधीं विधिनिषेधपक्ष—अनुरूपवर, व त्याचा काल—वात्सायनसूत्र, व त्यांतील नियम—भारतीय, व पाश्चात्य देशांतील विवाहपद्धतीची तुलना—तत्संबंधीं त्यांचा अभिप्राय—स्त्रीपुरुषांचें साहचर्य, व—त्याची अवश्यकता—साहचर्याचे गुणधर्म—स्त्रीपुरुषांचा परमधर्म—स्त्रीचें कर्तव्य—पाश्चात्य देशांतील शिथिल बंधन, व—तिकडील अनुचित स्त्रीस्वातंत्र्य—तत्संबंधीं गुणदोष—भरतखंडांतील स्त्रियांचें भर्तृवात्सल्य—संततिशिक्षणाविषयीं आमच्या पूर्वजांची खबरदारी, व तत्संबंधीं प्रमाण—शिक्षणाचा प्रभाव—हिंदुसमाजावरील स्त्रियांचें प्राबल्य—परकीयांचें तत्संबंधीं अज्ञान—स्त्रीप्राबल्याची परंपरा.

भाग ३६ वा.

आर्यनीति व प्रकृतिसौजन्य.

हिंदुग्रंथसंपत्तींतील नीतिप्रसार—ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, रामायण, महाभारत, मनुस्मृति, इत्यादींतील नीतिवचनें—हिंदूंच्या सत्यतेविषयीं, हिंदुप्रमाणाशिवाय अन्य प्रमाण—ग्रीकप्रमाणलेख—महमदीयप्रमाणलेख—चिनीप्रमाणलेख—अन्यप्रमाणलेख—आंग्ल-प्रमाणलेख—मिल्ल व क्रॉफर्डसारख्या द्वेषबुद्धिपरायणांचे कुतर्क—मिल्लच्या इतिहासाची किंमत—क्रॉफर्डची वृथा बरळ—पौरस्त्य आणि पाश्चात्य नीतीची तुलना—पाश्चात्यांची नीतिमत्ता, व त्यांच्या बोलण्यांत धरसोड—आंग्लनीति—आंग्लदरबारांतील नीति—राजे, व राण्यांची नीतिभ्रष्टता—प्रजेचें नीतिशैथिल्य—स्त्रीजनसमूहाचें अनीतीचें आचरण—आंग्लन्यायाधीश, आणि व्यवस्थापक, यांची नीतिभ्रष्टता—आंग्लधर्माधिकाऱ्यांची नीतिमलीनता—तिचें दुष्परिणाम—आंग्लहिंदी यांचें दुराचरण—त्यामुळें रयतेचे हाल, व यमयातना—आंग्लन्यायमूर्तींचा कुटिलभाव—आंग्लवणिग् बालकें, व त्यांचा अनीतीचा वर्तनक्रम—त्यांचें महा अवदान, व नीतिभ्रष्टता—नीतिभ्रष्टतेस उत्तेजन—हिंदूंचें प्रकृतिसौजन्य—पितृसेवा—स्वकीयांचा, व इष्टमित्रांचा सत्कार—त्यांची कृतज्ञता—त्यांच्या मनाची समता, व त्यांचें इतर गुण.

भाग ३७ वा.

आर्यसाहस आणि शौर्य.

प्राचीनकाळीं हिंदुंचें देशांतरी पर्यटन—वेदकालांतील साहस—स्मृतिकालांतील समुद्र प्रवास—हिंदूंचें द्वीपांतरीं पर्यटन—हिंदूंच्या तिकडील वसाहती—आफ्रिका—जमेका व जावा—त्या बेटांतील

हिंदूंचा अम्मल—मलाया, व सुमात्रा—हिंदूंचें अन्य देशीं गमन—इराणांत—कार्थेजांत—मासिडोनियेंत—रूम व स्पेन देशांत—शिकंदर्यैंत—ग्रीस, आसीरिया, व बाबिलन, येथें—व फिलिपाइन् बेटांत—अमेरिकाखंडांत आर्यांचा प्रवेश—हिंदूंचें साहस कमी होण्याचें कारण—षोकाखातर, ज्ञानार्थ, किंवा व्यापार निमित्य, हिंदूंचें अन्य देशीं जाणें—इस्तंबुलांत—युरोप व आशियांत—आस्त्राखानांत—सेंटपीटर्सबर्ग येथें—मस्कतेंत—मोझांबिकेंत—जावा बेटांत—जमेका, व सिंगापूर, येथें—चीनांत—इंग्लंडांत—अमेरिकेंत—हिंदूंचें शौर्य—त्याविषयीं परद्वीपीयांचें मत—ग्रीक मत—इस्लाम मत—इंग्रजांचें मत—सांप्रत स्थिति.

भाग ३८ वा.

आर्यव्यापार व उन्नति.

भरतखंडाचा प्राचीनकाळीं चालत असलेला व्यापार—खुद्द आशियांत—युरोपांत, व आफ्रिकेंत,—हिंदूंच्या व्यापाराची उतरतीकळा, व त्याचें कारण—निर्गतमाल आणि आयतमाल—व्यापाराचें साधन—भरतखंडाचा सांप्रतचा व्यापार—त्याचा विभाग—त्याचे मार्ग—सरहद्दीवरील—उत्तरेकडील—ईशान्येकडील—आभ्यंतरीय व्यापार—आर्योन्नतीचें प्राचीनत्व—प्राचीन आणि अर्वाचीन सुधारणा, व त्या दोहोंतील अंतर—भरतखंड हेंच जगदुन्नतीचें आदिस्थान—भारतीयांची ऐहिक व पारमार्थिक उन्नति—त्यांची सांप्रत स्थिति.

भारतीय साम्राज्य.

पूर्वार्ध

पुस्तक सहावें.

आर्यगृहस्थिति, नीति, शौर्य, व उन्नति.

भाग ३५ वा.

गृहस्थिति.

वर्णरचना.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें, एकंदर समाजाची चांगली व योग्य व्यवस्था राहण्याकरितां, त्याचे ब्राह्मण[1], क्षत्रिय[2], वैश्य[3], आणि

---

१ अध्यापनमध्यायनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहं चैव ब्राम्हणानामकल्पयत् ॥ ८८ ॥

२ प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेवच ।
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः ॥ ८९ ॥

३ पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेवच ।
वणिक्पथं कुसीदंचवैश्यस्य कृषिमेवच ॥ ९० ॥

(म. स्मृ. अ. १).

शूद्र[1], असे चार विभाग कल्पूनें[2], त्या प्रत्येक वर्णाची इति-कर्तव्यता तपशीलवार सांगितली.

वर्णाश्रम.

आतां, सदरहू वर्णव्यवस्थेंत[3], **ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व** जरी विशेष रीतीनें वर्णन केलें आहे तरी, ब्राम्हण क्षत्रियांचें परस्परावलंबनें सिद्ध करून, त्यापासूनच उभयपक्षांचें व त्यामुळें अर्थात् सर्व प्रजेचें कल्याण आहे, असें **स्मृतिकारांनीं**[4] थोडक्यांत व्यक्त केलें आहे. तदनंतर ही वर्णव्यवस्था सुरळीत चालण्यासाठीं, तींत धर्माचें प्रचंड बंधन घालून, एकंदर चार वर्णांपैकीं पहिल्या तीन वर्णांकरितां **ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ,** आणि **संन्यास** असे चार आश्रम ठरविले. ह्या सर्व आश्रमांचें विचारपूर्वक मनन केलें, म्हणजे हिंदुगृहस्थितीचें समग्र आणि खरें स्वरूप स्पष्टपणें ध्यानांत येऊन, तिचें जणूं काय उत्कृष्ट प्रतिबिंबच आपल्या

---

१ एकमेवतु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् ।
एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ॥ ९१ ॥ (म. स्मृ. अ. १)

२ ही वर्णसंज्ञा प्रथम ऋग्वेदांत दिसून येते.
(भाग १६ वा. पान ३९ तें ४३ पहा.)

३ भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धि जीविनः ।
बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठा नरेषु ब्राम्हणाः स्मृताः ॥ ९६ ॥
(म. स्मृ. अ. १.)

४ नाब्रह्मक्षत्रमृध्नोति नाक्षत्रं ब्रम्ह वर्धते ।
ब्रम्हक्षत्रं च संपृक्तमिहचामुत्रवर्धते ॥ ३२२ ॥
(म. स्मृ. अ. ९.)

हृत्पटिकेवर पडेल, यांत अगदीं संशय नाहीं. सबब तत्संबंधीं आपण यथावकाश विवेचन करूं.

गर्भशुद्ध्यर्थ होमादि क्रिया, व मौंजीबंधन.

ह्या गृहस्थितीची साद्यंत कल्पना होण्यासाठीं, आपण अगदीं मुळाशींच गेलें पाहिजे, म्हणजे तिचें चांगलें व यथार्थ अवबोधन होईल. आमच्या स्मृतिकारांनीं प्रथमतः गर्भशुद्ध्यर्थ होमादि क्रिया, व तदनंतर जातकर्म, आणि चूडाकरणकर्म सांगून, पुढें अनुक्रमानें मौंजीबंधन किंवा उपनयन सांगितलें. हें उपनयन झाल्यापासूनच मुख्यत्वेंकरून, आमच्या मनावर आमच्या गृहस्थितीचा संस्कार होण्यास प्रारंभ होतो.

उपनयनविधि, व त्याचा काल.

उपनयनविधि पहिल्या तीनें वर्णांकरितांच निर्दिष्ट केल्याचें दिसतें. त्याचा काल प्रत्येक वर्णांतील भिन्न भिन्न सांगितला आहे. ब्राह्मणांचें उपनयन पांचव्यां किंवा

---

१ गार्भैर्होमैर्जातकर्म चौडमौंजी निबंधनैः ।
बैजिकं गार्भिकं चैनो द्विजानामुपमृज्यते ॥ २७ ॥

२ गर्भाष्टमेऽब्दे कुर्वीत ब्राह्मणस्योपनायनम् ।
गर्भादेकादशे राज्ञो गर्भात्तुद्वादशे विशः ॥ ३६ ॥

३ ब्रह्मवर्चसकामस्य कार्यं विप्रस्य पंचमे ।
राज्ञो बलार्थिनः षष्टे वैश्यस्येहार्थिनोऽष्टमे ॥ ३७ ॥

(म. स्मृ. अ. २).

आठव्या वर्षी करण्याचें असून, त्याची मर्यादा सोळाव्या वर्षापर्यंत आहे. त्याचप्रमाणें क्षत्रियांचें मौंजीबंधन सहाव्या व अकराव्या वर्षी करण्याविषयीं उल्लेख आहे, व त्याची मर्यादा बावीस वर्षापर्यंत आहे. आणि वैश्य कुलांतील मुलांचें उपनयन आठव्या किंवा बाराव्या वर्षी करावें ह्मणून मन्वाज्ञा असून, त्याची मर्यादा चोवीस वर्षापर्यंत आहे. सदरहू तिन्ही वर्णांकरितां जी शेवटची मर्यादा सांगितली आहे, तिचें उल्लंघन झालें ह्मणजे उपनयनाचा अतिक्रांत काल झाला असें समजून, तदनंतर जे कोणी मौंजीबंधनाशिवाय राहतील, ते उपनयनहीन आहेत असें मानावयाचें; व त्यांसच व्रात्य अशी संज्ञा प्राप्त होते. आणि अशा प्रकारच्या व्रात्यांबरोबर अगदीं विपत्कालीं सुद्धां, कन्यादानादि संबंध कधींही करूं नये, अशी मन्वाज्ञा[3] आहे.

मौंजीबंधन झाल्यानंतर, अगदीं बाल्यावस्थेपासून

---

१ आषोडशाद् ब्राम्हणस्य सावित्री नातिवर्तते ।
आद्वाविंशात् क्षत्रबंधोराचतुर्विंशतेर्विशः ॥ ३८ ॥

२ अतउर्ध्वं त्रयोप्येते यथाकालमसंस्कृताः ।
सावित्री पतिता व्रात्या भवंत्यार्य विगर्हिताः ॥ ३९ ॥

३ नैतैरपूतै र्विधिवदापद्यपिहि कर्हिचित् ।
ब्राह्मान्यौनांश्च संबंधान्नाचरेद् ब्राह्मणः सह ॥ ४० ॥

(म. स्मृ. अ. २.)

आश्रमबंधन व त्याचा परिणाम.

तों तहत वृद्धावस्थेपर्यंत कशा प्रकारें कालक्रमणा करावी, याविषयीं स्मृतिकारांनीं विशेष नियम सांगितले आहेत. त्यांचें सूक्ष्म विचारानें अवलोकन केलें ह्मणजे असें सहजीं लक्षांत येईल कीं, आज हजारों वर्षांच्या घडामोडींत, आणि अनेक प्रकारच्या राज्यक्रांतींत, आमच्या समाजाची घडी जी आजमित्तीस देखील बहुतेक जशीच्या तशीच राहिलेली दृष्टीस पडते, याचें मुख्य कारण आमची अंतःस्थिति, व विशेषतः आमचें बलवत्तर धर्मबंधन होय. ह्याचा पाया आमच्या स्मृतिकारांनींच घातला असून, त्यांच्या अमृततुल्य वचनोक्तींचा संस्कार आमच्या समाजाच्या हृत्पटिकेवर अहर्निशी प्रतिबिंबित होऊन, तो असंख्य वंशश्रेणींच्या परंपरेंत, जणूं काय आमच्या पिंडांतच अगदीं खिळून राहिल्यासारिखा झाला आहे.

आतां, सदरहू संस्कारापासून जे परिणाम घडून आले, त्यांपैकीं कांहीं तर विशेष श्रेयस्कर, आणि निःसंशय हितावहच असून, कांहीं मात्र अगदीं अनिष्टकारक, व निर्विवाद अरिष्टमूलक झाले आहेत, असें कबूल करणें भाग पडतें. आणि हे परिणाम प्रत्येक सुजाण मनुष्याच्या सहजीं लक्षांत येण्यासारिखे आहेत.

ह्या काळचक्राच्या विलक्षण आणि भयंकर फेऱ्यांत,

हिंदुधर्माचें सनातनत्व.

आमच्या सनातन हिंदुधर्माला अनेक वेळां ग्लानी आली असतांही, तो बौद्ध, इस्लाम, आणि ख्रिस्ती-धर्मांच्या होमकुंडांत बलि न पडतां, अजून देखील आपलें डोकें पूर्ववत्च वर करून राहिला आहे, हें आमच्या धर्म-बंधनाचें श्रेष्ठतर व अनुपमेय फल होय. भरतखंडांतील जुन्या पद्धतीच्या लोकांची आमच्या धर्मावरील श्रद्धा अद्यापि कायम आहे, यांत तर कांहींच नवल नाहीं. परंतु नवीन मतांचे, व आंग्लविद्याविभूषित, आणि विशेष सुधारलेले ह्मणून जे ह्मणविणारे आहेत, त्यांची कितीही मतांतरें झालीं तरी देखील, ते धर्मांतर ह्मणून करण्यास बिलकुल प्रवृत्तच होत नाहींत.

आतां, भक्ष्याभक्ष्य विचार, आणि वेशांतर, यांसंबंधानें कधीं कधीं, किंबहुना नेहमींच, मतभेद झाल्याचें दृष्टीस पडतें; तथापि, आज अनेक युगें एकसारखा चालत आलेला जो सनातन हिंदुधर्म, त्याचा त्याग करण्याचें कोणाच्याही मनांत येत नाहीं. मात्र आमच्यांत अगदीं अशिक्षित व नीच जातीचे लोक असतात, ते फसल्यामुळें, किंवा भुलथापीच्या कारणानें, अथवा पैशाच्या लालुचीनें,

1 "But all these boastings are but reports; the truth is, that they have there spilt the precious water of Baptism upon some few faces, *work-*

(पुढें चालू)

अन्य धर्मात गेलेले आढळतात. परंतु उच्चवर्गातील, किंवा ज्यांजवर विद्येचा थोडाबहुत तरी संस्कार झाला आहे, असे लोक कचित्च बाटतात. इतकेंच नाहीं तर, अशा बाटलेल्या व्यक्तींस हें धर्मांतर केल्याबद्दल अनिर्वचनीय पश्चात्ताप, आणि असह्य दुःख होतें, व अनंत यातना भोगाव्या लागतात.

धर्मान्तराच्या दुःसह यातना.

परधर्म स्वीकारल्यावर, कालान्तरानें आपलेंच मन आपणांस कसें खाऊं लागतें, आपल्या चित्ताची प्रफुल्लता कशी मावळते, व मनाचा सर्व हुरूप एकदम लयास जाऊन, दाही दिशा कशा शून्यवत् भासतात, हें प्रत्यक्ष पाहणें असल्यास, फार दूर जावयास नलगे. ह्याचें उत्कृष्ट उदाहरण आमच्या भरतखंडातलेंच, परंतु अमर्दी

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

ing upon the necessity of some poor men, who for want of means, which they give them, are contented to wear crucifixes ; but for want of knowledge in the doctrine of Christianity are only in name Christans."

["A voyage to East India." (*Della. Valle)].

हे उद्गार एका मिशनरी चाप्लनचे असून, त्यांची वस्तुस्थिति खरी असल्याविषयीं यत्किंचित् देखील संशय नाहीं. व तें केवळ आम्हीच म्हणतों असें नाहीं. तर, हें परकीयांच्या अनुभवावरूनही सिद्ध आहे. व प्रसिद्ध इतिहासकार करनल टॉड यांचें सुद्धां तसेंच मत आहे.

(Tod's Rajasthan. Vol. I .P. 560). Foot note.

उच्चवर्णातलें, आणि सुशिक्षित गृहस्थाचें देतों. गोपाळराव जोशी या नांवाचे एक कोंकणस्थ ब्राह्मण असून, त्यांच्या मनांत एकाएकी बापतिस्मा घेण्याचें आलें. त्यावेळीं, त्यांस शास्त्री, पंडित, आणि प्राकृतजन, यांनीं पुष्कळ समजावून सांगितलें कीं, "पहा, तुम्ही वेळींच उमजा, आणि ख्रिस्तीधर्माचा अंगिकार करूं नका. कारण, आपला सनातन वेदधर्म सर्वांत उत्तम आहे. इतकेंच नाहीं तर, तो परधर्मांतील लोकांसही तसाच भासतो. सबब पोक्त विचार करा, आणि परधर्मांत शिरूं नका. नाहीं तर तुह्माला अतिदुःख होऊन, फार कष्ट सोसावे लागतील." परंतु उपड्या घागरीवर पाणी; या ह्मणीप्रमाणें त्यांनीं केलेली कानउघडणी व्यर्थ जाऊन, त्यांचा उपदेशही अगदीं निष्फळ झाला; आणि हो, ना, करतां करतां, गोपाळराव जोशांनीं एकदाचा परधर्म स्वीकारला, आणि बापतिस्मा घेतला.

मग काय विचारतां ! ! ! कृतापराधाबद्दल त्यांस बहुत

---

1 "This fundamental idea is worked out with systematic completeness in the Vedánta philosophy, and no one who can appreciate the lessons contained in Berkeley's philosophy, will read the Upanishads and the Brahmasutras' and their commentaries without feeling a richer and a wiser man."

(What can India teach us? P. 253.)

By Maxmuller.

पश्चात्ताप झाला; त्यांचें मन त्यांस खाऊं लागलें; आणि त्यांच्या पाठीवर एकसारखा चाबुकाचा मार सुरू झाला. ह्मण आहेना, " स्वधर्मो निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ". आपला धर्म आपणांस सर्व प्रकारेंच श्रेयस्कर असून, परधर्माचा अंगिकार कधींही इष्ट नाहीं. आणि त्याप्रमाणेंच सदरहू बाटलेल्या ब्राह्मण गृहस्थांच्या अनुभवास आलें, व त्यांच्या मनाचे हाल कुत्रेंही खातनासें झालें. त्यांच्या विचार तरंगांनीं त्यांस कसें ग्रासलें, आणि धर्मांतर केल्यामुळें त्यांचें मन दुःखसागराच्या भोंवऱ्यांत सांपडल्यासारिखें होऊन किती हतवीर्य झालें, याविषयीं अगदीं हुबेहूब कल्पना होण्यासाठीं, प्रत्यक्ष त्यांचाच लेख मी वाचकांपुढें सादर करितों. ते असें लिहितात कीं:—

" मनाचे विकार फार कठीण व चमत्कारिक असतात. मीं माझा कातड्याचा थैला उघडला, त्यांत हात घातला. तों माझीं धोतरें, माझा जोडा, अंगरखा, माझ्या हाताला लागला, आणि मग काय विचारतां, दे माय धरणीं ठाय, होऊन अश्रुपातास सुरुवात झाली. त्याच थैल्यांत ख्रिस्ती धर्माचीं पुस्तकें व हिंदुधर्माचीं पुस्तकें एकत्र केलेलीं होतीं. ब्रह्मकर्माची पोथी, गीता, रेशमांत बांधलेली दृष्टीस पडतांच असें कांहीं भरतें आलें कीं त्याचें वर्णन याठिकाणीं करणें अगदीं अशक्य आहे. वेळेचा गुण. मला वाटलें कीं ही ख्रिस्ती धर्माचीं पुस्तकें आतांच्या आतां समुद्रांत

बुडवून टाकावीं. यांनीं कितीरे सत्यानास केला. किती लोकांचीं घरें बुडविलीं. गोरगरीबांस भिकेस लावलें. मातापितरांची ताटातूट केली. अरे या निर्दया धर्मा, मी तुझ्या पाशांत कसारे सांपडलों. आणि माझ्या लोकांस सोडून कोणीकडेरे जात आहे. त्या पुस्तकांशीं घटकाभर तरफड करीत बसलों. आणि आतां समुद्रांत नेऊन टाकणार तों दुसरा विचार पुढें उभा राहिला. मला लोक काय ह्मणतील ? मी आतां पोर नाहीं. ही माझ्या मनाची झालेली स्थिति दुसऱ्यास कळली असतां ते माझा उपहास करतील. मग ती वर्तमानपत्रांत छापली असतां कसा प्रकार घडेल, या विवंचनेंतच मी होतों. झालेली हकीकत जरी खरी आहे तरी जगाला कळूं नये. यामुळें झालें तर माझेंच नुकसान होईल. माझे ख्रिस्तिबांधव मला नांवें ठेवतील, माझे गुरु आपली बोटें चावून घेतील; वेदमूर्ती नीलकंठशास्त्री गोऱ्यासारखीं माणसें हा कसचा ख्रिस्ती, याला तो धर्म समजलाच नाहीं, असें पुनः पुनः ह्मणतील. कांहींही होवो, झालेली हकीकत खरी आहे. माझा जो अनुभव तो सगळ्या ख्रिस्ती देशबांधवांचा असावा. मायबापांची ताटातूट सहन करणारा प्राणी कसा असतो तर तो या ख्रिस्ती लोकांसारखा. निर्दयांचे राजे, किंबहुना पुतळेच म्हटलें तरी चालेल; असो, हें भुरळ फार वेळ राहिलें नाहीं. डोळे, नाक, तोंड पुन्हा

पूर्वपदावर यायला बराच वेळ ला
आड केला, आणि मग मला बरें
मनुष्याची अशी त्रेधा करून सोडण
णूनच कीं काय कोण जाणें, आमचे पूर्वज सगळ्या प
थांची राखरांगोळी करून टाकीत असत."

याप्रमाणें, हिंदुधर्मामृतनिर्झराचा त्याग करून, ख्रिस्तिधर्माचा स्वीकार केल्यामुळें, परधर्मान्तर्गत तीव्र विषदाहानें गोपाळरावांचें शरीर अगदीं होरपळून गेलें; ते नखशिखांत लाल झाले; आणि त्यांच्या पायाची आग मस्तकाला पोहोंचली. खरोखर, ख्रिस्तिधर्माचा असाच असह्य पराक्रम, व इतकें दाहक तेज समजलें पाहिजे. त्या बिचाऱ्यास हें धर्मांतर केल्यानें यत्किंचित्‌ही सुख न होतां, उलट मानसिक व शारीरिक कष्ट मात्र भोगावे लागले.

अशा प्रकारें, परधर्मावलंबनापासून गुरुतरहानि होत असल्याचें, कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून प्रत्येकानें अन्यधर्माचा अंगिकार करण्यापूर्वी तत्संबंधीं योग्य, सारासार, आणि पोक्त विचार केला पाहिजे. प्रत्येकाला आपापला धर्म चांगलाच वाटतो; तथापि, तो किती अंशानें हितावह आणि श्रेयस्कर आहे, ह्याविषयीं साधकबाधक कारणांसह, दूरवर नजर पोहोंचविली पाहिजे.

---

१ गोपाळराव जोशीकृत समुद्र प्रवास.

धर्म कोणता, याविषयीं भवति
भवति, किंवा विशेष ऊहापोह कर-
याचें जरी हें स्थल नव्हे तरी, धर्माचीं
…त्व कोणतीं, व तीं आमच्या हिंदुधर्मांत परिपक्वतेप्रत
…वलीं आहेत किंवा नाहींत, हें या ठिकाणीं इत्थंभूत सांगणें अवश्य आहे. कारण, तत्संबंधीं सांग विवेचन केलें नाहीं तर, आमच्या धर्माची खरी थोरवी, व त्यापासून आमच्या मनावर आणि गृहस्थितीवर घडून आलेले वज्रलेप-संस्कार, ह्यांचें स्पष्ट आणि तथ्य अवबोधन होणार नाहीं. सबब त्याविषयीं यथावकाश लिहितों.

त्याचीं कारणें.

प्रत्येक धर्मांत, (१) ह्या विलक्षण सृष्टिरचनेचें आदिकारण, त्यापासून उद्भवलेले परिणाम, त्यांचा परस्परांशीं संबंध, आणि त्यांचा कार्यकारणभाव, याविषयीं, साधकबाधक कारणांसहित, सविस्तर व समाधानकारक विवेचन अवश्य असून, त्यांतील कोटिक्रम विसंगत नसला पाहिजे. (२) पापपुण्याची भीति राहून, दुष्टकर्माचें आचरण कधींही होऊं नये एतदर्थ, त्या सच्चिदानंदरूपाची व्यापकता, त्या परमात्म्याचें तेज, आणि त्या जगन्नियन्त्याची ईशशक्ति, यांविषयीं पूर्ण मीमांसा केलेली पाहिजे. (३) मनावर नीतितत्वाचे संस्कार ठायीं ठायीं होण्यासाठीं, प्रत्येक धर्मग्रंथ नीतीनें ओतप्रोत भरलेला

पाहिजे.(४) मानसिक उन्नतीचे गंभीर विचार, त्यांत प्रदर्शित केलेले पाहिजेत. (५) परधर्मसाहिष्णुतेचें अत्यंत महत्वाचें मूलतत्व त्यांत अवश्य असलें पाहिजे. आणि (६) एकंदर आचरण व सद्वर्तन, यांविषयींचे योग्य नियम घालून, ते धर्मबंधनानें सुसंस्कृत आणि अजरामर केलेले पाहिजेत.

इतके सर्व गुण आमच्या वेदान्तर्गत हिंदुधर्मात जितक्या पूर्णतेनें दृष्टीस पडतात, तितके अन्यधर्मात कोठेंही-

---

1 "Yet among those ancient religions we seldom know, what after all is the most important point, their origin and their gradual growth. The Jewish religion is represented to us as perfect and complete from the very first, and it is with great difficulty that we can discover its real beginnings and its historical growth. And take the Greek and the Roman religions, take the religions of the Tentonic, Slavonic or Celtic tribes, and you will find that their period of growth has always passed, long before we know them, and that from the time we know them, all their changes are purely metamorphic changes in form of substances ready at hand."

"Now let us look to the ancient inhabitants of India. With them, first of all, religion was not only one interest by the side of many. It was the all absorving interest; it embraced not only worship and prayer, but what we call philosophy, morality,

(पुढें चालू)

असल्याचें आढळून येत नाहीं. आणि ग्रीससारख्या विद्याचारसंपन्न, व तत्वज्ञानकुशल देशाचें तेज देखील, आमच्या आर्यभटांच्या ब्रह्मज्ञान मीमांसेपुढें, अगदीं फिकेंच पडतें.

आपण कोण, कोठून आलों, शेवटीं कोठें जाणार, याविषयींची उत्कटाजिज्ञासा, व आत्मस्वरूप ओळखण्याविषयीं तीव्रलालसा, आमच्या हिंदू इतकी अन्यत्र कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. त्या स्वरूपाचा विचार करतां करतां, ते

आमुष्मिक ज्ञानाविषयीं हिंदूंची नैसर्गिक स्फूर्ति, व उत्कट जिज्ञासा.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

law, and Government,–all was pervaded by religion. Their whole life was to them a religion— every thing else was, as it were, a mere concession made to the ephemeral requirements of this life." * * *

"It is this ancient chapter in the history of the human mind which has been preserved to us in Indian literature, while we look for it invain in Greece or Rome or elsewhere."

(What can India teach us ?
P. P. 107-108-109.)

1 "And, in the knowledge of the being and nature of God, they (Hindus) were already in possession of a light which was but faintly perceived even by the loftiest intellects in the best days of Athens."

(Elphinstone's History of India
Vol I. P. P. 94-95.)

2 "For, this knowledge of the Self is really

(पुढें चालू)

अगदीं तन्मयावस्थ व देहातीत होतात; आगे त्या समाधी-अवस्थेंत त्यांचें त्यांस भानही राहत नाहीं. अशा प्रकार-ची तल्लीनवृत्ति हिंदु प्रकृतिस्वभावांत जणूं काय प्राधान्येंकरून खिळूनच राहिलीशी दिसते.

हिंदूंचें आत्मसंयमन व विद्यार्जन.

आत्मोन्नतीसाठीं आत्मसंयमन, आणि ज्ञानार्थ विद्यार्जन, हीं करण्याविषयीं हिंदूंचे दीर्घ प्रयत्न[2] असून, त्या बाबतींत त्यांचा विशेष कटाक्षही आहे. व त्यांची

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

the Vedanta, that is, the end, the highest goal of the Veda. The highest wisdom of Greece was 'to know ourselves'; the highest wisdom of India is 'to know our self.' "

1 "The transcendent temperament acquired no doubt a more complete supremacy in the Indian character than any where else."

(What can India teach us ?
P. P. 104-106).

2 "The Bràhmans, therefore, were a body of men who, in an early stage of this world's history, bound themselves by a rule of life the essential precepts of which were self-culture and self-restraint."

(Dr. Hunters' Indian Empire P. 96.)

मनोनिग्रहतत्परता[1], आणि विद्यार्जनपरायणता[2], हीं आजमित्तीस देखील सुप्रसिद्ध शहरांत, आणि पवित्र क्षेत्रांत दृष्टिगोचर होतात[3].

भारतीय ग्रंथसमुदायांतील नीतितत्वें, व त्यामुळें हिंदु समाजावर झालेला इष्ट परिणाम.

आमच्या हृत्पटिकेवर नीतितत्वाचें प्रतिबिंब उमटविणारे ग्रंथ ह्मणजे **रामायण, महाभारत**, इत्यादि महाकाव्यें, **मन्वादिस्मृती**, सुंदर **नीतिशास्त्रें**, मनोहर **कथानकें**, आणि नीतिप्रद **पुराणें**, यांचें ही ह्या **भरतभूमींत** प्राचुर्य असल्यामुळें, त्यापासून हिंदुसमाजावर इष्ट परिणामच घडून आल्याचें दिसतें[4].

---

१. वशे कृत्वेंद्रिय ग्रामं संयम्यच मनस्तथा ।
सर्वान्संसाधयेदर्थानाक्षिण्वन्योगतस्तनुम् ॥ १०० ॥

२ वेदमेव सदाभ्यसेत्तपस्तप्स्यन्द्विजोत्तमः ।
वेदाभ्यासो हि विप्रस्यतपः परमिहोच्यते ॥ १६६ ॥

(म. स्मृ. अ. २).

3 "At this day, Brahman Colleges, called Tols, are carried on without fees on the old model, at Nadiyà in Bengal, and else where. The modern visitor to these retreats can testify to the stringent self-discipline, and to the devotion to learning for its own sake, often protracted till past middle-life, and sometimes by grey-haired students."

(Dr. Hunters' Indian Empire. P.96).

4 "Of the Ethico-Didactic Poetry—the so call-

(पुढें चालू)

उपनिषदें, वेद, व त्यांचें श्रेष्टत्व.

आत्मोन्नति, शांति, आणि स्वात्मसुख ह्यांचें तर आमची उपनिषदें केवळ माहेरघरच आहेत. आणि शोपेनहॉयर सारख्या विद्वान्, बहुश्रुत, व ख्रिस्तीधर्मानुयायानें देखील त्यांची विशेष थोरवी गाइली आहे. यावरून बुद्ध, इस्लाम, आणि ख्रिस्तीधर्मापेक्षांही

(मागील पृष्टावरून पुढें चालू)

ed Nitishàstras — but little has survived in a complete form, no doubt because the great epic, the Mahá Bhàrata, in consequence of the character of universality which was gradually stamped upon it, is itself to be regarded as such a Niti-Shástra. Still, relics enough of the aphoristic ethical poetry have been preserved to enable us to judge that it was a very favourite form, and achieved *very excellent results.*"

(History of Indian Literature.
By Weber P. 210).

1 In the whole world there is no study so beneficial and so elevating as that of the Upanishads. It has been the solace of my life—it will be the solace of my death."

(Sacred Books of the East. Vol. I. The
Upanishads, translated by Max-
Muller Introduction P. IXI).

ही उक्ति शोपेन्हॉयर नामक एका विद्वान् तत्वमीमांसकाची असून, तो जर्मनींतील राहणारा होता.

आमचा वेद्धर्म विशेष श्रेयस्कर, व सुखद आहे, असें कोणाही निःपक्षपाती माणसास कबूल करणें भाग पडेल.

हिंदुधर्मांतील परधर्मसहिष्णुता.

आमच्या हिंदु धर्मांचें दुसरें अति प्रंशसनीय स्वरूप ह्मटलें ह्मणजे, **परधर्मसहिष्णुता** होय. ही आमच्या इतकी अन्यधर्मांत कोठेंही दृष्टिगोचर होत नाहीं. आमचा धर्म आह्मांस इतका प्रियतम आहे तथापि, आमच्या कळपांत परधर्माचे लोक यावे, अथवा त्यांनीं आमचाच धर्म स्वीकारावा एतदर्थ, बलात्कार, अन्यायमूलकवर्तन, प्रतारणा, निंद्य आचरण, किंवा घोरकर्म, इत्यादि करण्यास आम्ही कधींही प्रवृत्त होतें नाहीं. आमच्यांत

---

1 "The Hindus are among the most tolerant religionists in the world."

(Indian Empire. P· 227.)

2 "And there is much in your family-life that excites my sincere admiration, much in the devout piety which appears to me to be a strong characteristic of the Hindu mind which commands my respect, whilst the *religious toleration* which has, from time immemorial, been not only *taught* but *practised* by your race is an example to all the world in the very highest degree, for it is not the toleration of persons indifferent themselves to religion, but, on the contrary, the Hindus have always presented the spectacle of a nation intensely devot-

(पुढें चालू)

राहूनही, परधर्माचे लोक आपापल्या धर्माचे मनमानेल तसे सोहळे करतात; आम्हांस मुद्दाम कष्टी करण्याकरितां आमच्या धर्माविरुद्ध हवें तें निंद्य कृत्य करण्यास ते तयार होतात; व प्रसंगीं आमचा छल देखील करतात. परंतु तें सर्व आह्मी निमूटपणें सोसतों. तथापि, प्रसंगानुसार स्वसंरक्षणासाठीं, व स्वधर्म प्रीत्यर्थ योग्य तो प्रतिकार करण्यासही, आम्ही तयार असतों. मात्र, दुसऱ्याचें वर्तन अक्षम असेल तेव्हांच प्रतिकाराविषयीं आमची प्रवृत्ति होते, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

बौद्धधर्माची वेदापासून उत्पत्ति.

आतां बौद्धधर्म हा वेदधर्माचेंच एक छोटेसें पिलूं[1] होय. परिणामवाद्यांच्या मताचें हा धर्म अगदीं हुबेहूब प्रतिबिंबच[2] आहे, असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

ed to its own faith and firmly convinced of its truth and reality, and yet willing to live side by side with people of other creeds without intolerance and without interference."

(Mrs. Pichey Phipson on child-marriage).

1 "We are, therefore, led to suppose the Brahmin faith to have originated in early times, and that of Budha to have branched off from it at a period when its orthodox tenets had reached their highest perfection, if not shown a tendency to decline."

2 "The doctrines of the Sànkhya school of

(पुढें चालू)

ह्यांत अनीश्वरमताचें प्रतिपादन असून, वेद हे ईश्वरप्रणित नाहींत अशाविषयीं ह्याचा मुख्य कटाक्ष आहे. परंतु ह्याशिवाय, बाकी हिंदुधर्माचें साद्यन्त स्वरूपच त्यांत दिसून येतें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

philosophers seem reflected in the athiesm of the Budha."

(Elphinstone's India P. 213 Vol. 1.)

"The historical information regarding these religions tends to the some conclusion. The Vedas are supposed to have been arranged in their present form about the fourteenth century before Christ, and the religion they teach must have made considerable previous progress ; while scarcely one even of its most zealous advocates has claimed for that of Budha a higher antiquity than the tenth or eleventh century before Christ, and the best authenticated accounts limit it to the sixth."

(Elphinstone's India. P. 213).

1 "The Indian origin of the Budhás would appear, independently of direct evidence, from the facts that their theology, mythology, philosophy, geography, chronology &c., are almost entirely of the Hindu family ; and all the terms used in those sciences are Sanskrit. Even Budha (intelligence) and Adi Budha (supreme intelligence) are well known Sanskrit words."

(Elphinstone's India P. 216).

ख्रिस्तिधर्माचीं मतें देखील हिंदु धर्मांतूनच उचललीं असून, इस्लाम[3] धर्माचीं मूलतत्वें ख्रिस्ती धर्मांतून घेत-

१ याविषयीं सविस्तर विवेचन, नामदार तेलंगकृत भगवद्गीतेच्या इंग्रजी भाषांतरांत, प्रस्तावनेंत केलेलें आहे.

डीनमिलमनचें असें ह्मणणें आहे कीं, ज्या मतांचा उद्भव आणि प्रसार हिंदुस्थानांत झाला, त्यांचाच संस्कार व परिणाम ख्रिस्ती धर्मावर मुख्यत्वेंकरून झाला असावा.

Milman's History of Christ, II. 31.)

पायथ्यागोरस् हिंदुस्थानांत आला असून, त्यानें तत्कालीन हिंदु विद्वानांपासून षड्दर्शनांपैकीं कांहीं दर्शनें समजाऊन घेतलीं असल्याचें सुप्रसिद्ध आहे. तसेंच एसिनीज नामक ख्रिस्त संप्रदायाचे जे लोक होते, त्यांचेंही प्राची दिशेकडे गमन असून, इकडील मतांचा त्यांच्यावर विशेष संस्कार झाला होता, हें निर्विवाद आहे,

2 "On the contrary, the conclusion, to which the facts and probabilities of the case seem to point as more probable is one which the adherents of that theory have not condescended even to glance at, namely, that it is Christianity which has borrowed from Hinduism, and not Hinduism which has borrowed from Christianity."

(Telang's Bhagwatgitá. Introductory Essay. P. LXXXVII).

3 "Thus, the religion of the Jews is founded upon that of the Egyptians; Christianity is the result of Judaism; and from these two last, has naturally sprung Mahamedanism."

(Buckles' History of Civilization in England P. 21).

खिस्तिधर्माची हिंदुधर्मापासूनच उत्पत्ति. आणि ह्या दोहोंचें मिश्रणच इसलाम धर्म.

लेलीं आहेत. तथापि, त्या दोहोंतही परधर्मसहिष्णुता ह्मणून बिलकुल दिसून येत नाहीं. मागील इतिहासाचें अवलोकन केलें ह्मणजे असें आढळून येईल कीं, सदरहू दोन्ही धर्मांपैकीं, प्रत्येक धर्मांतील लोकांनीं आपापलें मत स्थापित करण्यासाठीं, अनंत घोर कृत्यें करून महादारुण प्रसंग आणिले; यत्किंचित्ही सारासार विचार न करतां, लोकांची निर्दयपणें कत्तल उडविली; लोकांस बलात्कारानें निष्कारण बाटवून, त्यांच्याकडून अतिनिंद्य उपायांनीं धर्मांतर करविलें; मनाची समता न राखतां, हवेंतसें दुष्टाचरण केलें; त्यांनीं आपल्या नीच आचरणाची तर कमालच उडविली; अंगावर रोमांच उभे राहतील, असें रणकंदल केवळ धर्माच्या नांवानेंच माजविलें; सर्व देश भयानक व उध्वस्त करून टाकिले; आणि जगाच्या कल्याणाची किंवा मानवी स्थितीच्या उन्नतीची गोष्ट एका बाजूलाच ठेवून, सुरापान करण्यासारिखें, अथवा मतिभ्रंश झाल्याप्रमाणें, परम अश्लाघ्य, व निस्सीम उन्मत्ततेचें वर्तन केलें.

ख्रिस्तीधर्माचें अतिनिंद्य स्वरूप युरोप व आशिया खंडांत एकाच मासल्याचें दिसून येतें. इंग्लंडांत असंख्य

---

1 "Then began that terrible persecution of Protestants, which has given to the first Queen

(पुढें चालू)

ख्रिस्तीधर्माचें खरें स्वरूप व त्याच्या नांवानें केलेलीं क्रूर कर्में.

मनुष्यांची होळी अति निर्दयतेनें होऊन, फ्रान्स आणि इतर देशांतही, हजारों मनुष्यें केवळ धर्मा-

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

regnant of England the name of Bloody Mary." * * "During three years, 288 men, women, and children were burned for their Protestantism, while thousands suffered in a less degree. The chief scene of these tragedies was Smithfield in London. There, many condemned to death, perished amid the flames of blazing fagots. More than a thousand ministers were driven from their pulpits; and, as many of them as could, fled to the continent to escape the fury of the tempest." * * * Hooper, Bishop of Glouester, was in torture for three quarters of an hour: one of his hands dropped off, the other still beat his breast and he prayed till his tongue swelled so that he could not speak." . * * * Bags of gunpowder laid round them (limbs) killed Latimer by the explosion, but Ridley's death was very slow. Oct 16, 1555)."

(History of the British Empire, by William Francis Collier L. L. D.)

1 "But those far more horrible wars, by which, in the sixteenth century, France was desolated, were conducted in the name of Christianity, and even the political struggles of the great families were merged in a deadly contest between Catholics and Protestants." * * * (Buckle's History.)

(पुढें चालू)

तर किंवा मतांतराच्या निमित्तानें यमसदनास गेली. क्रूरकर्म व निर्दयतेचें आचरण, यांत कोणाची सरशी होते, हेंच जणूं काय पाहण्याकरतां, प्रत्येक व्यक्तीची व मोठमोठ्या राष्ट्रांची चढाओढच लागली. प्रॉटेस्टंट लोकांनीं क्याथलिक् लोकांची कत्तल उडविली, व ह्यांनीं

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

"The theological spirit was shown in the conspiracy of Amboise, and in the conference of Poissy; and still more was it shown in those revolting crimes so natural to superstition, the massacres of Vassy and of St. Bartholomew, the murder of Guise by Paltrot, and of Henry III. by Clement. These were the legitimate results of the spirit of religious bigotry." * * *

"Francis I. said that if his right hand were a heretic, he would cut it off. Henry II. whose zeal was still greater, orderded the judges to proceed against the Protestants, and publicly declared that he would 'make the exterpation of the heretics his principal business.' Charles IX., on the celebrated day of St. Bortholomew, attempted to relieve the church by destroying them at a single blow. Henry III. promised to 'oppose heresy even at the risk of his life;' for he said, 'he could not find a prouder grave than amidst the ruins of heresy.'"

(Buckle's History of the Civilization of England Vol. II. P. P. 8-10-11-12-13).

प्रत्यपकार बुद्धीनें त्यांचे मुर्दे पाडले. मिळून क्षमा आणि सहिष्णुता, हीं उभयपक्षांच्या स्वप्नीं देखील वास करीनात.

खिस्तिधर्माचा भयंकर परिणाम.

पोर्चूगीज् खिस्त्यांनीं एशियाखंडांत अशाच मासल्याचा अति निंद्य जुलूम माजविला. गोंव्यापासून तों हतत दम्मणपर्यंत हिंदुस्थानचा बहुतेक पश्चिम किनारा व्याप्त करून, ह्या फिरंगी लोकांनीं हिंदूंस बाटविण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालविलें. त्यांनीं असंख्य लोकांचें बलात्कारानें धर्मांतर करविलें; हजारों कुळें भ्रष्ट केलीं; आणि अनेक ब्रह्मवृंदांस देशोधडीस लाविलें. मोठमोठे जलतडाग व कूप, आणि लहानसहान तलाव व विहीरी, ह्या देखील बाटविण्याचें ह्मणजे अपवित्र करण्याचें सत्र चालविलें. ते कांहींत थुंकले, व कांहींत त्यांनीं हाडें टाकिलीं. एतावता, अतिनिंद्य व दुःसह आचारण करून, हिंदु लोकांस ह्या ख्रिस्ति धर्मानें अगदीं त्राहि भगवन् करून सोडिलें.

---

1 "While the Protestants were murdering the Catholics, and the Catholics murdering the Protestants, it was hardly likely that either sect should feel tolerance for the opinions of its enemy."

(Buckle's History of the Civilization of England P. 9 New Edition.)

2 "Only those who have read the contemporary narratives of their conquests, can realize the superstition and the cruelty with which their history in the Indies is stained."

(Dr. Hunter's Indian Empire P. 359.)

आणि ह्मणूनच निदान आह्मांला तरी, ह्या ख्रिस्ती धर्माचें स्वरूप अगदींच दूषितें झाल्यासारिखें दिसतें.

इसलाम धर्माची देखील हीच रडकथा. परधर्म असहिष्णुता, दांभिकता[3], प्रतारणा, आणि उन्मत्तता, इत्यादि गुणांनींच मंडित असा हा धर्म होय. यामुळें जेथें जेथें ह्मणून ह्या धर्माचा प्रवेश झाला, तेथें तेथें शस्त्रा-

इसलाम धर्माचें निंद्य स्वरूप.

---

1 "And Christianity was degraded by corruptions, and weakened by the controversies of irreconcileable sects."

(Elphinstones' History of India P. 503 Vol. I.)

2 "But, whatever may have been the reality of his (Mahomets) zeal, and even the merit of his doctrine, the spirit of *intolerance* in which it was preached, and the bigotry and bloodshed which it engendered and perpetuated, must place its (Islám religions') auther among the worst enemies of mankind."

3 "At the commencement of Mahomets' preaching, he seems to have been perfectly sincere ; and although he was provoked by opposition to support his pretensions by *fraud*, and in time become habituated to *hypocrisy* and *imposture*, yet it is probable that, to the last, his original *fanaticism* continued, in part at least, to influence his actions."

(Elphinstones' History of India. P. 501. Vol. I).

स्त्राचे प्रखर प्रहार करण्यांत आले. रक्तस्रावाचे पूर वाहून गेले. अतिनिंद्य कर्माची सीमा झाली. क्रूरतेचा पगडा बसला. दुष्टाचरण बळावलें. बलात्कारानेंच धर्मांतर होत चाललें. हिंदुधर्माचें उन्मूलन करण्याविषयीं हरएक प्रयत्न होत गेला. एकंदर प्रदेश उध्वस्त झाला. आणि त्याकारणानेंच सर्वत्र निर्जनता भासूं लागली. एतावता, मुसलमानी राज्याचा इतिहास वाचणारास, इस्लाम धर्माच्या दुष्ट आचरणाची, त्याच्या अनन्वित कृत्यांची, आणि निःसीम अनीतीची, एक लांबच्या लांबच मालिका दृष्टीस पडण्यासारखी आहे.

हिंदुधर्मांतील गुणोत्कर्ष.

असो. इतरधर्मांत नसणारे असे दया, क्षमा, आणि शांति, हे अलौकिक गुण केवळ आमच्या हिंदुधर्मांतच असून, त्याच सर्वोत्कृष्ठ गुणांची प्रत्येक धर्मांत अवश्यकता आहे. ह्याशिवाय, गहन विचार, अप्रतीम सदाचार, प्रकृतिसौजन्य, आणि नीतिधैर्याचें दृढावलंबन, इत्यादींचें फार मनोहर स्वरूपही आमच्या धर्मांत दिसून येतें. यामुळें, आपल्या धर्माचा त्याग करण्याची हिंदु लोकांस मुळीं इच्छाच होत नाहीं; व परकीयांचा धर्म त्यांस पसंतही नाहीं.

परधर्मीयांचे तत्संबंधीं उद्गार.

आमच्या धर्मास आह्मी चांगलें ह्मणावें, यांत तर कांहींच नवल नाहीं. परंतु जे ख्रिस्ती मिशनरी आमच्या धर्मांतलं

कांहींना कांहीं तरी निष्कारण उणें काढण्यास कधींही मागें सरत नाहींत, ते देखील त्याची बढाई सांगून मोठी तारीफ करतात, व थोरवी गातात. आणि अन्य कोणाचें ही साहाय्य नसतां, केवळ स्वकष्टार्जित, स्वबुद्धिकल्पित, व स्वपराक्रम संसाधित असून देखील, सर्वोत्कृष्ठ अशी धर्मरचना, या भूतळावर हिंदुधर्माशिवाय दुसरी कोणतीही नाहीं, असे तेच[1] भर सभेंत कबूल करतात.

एका जर्मनपंडिताचें तत्संबंधीं मत.

प्रसिद्ध विद्वन्मणि पालदेवसेन[2] हे आमच्या वेदान्ताविषयीं फारच गौरवानें लिहितात, आणि असें सांगतात कीं, वेदान्ताचा ठसा आमच्या हृत्पटिकेवर अजरामर[3] राहिला असून, नास्तिक मताचा किंवा

१ मुंबई येथें तारीख २ जानेवारी सन १८९३ रोजीं, जी खिस्ती परिषद् भरली होती, तींत रेव्हरंड जे. पी. जोन्स एम. ए. असें बोलले कीं:—

"It is vastly important to know well, Vedic and Modern Hinduism, not simply as an object of attack, but also as a religious system perhaps the *best* that the world has seen among those worked out by man's *unaided wisdom.*"

२ हे गृहस्थ जर्मनी देशांत कील येथें अध्यापक आहेत, व त्यांचें नांव Paul Deussen असें आहे.

3—"But the Vedánta is, now as in the ancient time, living in the mind and heart of every thoughtful Hindoo," * *

परिणामवाद्यांचा दुष्परिणाम[1], हिंदुधर्मावर किंवा त्यांच्या तत्वविचारावर, बिलकुल घडून आला नाहीं. त्यांतील तत्वविचार, ग्रीस देशांतील प्लेटो व जर्मनींतील कँयांट या प्रसिद्ध[2] तत्ववेत्यांसारखेच गंभीर आणि सखोल आहेत. व तत्संबंधीं साधक बाधक कारणांचें योग्य विवेचनही शंकराचार्यानें अति मार्मिकपणानें, आणि केवळ आपल्या बुद्धीच्या जोरावरच केलें असल्यामुळें, ते फार अप्रतीम झालें आहे. आणि म्हणूनच ख्रिस्तीमताभिमान्यांनीं त्याचें अनुकरणं[3] करणें प्रशस्त आहे. वेदान्त म्हणजे

---

1 "In India the influence of this perverted and perversive spirit of our age has not yet overthrown in religion and philosophy the good traditions of the great ancient time." * *

2 "And the sytem of the Vedanta, as founded on the Upanishads and Vedanta Sutràs and accomplished by Shankaràs' commentaries on them equal in rank to Plato and Kant —is one of the most valuable products of the genius of mankind in his researches of the eternal truth."

3 "Shankar in these difficulties created by the nature of his materials, in face of so many contradictory doctrines, which he was not allowed to decline and yet could not admit altogether,—has found a wonderful way out, which deserves the attention, perhaps the imitation of the Christian dogmatists in their embarrasments."

(पुढें चालू)

नीति तत्वाचें केवळ सारच असून, तद्विरुद्ध लोकांचे आक्षेप सर्वथैव भ्रांतिमूलक व मिथ्या होत. असो, एकंदरींत निर्मळ नीति, अनुपम शांति, आणि अक्षय्य सुख, वेदान्तासारिखें अन्यत्र कोठेंही नाहीं. आणि म्हणूनच आमचे

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

"The life a dream ! this has been the thought of many wise men from Pindar and Sophocles to Shakspeare and Calderon de la Boren, but no body has better explained this idea than Shankara."

1 "People have often reproached the Vedànta with being defective in morals, and, indeed, the Indian genius is too contemplative to speak much of works; but the fact is, never the less, that the highest and purest morality is the immediate consequence of the Vedanta. The Gospels fix quite correctly as the highest law of morality : "Love your neighbour as yourselves." But why should I do so, since by the order of nature I feel pain and pleasure only in myself, not in my neighbour ? The answer, is not in the Bible (this venerable book being not yet quite free of Semitic realism), but it is in the Veda, is in the great formula, "tat-tvam asi," which gives in three words metaphysics and morals altogether."

2 "And so the Vedanta, in its unfalsified form, is the strongest support of pure morality, is the greatest consolation in the sufferings of life and death."

लोक हिंदुधर्माला अगदीं बिलगून राहतात, यांत नवल तें कोणते ?

आमचें धर्मबंधन, व परधर्माची निष्फलता.

मुख्यत्वेंकरून सदहू कारणामुळेंच, आमचे लोक धर्मभ्रष्ट होत नाहींत. मग ते गरीब असोत किंवा श्रीमंत असोत, लहान असोत किंवा मोठे असोत, अज्ञान असोत अथवा विद्वान् असोत; धर्मांतर करण्याला त्यांच्या मनाचीच प्रेरणा नसते. कारण, आमच्याच धर्मांत जें हवें तें असून, परधर्मांत त्याचा गंधही नाहीं. मग त्याला जोंबाळण्यांत विशेष अर्थ तो कोणता ? ह्याच कारणानें ख्रिस्ती मिशनरींचा हिंदुजन बाटविण्याच्या संबंधानें इष्टहेतु कधींही सिद्धीस जात नाहीं. व ती गोष्ट कबूल करणें ही त्यांस प्राप्त पडतें. त्यांस आतां असें वाटूं

1—"Indians keep to it!"
(Address from Dr. Paul Deussen on "The Philosophy of the Vedanta in its relations to occidental Metaphysics." in the rooms of the B. B. R. A. S. on Saturday the 25th /2/93).

2 "I think it will be admitted by all who have thought-fully considered the problem of Indian evangelization that tbe strength and influence of Hinduism are to be found in that great Socio-religious organization which is conveniently described

(पुढें चालू)

लागलें आहे कीं, जातिभेदापासून राजकीय दृष्टीनें कितीही तोटे असले तथापि, धर्मबंधनदृष्टीनें त्यापासून फायदाच आहे. व त्याचा प्रत्यक्ष परिणामही हिंदुसमाजावर झाल्याचें त्यांच्या अनुभवास येत आहे. एकंदरींत हिं-

---

(मागील पृष्ठवरून पुढें चालू.

as the system of caste. The records of each Decennial conference have shown how possible it is by presentation of the Gospel to the masses who lie out side this system to attract large numbers of individuals to the profession of Christianity ; but they reveal with equal clearness the fact that such methods have achieved comparatively little in the way of distinct Christian accessions from the great religious system which dominates the land. * * For, within the system of which we speak, there are myriads of the poorest and weakest whose attitude towards the Gospel is as full of resistance as that of the mighty and wise amongst them ; it is the result of the natural working of that system to which all these classes, the noble and the poor, the mighty and the weak, the wise and the unwise, alike belong. * * Now it has been abundantly demonstrated that there has been no visible Christian progress amongst such classes." * *

(Education as a missionary Agency. A paper read by the Rev. D. Machichan D. D ; Principal of the Wilson College Bombay, in the Decennial conference, held on the 2nd of January 1893).

दुगृहस्थितीचें हें एक सोज्वलच स्वरूप आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

हिंदुधर्मरचनेचा स्थूल व सूक्ष्म विचार.

याप्रमाणें आमच्या धर्मरचनेचा स्थूल विचार झाला. आतां सूक्ष्म विचाराअंतीं त्यांत कित्येक दोषही दिसून येतात. ते असे कीं, अति विश्वासामुळें, मिथ्या धर्मश्रद्धा वाढली; व तेणेंकरून बहु समाजानें सारासार विचार करण्याचें वर्जिलें. जातिभेदाचें बंड वाढत गेलें; आणि त्या कारणानें जातिमत्सर वृद्धिंगत झाला. एकी मोडली; व त्या योगानें एकमेकांचा विश्वास कमी होत गेला. आणि शेवटीं कलह होऊन दुई माजली. धर्माचेंच वेड पिकल्यामुळें, ज्ञाननिर्झर अटत चालला. धर्मशास्त्राचें खरें तत्व थोड्यांसच अवगत होऊं लागलें. देशांतरीं पर्यटन करून आपल्या ज्ञानांत भर पाडण्याचे प्रयत्न कोणीही करीतनासें झालें. जातिबहिष्कृत होण्याच्या भीतीनें दूर दूर देशांत, व अन्य खंडांत, फिरण्याचें साहस साहजीकच कमी होत चाललें. दायविभागाचे दुष्ट परिणाम एकंदर समाजावर घडून आले. आळस वाढत चालला. परिश्रम करण्याची लालसा कमी होत गेली. देश कंगाल झाला. आणि लोक भिकेस लागले. आयत्या बिळांत नागोबा, या ह्मणीप्रमाणें एकाच्या मेहेनतीचें फळ दुसऱ्यास फुकटच प्राप्त होऊं लागलें. त्यामुळें, जो तो आयत्या पि-

ठावर रेषा ओढूं लागला; व तणेंकरून आळसास तेजी, आणि परिश्रम व साहस ह्यांस मंदत्व आलें. तेव्हां हिंदु-गृहस्थितीचें हें एक अति शोचनीयच स्वरूप आहे, अशी कल्पना करण्यास अडचण नाहीं.

असो. इतकें झालें तरी, आमच्या धर्माचें अंतर्गत स्वरूप कांहीं कांहीं बाबतींत निःसंशय विशेष रमणीय आहे. आणि १ स्नानादि नित्यविधि; २ खाद्यपेयादि नियम; ३ मनःसंयमन; ४ लोकशिक्षण; ५ अभिवादन; व ६ स्त्रीधर्म; इत्यादि विषयीं फारच सुरेख विवेचन मनुस्मृतींत केल्याचें आढळून येतें. आणि त्याचाच प्रत्यक्ष परिणाम आमच्या गृहस्थितीवरही घडून आला आहे, यांत बिलकूल शंका नाहीं.

नित्यविधि.

प्रातःस्नानादि-विधि.

उपनयन झाल्यानंतर प्रत्येक मुलानें प्रातःकाळीं उठून-प्रथम बहिर्दिशेस जावें, आणि नंतर मुखमार्जन करून स्नान करावें. स्नान झाल्यावर भस्मलेपन करण्याची आमच्यांत चाल असून, ती फारच चांगली आहे. स्नानामुळें कदाचित् ओलें शरीर राहिलें असल्यास, तें भस्मावलेपानें अगदीं कोरडें होतें, व तेणेंकरून शरीरास अपाय होण्याची भीति राहत नाहीं. आमचें धर्मशास्त्र आणि वैद्य-

शास्त्र हीं दोन्हीं एकमेकांस अगदीं अनुसरूनच असून, त्या दोहोंचें फारच ऐक्य आहे; व एकाचे नियम विशेष दुसऱ्याला अनुकूल असेच केलेले आहेत. स्नानसंध्याविधि तीनदां करावा अशी धर्माज्ञा आहे; व त्याप्रमाणें अगदीं जुन्यामताचे, क्षेत्रस्थ, आणि श्रद्धावान् लोक अमलांतही आणितात. प्रातःकाळीं, माध्यान्हीं, व सायंकाळीं, याप्रमाणें तिन्हींवेळां ते स्नानासंध्यादिविधि करतात. परंतु नवीन मताच्या लोकांत, किंवा सुधारलेल्या जनसमूहांत, अथवा अनेक कार्यव्यापृतत्वामुळें ज्यांस फुरसद मिळत नाहीं अशा मंडळींत, त्रिकाळ स्नान करण्याची चाल अजिबात बंद झाली आहे. इतकेंच नाहींतर, त्यामानानें त्रिकाळ, किंबहुना एक वेळच्याही स्नानसंध्येला बहुतेक फांटाच मिळाला आहे. तथापि, सुदैवेंकरून, तो क्रम अजिबात नाहिंसा झाला नाहीं.

शारीरिक श्रम.

असो. प्रातःस्नान झाल्यावर संध्यादिविधि आटपून, सूर्याराधनेसाठीं कोणी यथाशक्ति नमस्कार घालतात. हे नमस्कार घालण्याचा हेतु केवळ शरीर-व्यायामच होय. कोणत्याही प्रकारचें दृढतर बंधन असल्याखेरीज, अवश्यकतेची गोष्ट नियमित वेळानें कधींही होत नाहीं; आणि हा मानुषिक प्रकृतिदोषच जाणून, आमच्या स्मृतिकारांनीं नित्यक्रमांत सूर्याराधनेचें धर्मबंधन घातलें, व त्यायोगानें शारीरिक श्रम

नियमितपणानें होतील अशी व्यवस्था केली. त्याप्रमाणें आजपर्यंत बऱ्याच अंशानें ती सुरळीतपणें चालत आली. परंतु आतां, दिवसानुदिवस, नवीन होणाऱ्या प्रजेवरील धर्मबंधन अगदींच ढिलें होत गेलें आहे; किंबहुना तें बहुतेक तुटतच चाललें आहे, असें ह्मटलें तरी चालेल. ही धर्मावरील श्रद्धा शिथिल होत गेल्या कारणानें, ह्या आधुनिक प्रजेचें बरेंच नुकसान झालें असून, त्याचा दुष्परिणामही त्यांस भोगावा लागत आहे. तो असा कीं, त्यांचा नियमितपणा नाहिसा झाला; ते यद्वातद्वा वर्तूं लागले; शरीराची मेहेनत ते बिलकूल करीतनासे झाले; त्यामुळें त्यांस क्षीणता आली; आणि त्यांची प्रजा दुर्बल झाली. मानसिक श्रम आणि शारीरिक श्रम यांचा इतका कांहीं निकट संबंध आहे कीं, ते केवळ परस्परावलंबीच आहेत असें म्हटलें तरी चालेल. शरीरास दौर्बल्य आलें कीं मनालाही तें आपोआपच प्राप्त होतें. आणि शरीरसामर्थ्य वाढत गेलें ह्मणजे मनाची परिपक्वता, उन्नति, व विकास, हीं देखील त्याचप्रमाणानें वाढत जातात. ह्याचें ठळक उदाहरण म्हटलें म्हणजे, मागील इतिहास व सांप्रतची वस्तुस्थिति होय. जीं जीं बळवान् म्हणून राष्ट्रें होऊन गेलीं, किंवा हल्लीं आहेत, तींच विद्या, शास्त्र, व कलासंपन्न, अशीं दृष्टीस पडतात. आणि ज्यांचा शारीरिक पराक्रम

नाहीं, त्यांची मानसिकशक्ति देखील तितक्याच बेताची आढळून येते.

मानसिक व शारीरिकश्रमाचा निकट संबंध.

दक्षिण विद्याप्रसारक मंडळीचा बक्षीस समारंभ तारीख १७ आगष्ट सन १८८९ रोजीं झाला, तव्हां आपले लोकप्रिय माजी गव्हरनर लॉड रे यांनीं शारीरिक व मानसिक उन्नतीचा किती निकटसंबंध आहे, हें चांगल्याप्रकारें व्यक्त केलें. सदरहू गृहस्थ मोठें विद्वान्, बहुश्रुत, अनुभवी, आणि नामांकित मुत्सद्दी असल्यामुळें, त्यांचें म्हणणें तितक्यांच अंशानें विशेष सप्रमाण व वजनदार आहे, यांत बिलकूल संशय नाहीं. त्यानीं असें बोलून दाखविलें कीं:—

"I will put in the forefront what you have done to develop play ground life, which is so great an element in promoting a healthy tone among your boys. I always like to place corporal development along side of brain-development, because the former is essential to the growth of the latter. I have been told by Mr. Kirkham that there is no Hindu school in his division which has given such facilities to drill and gymnastics, as you have provided. To keep control of the mind over the body, and not to let the body control the mind, a careful selection of drill and gymnasties, in addition to cricket and swimming, should be entered into every school programme."

सकाळचा स्नानसंध्यानमस्कारादि विधि आटपल्यावर, दुसरें एक विशेष महत्वाचें कृत्य म्हटलें म्हणजे सायंप्रातः समिद्धोमानुष्ठान होय. हा होम सकाळीं व संध्याकाळीं असा दोन्ही वेळ करावा लागतो. परंतु तसा करण्यास अडजणच आल्यास, निदान दुपारचा वैश्वदेव तरी झालाच पाहिजे. हा होमविधि सुद्धां, फारच महत्वाचा असून, तो केवळ वैद्यशास्त्रास अनसरूनच आहे; आणि त्याचा मुख्य हेतु शरीरारोग्यता होय. ह्या होमांत तूप विशेष जाळावें लागतें. कारण, त्या योगानें हवा साफ होऊन गृहशुद्धि होते, व शरीरास आरोग्य जडतें. परंतु इतर बाबतीप्रमाणें, आम्ही ह्यांत देखील दुर्लक्ष्य करूं लागलों आहों, त्यामुळें आमचा हा वैश्वदेवविधि सुद्धां, बहुतेक संपुष्टांतच आल्यासारखा झाला आहे; तथापि तो अजिबात बुडाला नाहीं, हें लिहिण्यास फार आनंद वाटतो.

सायंप्रातः समिद्धोमानुष्ठान.

वैश्वदेव झाल्यानंतर पशु, पक्षी, कीड, मुंगी, किंवा पतित, इत्यादिकांस भक्ष्य मिळून त्यांचें पोषण व्हावें

---

१. उपनीय गुरुःशिष्यं शिक्षयेच्छौचमादितः ।
आचारमग्निकार्यंच संध्योपासनमेवच ॥ ६९ ॥
(म. स्मृ. अ. २)

अतिथी, आणि अ-भ्यागत, यांचा समाचार.

एतदर्थ, कांगोळी टाकण्याविषयीं स्मृतिवचन असून, अतिथि आणि अभ्यागत यांस आपल्या सामर्थ्यानुरूप भिक्षा घालावी, अथवा भोजन द्यावें, असेंही त्यांत सांगितलें आहे.

प्रात्यह्निक पंचमहा यज्ञ.

दर दिवसाच्या नित्यविधींत, ब्राम्हणांनीं एकंदर पांच महायज्ञ केले पाहिजेत, अशी मन्वाज्ञा आहे. हे पंचमहायज्ञ म्हटले म्हणजे खालीं लिहिलेले होतः–

---

१ शुनांच पतितानांच श्वपचां पापरोगिणाम् ।
वायसानां कृमीणांच शनकैर्निर्वपेद्भुवि ।। ९२ ।।

२ कृत्वैतद्बलिकर्मैवमतिथिं पूर्वमाशयेत् ।
भिक्षांच भिक्षवे दद्याद्विधिवद्ब्रम्हचारिणे ।। ९४ ।।
संप्राप्ताय त्वभितये प्रदद्यादासनोदके ।
अन्नंचैवयथाशक्तिसत्कृत्यविधिपूर्वकम् ।। ९९ ।।

(म. स्मृ. अ. ३)

३ भिक्षा म्हणजे एका घांसायेवढें अन्न होय. तथापि आपल्या शक्त्यनुरूप ह्यापेक्षां जास्त अन्न देण्यासही कांहीं प्रत्यवाय नाहीं. मात्र एक घांस अन्नापेक्षां ती भिक्षा कमी असूं नये, एतदर्थ हें केवळ प्रमाण मात्र सांगितलें आहे.

" ग्रास मात्रा भवेद् भिक्षा, " इतिशातातप वचनात् ।

४ अध्यापनं ब्रम्हयज्ञः पितृयज्ञस्तुतर्पणम् ।
होमो दैवो बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ।। ७० ।।

(म. स्मृ. अ. ३)

१ ब्रम्हयज्ञ (अध्ययन व अध्यापन), २ पितृयज्ञ (तर्पण), ३ देवयज्ञ (होम), ४ भूतयज्ञ (भूतबलि), आणि ५ मनुष्ययज्ञ (अतिथि पूजन).

जुन्या मताचे व श्रद्धावान् लोक हे पंचमहायज्ञ अजूनही रोज करतात.

खाद्यपेयादिनियम.

मद्यमांस निषेध.

खाण्यापिण्याचे नियम फारच चटकदार व थोडक्यांत सांगितले आहेत. ज्यापासून रोग उत्पन्न होऊन आयुष्यास अपाय होईल, असे पदार्थ खाऊं नयेत;[१] अति भोजन करूं नये; उष्टें कोणास देऊं नये, किंवा कोणाचें उच्छिष्ट खाऊं नये; अथवा तें कोठें सांडूं नये, व टाकूं नये.[२] मांसाशन, आणि मद्यपानें, हीं अगदीं वर्ज्य केलीं पाहिजेत.[३] तथापि, हा निषेध केवळ ब्राह्मणांसच लागू असून, इतर वर्णास

१ अनारोग्यमनायुष्यमस्वर्ग्यं चातिभोजनम् ।
अपुण्यं लोकविद्विष्टं तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥ ५७ ॥

२ नोच्छिष्टं कस्यचिद्दद्यान्नाद्याच्चैव तथान्तरा ।
नचैवात्यशनं कुर्यान्न चोच्छिष्टः क्वचिद्व्रजेत् ॥ ५६ ॥

३ वर्जयेद् मधुमांसंच गंधं माल्यं रसान्स्त्रियः ।
शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनांचैव हिंसनम् ॥ १७७ ॥

(म, स्मृ, अ, २)

तत्संबंधीं मोकळीक दिली असल्याचें दिसतें. तरी देखील, त्यांनीं त्यापासून अलिप्त राहिल्यास फारच हितावह; असें स्मृतिकार लिहितात.[1]

मनःसंयमन.

मनःसंयमन.

प्रत्येक मनुष्यानें आपल्या मनाचें संयमन, आणि चक्षुरादि बाह्येन्द्रियांचें दमन करण्याचा विशेष प्रयत्न केला पाहिजे.[2] एकंदर इंद्रियांपैकीं, फक्त एकच प्रबल राहिलें किंवा अनावर झालें तरी देखील, ते इतरांच्या सत्कृतीस हरताळ लावितें, आणि मनुष्याच्या दुष्कीर्तीस कारणीभूत होतें; इतकेंच नव्हे तर, तें त्याचीं प्रज्ञासुद्धां अगदीं जायां करून टाकतें.[3] मग सर्वच इंद्रियें बेफाम झालीं तर तीं केवढा प्रलय करतील बरें ?

ह्या भूतलावर जेवढे ह्मणून विषय आहेत, मग ते श्रुतिविषय असोत किंवा दृष्टिविषय असोत, रसनाविषय

---

१ न मांसभक्षणे दोषो न मद्ये नच मैथुने ।
प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ ५६ ॥
(म. स्मृ. अ. ५)

२ इन्द्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु ।
संयमेयत्नमातिष्टेद्विद्वान्यन्तेव वाजिनाम् ॥ ८८ ॥

३ इंद्रियाणां तु सर्वेषां यद्येकं क्षरतींद्रियम् ॥
तेनास्य क्षरति प्रज्ञा दृतेः पादादिवोदकम् ॥ ९९ ॥
(म. स्मृ. अ. २)

"शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध, इत्यादि विषय, व त्यांचा परित्याग.

असोत अथवा स्पर्शविषय असोत, गंधविषय असोत यद्वा कामविषय असोत, त्यांचा केवळ यथेष्ट उपभोग घेतल्यानेंच मनाची शांति कधींहीं होत नाहीं. उलट त्याची लालसा उत्तरोत्तर वाढत[1] मात्र जाते. आणि ह्या संवकलेल्या अभिरुचीस जर वेळींच अटकाव झाला नाहीं, तर ती अनावर होऊन, त्याचा भयंकर परिणाम भोगावा लागतो. सबब आपल्या एकंदर विषयवासनांस मर्यादेंत ठेवणें अगदीं अवश्य[2] आहे. परंतु त्या सर्व एकदमच टाकून देऊन, त्यांचा त्याग होण्यासारखा[3] नाहीं. फक्त वारंवार विचार करून, आणि मनाची प्रवृत्ति बदलूनच, त्यांचा लोप होण्याचा संभव आहे. या करितां प्रत्येक मनुष्यानें, आपलीं इंद्रियें आपल्या ताब्यांत राहतील, असा **भगीरथ** प्रयत्न जरूर केला पाहिजे. कारण, त्यापासूनच सर्व कार्यांची सिद्धि होणारी[4] आहे.

---

१ न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ ९४ ॥

२ यश्चैतान्प्राप्नुयात्सर्वान्यश्चैतान्केवलांस्त्यजेत् ।
प्रापणात् सर्वकामानां परित्यागो विशिष्यते ॥ ९५ ॥

३ न तथैतानि शक्यंते संनियंतुमसेवया ।
विषयेषु प्रजुष्टानि यथाज्ञानेन नित्यशः ॥ ९६ ॥

४ वशे कृत्वेंद्रियग्रामं संयम्यच मनस्तथा ।
सर्वान्संसाधयेदर्थानाक्षिण्वन्योगतस्तनुम् ॥ १०० ॥
(म. स्मृ. अ. २)

द्यूत किंवा जुगार खेळणें, निरर्थक वाक्कलह करणें, दुसऱ्याची निन्दा करण्याच्या हेतूनें निष्कारण विवाद चालविणें, खोटें बोलणें, सानुरागानें परस्त्रीकडे पाहणें, आणि दुसऱ्याला अपकार करण्याची इच्छा धरणें, इत्यादिकांचा सुविचारानें मनःसंयमन करून, आपण त्याग केला पाहिजे, अशी ही स्मृतिकारांची आज्ञा आहे.

लोकशिक्षण.

लोकशिक्षण.

अध्ययन आणि अध्यापन करण्याविषयीं आमच्या स्मृतिकारांचा मोठा कटाक्ष आहे. **ब्राम्हण, क्षत्रिय, आणि वैश्य,** या तीन वर्णांनींच अध्ययन करण्याचें आहे. परंतु अध्यापन करण्याचा अधिकार मात्र केवळ **ब्राह्मणांचाच** असून, तो **क्षत्रिय व वैश्य** ह्यांस दिलेला नाहीं.

अध्ययन करणें तें प्रथमतः **वेदांचेंच** केलें पाहिजे.

---

१ द्यूतं च जनवादंच परिवादं तथानृतम् ।
स्त्रीणांच प्रेक्षणालम्भमुपघातं परस्यच ॥ १७९ ॥
(म. स्मृ. अ. २)

२ अधीयीरंस्त्रयोवर्णाः स्वकर्मस्था द्विजातयः ।
प्रब्रूयाद्ब्राह्मणस्तेषां नेतराविति निश्चयः ॥ १ ॥
(म. स्मृ. अ. १०)

३ वेदमेव सदाभ्यसेत्तपस्तप्स्यन् द्विजोतमः ।
वेदाभ्यासोहि विप्रस्य तपः परमिहोच्यते ॥ १६६ ॥
(म. स्मृ. अ. २)

वेदांचें अध्ययन व त्याचें कारण.

वेदाध्ययन न करतां आरंभींच अन्यत्र[1] परिश्रम केल्यास, तत्संबंधीं स्मृतिकारांनीं मोठा दोष सांगितला आहे. आतां अगोदर वेदांचेंच अध्ययन करण्यास सांगितलें याचा तरी मुख्य हेतु हाच कीं, वेद हे अखिल धर्माचें मूळ असून, केवळ त्यांच्याच प्रमाणावर स्मृतिशास्त्र, साधुपुरुषांचे आचार, आणि आत्मसंतोष, यांची घटना झाली असल्यामुळें, तदवलोकनाशिवाय गत्यंतरच नाहीं. शिवाय, वेदाध्ययनाखेरीज आत्मोन्नतीला दुसरें

---

१ योऽनधीत्य द्विजोवेदमन्यत्र कुरुते श्रमम् ।
सजीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥ १६८ ॥

२ वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ।
आचारश्चैव साधुनामात्मनस्तुष्टिरेव च ॥ ६ ॥
(मं. स्मृ. अ. २)

3 "But I claim even more for the Vedànta, and I recommend its study, not only to the candidates for the Indian Civil Service, but to all true students of philosophy. It will bring before them view of of life, different from all other views of life which are placed before us in the History of philosophy. You saw how behind all the Devas or gods, the authors of Upanishadas discovered the Atman or Self. Of that Self they predicated three things only, that it is, that it perceives, and that it enjoys eternal bliss." (What can India teach us ? P. 251. First Edn.)

3 मनुस्मृति. अ. ४. श्लोक १४७, १४८, १४९.

विशेष श्रेयस्कर असें साधनही नाहीं. आमच्या धर्माची भव्य आणि टोलेजंग इमारत वेदाच्या सखोल व मजबूत पायावरेंच रचली असून, आमच्या तत्वविचाराचा निर्झर ही त्या खाणींतूनच निघाला आहे. एकंदरींत, आमच

1 "These three Beyonds" (I. the Devas or Gods, II. the Pitris or Fathers, and III. the Rita or the Moral Laws of Nature, the eternal law of Right and Reason) "are the three revelations of antiquity; and it is due almost entirely to the discovery of the Veda that we, in this nineteenth century of ours, have been allowed to watch again these early phases of thought and religions, which had passed away long before the beginnings of other literatures. In the Veda an ancient city has been laid bare before our eyes which, in the history of all other religions, is filled up with rubbish, and built over by new architects. Some of the earliest and most instructive scenes of our distant childhood have risen once more above the horizon of our memory which until thirty or forty years ago, seemed to have vanished for ever."

(What can India teach us ? P. 244).

2 "Only a few words more to indicate at least how this religious growth in India contained at the same time the germs of Indian philosophy. Philosophy in India is, what it ought to be, not the denial, but the fulfilment of religion ; it is the highest religion, and the oldest name of the oldest system of philosophy in India is Vedànta, that is, the end, the goal, the highest object of the Veda.'

(What can India teach us ? P. 244).

धर्माचरण व संस्कार, आचार व विचार, नीति व सत्ता, राजकार्यधुरीणता व व्यवहारकुशलता, या सर्वांचें वेद हे जणूं काय शक्तिस्थानच होऊन राहिले आहेत. सबब, अशी जी अमूल्य ग्रंथसंपत्ति, तिच्याविषयीं मूळपासूनच

---

1 "To the present day India acknowledges no higher authority in matters of religion, ceremonial, customs, and law, than the Veda, and so long as India is India, nothing will extinguish that ancient spirit of Vedàntism which is breathed by every Hindu from his earliest youth, and pervades in various forms the prayers even of the idolater, the speculations of the philosopher, and the proverbs of the beggar."

2 "It is easy to make light of this, and to ask, as some statesmen have asked, even in Europe. What has religion, or what has philosophy, to do with politics ? In India, in spite of all appearances to the contrary, and notwithstanding the indifference on religious matters so often paraded before the world by the Indians themselves, religion, and philosophy too, are great powers still. Read the account that has lately been published of two native statesmen, the administrators of two first-class states in Sauràshtra, Junágadh and Bhávnagar, Gokulji and Gaurishankar, and you will see whether the Vedanta is still a moral and a political power in India or not."

(What can India teach us ?
P. P. 250 251).

अज्ञातवासांत राहणें बिलकुल हितावह नाहीं. आणि याच गोष्टीवर दूरदृष्टि देऊन वेदाध्ययन प्रथमतःच केलें पाहिजे, असें धर्मबंधन आमच्या पूर्वजांनीं घातलें.

वेद आणि वेदांगें, यांतील विषय.

वेदांत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्ववेद, यांचा समावेश होत असून, वेदांगें ह्मणून ज्यांला संज्ञा आहे, त्यांत १ शिक्षा, २ छंदस्, ३ व्याकरण, ४ निरुक्त, ५ ज्योतिष, व ६ कल्प, हीं मोडतात. प्रत्येक वेदाची संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें, उपनिषदें, आणि सूत्रें, हीं भिन्नभिन्न असून, संहितेंत मूलमंत्र, ब्राम्हणांत मंत्रविधि, आरण्यकें व उपनिषदें, यांत पारमार्थिक विचार, आणि सूत्रांत एकंदर संस्कारतंत्र सांगितलें आहे. ह्यावरून वेद, व वेदांगें, यांची व्यापकता सहजीं लक्षांत येऊन, त्यांचेंच अध्ययन प्रथमतः करावें म्हणून जी मन्वाज्ञा आहे, तिची सार्थकता भासेल.

सदहूवरून, फार प्राचीन काळीं सुद्धां, लोकशिक्षणा-

---

1 "But I do believe that not to know what a study of Sanskrit, and particularly a study of the Veda, has already done for illuminating the darkest passages in the history of the human mind, of that mind on which we ourselves are feeding and living, is a *misfortune*, or at all events *a loss.*" * * *

(What can India teach us ? P. 255.)

विषयीं आम्हा हिंदूंची किती उत्कट इच्छा होती, याचें दिग्दर्शन झाल्यावांचून खचित राहणार नाहीं.

आतां, शिक्षण कोणास द्यावें, याविषयीं देखील थोडक्यांत विवेचन केलें आहे; आणि तें भलत्यालाच न देतां, केवळ सत्पात्रींच द्यावें, एतद्विषयीं पूर्ण कटाक्ष आहे. शिक्षणानुग्रहास खालीं लिहिलेले इसम मात्र पात्रें आहेत:—

शिक्षणानुग्रहाची पात्रता.

१ आचार्यपुत्र, २ सेवक, ३ ज्ञानदाता, ४ धार्मिक, ५ पवित्र, ६ आप्त, ७ ग्रहणधारणसमर्थ, ८ धनदाता, ९ हितेच्छु, आणि १० ज्ञातिवर्ग किंवा सोयरा.

विद्यार्जनाविषयीं प्राचीन काळासारखेंच जर आम-

---

1 "Now so far from withholding it, the Brâhmans have always been striving, and often striving invain, to make the study of their sacred literature obligatory on all castes, except the Sudras, and the passages just quoted from Manu show what penalties were threatened, if children of the second and third castes, the Kshatriyas and Vaisyas, were not instructed in the sacred literature of the Brahmans."

(What can India teach us ?

P. P. 142-143).

२ आचार्यपुत्रः शुश्रूषुर्ज्ञानदो धार्मिकः शुचिः ।
आप्तः शक्तोऽर्थदः साधुः स्वोऽध्याप्या दश धर्मतः ॥ १०९ ॥

(म. स्मृ. अ. २)

विद्यार्जनाविषयीं आमची अनास्था, व सद्यःस्थिति.

ची सांप्रत इच्छा असती तर, आम्ही इतक्या निकृष्ट दशेप्रत खचित् पोहोंचलों नसतों. केवळ ज्ञानासाठींच विद्यार्जन, असें हल्लीं क्वचित् दृष्टीस पडतें. त्यामुळें ज्ञाननिर्झर विसृत न होता, तो जेथल्या तेथेंच मुरतो. तथापि ही सुदैवाची गोष्ट आहे कीं, तो अजीच ठणठणीत कोरडा पडत नाहीं. मधून मधून त्याला बराच ओलावा व पाझर फुटत जाऊन, तो इतस्ततः वाहत असल्याचें दृष्टिगोचर होतें.

तत्संबंधीं प्राचीन स्थिति.

पूर्वी, ज्या प्रमाणानें विद्याभ्यासंगाची आर्यावर्त्तांत हौस होती, त्याच मानानें शिक्षणपद्धति देखील पूर्णदशेस आली होती. आणि अध्ययन व अध्यापन

1 "At this day, Bràhman colleges, called Tols, are carried on without fees on the old model, at Nadiyà in Bengal, and elsewhere. The modern visitor to these retreats can testify to the stringent self-descipline, and to the devotion to learning for its own sake, often protracted till past middle-life, and some-times by gray-haired students."

(Dr. Hunter's History of the Indian Empire. P. 96).

2 "The art of teaching had even at that early time been reduced to a perfect system."

(What can India teach us ? P. 214).

याविषयीं मनुस्मृतींत जो वारंवार उल्लेख दृष्टीस पडतो, त्यावरून तत्कालीन शिक्षण पद्धतीचें एकंदर स्वरूप ध्यानांत येतें.

अभिवादन.

कोणी कशा प्रकारें अभिवादन करावें, अशाविषयीं सविस्तर नियम[1] सांगितले आहेत. त्यांपैकीं मुख्य मुख्य व महत्वाचे मात्र येथें देतों.

अभिवादनविधि.

ब्राह्मणाला[2] 'कुशल' विचारून, क्षत्रियाला 'अनामय,' वैश्याला 'क्षेम,' आणि शूद्राला 'आरोग्य' पुसावें. व, परस्परांची भेट झाल्यानंतरचा हा प्रथमविधि होय.

मातृपक्षीय, पितृपक्षीय, श्वशुर, ऋत्विज, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, आणि गुरु, इत्यादि जे जे आपल्याहून वडील असतील, त्यांस उत्थापन देण्याविषयीं स्मृति-

श्रेष्ठत्वाचें मूल, विद्या आणि गुण, इत्यादि होत.

१ मनुस्मृति. अ. २ श्लो. ११९, १२२, १२३, १२४, १२५, १२६, १२८, १२९, १३० ते १३७.

२ ब्राह्मणं कुशलं पृच्छेत् क्षत्रबंधुमनामयम् ।
वैश्यं क्षेमं समागम्य शूद्रमारोग्यमेवच ॥

(म. स्मृ. अ. २ श्लो. १२७)

कार लिहितात. मात्र इतकेंच कीं, केवळ वयोवृद्ध असल्यामुळें, शुभ्रकेस झाल्याकारणानें, धनवान् ह्मणून, अथवा नातलग आहे एतदर्थच, कोणीही मानास पात्र नसून, जो वेदाध्ययन करणारा, आणि विद्वान्, तोच मोठा होय.

ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व ज्ञानानें समजावयाचें असून, क्षत्रियांचें वीर्यानें, वैश्याचें धनधान्येंकरून, आणि शूद्राचें पूर्वजन्मानें समजावयाचें आहे. ज्ञान, शौर्य, संपत्ति, इत्यादि गुणाशिवाय, वाचा आणि मन, हीं देखील पवित्र असलीं पाहिजेत. कारण, सर्व प्राप्तीचें स्थानें त्यांतच, ह्मणजे शुद्ध मन असल्यांतच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ब्राह्मणाच्या घरीं कोणीही येवो, मग तो क्षत्रिय

---

१ मातुलांश्च पितृव्यांश्च श्वशुरानृत्विजो गुरून् ।
असावहमितिब्रूयात्प्रत्युत्थाय यवीयसः ॥ १३० ॥

२ न हायनैर्नपलितैर्नवित्तेन न बंधुभिः ।
ऋषयश्चक्रिरे धर्मं योऽनूचानः सनोमहान् ॥ १५४ ॥

३ विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यं क्षत्रियाणां तु वीर्यतः ।
वैश्यानां धान्यधनतः शूद्राणामेव जन्मतः ॥ १५५ ॥

४ यस्य वाङ्मनसी शुद्धे सम्यग्गुप्तेच सर्वदा ।
सवै सर्वमवाप्नोति वेदान्तोपगतं फलम् ॥ १६० ॥
(म. स्मृ. अ. २)

५ यदि त्वातिथि धर्मेण क्षत्रियो गृहमाव्रजेत् ।
भक्तवत्सूक्तविप्रेषु कामं तमपि भोजयेत् ॥ १११ ॥
(म. स्मृ. अ. ३८)

अतिथींचें आदरातिथ्य, व

असो अथवा वैश्य[1] असो, शूद्र असो किंवा अन्य[2] कोणी असो, तथापि त्याचा योग्य आदरसत्कार करून त्याला त्याच्या नोकरचाकरांसहित भोजन घातलें पाहिजे. तसेंच सुवासिनी[3] व कुमारी, गर्भिणी आणि रोगी, इत्यादिकांस देखील अतिथींच्या अगोदर वाढून, त्यांस मोकळें केलें पाहिजे.

तत्कालीन सुधारणेचें दिग्दर्शन.

मार्गस्थ असल्यावर कोणी कोणाला वाट द्यावी, याविषयीं फार विचारपूर्वक आणि पोक्त नियम केले असल्याचें दिसून येतें. रथारूढ, वृद्ध, रोगी, ज्याच्या डोक्यावर भार आहे तो, स्त्रीजन, वर, स्नातक, व राजा, ह्या सर्वांस इतरांनीं मार्ग दिला[4] पाहिजे. ह्यावरून तत्कालीन स्थितीचें, सुधारणेचें, आणि रीतिभातीचें सुरेख चित्र

---

१ वैश्यशूद्रावपि प्राप्तौ कुटुंबेऽतिथिधर्मिणौ ।
भोजयेत्सह भृत्यैस्तावानृशंस्यं प्रयोजयन् ।। ११२ ।।

२ इतरानपिसंख्यादीन्संप्रीत्या गृहमागतान् ।
सत्कृत्यान्नं यथाशक्ति भोजयेत्सह भार्यया ।। ११३ ।।

३ सुवासिनीः कुमारीश्च रोगिणो गर्भिणीः स्त्रियः ।
अतिथिभ्योऽग्र एवैतान्भोजयेदविचारयन् ।। ११४ ।।
(म. स्मृ. अ. ३)

४ चक्रिणो दशमीस्थस्य रोगिणो भारिणः स्त्रियाः ।
स्नातकस्य च राज्ञश्च पन्थादेयो वरस्य च ।। १३८ ।।
(म. स्मृ. अ. २)

दिसत असून, हिंदूंचें प्रकृतिसौजन्य, आदर, आणि आतिथ्य, हीं उत्तम प्रकारें प्रकाशित होतात.

स्त्रीधर्म.

स्त्रीधर्म. स्त्रीधर्माचा विचार करतांना, त्यांत कित्येक अतिशय महत्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव होतो. स्त्रीधर्मांत, स्त्रियांची पुरुषांविषयीं जी इतिकर्तव्यता, तिचाच केवळ समावेश होतो असें नाहीं. तर, पुरुषांचें स्त्रियांविषयीं जें कर्तव्यकर्म, त्याचीही त्यांत परिगणना होते. पुरुषांची स्त्रियांविषयीं मुख्य इतिकर्तव्यता ह्मटली ह्मणजे स्त्रीसंगोपन असून, स्त्रियांची इतिकर्तव्यता ह्मटली ह्मणजे पतिसेवा, व पुत्रकल्याण होय.

अबलारक्षण, व परकीयांची तत्संबंधी चुकीची समज. स्त्रियांचें सर्वथा संरक्षण करण्याविषयीं जी मन्वाज्ञा आहे, ती त्यांचा अभरवंसा, अशा हेतूनें बिलकुल नसून, स्त्रिया केवळ अबला, एतदर्थच त्यांच्या संगोपनार्थ, विशेष काळजीपूर्वक तजवीज केल्याचें दिसतें. कारण, तसें नसतें तर, स्त्रियांविषयीं अत्युदार विचार, स्मृतिकारांनीं कधींही प्रदर्शित केले नसते; किंवा त्यांची त्यांनीं

1 "The admirable text" (of Manu) "On the laws of hospitality." says Todd in his history fo Rájasthan. P, 551.

योग्य अशी प्रशंसा देखील केली नसती. परंतु, ज्यापेक्षां आमच्या भरतखंडांत स्त्रियांविषयीं विशेष आदर दृष्टीस पडतो, त्यापेक्षां आमच्या स्त्रियांची स्थिति खरोखर विचार करण्यासारखी आहे. आणि आमच्या गृहस्थितीविषयीं, अथवा अबलाजनासंबंधीं, परद्वीपस्थांची जी चुकीची समज झाली आहे, त्याहून वस्तुस्थिति अगदीं भिन्न आहे, यांत तिळमात्रही शंका नाहीं.

भरतखंडांतील अबलांविषयीं लिहितांना, मुख्यत्वें-

---

1 "Most erroneous ideas have been formed of the Hindu female from the pictures drawn by those who never left the bank of the Gangese. They are represented as degraded beings, and that not one in many thousands can even read."

(Tods' Rajasthan P. 551).

"The superficial observer who applies his own standard to the customs of all nations, laments with an affected philanthropy the degraded condition of the Hindu female, in which statement he would find little disposed to join. He particularly laments her want of liberty, and calls her seclusion imprisonment. Although I cordially unite with Ségur, who is at issue with his compatriat Montesquien on this part of discipline, yet from the knowledge I do possess of the freedom, the respect, the happiness, which Rajput women enjoy, I am by no means inclined to deplore their state as one of captivity."

(Tods' Ràjasthan P. P. 523/524.)

करून खालीं निर्दिष्ट केलेल्या गोष्टींचा चांगला आणि दूरवर शोध करून, तत्संबंधीं ऐतिहासिक प्रामाण्यें पाहिलीं पाहिजेत. व तीं निःपक्षपातानें आणि पूर्णपणें अवलोकन केलीं तरच हिंदूंचें १ स्त्रीवात्सल्य, २ स्त्रीसंरक्षण, ३ लग्नकाल, ४ अनुरूपवर, ५ पतिसेवा, ६ संततिशिक्षण, आणि ७ स्त्रीप्रभाव, इत्यादिसंबंधीं खरी कल्पना होऊन, त्यांची गृहस्थिति लक्ष्यांत येण्यासारखी आहे. नाहींपेक्षां, अविचारानें "साप साप" ह्मणून, हिंदुसमाजस्थितीला हवें त्यानें धोपटावें, यासारखी आणखी शोचनीय आणि दुःखद स्थिति ती कोणती!

स्त्रीवात्सल्य.

स्त्रीवात्सल्य.

हिंदु धर्मांत स्त्रियांविषयीं जितका आदर प्रकट केलेला दृष्टीस पडतो, तितका अन्य धर्मांत फारच विरळा आढळून येतो. मानवी उन्नतीला मुख्यत्वेंकरून स्त्रीच कारण आहे, हें तत्व आमच्या पूर्वजांच्या लक्षांत पूर्णपणें येऊन चुकलें होतें असें दिसतें.

त्यांची प्राचीन स्थिति.

अति पुराण अशा वेदकालीं, ह्मणजे सुमारें सात आठ हजार वर्षांपलीकडे देखील, स्त्रियांचें उचितस्वातंत्र्य, त्यांजविषयीं उदारवृत्ति, आणि त्यांच्या ठायीं मनोहर

वात्सल्य दिसून येतें. मन मोकळें असल्याशिवाय मनाची उल्हासवृत्ति कधींही राहत नाहीं, आणि मनाला आल्हाद वाटल्याखेरीज, मनाची प्रफुल्लता व उन्नता होण्याचा मुळींच संभव नसतो. पुराणकाळीं स्त्रियांच्या ठिकाणीं पुरुषांचा फार आदर आणि भक्ति असे. त्यामुळें स्त्रियांचे व पुरुषांचे हक्क बरोबर आणि समान समजून, हरतऱ्हेच्या ज्ञानार्जनांत पुरुष हे स्त्रियांस अवश्य वांटेकरी करीत; लालनपालनांत ते त्यांस सहभागीदार समजत; व प्रत्येक बाबतींत त्यांस संतोषी राखीत. या कारणानें त्यांचें ज्ञान वाढत गेलें; त्यांच्या मनाची आपोआपच प्रगल्भता झाली; आणि तत्वज्ञानासारख्या सखोल व गहन विषयांत देखील चर्चा करण्याचें त्यांच्यांत मोठें सामर्थ्य आलें.

वेदकालांतील.

1 The free position held by women at this time is remarkable. We find songs of the most exquisite kind attributed to poetesses and queens, among whom the daughter of Atri appears in the foremost rank. As regards love, its tender, ideal element is not very conspicuous ; it rather bears throughout the stamp of an undisguised natural sensuality. Marriage is, however, held sacred ; husband and wife are both rulers of the house (dampati); and approach the gods in united prayer."

(The History of Indian Literature by Prof. A. Weber 2nd. Edn. P. 38.)

2 "We must at any rate assume among the Brah-

(पुढें चालू)

वेदकालानंतर स्मृतिकालांत देखील स्त्रियांविषयीं तेंच आदरातिथ्य दिसून येतें. बायकांचा सत्कार देवतांस देखील प्रिय असून, त्यांच्या ठिकाणीं जर कांहींच आदर दाखविला नाहीं तर आपल्या सर्व क्रिया नष्ट होतात, व ह्मणूनच त्या सदैव पूजनीय आहेत असें स्मृतिकार लिहितात.

स्मृतिकालांतील.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

mans of this period a very sterring intellectual life, in which even the *women took* an active part, and which accounts still further for the superiority maintained and exercised by the Brâhmans over the rest of people. * * Bràhmans who with lively emulation carry on their enquiries into the highest questions the human mind can propound; women who with enthusiastic ardour plunge into the mysteries of speculation, impressing and astonishing men by the depth and loftiness of their opinions, and who solve the questions proposed to them on sacred subjects." [H. I. L. P, P. 21/22.]

१ पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥ ५५ ॥

२ यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ५६ ॥

३ तस्मादेताः सदापूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषुच ॥ ५९ ॥

(पुढें चालू)

स्त्रियांचें दर्शन फार सौभाग्यदायक व पवित्र आहे. आणि त्यांचे मनुष्य जातीवर महदुपकार आहेत. प्रत्येक राष्ट्राची उन्नति, त्याची संस्थिति, आणि त्याची चढती व उतरतीकळा, हीं केवळ त्यांच्यावरच अवलंबून असतात. ज्या ज्या ठिकाणच्या स्त्रिया सुशिक्षित, सदाचारी, सद्गुणी आणि नीतिमान आहेत, त्या त्या ठिकाणीं त्यांचेच गुण प्रजेंत प्रतिबिंबित होतात, व ती सुसंपन्न राहते. यासाठीं, स्त्री ह्मणजे राष्ट्राचे अलंकार, रयतेची अधिष्ठात्री देवता, पुढील संततीची मार्गोपदेशक, आपल्या गृहाची शोभा, आणि पतीचा केवळ नयनोत्सवच असून, तिच्याशिवाय दुसरी आल्हादकारक, पूजनीय, व प्रजोन्नति करणारी कोणतीही वस्तु नाहीं, असें आमचे पूर्वज पूर्णपणें समजून असत.

यावरून इतकें कोणाच्याही लक्षांत येऊन चुकेल कीं,

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

स्त्रियांतुरोचमानायां सर्वंतद्रोचते कुलम् ।
तस्यांत्वरोचमानायां सर्वमेव न रोचते ॥ ६२ ॥

(म. स्मृ. अ. ३)

१ नित्यमास्यंशुचिस्त्रीणाम् ॥

(म. स्मृ. अ. ५, श्लो. १३०)

२ प्रजनार्थम् महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन ॥ २६ ॥

(म. स्मृ. अ. ९)

आम्ही आपल्या बायकांस गुलाम किंवा दासीप्रमाणें बिलकुल मानीत नाहीं. इतकेंच नाहीं तर, आम्ही त्यांस सहधर्मिणी, व सहकारिणी समजतों; आम्ही त्यांचा सन्मान ठेवितों; आणि त्यांच्याशीं हरएक प्रसंगी आह्मीं आदरपूर्वक वर्ततों. यासंबंधानें, परकीयांचे तद्विरुद्ध जे उद्गार आमच्या कानीं पडतात, किंवा वाचण्यांत येतात, ते केवळ एकदेशीय, चुकीचे, आणि अतिशयोक्तीचे असून, ती गोष्ट परद्वीपस्थ[3] देखील कबूल करतात.

1 "The women in the Maràtha country are well treated; they are the help-mates, but by no means the slaves, of their husbands; nor are they in the degraded state in which some travellers have described the condition of the women in other parts of India."

[Grant Duffs' History of the Marathas. P. 8.]

2 "But, deeply as I feel for an Indian woman's sorrows, I cannot ignore her joys, and I certainly am able to have a more kindly sentiment towards the nation as a whole, because I have seen happy wives and happy mothers in India, and because I believe in happy Indian homes,"

[Lady Dufferins' article in the Nineteenth century].

3 _ Todds' Rájasthan. Volume I P. P. 551. 523 524.

स्त्रीसंरक्षण.

स्त्रियांचें संरक्षण[1] लहानपणीं बापानें करावें, मोठेपणीं नवऱ्यानें करावें, आणि म्हातारपणीं, किंवा स्त्रीला वैधव्य प्राप्त झाल्यावर मुलग्यानें करावें. याप्रमाणें कौमार, यौवन, आणि वृद्धावस्थेंत जर पिता, पति, व पुत्र आपापली इतिकर्तव्याता बजाविणार नाहींत, तर, ते खचीत निंदेस[2] पात्र होतील.

स्त्रियांचें रक्षण करण्याच्या संबंधानें पिता, पति, व पुत्र, यांची इतिकर्तव्यता.

कुसंगतीपासून स्त्रियांचें सदैव अवश्य रक्षण[3] केलें पाहिजे. कारण, तसें न केल्यामुळें त्यांचें वांकडें पाऊल पडलें तर, सासरच्या व माहेरच्या कुळास निरंतरचा बट्टा लागणारा आहे: म्हणून असा कलंक लागण्याचें ज्या उपायांनीं टळेल, त्या उपायांचें अवलंबन निरंतर केलेंच पाहिजे. हे उपाय[4] म्हटले म्हणजे पतीच्या ठिकाणीं

---

१ पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षंति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ ३ ॥

२ कालेऽदाता पिता वाच्यो वाच्यश्चानुपयन्पतिः ।
मृते भर्तरि पुत्रस्तु वाच्यो मातुररक्षिता ॥ ४ ॥

३ सूक्ष्मेभ्योऽपि प्रसंगेभ्यः स्त्रियोरक्ष्या विशेषतः ।
द्वयोर्हि कुलयोः शोकमावहेयुररक्षिताः ॥ ५ ॥

४ अर्थस्य संग्रहेचैनां व्ययेचैव नियोजयेत् ।
शौचेधर्मेऽन्नपक्त्यांच पारिणाह्यस्यचेक्षणे ॥ ११ ॥

(म. स्मृ. अ. ९)

कडकडीत निष्ठा, त्याची उत्तम प्रकारची सेवा, संसारकृत्यांत योग्य दक्षता, स्वधर्माचरण, आणि शुद्ध वर्तन, हे होत. ज्या गोष्टींपासून दुष्ट परिणाम घडून येणार आहेत, त्यांपासून अगदीं दूर व अलिप्त राहिलें पाहिजे, आणि मद्यपान, दुर्जनसंगति, पतिविरह, इतस्ततश्च परिभ्रमण, अकालनिद्रा, परगृहनिवास, इत्यादींचा सर्वथैव निषेध केला पाहिजे. कारण, " यथाबीजं तथांकुरः " हा सृष्टिधर्म पडल्याकारणानें, जितकी स्त्री पतिव्रता व शुद्ध राहील, तितक्याच मानानें पुढें होणारी प्रजा पण सदाचरणी, सदृढ, आणि निकोप निपजेल. सबब स्त्रीनें आपलें वर्तन फारच शुद्ध राखिलें पाहिजे, व ह्यासाठींच त्यांचें संरक्षण करणें महत्वाचें आहे. आणि आत्मवर्तन शुद्ध ठेवण्याच्या संबंधानें जे नियम स्त्रियांस लागू आहेत, तेच पुरुषांसही लागू आहेत असें समजावयाचें.

---

१ पानं दुर्जनसंसर्गः पत्याच विरहोऽटनम् ।
स्वप्नोऽन्य गेहवासश्च नारीसंदूषणानि षट् ॥ १३ ॥

२ यादृशं भजतेहि स्त्री सुतं सूते तथा विधम् ।
तस्मात् प्रजाविशुध्यर्थं स्त्रियं रक्षेत् प्रयत्नतः ॥ ९ ॥
(म. स्मृ. अ. ९)

३ परदाराभिमर्शेषु प्रवृत्तान्नॄन्महीपतिः ।
उद्वेजनकरैर्दण्डैश्छिन्नयित्वा प्रवासयेत् ॥ ३५२ ॥
तत्समुत्थोहि लोकस्य जायते वर्णसंकरः ।
येनमूलहरोऽधर्मः सर्वनाशाय कल्पते ॥ ३५३ ॥
(म. स्मृ. अ. ८)

स्त्रियांविषयीं योग्य व सारासार विचार.

आतां निःपक्षपातानें आणि सरळबुद्धीनें विचार केला तर, स्त्रीसंरक्षणार्थ व भावि प्रजेच्या कल्याणार्थ, जें सदरीं निर्दिष्ट केलेलें बंधन आमच्या स्मृतिकारांनीं घालून ठेविलें, तें केवळ अन्यायाचें आहे, किंवा त्यामुळें भारतीय स्त्रियांचे सर्व हक्क, अथवा इष्ट स्वातंत्र्य नष्ट झालें, असें खचीत ह्मणतां येणार नाहीं. स्त्रियांस अबला समजून जितक्या बाबतींत त्यांचें गौणत्व दिसलें, तितक्याविषयींच जरूर तो संगोपनविधि सांगितला असून, जेव्हां जेव्हां त्या प्रशंसेस पात्र वाटल्या, तेव्हां तेव्हां त्यांजविषयीं पूज्यबुद्धि व त्यांचा मनुष्यमात्रावर झालेला उपकार[१], स्मृतिकारांनीं मोठ्या गौरवानें प्रदर्शित केला आहे.

मनुस्मृतींतील केवळ तुटक तुटक वचनें घेऊन, त्यांचा पूर्वापार संबंध ध्यानांत न आणितां, स्मृतिकारांवर उगीच शिव्यांचा भडिमार करणें, किंवा निरर्थक गालिप्रदान करीत सुटणें, कधींही प्रशस्त होणार नाहीं. तसेंच, त्यांच्या खऱ्या अभिप्रायाविषयीं पोक्त व दूरवर विचार न करतां, आमच्या स्त्रियांचें स्वातंत्र्य त्यांनींच नष्ट केलें असें प्रतिपादन करणें, अथवा आमच्या अबलांस त्यांनींच गुलाम बनवून ठेविलें, असें बरळणें, हें अगदींच

१ म. स्मृ. अ. ९. श्लो. २६.

विचाराचें नाहीं. इतकेंच नाहीं तर, अशा प्रकारची वृथा बडबड निःसंशय अज्ञानमूलक होय.

समजुतीची चूक.

कांहीं परद्वीपस्थ, व हिंदुधर्म दोषैकदृक्, यांचा विशेष कटाक्ष ' न स्त्री स्वातंत्र्य मर्हति ' या मनुवचनावर आहे. परंतु त्याचा वास्तविक अर्थ ह्मटला ह्मणजे इतकाच कीं, स्त्रियांस वाजवीपेक्षां जास्त स्वतंत्रता देणें, किंवा त्यांनीं तरी अशा अनुचित स्वतंत्रतेचा अभिलाष करणें, त्यांच्याच हिताच्या संबंधानें बिलकुल इष्ट नाहीं. " स्त्री ह्मटली ह्मणजे ती स्वतंत्रतेस अगदींच पात्र नाहीं, " असा सदरहू वचनाचा हेतु नसून, टीकाकारांनीं देखील त्याची तशीच अर्थयोजना केल्याचें दिसतें.

स्त्रियांची वृत्ति चंचळ असून, त्यांचे शारीरिक व अतएव मानसिक सामर्थ्य, पुरुषापेक्षां प्रायः कमीच असतें. आणि ह्मणूनच सारासार विचार, मनोनिग्रहशक्ति, व नीतिधैर्य, हीं त्यांच्यांत सर्व साधारणतः पूर्णत्वानें बहु-

---

१ म. स्मृ. अ. ९ श्लो. ३

२ कुल्लुकभट्टाचार्य हे आपल्या टीकेंत असें लिहितात कीं, " तस्मान्न स्त्रीकस्यांचिदप्यवस्थायां स्वातंत्र्यं भजेत् " ।
(म. स्मृति अ. ९. श्लो. ३. पान ४३२)

३ नैतारूपं परीक्षंते नासां वयसि संस्थितिः ।
सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुंजते ।। १४ ।।
(म. स्मृ. अ. ९)

तकरून कधींही वास करीत नाहींत. या करितांच, त्यांच्या संगोपनाविषयीं आमच्या स्मृतिकारांनीं विशेष काळजी घेतली असल्याचें दिसतें.

काहीं काहीं बाबतींत आमच्या भारतीय स्त्रियांची शोचनीयावस्था.

तथापि, सांप्रतची वस्तुस्थिति मनांत आणिली तर, कांहीं कांहीं बाबतींत आमच्या स्त्रियांची अवस्था खरोखर शोचनीय आहे, असें प्रांजलपणें कबूल करणें भाग पडतें. १ वैधव्य, २ एकांतवास, किंवा प्रतिबंध, आणि ३ तज्जन्य अज्ञान, इत्यादिकारणांनीं त्यांस दुःसह कष्ट भोगावे लागतात. इतकेंच नाहीं तर, त्यामुळें त्यांच्या उन्नतीस अपाय होऊन, त्याचा दुष्ट व भयंकर परिणाम एकंदर हिंदुराष्ट्रावर घडून आला आहे. व इतक्याच संबंधानें हिंदुस्मृतिकारांस आणि आर्यसुशीलतेस थोडेसें गौणत्व येऊं पाहतें, हें कोणालाही कबूल केलें पाहिजे.

एकांतवास, व केशवपन.

स्त्रियांचें सर्वप्रकारें संरक्षण करणें जरी इष्ट आहे, तरी त्याला कांहीं उचित मर्यादा पाहिजे. त्यांच्या पातिव्रत्याचा भंग होऊं नये एतदर्थ योग्य व्यवस्था, आणि अवश्य ते निमय केले पाहिजेत. तथापि, एकांत व आज्ञातवासापलीकडे देखील त्यांची मजल जाणें ह्मणजे, तो देहांत शिक्षेसारखा, निर्घृण दंडच समजावयाचा. अगो-

दर, वैधव्य हेंच स्त्रियांस पराकाष्ठेचें संकट होय. आणि त्यांत अशा गतभर्तृकांचें केशवपन करणें ह्मणजे दुःखावर डाग दिल्यासारिखें आहे. त्यांचा तो भव्य केशकलाप काढून टाकून त्यांस कुरूप करणें, किंवा दैन्यत्व आणणें, यासारिखें अश्लीलतेचें व क्रौर्याचें दुसरें कृत्य तें कोणतें? खरोखर, ही केशवपनाची चाल केवळ रानटी स्थितीची व्यंजक असून, ती आमच्या आर्योन्नतीस, आचारशिष्टतेस, व प्रकृतिसौजन्यास कालिमा आणिते.

सती. केशवपनासारखाच सती जाण्याचा दुष्ट प्रघात पूर्वी अमलांत होता. परंतु सुदैवानें तो आंग्लप्रभूंच्या कारकीर्दीत बंद झाला आहे. सती जाण्याची केशवपनासारखी सक्ती नसून, सती जाणें न जाणें, हें प्रत्येक मृतभर्तृकेच्या मर्जीवर अवलंबून असे. कित्येक प्रसंगी तर ह्या सती जाणाऱ्या स्त्रिया विलक्षण धैर्य व कृतनिश्चय दाखवीत.

सती जाण्याची चाल मनुकालांत बिलकुल नव्हती, असें

---

1 "Women go through all the ceremonies with astonishing composure and presence of mind, and have been seen seated, unconfined, among the flames apparently praying, and raising their joined hands, to their heads with as little agitation as their ordinary devotions."

(Elphinstones' History of India
P. 367 Vol. I.)

स्मृतिवचनावरूनच सिद्ध होतें. कारण, पतीच्या पश्चात् साध्वी स्त्रीनें कशा रीतीनें वर्तावें, याविषयींचें बंधनें मनूनें घातलें आहे. त्यावरून स्त्रीनें पतिसह गमन करावें, असा स्मृतिकारांचा मुळींच हेतु नसून, ही चाल मनूनंतर अनेक शतकांनीं प्रचारांत आली असावी, असें वाटतें.

अ स्त्रियांस प्रतिबंध, आणि एकांतवासाचें दुःख,

---

१ पाणिग्राहस्य साध्वी स्त्री जीवतो वा मृतस्यवा ।
पतिलोकमभीप्सन्ती नाचरेत्किंचिदप्रियम् ॥ १५६ ॥
कामं तु क्षपयेद्देहं पुष्पमूल फलैः शुभैः ।
नतु नामापि गृण्हीयात्पत्यौ प्रेते परस्यतु ॥ १५७ ॥
आसीतामरणक्षान्ता नियता ब्रह्मचारिणी ।
योधर्म एकपत्नीनां कांक्षन्ती तमनुत्तमम ॥ १५८ ॥
(म. स्मृ. अ. ५)

2 "The period at which this barbarous custom was introduced is uncertain. It is not alluded to by Manu, who treats of the conduct proper for faithful and devoted widows, as if there were no doubt about their surviving their husbands." * * It certainly is of great antiquity, as an instance is described by Diodorus (who wrote before the birth of Christ) and stated to have occurred in the army of Eumenes upwards of 300 years before our (Christian) "Era."

(Elphinstones' History of India
P. 364. Vol. I.)

"But Manu inculcates no such doctrine ; " *i. e.* of Satti.

(Tods' Rajasthan. Vol. I. P. 545.)

इस्लामशाही, व तज्जन्य स्त्रीप्रतिबंध.

हल्लींप्रमाणें मनूच्या वेळीं, किंवा त्यापूर्वीं, बिलकुल नव्हतें, असें अंतर्गत प्रमाणांवरून निश्चयात्मक ठरतें. हें यंत्रण केवळ परकीयांच्या सहवासाचेंच[1] फल असून, भरतखंडांत इस्लामशाहीचा अम्मल सुरू झाल्यावर, मुसलमान लोकांनीं स्वस्त्रीजनसंबंधानें जो पडद्यांतील रिवाज सुरू केला, त्याचेंच आम्हीं, संसर्गदोषप्राबल्यानें, हळूहळू अनुकरण केलें, यांत तिळमात्रही संशय नाहीं. वेदकालांत, व तदनंतर, आमच्या स्त्रियांस पूर्ण स्वातंत्र्य[3]

1 "A custom" (of restraint) "attributable to the paramount dominion of the Mahomedans, from whose rigid system the Hindus have borrowed."

(Tods' Rajasthan. Vol I. P. 551).

2 "This observance " (of the ladies being veiled) "they [the Hindus) probably adopted, in the first instance, from the Decconee Mussalmans or the Mogals." * *

(History of the Maráthás. Grant Duff. P. 8. Third Edition. 1873.)

"You are well aware, that, as a body, the ladies of Sardàrs are secluded, not according to your own ancient Hindu usage but according to a comparatively modern fashion, derived from the Mahomedans."

(Speech of H. E. Sir Bartle Frere).

3 "The free position held by women at this time is remarkable "

(History of Indian Literature. P. 38.)

होतें. आणि त्यामुळेंच ज्ञानार्जनांतही त्यांचें पाऊल बरेंच पुढें सरसावल्यासारिखें दिसतें. परंतु मुसलमानी अमलानंतर, तत्संसर्गदोषानें त्यांचें स्वातंत्र्य केवळ नष्टच झालें. इतकेंच नाहीं तर, त्यांचें अज्ञानही दिवसानुदिवस वाढत गेलें. लिहिण्यावाचण्यापेक्षां कांहीं जास्त येतें, अशा स्त्रिया सांप्रतकाळीं अगदींच विरळ असून, ज्यांस निव्वळ वाचतां येतें, अशा देखील फारच थोड्या आहेत.

त्याचा दुष्ट परिणाम.

अशा प्रकारचा प्रतिबंध, ही गोषांतील पद्धत, आणि तो एकान्तवास, इत्यादि कारणांनीं आमच्या स्त्रियांवर फारच दुष्ट परिणाम घडून आले असून, त्या कारणानें आमच्या राष्ट्राचें अपरिहार्य नुकसान झालें आहे. बाह्यसौन्दर्यानें व चमत्कृतीनें स्त्रियांचें मन वेधलें जाऊं नये, अथवा त्यांच्या मनोनिग्रहावर अनुपम सृष्टिवैचित्र्याचा अम्मल बसूं नये, एतदर्थ ही एकांतवासाची योजना झाली असल्याचें दिसतें. परंतु, अशा प्रकारचें बंधन बिलकुल

1 "We find songs of the most exquisite kind attributed to poetesses and queens, among whom the daughter of Atri appears in the foremost rank."

(H. I. L. P. 38).

2 "And there is hardly a Sardàrs mother or wife, who can do more than read or write, and few can even do that."

(Speech of H. E. Sir Bartle Frere.)

इष्ट नाहीं. कारण, तें नैसर्गिक नसून अगदींच सृष्टीक्रमाविरुद्ध असल्यामुळें, त्यापासून यत्किंचित्‌ही फायदा न होतां, ह्या एकान्तवासि स्त्रीजनाचें कुतूहल नेहेमीं जागृत राहून, तें एकसारखें आणि झपाट्यानें वाढत जातें. व ज्या गोष्टीपासून त्यांनीं अलिप्त रहावें ह्मणून विशेष खबरदारी ठेवण्यांत येते, तीच गोष्ट करण्याविषयीं त्यांचें मन एकदम प्रवृत्त होतें.

एकान्तवासाचें फल.

ह्या प्रतिबंधाचा व एकांतवासाचा आणखी एक भयंकर परिणाम असा घडून येतो कीं, त्या योगानें ज्ञानार्जनाचें सर्व मार्ग बंद होतात, व ज्ञानदीप मावळतो. आणि अशा प्रकारें ज्ञानदीपकिरण मावळलें ह्मणजे, जिकडे तिकडे अज्ञानांधकार माजतो. आतां, असें होणें कधींही इष्ट नाहीं. कारण, तसें झालें ह्मणजे, अव्यवस्था व संक्षोभ, अथवा अस्वास्थ्य व संभ्रम सुरू होऊन, केवळ प्रलयका-

1 "The auther of the spirit of laws, with the view of a closest philosopher, deems seclusion necessary from the irresistible influence of climate on the passions; while the chivalrous Sigur, with more knowledge of human nature, draws the very opposite conclusion, asserting all restraints to be injurious to morals,"

(Tod's Rajasthan. P. 524, Vol. I. third Edn.)

ळाचीच कला प्राप्त होते. ज्ञान ह्मणजे एक अमूल्यवस्तु असून, ती सर्व सुखाचें निधान आहे, असें कोणीही अवश्य कबूल केलें पाहिजे. इतकेंच नाहीं तर, हरएक प्रसंगीं मनाला शांति देणारा तो अक्षय्य मित्रच आहे, असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. आणि जर ज्ञानप्रकाश नाहीं, तर मनुष्यमात्राच्या मनाचें सदैव रंजन होण्याचें अन्य साधनच नाहीं, हें निर्विवाद आहे.

इस्लामशाहीचें होमकुंड तप्त असतांना, ज्ञाननिर्झर बहुतेक शुष्क होऊन, ज्ञानार्जनाची साधनेंही अजिबात नाहिशीं झालीं होतीं. आणि तशांत स्त्रियांच्या गोषाची प्रवृत्ति एकदम सुरू झाल्याकारणानें, त्या बिचाऱ्यांस विद्याधन मिळेनासें होऊन, त्यांची स्थिति उत्तरोत्तर अगदींच दुःसह झाली. पुढें अज्ञानानेंही आपला अम्मल बराच गाजविला; व तो इतका प्रखर झाला कीं, त्याचा परिणाम आमच्या अबलाजनांस आजमित्तीसही भोगावा लागत आहे.

व ज्ञानार्जनाची अवश्यकता.

साध्वी स्त्रियांस मोठी करमणूक म्हटली ह्मणजे पतीची होय. परंतु वैधव्यदशेंत ती देखील नाहिशी झाल्यामुळें ज्ञानशांतीशिवाय, मनोरंजनाला त्यांस अन्यमार्गच नसतो. सबब, विद्याधन, व ज्ञानार्जनाचें योग्य साधन, हीं त्यांस प्राप्त करून देणें अगदीं अवश्य आणि न्यायाचें आहे.

कारण, जगांतील हरएक वस्तूच्या सुखास्वादापासून त्यांस वैधव्यदशेंत अगदींच अलिप्त राहवें लागतें. इतकेंच नाहीं तर, त्यांस आमरणांत अनंत व दुःसह कष्ट भोगावे लागतात. अतएव, त्यांच्या दुःखाचें परिमार्जन जेणेंकडून होईल, ते ते उपाय आम्हीं अवश्य योजिले पाहिजेत; व तसें करणें हें आमचें पहिलें कर्तव्य होय.

लग्नकाल.

लग्नकाल.

कन्येचा लग्नकाल आठव्या वर्षापासून तों ती ऋतुमती होईपर्यंत आहे. तथापि, कन्येला योग्य वर मिळाल्याशिवाय तिचें लग्नच करूं नये, अशाविषयीं आमच्या स्मृतिकारांचा विशेष कटाक्ष असल्यामुळें, सदरहू मुदतींत फेरबदल करण्याविषयीं **मन्वाज्ञा** आहे.

उत्कृष्ट व अनुरूप असा वर मिळाला तर, आठवें वर्ष लागण्यापूर्वी देखील कन्येचें लग्न करावें. तसेंच, योग्य वर मिळाला नाहीं तर, ऋतुमती होईपर्यंत सुद्धां कन्या अविवाहित ठेवावी. आणि त्यावेळींही अनुरूप वर नच मिळाल्यास, आणखी तीनें वर्षें वाट पाहून, समान जाति-

---

१ उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशायच ।
अप्राप्तामपि तां तस्मै कन्यां दद्याद्यथा विधि ॥ ८८ ॥

२ त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वंतु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥ ९० ॥

(म. स्मृ. अ. ९)

गुण अशा पतीस तिनें स्वतः पसंत करावें. परंतु विद्या-गुणरहित पुरुषाशीं तिनें कधीं देखील लग्न लावूं नये, असें स्पष्ट स्मृतिवचन आहे.

पुरुष व स्त्री या दोघांचें अनुरूप असें जोडपें होऊन लग्नविधि झाला तर, परस्परांचें प्रेमाकर्षण असल्या कारणानें, हें संसारचक्र सुरळीत चालतें. व प्रजा देखील चांगली निपजते. आणि ह्याच गोष्टीवर दूरवर लक्ष्य पोहोंचवून, आमच्या **स्मृति**कारांनी तत्संबंधीं विशेष नियम करून ठेविले; व योग्य वर नच मिळाला तर स्त्रियेनें मरेपर्यंत पितृगृहीं अविवाहित रहावें, परंतु गुणहीन अथवा विद्यारहित पुरुषास बापानें आपल्या कन्येस कधीं देखील देऊं नये, असें ठरविलें. यावरून स्त्री पुरुषांचें परस्पर हित हें आमच्या **स्मृतिकारांच्या** हृदयांत किती अंशानें जागृत होतें, तें पूर्णपणें लक्ष्यांत येईल.

मातापितरांकडून योग्य कालीं कन्येचा विवाह नच झाला तर, तिनें आपल्या मर्जीप्रमाणें पति पसंत करावा. आणि तसें केल्यास पति किंवा पत्नी या दोघांकडेही तत्संबंधीं बिलकुल दोष नाहीं, असें **स्मृति**वचनें आहे.

---

१ काममामरणात्तिष्टेद्गृहे कन्यर्तुमत्यपि ।
नचैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ ८९ ॥

२ अदियमाना भर्तारमधिगच्छेद्यधिस्वयम् ।
नैनःकिंचिदवा प्नोति नचयं साऽधिगच्छाति ॥ ९१ ॥
(म. स्मृ. अ. ९ ॥)

बालविवाह, व तत्संबंधीं विधिनिषेधपक्ष.

आतां, बालविवाहापासून जरी दुष्ट परिणाम घडून येतात. तरी त्यांतही कित्येक गोष्टी अभिनंदनीय[१] आहेत. ल्हानपणीं लग्न झाल्यानें, कन्येचें सर्व लक्ष्य त्या कोमलावस्थेंत आपल्या अंगीकृत पतीच्या ठायीं वेधलें

1 "If as we learn from the biographies of our greatest men, childish or boyish attachments are not unknown among ourselves, why should we be so determinately incredulous as to the possibility of a pure attachment between children under the sunny sky of India ? We should remember that in India the child-like devotion of a young girl is concentrated from the first on one object only, never discipated, never frustrated by any early disappointments. A husband, though a mere boy, is accepted by the young bride, as we have to accept father and mother, sister and brother. He is her own, for better for worse, for this life and for the next. Heaven has ordained it so. A husband is not chosen, he is given' and to repudiate such a gift seems as unnatural to them as to repudiate father and mother, sister and brother, would seem to us. Natives who speak at all of the mysteries of their heart dwell with rapture on the days of their boyhood and boyish love as the most blissful of their whole lives."

(Max Muller on Indian child-wife. Contemporary Review.)

"The child-wife whose story he briefly narrates

(पुढें चालू)

जाऊन, तिचें त्याजवर साहचर्यानें प्रेम जडतें. आणि

(मागील पृष्ठवरून पुढें चालू.)

is the late Shrimati Soudámini Ráy, wife of one of the prominent members of the Bràhma Samàja, Bãbu Kedâr Náth Rây. Shrimati was married at the age of nine to a husband of twelve. But though young the couple loved each other ardently, and together they were prepared to brave the storms of life raised by their joining the Brâhma Samáj and renouncing the ancient faith of their fathers. They had to struggle alone with poverty and ablaquy; but they would not bend the knee to Baal; nor did their mutual love abate. "She twined round him like a creeper, but it was the creeper that gave strength to him, and upheld him in all his trials and all his aspirations." Every morning and evening the happy wife prayed with her husband, and later she conducted the domestic services for her children and servants. Theirs was a quiet and uneventful life, full of silent joys and sorrows. "Nature supplied them with all the objects of their admiration, and religion lifted their souls to the sublimest happiness. Many a delightful moonlight night they passed together in calm contemplation of nature and of the great spirit who liveth and worketh in her. They well knew the rapture that springs from feeling a divine presence in everything, in the soft breezes of the evening, in the whisper of the leaves, in the silver rays of the moon, and most of all, in the deep, silent glances of two loving eyes."

The T. I. 12th Sept. 1891.

दिवसानुदिवस, तीं उभयतां जसजशीं यौवनावस्थेंत येऊं लागतात, तसतशी त्यांची परस्परांविषयींची प्रीति वृद्धिंगत होऊन, ती त्याला अगदीं देवासमान मानूं लागते; इतकेंच नाहीं तर, ती त्याला आपला जीव कीं प्राण असें समजते. ज्याप्रमाणें आई किंवा बाप, बहीण अथवा भाऊ, मुलगी व मुलगा, मग तीं आपल्याला आवडोत अथवा न आवडोत, तीं ज्या स्थितींत असतील त्या स्थितींत त्यांचा बिनूतक्रार अंगिकार करणें आपणांला भाग आहे, त्याच प्रमाणें "पदरीं पडलें आणि पवित्र झालं," या ह्मणी अन्वयें प तीची देखील गोष्ट आहे, असें ती निश्चयपूर्वक मानते. यामुळें, ती कधीं देखील कष्टी नसते. आणि तिच्या पतीकडून प्रीतीचा मोबदला तिला योग्य प्रकारें मिळत असल्याकारणानें, ती आपला अयुष्यक्रम सदैव आनंदात घालविते. आतां, दिवसानुदिवस, ह्या गोष्टीची सत्यता पाश्चात्यांस देखील भासमान होऊं लागली आहे.

अनुरूपवर.

अनुरूपवर, व त्याचा काल.

वरानें आपल्यास पाहिजे तशी वधू पाहून करावी, व वधूनें ही आपल्या इच्छनुरूप वर पसंत करावा, अशी फार प्राचीन काळापासून भरतखंडांत चाल अस-

ल्याचें दिसतें. **रामायण** आणि **महाभारत** काळीं तर, ही चाल सुरू असल्याचें **सीतास्वयंवर** व **सुभद्रास्वयंवरां**वरून, उघड होतें. तसेंच, **स्मृति**कालीं देखील हाच प्रघात असल्याचें [1]**मनुस्मृती**वरून दिसून येतें.

हल्लींप्रमाणें **स्मृति**कालीं मुलांचीं लग्नें लहानपणीं होत नव्हतीं. मुलगा पंचवीस तीस वर्षांचा झाला म्हणजे तो लग्नास पात्र होत असे, व त्या मानानें कन्येचेंही वय आठ पासून बारावर्षांपर्यंत असे. याकारणानें ततकालीन प्रजा फार सतेज आणि सदृढ असे. परंतु सांप्रतकाळीं हा सर्वच प्रकार बदलल्यामुळें, आह्मीं अगदीं निस्तेज व निर्बल होत चाललों आहों.

वात्स्यायनसूत्र, व त्यांतील नियम.

वात्स्यायनकृत कामसुत्रांवरून देखील, अनुरूप वधूवर पाहण्याची चाल प्राचीन काळचीच असल्याचें ठरतें. सबब त्यांतून पाणिग्रहणसंबंधीं सूत्रांचा गोषवारा याखालीं देतों:—

१ मुलानें स्वजातीयांपैकीं कन्या पसंत करावयाची असून, ती दुसऱ्या कोणास दिलेली नसावी.

---

१ अध्याय ९. श्लोक ८८, ८९, ९०, ९१.
(म. स्मृ. अ ७. श्लो. ७७.)

२ त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम् ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षांवा धर्मे सीदति सत्वरः ॥ ९४ ॥
(म. स्मृ. अ. ९)

२ मुलगा व मुलगी कुलीन घराण्यातलीं असून, त्यांजला आईबाप असावेत. त्यांच्या मातृपक्षाकडील, किंवा पितृपक्षाकडील संबंधी प्रतिष्ठित असावेत. तसेंच, ते उभयता अंगापिंडानें सशक्त असावेत. मात्र वराचा अभ्यासक्रम पुरा झाला पाहिजे असून, तो वधूपेक्षां निदान तीन वर्षांनीं तरी मोठा असावा.

३ आपणास सुखप्रद होई, अशी कन्या मुलानें वरावी. मात्र तसें करण्यानें आपल्या इष्टमित्रांचा आपल्याला बोल न लागेल, अशाविषयीं त्यानें लक्ष्य ठेवावें.

४ परस्परांविषयीं एकमेकांचें मन मिळाल्यावर, मुलाच्या आईबापांनीं व इष्टमित्रांनीं त्या उभयतांचा शरीरसंबंध जुळविण्याची तजवीज करावी.

५ वरपक्षाकडील इष्टमित्रांनीं, कन्येच्या आईजवळ तिला संमत होतील असें मुलाचे गुणानुवाद गावे. आणि ह्या कन्येच्या पाणिग्रहणार्थ जे कोणी अन्य उमेदवार असतील, त्यांच्या दोषांचें त्यांनीं आविष्करण करावें.

६ वरपक्षाकडील कोणी एकानें दैवज्ञ बनून, त्याच्या शुभशकुनांची फलश्रुति सांगावी; व कालांतरानें त्या वरास खचित द्रव्यप्राप्ति होणार, असें जाहीर करावें.

७ दुसऱ्या एकानें कन्येच्या आईला असें कळवावें कीं, ह्या पेक्षांही चांगलें, असें मुलाला एक दुसरें स्थळ सांगून आलें असून, तत्संबंधीं हकीकतीविषयीं आपल्याला विचारणा झाली आहे.

८ शकुनादि चिन्हांवर आपलें लक्ष्य पुरवून त्याप्रमाणें वरानें आपलें वर्तन ठेवावें.

९ केवळ दैवावरच विश्वास ठेवूं नये.

१० कन्येस पहावयास गेल्यावेळीं ती निजली असेल किंवा अश्रुपात करीत असेल, अथवा बाहेर गेली असेल तर, तिच्याशीं संबंध करूं नये. तसेंच, खालीं लिहिलेल्या कन्या देखील वर्ज कराव्याः— १ अशुभ नांवाची, २ छपवून ठेवलेली, ३ दुसऱ्यास दिलेली, ४ लोहित केशा, ५ चिन्हांकित, ६ ऋषभी (पुरुषासारखी राठ), ७ कुबडी, ८ अतिविशालभाला, ९ प्रगतजानु, १० अपवित्र, ११ धर्माप्रमाणें मातापितरांचें योग्य लग्न न होऊन झालेली, १२ रजस्वला, १३ गरोदर, १४ वयस्क, १५ अतिल्हान, आणि १६ सार्द्रहस्ता.

कन्येच्या गुणावगुणांसंबंधीं अशाच प्रकरचा वर्ज्यावर्ज्य गोष्टींचा विचार मनुस्मृतींत[1] केल्याचें आढळून येतें.

---

१ मनुस्मृति. अ. ३. श्लो. ४ । ५ । ६ । ७ । ८ । ९ । १० ११ । १२ । १३ । १४.

भारतीय, व पाश्चात्य देशांतील विवाहपद्धतीची तुलना.

अनुरूपवर पाहण्याच्या संबंधानें जें उचित बंधन, किंवा जो योग्य विनय पाहिजे आहे, त्याचें पाश्चात्य देशांत बहुतेक सीमोल्लंघन झाल्यासारखेंच दिसतें. त्यामुळें, तिकडील पद्धत निदान आमच्या दृष्टीला तरी गोड दिसत नाहीं. किंबहुना, ती रीत तद्देशीय विवेकी लोकांस देखील पसंत नाहीं, असें साधारण अनुमान होतें.

फ्रेडरिक्पिंकार् नांवाचे गृहस्थ या देशांत बहुत दिवस राहिलेले आहेत. त्यांस इकडील रीतीभातीची पुष्कळ माहिती असून, ह्या देशांतल्या पांच सहा भाषा त्यांस चांगल्या अवगत आहेत. आमच्या समाजबंधनाच्या संबंधानें त्यांनीं आपलें मत विलायतेंतील एका पुस्तकांत प्रसिद्ध केलें आहे. त्यावरून आमची समाजरचना त्यांस

तत्संबंधीं तद्देशीयांचा अभिप्राय.

विशेष पसंत आहे असें दिसतें. एके ठिकाणीं ते असें लिहितात कीं, ' वास्तविक पाहतां आमच्या इंग्रज समाजानें प्रत्येक बाबतींत हिंदुसमाजाच्या पायांजवळ बसून समाजव्यवस्थेचें अध्ययन करावें. हिंदुसमाजपद्धत पूर्णतेस गेलेली आहे. पुष्कळ लोकांचें मोठें हित होईल, आणि सर्वत्र समाधान राहील, अशा प्रकारच्या बंधनांनें पुष्कळ विचार करून व निसर्ग-

स्थिति पूर्णपणें ध्यानांत आणून, तिकडील शास्त्रकारांनीं हिंदु लोकांच्या समाजास वाजवी बंधनांनीं जखडलें आहे. या स्थितींत आह्मां इंग्रजांच्या अर्धवट कल्पनांचा शिरकाव होईल तर मात्र पुष्कळ अनर्थ ओढवतील. अशानें, आमच्या इंग्रज समाजासारखाच हिंदुसमाज गदळ आणि निर्लज्य करूं नका.

आमची विवाहपद्धति देखील फारच उत्तम आहे असें तें समजतात. १ 'लहानपणीं लग्न झाल्यावर खऱ्या विवाहाचें फल वयांत आल्यानंतर ध्यावें, हें हिंदूलोकांस अत्यावश्यक आहे. २ ही बालविवाहपद्धत उष्णकटिबंधांतल्या स्थितिगतीस अनुसरून आहे. ३ आज कित्येक वर्षें बालविवाहपद्धत अबाधित चालू असून, त्यापासून अनेक फायदे होत आहेत. आणि व्यवस्था, शांतता, व सौख्य, हे तन्निसृतच गुण आहेत. ४ त्याच कारणानें स्त्रीजातीचे सद्गुण आणि विनय हे आजवर कायम राहिले आहेत. ५ इंग्रजी विवाहपद्धत स्त्रीजातीस कमीपणा आणीत असून, इंग्रज समाजांतल्या अनेक नीच प्रघातांचा उत्पादकपणा, व जबाबदारी, त्या इंग्रजी पद्धतीकडे येऊं पाहत आहे. ६ हें संमतिवय ह्मणजे त्या (हिंदु) लोकांवर एक जुलमाचें यंत्रच होय. आणि ज्या स्त्रियांचें संरक्षण या बिलानें

---

१ संमतिवयाच्या कायद्यास अनुलक्षून, हें मत प्रदर्शित केलें आहे.

होणार, त्यांची तर त्या योगेंच फार फजिती होईल,' असा त्यांचा अभिप्राय आहे.

अनुरूप वर शोधून काढण्याच्या कामीं जो **पाश्चात्यांचा** रिवाज आहे, तत्संबंधीं **पिंकार्ड** मजकूरनें आपला तिटकारा, आपली असंमति, व आपली विशेष अप्रीति, खालीं लिहिल्याप्रमाणें व्यक्त केली आहे.

"**भर ज्वानींत आलेल्या मुलीनें, पुष्कळ** नट्टेपट्टे करीत, आणि नवरा पसंत करण्यासाठीं लोकांचें लक्ष आपणांकडे ओढून घेत, आईबापाच्या परवानगीनें रस्त्यांतून, देवळांतून, सभांतून, बाजारांतून, पुरुषांच्या **खांद्यास खांदा भिडवीत फिरणें,** याजपेक्षां **हिंदु**विवाहपद्धत संभावितपणाची, कुलीन, व सद्गुणास पोसणारी नव्हे काय,"

आमची विवाहपद्धति फारच चांगली आहे, यांत तर आतां कांहींच संशय नाहीं. मात्र लग्नकालीं मुलगे आणि मुली यांचें वय जरा जास्त प्रमाणाचें असलें पाहिजे. **हिंदूंच्या** विवाहपद्धतीची स्पृहणीय अवस्था ह्मटली ह्मणजे नवरा बायकोचें परस्पर चांगलें प्रेम; तिची सर्वोत्कृष्ठ स्थिति ह्मटली ह्मणजे दृढानुबंधन; आणि तिचें मनोहर स्वरूप ह्मटलें म्हणजे कुंटबवात्सल्य. यासंबंधानें **सरजॉर्ज बर्डवूड** यांचें तर असें ह्मणणें आहे कीं, आदर व स्नेह, सरलता व शुद्धता, आणि निष्कापट्य व विनीतत्व, इत्यादि गुणांत ह्या भूतळावरील एकही राष्ट्र **हिंदूंच्या** पासंगास देखील लागणार नाहीं.

संमति कायद्यावर आक्षेप घेतांना एके ठिकाणीं हे गृहस्थ असें लिहितात कीं:--

"Above any other subject affecting the Hindus, this (marriage law reform) is the one, they should be left to deal with themselves. * * * The marriage laws of the Hindus have served to create the *highest type* of family life known. For its *simplicity, affection, reverence,* and *purity,* it is absolutely *inapproachable* by *any other* nation."

पतिसेवा.

स्त्रीपुरुषांचें साहचर्य, व

पुरुष आणि स्त्री ह्या परस्परांचे व्यवहार एकमेकावांचून बिलकुल चालण्यासारिखे नसल्याकारणानें, त्यांचें साहचर्य फारच महत्वाचें आहे. इतकेंच नाहीं तर, प्रत्येक कृत्य, मग तें धर्मसंबंधीं असो अथवा सामाजिक असो, व्यावहारिक असो किंवा राजकीय असो, तें स्त्रियांच्या अमूल्य साहचर्याशिवाय मुळींच व्हावयाचें नाहीं, असें ह्मटलें असतांही चालेल.[१]

त्याची अवश्यकता.

ऐहिकसुखाचें संसारचक्र निर्वेध, सुरळीत, आणि व्यवस्थेनें चालण्यास, स्त्रीपुरुषांचें परस्पर साहाय्य हें एक उत्तम ओंगणच

१ प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थंच मानवाः ।
तस्मात्साधारणो धर्मः श्रुतौ पत्न्यासहोदितः ।।
(म. स्मृ. अ. ९ श्लो. ९६.)

आहे, व त्याला सद्वर्तन हें विशेष मदत करितें, असें ह्मणण्यासही हरकत नाहीं. कांता सदाचारी असली तर पतीचें मन नेहमीं प्रफुल्लित राहून, महत्कार्य करण्यास त्याला प्रोत्साहन मिळतें. तसेंच, पति सद्गुणी असला तर, स्त्रीचें चित्त सदैव संतुष्ट राहून, भावी संततीस सदाचाराचें, व नीतीचें, शुद्ध वळण लागतें; आणि त्यामुळें एकंदर कुटुंबाचें, व अतएव सर्व प्रजेचें कल्याण होतें.

साहचर्याचे गुणधर्म.

नवराबायकोचा परस्पर अगदींच निकट संबंध असल्याकारणानें, स्त्री ही बहुतकरून आपल्या पतिचेच गुण घेऊन उठते. आणि म्हणूनच पतीचें आचरण ज्या मानानें शुद्ध असेल त्या मानानें स्त्रीचें आचरण देखील विशेष पवित्र असतें. सबब आपली नीति व वर्तन सदैव अनुकरणीय राहील, अशी व्यवस्था पतीनें अवश्य ठेविली पाहिजे.

आपल्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत, स्त्रीपुरुषांनीं आपलें वर्तन पवित्र ठेऊन, आपल्या हातून भलतीच

---

१ संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच ।
यस्मिन्नेव कुलेनित्यं कल्याणं तत्रवैध्रुवम् ॥६० ॥
(म. स्मृ. अ. ३)

२ यादृग्गुणेन भर्त्रा स्त्री संयुज्येत यथाविधि ।
तादृग्गुणा साभवति समुद्रेणेव निम्नगा ॥ २२ ॥
(म. स्मृ. अ. ९)

स्त्रीपुरुषांचा परम-धर्म.

गोष्ट घडूं नये ह्मणून, अथवा आपलें पाऊल वांकडे पडूं नये एतदर्थ, दृढ निश्चय बाळगिला पाहिजे. कारण, केवळ निश्चयानेंच हवें तें कार्य सिद्धीस जाणारें आहे. एका महाराष्ट्र कवीनें ह्मटलें आहे कीं,

निश्चयाचें बळ । तुका ह्मणें तेंची फळ ॥

सबब हें तत्व पूर्णपणें लक्ष्यांत ठेवून, त्याप्रमाणें प्रत्येकानें आपली इतिकर्तव्यता बजाविली पाहिजे. आणि हाच स्त्रीपुरुषांचा परम धर्म[1] होय.

स्त्रीचें कर्तव्य.

स्त्रीनें आपल्या पतीच्या स्नानसंध्येची, पुजाविधीची, खाण्यापिण्याची, व निजण्याबसण्याची, वगैरे सर्व व्यवस्था आपल्या अनुकुलतेनुरूप उत्तम प्रकारची ठेविली पाहिजे. तसेंच धर्मकृत्यांत, नित्य नैमित्तिक कार्यांत, आणि प्रात्यहिक व्यवहारांत त्याला योग्य ती मदत देऊन, तिनें त्याची चांगली शुश्रूषा[2] केली पाहिजे. कारण, स्त्रियांस पतिसेवे-

१ अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणांतिकः ।
एषधर्मः समासेनज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः ॥ १०१ ॥
तथानित्यं यतेयातां स्त्रीपुंसौ तुकृतक्रियौ ।
यथानाभिचरेतांतौ वियुक्तावितरेतरम् ॥ १०२ ॥

२ भर्तुः शरीरशुश्रूषां धर्मकार्यं च नैत्यकम् ।
स्वा चैव कुर्यात्सर्वेषां नास्वजातिः कथंचन ॥ ८६ ॥
(म. स्मृ. अ. ९)

व्यतिरिक्त अन्यधर्मच, नाहीं. त्यांची पुजाअर्चा, नेमधर्म, उपासतापास, यज्ञयाग, व्रतेंतीर्थें, इत्यादि सर्व पतिसेवेंतच असल्यामुळें, तीच प्रथमतः केल्यावर नंतर इतर विहितकृत्यें त्यांनीं आचरण्याचीं आहेत.

आमच्यांत पतिसेवेची इतिकर्तव्यता विशेष मानली असून, लग्न ह्मणजे एक बलवत्तर धर्मबंधन, व अतीव पवित्र करारच होय असें आह्मी समजतों. आणि पति व पत्नी ह्या दोघांचा सारखाच अधिकार असून, गृहसंबंधीं व्यवस्थेंतही त्या दोघांची सत्ता सारखीच भासमान होते, असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं.

हें चारुबंधन, किंवा हा निकट संबंध, इंग्लंडांत किंवा

---

१ नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।
पतिशुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ॥ १५५ ॥
(म. स्मृ. अ. ५)

2 "Marriage is, however, held sacred; husband and wife are both rulers of the house (dampati), and approach the gods in united prayer."
(H. I. L. P. 38)

LAW OF HUSBAND AND WIFE.

3 "The now notorious Jackson case has done the English community one great service. It has opened their eyes to the fact that the present state of the English law in regard to husband and wife is not entirely for the best. The wife refuses to live with her husband for no very important reasons, and the

(पुढें चालू)

पाश्चात्य देशांतील शिथिल बंधन, व

इतर पाश्चत्य देशांत, इतका बलवत्तर असल्याचें तिकडील सांप्रत स्थितीवरून बिलकुल दिसून येत नाहीं.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

poor fellow has practically no remedy to get her to a reasonable way of thinking. This has set the thoughtful men of England a thinking. Some of them have already given their opinions in which they express doubts about the soundness of the principles involved in the Jackson decision. Lord Penzance has presided over the Divorce Court for a number of years and has therefore a right to be heard on this question. He says:—

1 "The Lord Chancellor says that the decision in the Clitheroe case does not suggest a need for further legislation. I regret that this should be his opinion. A late statute has deprived the Matrimonial Court of the power to enforce a decree for the restitution of conjugal right. *Husband and wife* are, therefore, no longer bound by *law to live together.* It is somewhat singular that a *contract the most solemn,* and in the interests of the community, by far the most important, should be the only *one which the law refuses to enforce.* But this result of the above statute is obvious and beyond question. *If married people are* no longer under any *legal obligation to live together,* it follows as a consequence that none of the duties and *obligations undertaken at the alter have the binding* support of any law to

(पुढें चालू)

आणि त्यास कायद्याची अनुकूलताही नाहीं, असें ज्याक्सन् खटल्यांत ठरलेल्या नीतितत्वावरून उघड होतें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

uphold them—for none of these duties can be duly discharged between people who live apart, and this applies to their offspring as well as themselves. It would be absurd to say that this rent in the matrimonial law was effected by the decision in Mr. Jackson's case; that decision only revealed its existence. The common law of England has at all time concerned itself much about the rights of property resulting from marriage; *but about the duties and obligations of marriage not at all* ... ... It is the knowledge that man and wife must live together that induces both to make that *life as tolerable as mutual concession can make it* ... ... But once let the opposite idea take possession of the mind, and open a prospect of escape from ties that have become onerous or irksome, *and every grievance is at once magnified, trifles become enormities*—the friction of opposite wills is regarded as an absolute incompatibility of tempers, and a moment of hasty vexation frustrates a union undertaken for life. *It seems to me that some legislation on this subject is imperatively demanded*, and the longer it is delayed the more *mischief will be done*, for this new matrimonial creed is likely to have wide and *rapid diffusiou.* To enact that a husband whose wife has left him may claim *a divorce will only increase the present evil.*

(पुढें चालूं)

पाश्चात्य देशांत अनुचित स्त्रीस्वातंत्र्य विशेष बलवत्तर दिसतें. आणि त्यामुळें, तिकडे स्त्रियांस वाजवीपेक्षां फाजील सवलत मिळाली जाऊन, पुरुषवर्गाच्या संबंधानें अन्याय झाल्यासारिखें होतें.

तिकडील अनुचित स्त्रीस्वातंत्र्य.

हिंदुस्थानातील अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं जो

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

Either party, as matters now stand, may confer on him or herself what amounts to a decree of judicial separation."

1 "A man cannot obtain divorce from a childless woman, but a woman can at any time reduce her husband to the condition of married celibate and an heirless possessor; so that, although a woman cannot as yet get rid of her husband for simple infidelity, unaccompanied by cruelty or specialised exaggeration of guilt, she can leave him for this, as for the most trifling cause of displeasure, or for no cause at all, and the law has no machinery to compel her to return. When two people have undertaken to carry a common burden between them, is it quite fair that one should be allowed to throw down the carrying-stick at will while the other is forced to keep hold of his end, good or bad as it may be?"—The *Nineteenth Century*.—

E. LYNN LINTON.

तत्संबंधी गुणदोष

फौजदारी कायदा आहे, तो इंग्लंडांतील नीतितत्वांस अनुसरूनच केला असल्यामुळें, त्यांत देखील हाच दोष दिसून येतो. आणि व्यभिचार केल्या कारणानें, पति विरुद्ध पत्नीनें दंडनीय व निंद्य अपराध केला असतांही, ती दोषमुक्त आहे असें कायद्यानें निःशंकपणें ठरविणें, ह्मणजे स्त्रियांनीं केलेल्या निंद्यकर्माकडे कायद्यानेंच उघड रीतीनें कानाडोळा करणें होय.

पाश्चात्यदेशापेक्षां पौरस्त्य देशांत, आणि त्यांतही विशेषतः भरतखंडांत, स्त्रियांचें भर्तृवात्सल्य

---

1 The Indian Penal Code. (Act No. XLV. of 1860.)

2 I. P. Code. S. 497. Adultery by a person with another's wife.

"In such case the wife shall not be punished as an abettor."

३ 'असल्या प्रकरणांत [जारकर्मांत] बायको साह्य करणारी ह्या नात्यानें शिक्षेस पात्र नाहीं.'

(हिं. अ. शि. फौ. का. कलम ४९७.)

4 "Nor will the annals of any nation afford more numerous or more sublime instances of female devotion, than those of Ràjpoots; and such would never have been recorded, were not the incentive likely to be revered and followed."

(Tods' Ràjasthan Vol. P. 526).

भरतखंडांतील स्त्रियांचें भर्तृवात्सल्य

निःसीम, असून, तें हृदयद्रावक, व अत्यंत रमणीय असल्याचें दिसून येतें. कडकडीत पातिव्रत्य, पतिविषयीं पवित्रप्रेम, आणि स्पृहणीय तितिक्षा, हेच आमच्या आर्यांगनांचे विशिष्ट गुण होत. व ते तावून, सुलाखून, आणि पूर्ण

---

1 "Do we desire to see a model of unbounded devotion, resignation, and love, let us take the picture of Sitá, as painted by the Milton of their silver age, than which nothing more beautiful or sentimental may be called even from Paradise Lost."

(Tods' Ràjasthan. Do. Do.)

2 "The publication of Mr. Wilson's specimens of the Hindu drama has put the English public in possession of very striking features of ancient Hindu manners, amongst which *conjugal fidelity and* affection stand eminently conspicuous. Uttara Ràma Charitra, the Vikrama and Urvasi, and the Mudrà Ràkshasha, contain many instances in point. In the latter piece occurs an example in comparatively humble life, of the strong affection of a Hindu wife. Chandana Das, like Antonio in the merchant of Venice is deemed to die, to save his friend. His wife follows him to the scene of execution, with their one child."— * * *

(Tods' Rájasthan. Vol. I. P. 527).

कसोटीस लावून ही, इतक्या उच्चावस्थेप्रत पोहोंचलेले असे, गुण अन्यत्र क्वचित्‌च आढळून येतील.

संततिशिक्षण.

संततिशिक्षण्याच्या संबंधानें प्राचीनकाळीं योग्य काळजी घेतली जात असे, असें श्रुति, स्मृति, व इतर संस्कृत ग्रंथसमुहावरून चांगलें दिसून येतें. आणि मुलांबरोबर मुलींच्या शिक्षणाविषयीं देखील आमचे पूर्वज विशेष खबरदारी घेत असत, असें मानण्यास बलवत्तर प्रमाण मिळतें. कारण, वेदकालीं सुद्धां मोठमोठ्या गहन विषयांत स्त्रिया वादविवाद चालवीत, धर्मशास्त्रांत भवति न भवति

संतति शिक्षणाविषयीं, आमच्या पुर्वजांची खबरदारी, व

1 "The annals of no nation on earth record a more ennobling or more magnanimous instance of female loyalty than that exemplified by Dewaldi, mother of the Binafur brothers, which will at once illustrate the manners of the Rajpoot fair, and their estimation and influence in Society."

[Tods' Râjasthan. Vol. I. P. 528.)

2 "We must, at any rate, assume among the Brâhmans of this period a very stirring intellectual life, in which even the *women took an active part*, and which accounts still further for the superiority maintained by the Brahmans over the rest of the people." * * *

(History of Indian Literature P. 21.)

करीत, व आपल्या ज्ञानानें आणि गंभीर विचारांनी विद्वज्जनांस अगदीं थक्क करून सोडीत.

तत्संबंधींप्रमाण.

नाटकें, काव्यें, आणि ताम्रपत्रें, इत्यादींवरून चित्रविद्या, लेखन, वाचन, गायन, व नर्तन, वगैरेचेंच आमच्या स्त्रियांस मुख्यत्वेंकरून शिक्षण मिळत असे. आणि त्या विषयांत त्यांची

1 * * — "Women who with enthusiastic ardour plunge into the mysteries of speculation, impressing and astonishing men by the depth and loftiness of their opinions, and who * * solve the questions proposed to them on sacred subjects."

(History of Indian Literature. P. 22.)

2 "There is therefore, no doubt that Savaldevi was a married queen of Soma; and, if so, we have evidence here that in the last quarter of the twelfth century of the Christian era, music and dancing formed a part of the education of Kshatriya girls, and that a married Kshatriya woman could be present at an assembly of eminent men, and sing before them without impropriety. The strict purdah system which the Maratha princes and chiefs observa at the present day, and which even the most highly educated among them have not the courage to give up, did not exist in those days."

{Dr. Bhandârkar's paper on the Copper-plates from Wardha, Nawsari and Belgaum District, read before the B. B. R. A. S. on the 30th July 1892.}

निपुणता झाली, ह्मणजे ती भरसभेंत रसिकजनांस दाखविण्यांत, पूर्वीच्या काळीं मोठी प्रतिष्ठा मानीत असत. महाराष्ट्र देशांतील प्रसिद्ध सोम राज्याच्या कारकीर्दीत ठिकाठिकाणचे विचक्षण लोक, लब्धप्रतिष्ठ विद्वज्जन, व प्रवीण पंडित, तसेंच नानाशास्त्रनिपुण, अनेककलापारंगत, आणि गाननृत्यव्युत्पन्न, अशी रसिक मंडळी त्याच्या दरबारीं एकत्र झाली असतां, शवलदेवी नांवाच्या खुद्द सोमराजाच्या राणीनेंच भर सभेंत गान करून. आपल्या प्रियपतीस संतुष्ट केलें.

आतां, शिक्षण हें मानसिक उन्नतीचें आदिकारण

---

1 "There is one remarkable circumstance concerning the grant before us which deserves notice. It was at the instance of a woman that king Soma made the grant. In the audience-hall where were assembled eminent and influential men of his and of other kingdoms, and persons proficient in the arts of music and dancing, and men of taste were gathered together and instrumental music was going on, she song a beautiful song in a most skilful manner and obtained from the king, who was very much pleased, as a reward, his consent to give the land in charity, and granted it herself on the occasion; but afterwards got the king to do so more formally in the usual manner."

(Dr. Bhāndarkar's paper, read before the B. B. R. A. S. on the 30th July 1892.)

शिक्षणाचा प्रभाव.

असून, मानसिक उन्नति ही स्वातंत्र्याचें बीज होय. यामुळें, जावत्कालपर्यंत लोकशिक्षणाकडे अथवा प्रजाशिक्षणाकडे राष्ट्राचा ओघ असतो, आणि पुरुषाप्रमाणेंच स्त्रीवर्गासही योग्य शिक्षण मिळतें, तावत्कालपर्यंतच त्या राष्ट्राची खरी उन्नती असून, तें स्वातंत्र्यावस्थेचा पूर्ण उपभोग घेतें. जोंपर्यंत आमच्या स्त्रिया विद्याविभूषित असत, तोंपर्यंत आम्ही स्वातंत्र्याच्या अनुपम सौख्याचा पूर्ण अनुभव घेत होतों. परंतु, इस्लामशाहीच्या दुःखद संसर्गानें, जेव्हां आमचा गोषा सुरू झाला, तेव्हां आमच्या स्त्रीजनांचें, व अतएव भावी प्रजेचें ज्ञान, हळूं हळूं, संपुष्टांत येऊन, शेवटीं आम्ही स्वातंत्र्यासही आंचवलों.

ह्यावरून, इतकें कोणाच्याही लक्षांत येऊन चुकेल कीं, देशोन्नतीस मूळ कारण संततिशिक्षण असून, तें स्त्रियांस व पुरुषांस सारखेंच मिळालें पाहिजे. कारण, स्त्रियांपासूनच पुरुषांची उन्नति असल्यामुळें, त्या मूळभूमींत ज्या मानानें ज्ञानाचें सिंचन होईल, त्यामानानेंच तदुद्भूत फल ज्ञानसंपन्न किंवा अज्ञानविदग्ध होईल. यासाठीं, आह्मांस जर खरें राजकीय स्वातंत्र्य हवें असेल तर, आम्ही आपल्या अबलाजनांस योग्य शिक्षण देऊन, त्यांच्या मनाची ज्या

1 "All who have aspirations for a high political

(पुढें चालू)

ज्या उपायांनीं उन्नति होईल, त्या त्या उपायांचें दृढनिश्चयानें पूर्ण अवलंबन केलें पाहिजे.

स्त्रीप्रभाव.

हिंदुसमाजावरील स्त्रियांचें प्राबल्य.

मागील विवेचनावरून, आमच्या भारतीय स्त्रियांची एकंदर स्थिति सहज लक्षांत येण्यासारखी आहे. आतां, त्यांच्या प्राचीनकाळच्या आणि सांप्रतच्या स्थितींत महदन्तर आहे. तथापि, त्यांचें हिंदुसमाजावरील प्राबल्य, पूर्वीं होतें तसेंच अजूनही, कायम व अबाधित आहे. इतकेंच नाहीं तर तें खचित निस्सीम आहे, असेंही म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

future for this country should know that those great changes which they look for cannot be achieved without raising the social position of the women of this country generally."

(Speech of H. E. Sir. Bartle Frere.)

1 "Yet the women of India possess influence the most unbounded. In their own house-holds, be it in hut or palace, even though never seen, they hold the most important moral strong-holds of any women on earth. Did not a well known Indian gentleman declare that it was easier to defy the

(पुढें चालू)

त्या पूर्वी पूजनीय असत, तशा हल्लींही आहेत. आणि गृहसंबंधीं कोणताच कारभार त्यांच्या सल्ल्याशिवाय[1] होत नसून, त्या ह्या संसारचक्राचे आधारभूत केवळ मजबूत स्तंभ, व उत्कृष्ट अलंकारच होत[2]. प्रजेचें उत्पादन, उत्पन्न झालेल्या प्रजेचें परिपालन, पालन केलेल्यांचें शिक्षण, आणि शिक्षितांची उन्नति, इत्यादि सर्व गोष्टी विशेषतः भार्याधीनच[3] आहेत; व त्यांच्यापासूनच भाविसंततीवर वज्रलेप संस्कार होतात, असें कोणालाही कबूल करणें भाग आहे.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

Secretary of State than to defy one's own mother-in-law? Supported by ancient custom, Indian women are absolute within their sphere."

(Miss. Florence Nightingale's introduction to an English Edition of Behramji M. Malabari.)

1 "Like the ancient German or Scandinavian, the Rajpoot consults her in every transaction ; from her ordinary actions he draws the omen of success, and he appends to her name the epithct of Devi, or Godlike."

(Tod' Rajasthán Vol. I. P. 523).

२ मनुस्मृति अ. ९. श्लो. २६.

३ उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् ।
प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबंधनम् ।। २७ ।।
अपत्यं धर्म कार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा ।
दाराधीनस्तथा स्वर्गः पितृणामात्मनश्चह ।। २८ ।।

(म. स्मृ. अ. ९)

परकीयांचें तत्संबंधीं अज्ञान.

आतां एकंदर हिंदु समाजावर आमच्या भारतीय स्त्रियांचे किती प्राबल्य आहे, हें ज्यांनीं ह्मणून आमच्या गृहस्थितीचें विचारपूर्वक अवलोकन केलें नाहीं, त्यांस क्वचित्‌च माहीत असतें. आणि बहुतेकांस तर तत्संबंधीं यत्किंचित्सुद्धां कल्पना नसते.

हा भारतीय स्त्रीप्रभाव आजकालचा नसून, तो आह्माला

1 "We English women understand as little the lives and circumstances, the ideas and feelings of these hundred millions of women of India as if they lived in another planet. They are not reached by us, not even by those of us who have lived in powerful positions in India. Yet the women of India possess influence the most unbounded."

(Miss Florence Nightingales' introduction to an English Edition of "Behramji. M. Malabari a Biagrophical sketch.")

2 "The influence of women on Rajpoot society is marked in every page of Hindu history, from the most remote periods. What led to the wars of Ràma? the rape of Sità. What rendered deadly the feuds of the Yadus? the insult to Drupdevi. What made prince Nala an exile from Nirweer? his love for Damayanti. What made Rajá Bhartri abandon the throne of Awanti? the loss of Pingani. What subjected the Hindu to the dominion of the Islamite? the rape of the princess of Kanouj. In fine, the cause

(पुढें चालू)

स्त्रीप्राबल्याची परंपरा.

अनेक युगें एकसारखा भासमान होत आहे. सीतेला हरण केल्यामुळें **रावण** प्राणास मुकला. **द्रौपदीचा** अपमान झाल्याकारणानें **कौरव पांडवांचें** तुमुल युद्ध जुंपलें. केवळ **दमयंतीसाठीं नल** राजानें वनवास भोगला. प्रियतमा **पिंगाणीकरितां भर्तृहरीनें** राज्य सोडिलें. **कनोजच्या** राजकुमारीकरितां **पृथुराजानें** आपलें साम्राज्य गमावून, सर्व **भारतीयांचें** स्वातंत्र्यही नष्ट केलें; आणि त्याची ती अनुपम व रूपवती **संयुक्ता** हीच **इस्मालशाहीचा** पगाडा बसण्यास कारणीभूत झाली. **हिंदु** स्त्रियांच्या महिम्याचीं, हीं मुख्य मुख्य, व ठळक उदाहरणें होत. ह्याशिवाय दुसरीं लहान सहान तर असंख्य प्रमाणानें सांपडतील.

याप्रमाणें, **भारतीय** स्त्रियांचें **हिंदु** समाजावर कसें प्राबल्य आहे, याचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें. आतां, तें जरी प्रत्यक्ष भासमान होत नाहीं, तरी त्याची आकर्षण-शक्ति ही लोहचुंबकाप्रमाणेंच निर्विवाद सिद्ध आहे,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)
which overturned Kingdoms, commuted the sceptre to the pilgrim's staff, and formed the ground work of all their grand Epics, is woman."

(Tods' Rajasthán. P. 543. Vol. I.).

1 "Like the magnetic power, however latent, their attraction is not the less certain."

[Tods' Rajasthan. P. 523. Vol. I.].

असें कोणीही कबूल करील. परंतु, ह्या वस्तुस्थितीचें खरें ज्ञान पाश्चात्यास अगदींच नसून, आमच्या भारतीय स्त्रियांविषयीं त्यांची कांहीं भलतीच कल्पना झाल्या सारिखें दिसतें; आणि आमच्या समाजांतील बहुतेक धुरीणत्व आमच्या स्त्रियांच्या कडेसच असतांही, आम्ही त्यांस गुलामाप्रमाणें वागवितों, असा ते मिथ्यावाद करितात; व तेणेंकरून विनाकारण आपणांस उपहास्यतेस मात्र पात्र करून घेतात.

---

1 "Most erroneous ideas have been formed of the Hindu female from the pictures drawn by those who never left the bank of the Ganges. They are represented as degraded beings, and that not one in many thousands can even read."

(Tods' Rajasthan. Vol. I. P. 551.)

विद्यादानाच्या संबंधानें आमच्या स्त्रियांची सांप्रतकाळीं कशीही स्थिति असली तथापि, इतर बाबतींत त्या दास्यत्वांत नाहींत, हें निःसंशय खरें आहे.

भाग ३६ वा.

आर्यनीति व प्रकृतिसौजन्य.

हिंदुग्रंथसंपत्तींतील नीतिप्रसार.

नीतिशब्दांत **सत्य** आणि **सदाचार** यांचा समावेश होत असून, तत्संबंधीं उदात्त विचार, अनुपम वचनें, व अनुकरणीय तत्व-मौक्तिकें, आमच्या **संस्कृत** ग्रंथसंपत्तींत ठायीं ठायीं दृष्टिगोचर होतात. **श्रुति** किंवा **स्मृति**, काव्यें अथवा नाटकें, इतिहास अगर प्रबंधकल्पना, पुराणें अथवा कथानकें, इत्यादि[1] प्रत्येक ग्रंथांत **सत्या**विषयीं ह्मणून अत्यादरच दृष्टीस पडतो.

---

1 "The whole of their (the Hindus')literature from one end to the other is pervaded by expressions of love and reverence for truth."

(What can India teach us ? P. 64.)

"Horace Wilson tells us not to imagine that the Hindus are ignorant of the foundations of all morality, or that they do not value truth, justice, integrity, benevolence, charity to all that lives, and even the requital of evil with good; that these

(पुढें चालू)

ऋग्वेदांत[1], सत्य आणि ऋत हे उत्तम गुण समजून, तीच विशेषणें देवांस लाविलीं आहेत. यजुर्वेदांत[2] सत्याच्या पराक्रमाचें वर्णन आहे. आणि अथर्ववेदांत[3] असत्याविषयीं अति तिरस्कार प्रदर्शित केला आहे. रामायणांत[4] सत्याविषयीं महन्निष्ठा दृष्टीस पडत असून, केवळ आपलें वचन खरें करण्यासाठीं, दशरथानें रामास वनवासही भोगावयास लाविलें. महाभारतांत[5] तर सत्याची प्रीति आणि असत्याचा अनादर ठायीं ठायीं दृष्टिगोचर होतो. मनुस्मृतींत, सत्य आणि सदाचाराच्या ठिकाणीं रति ठेवावी, अशी स्पष्ट आज्ञा[6] आहे. इतकेंच नाहीं तर,

ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, रामायण, महाभारत, मनुस्मृति, इत्यादींतील नीतिवचनें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

duties are all repeatedly enjoined, and Hindu authorities commend as earnestly as those of any other language."

(Speeches and writings of D. Nowroji P. 10)

१ ऋग्वेद. १. ८७, ४; १४५, ५; १७४, १; ५. २३, २.

२ शतपथ ब्राह्मण. २. २, २, १९.

३ अथर्ववेद. ४. १६.

४ वाल्मीकि रामायण.

५ महाभारत. ८, ३४४८. १, ३०१५-१६.

६ सत्यधर्मार्य वृत्तेषु शौचेचैवारमेत्सदा ।
शिष्यांश्च शिष्येद्धर्मेण वाग्बाहूदर संयतः ॥ १७५ ॥
(म. स्मृ. अ. ४)

तींत असत्याची अगदींच निर्भर्त्सना केलेली आढळते. आणि याज्ञवल्क्यस्मृतींत, आपल्या सदाचरणानें दुसऱ्यास कित्ता घालून देऊन, त्याचें वर्तन सुधारण्याविषयीं यत्न करण्याचा विशेष कटाक्ष दिसतो. तसेंच, यच्चावत् नाटकांत व काव्यांत, सत्याविषयीं पराकाष्ठेचा आदर दृष्टीस पडतो.

हिंदूंच्या सत्यतेविषयीं. हिंदुप्रमाणाशिवाय अन्य प्रमाण.

याप्रमाणें सत्याविषयींचा हिंदूंचा अत्यादर, अंतःप्रमाणावरून, आणि हिंदूंच्या ग्रंथावरून, पूर्णपणें व्यक्त व सिद्ध होतो. आतां, ह्या हिंदूंच्या खरेपणाबद्दलचा, हिंदुप्रमाणाखेरीज, अन्य पुरावा उपलब्ध आहे किंवा नाहीं, आणि असेल तर तो किती वजनदार व बलवत्तर आहे, याविषयीं थोडा विचार करूं.

हिंदुस्थानावर महमदगिझनीची स्वारी होण्यापूर्वी, परकीयांच्या आक्रमणाचा सुळसुळाट या भूमीवर फारच क्वचित् असे. तसेंच, देशांतरावरील प्रेक्षक, किंवा फिरस्ते, अथवा गुणदोषरूपक, असेही विरळाच येत. तथापि,

---

१ योऽन्यथा सन्तमात्मानमन्यथा सत्सुभाषते ।
स पापकृत्तमो लोके स्तेन आत्मापहारकः ॥ २५५ ॥
(म. स्मृ. अ. ४)

म. स्मृ. अ. ८ श्लो. ८०; ८१, ८३, ८४, ८५, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, २५७.

२ या. स्मृ. ४, ६५.

प्राचीनकाळीं इकडे जे कांहीं थोडेबहुत येऊन गेले, मग ते ग्रीक असोत अथवा आरब असोत, इराणी असोत किंवा चिनी असोत, जर्मन् असोत अगर इंग्रज असोत,

---

1 "Now, it is quite true that during the two thousand years which precede the time of Mahmud of Gazni, India had but few foreign visitors, and a few foreign critics ; still it is surely extremely strange that whenever, either in Greek, or in Chinese, or in Persion, or in Arab writing, we meet with any attempts at describing the distinguishing features in the national character of the Indians regard for truth and justice should always be mentioned first."

(What can Indian teach us ? P. 54)

"So I could go on quoting from book after book and again and again we should see how it was love of truth that struck all the people who came in contact with India, as the prominent feature in the national character of its inhabitants. No one ever accused them of falsehood. There must surely be some ground for this, for it is not a remark that is frequently made by travellers in foreign countries, even in our time, that their inhabitants invariably speak the truth. Read the accounts of English travellers in France, and you will find very little about French honesty and veracity, while French accounts of England are seldom without a fling at Perfide Albion."

(What can India teach us ? P. P. 57-58)

त्या सर्वांनीं सत्य, सदाचार, नीति आणि न्यायबुद्धि, हे हिंदूंचे जणूं काय प्रकृतिसिद्धच गुण आहेत, असें निर्विवाद कबूल करून, तसें प्राञ्जलपणें त्यांनीं आपल्या लेखांतही लिहून ठेविलें आहे. सबब त्या लेखांचे आपण यथावकाश अवलोकन करूं.

ग्रीकप्रमाणलेख.

ग्रीकप्रमाणलेख.

आर्टाक्झरसीज म्नेमान्‌चा प्रसिद्ध वैद्य क्टेशिअस[1] यानें " भारतीय न्यायनैपुण्य " नांवाचा स्वतंत्र लेखच लिहिला आहे.

मिग्यास्थिनीज्[2] हा सेल्यूकस्‌च्या पदरीं असून, तो चंद्रगुप्ताच्या दरबारीं पाटणा[3] येथें वकील होता. तो असें म्हणतो कीं, भरतखंडांत चोऱ्या फारच विरळा होत असून, हिंदु लोक सत्यवादी आणि सदाचारी आहेत.

स्ट्रॅबोचें[5] मत देखील असेंच आहे.

---

1 Ktesiae Fragmenta. (इ. स. पूर्वी ४०४ वर्षें)

2 Megasthenes states "that thefts were extremely rare, and that (the Hindus) honoured truth and virtue."

(What can India teach us? P. 55).

३ ह्या शहराचें प्राचीन नांव पातलीपुत्र असें होतें.

४ (इ. श. पू. ३०० वर्षें).

5 "Strabo testifies to the truthfulness and virtue of the Hindus." (D. N.)

आरियान्[1] असें लिहतो कीं, हिंदुकामगार खोटा मजकूर कधींच जाहीर करीत नसून, अनृत भाषण न करण्याविषयीं त्यांची ख्याति आहे.

महमदीयप्रमाणलेख.

महमदीयप्रमाणलेख,

आरबी, इराणी, आणि इतर मुसलमान लोक, हे हिंदुविषयीं असें लिहितात[2] कीं, ते स्वभावतःच न्यायी असून, विश्वास, सचोटी, व सत्यवचन, या गुणांत त्यांची चोहोंकडे इतकी कीर्ति पसरली आहे कीं, ती केवळ ऐकूनच देशांतरीचे लोक भरतखंडाकडे धांव घेतात.

---

1 Arrian says—"It is against use and wont for these (Hindu officers), to give in a false report; but indeed no Indian is accused of lying."

(What can India teach us ? P. 55.)

2 "If we turn to the accounts given by the Mahomedan conquerors of India, we find Idrisi, in his Geography (written in the 11th century), summing up their opinion of the Indians in the following words:—

'The Indians are naturally inclined to justice and never depart from it in their actions. Their good faith, honesty, and fidelity to their engagements are well known, and they are so famous for these qualities that people flock to their country from every side."

[What can India teach us ? P. 56].

बेदीझरझनान यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, हिंदु लोक वाळूच्या कणाप्रमाणें असंख्य आहेत. ते वंचक किंवा घातकी नसून, मरणाची अथवा जीविताची तर त्यांस बिलकुल परवाच नाहीं. शमसुद्दीन आबू अबदल्ला यानें एके प्रसंगीं आपल्या उक्तींत याच वचनाचें अवतरण घेतलें आहे.

आकबर बादशहाचा मंत्री आबू फाजिल हा ऐनी आकबरींत असें लिहितो कीं, हिंदु लोक धार्मिक, सुस्वभावी, हस्तमुख, न्यायी, एकांतवासी, कार्यदक्ष, सत्यरत, कृतज्ञ, आणि अति विश्वासूक असून, रणांगणांतून पळून जाण्याचें त्यांच्या स्वप्नीं देखीलें नाहीं.

कालिकत आणि विद्यानगरच्या राज्यांत व्यापार

---

1 "Again in the thirteenth century, Shamsuden Abu Abdallak quotes the following judgment of Bediezr Zenan: 'The Indians are innumerable, like grains of sound, free from all decict and violence. They fear neither death nor life."

[What can India teach us ? P. 217].

2 "In the sixteenth century, Abu Fazl, the minister of the Emperor Akbar, says in his Ayin Akbari:— 'The Hindus are religious, affable, cheerful, lovers of justice, given to retirement, able in business, admirers of truth, grateful and of unbounded fidelity : and their soldiers know not what it is to fly from the field of battle."

3 Samuel Johnson. India.

संबंधानें संपूर्ण निर्भयत्व असल्याविषयीं, खाकनचा वकील कमलुद्दीन म्हणतो.

मुसलमान लोक अजूनें देखील हिंदूंस सच्चे मानतात.

---

1 "In the fifteenth century, Kamaluddin Samarkandi (1413-1482), who went as ambassadar of the Khakan to the prince of Kalikat and to the king of Vidyanagar (about 1440-1445), bears testimony to the perfect security which merchants enjoy in that country."

(What can India teach us? P. 56.)

2 "And even in quite modern times the Mahomedans seem willing to admit that the Hindus, at all events in their dealings with Hindus, are more straight forward than Mahomedans in their dealings with Mahomedans."

"Thus Mur Sulamut Ali, a venerable old Mussalman, and, as Colonel Sleeman says, a most valuable public servant, was obliged to admit that a Hindu may feel himself authorised to take in a Mussalman, and might even think it meritorious to do so; but he would never think it meritorious to take in one of his own religion. There are no less than seventy two sects of Mahomedans; and every one of these sects would not only take in the followers of every other religion on Earth, but every number of every one of the other seventy-one sects; and the nearer that sect is to his own, the greater the merit of taking in its members."

(What can India teach us? P. 57.)

मीर सलामतअल्ली हे वृद्ध असून मोठे नामांकित सरकारी नोकर होऊन गेले. ते नेहमीं असें ह्मणत असत कीं, हिंदु लोक स्वधर्मीयांस कधीं देखील फसवीत नाहींत.

चिनीप्रमाणलेख.

चिनीप्रमाणलेख. इसवी सन २३१ सालीं, एक चिनी वकील हिंदूविषयीं अशी हकीकत कळवितो कीं, भारतीय[1] हे सरळ आणि सत्यशील आहेत.

हुंणसंगनें[2] इ० स० च्या सातव्या शतकांत हिंदु-

---

1 "The inhabitants are straightforward, and honest, and the soil is very fertile. The king is called Men-lun, and his capital is surrounded by walls, &c. This was in about 231 A. D."

(What can India teach us? P. 271).

2 "The Chinese, who come next in order of time, bear the same, I believe, unanimous testimony in favour of the honesty and veracity of the Hindus. Let me quote Hiouen-thsang, the most famous of the Chinese Budhist pilgrims, who visited India in the seventh century. 'Though the Indians, he writes 'are of a light temperament, they are distinguished by the straightforwardness and honesty of their character. With regard to riches, they never take anything unjustly; with regard to justice, they make even excessive concessions... ... ... Straightforwardness is the distinguishing feature of their administration."

(What can India teach us? P. 55).

स्थानांत पर्यटन केलें, आणि एकंदर देश, लोकांची रीतभात, व स्थिति पाहिली. तो असें लिहितो कीं, हिंदु लोक जरी चंचल आहेत, तरी ते सरल, निर्व्याज, आणि सत्यवादी असल्याविषयीं त्यांची फार प्रसिद्धि आहे. ते परद्रव्याचा कधींही अन्यायानें अपहार करीत नाहींत, आणि न्याय करण्यांत देखील ते विशेष त्यागशील व सहिष्णु आहेत. सरलता ही त्यांच्या राज्यपद्धतीचें विशिष्ट लक्षण होय.

अन्यप्रमाणलेख.

अन्यप्रमाणलेख.

इसवी सनाच्या तेराव्या शतकांत मार्कोपोलो, आणि चौदाव्या शतकांत फ्रायर जॉरडेनस्, हे आमच्या हिंदूंच्या सत्यव्रताविषयीं, आणि न्यायदाक्षिण्याबद्दल, उत्तम पुष्टी-

---

1 "You must know, that these Abraiman (by which he seems to mean the Brahmans) are the best merchants in the world, and the most truthful, for they would not tell a lie for anything on earth."

(Marco Polo. Ed. Yule).

2 "In the fourteenth century we have Friar-Jardanus, who goes out of his way to tell us that the people of Lesser India (South and Western India) are true in speech and eminent in justice."

(What can India teach us ? P. 56).

करण करतात. ह्यापैकीं, पहिल्याचें असें सांगणें आहे कीं, सर्व जगांत ब्राह्मण हे उत्तम प्रतीचे व्यापारी असून, ते अति प्रामाणिक आहेत. कारण, ते कोणत्याही कारणासाठीं खोटें ह्मणून बोलतच नाहींत. आणि दुसऱ्याचें असें ह्मणणें आहे कीं, ते सत्यवादी असून न्यायप्रविण आहेत.

आंग्लप्रमाणलेख.

आंग्लप्रमाणलेख.

वारेन हेस्टिंग्ज[1], माजी गव्हरनर जनरल, यांचा हिंदूविषयीं असा अभिप्राय आहे कीं, ते फारच कृतज्ञ, सौम्य, व परोपकारी आहेत. दुसऱ्यानें अपकार केला असतांही त्याचा सूड घेण्याविषयीं ते बहुतकरून पराङ्मुखच असल्यामुळें, पृथ्वीवरील इतर कोणत्याही राष्ट्रांपेक्षां ह्यांची द्वेषबुद्धि कमी आहे. आणि ते विश्वासूक व मायाळू असून, आज्ञाधारक आहेत.

एल्फिन्स्टन्[2] ह्मणतो कीं, हिंदु लोक शांत व सौम्य

---

1 "Warren Hastings thus speeks of the Hindus in general :— 'They are gentle and benevolent, more susceptible of gratitude for kindness shown them, and less prompted to vengeance for wrongs inflicted, than any people on the face of the earth ; faithful, affectionate, submissive to legal authority."

(What can India teach us ? P. 60)

2 "The Hindus are mild and gentle people, more

(पुढें चालू)

आहेत. ते कैद्यांस फारच दयार्द्र दृष्टीनें वागवितात. अशा प्रकारें एशियस्थांपैकीं अन्य कोणीसुद्धां बंदी-जनांस वागवीत नाहींत. अन्य राष्ट्रांच्या मानानें, यांचें दुराचरण व अश्लीलत्व फारच कमी आहे. त्यामुळें त्यांचा तत्संबंधीं गुणोत्कर्ष ताबडतोब नजरेस येतो. आणि त्यांचें सदाचरण, स्वच्छता, व नीति, हीं श्रेष्ठतरच असल्याकारणानें, ते आपणांस (इंग्रजांस) खालींच पहावयास लावितात.

सर जॉन माल्कम्[1] असें लिहितो कीं, इतर राष्ट्रांपेक्षां, हिंदु लोक जास्त असत्यशील नाहींत.

सर टॉमस् मन्रो हे हिंदूंची एकंदर सुधारणा, व

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

merciful to prinsoners than any other Asiatics. Their freedom from gross debauchery is the point in which they appear to most advantage ; and their superiority in purity of manners is not flattering to our self-esteem."

[Elphinstone's History of India Vol. I. P. P. 388-389].

1 "I by no means wish to state that our Indian subjects are more free from this vice, than other nations that occupy a nearly equal position in society, but I am positive that they are not more addicted to untruth."

(Mills' History of India, Ed. by Wilson).

2 "If a good system of agriculture, unrivalled manufacturing skill, a capacity to produce whatever

(पुढें चालूं)

त्यांचें प्रकृतिसौजन्य, याविषयीं फारच गौरवानें लिहून शेवटीं असें कळवितात कीं, चांगली कृषिकर्मपद्धति, अनुपम शिल्पनैपुण्य, सुखसाहित्य व विलासभोगाच्या हरएक वस्तु तयार करण्याच्या कामांत पटुत्व; लेखन, वाचन, गणित, इत्यादि विषय शिकविण्याकरितां प्रत्येक गांवीं शाळेची तजवीज, अतिथिसत्कार व भूतानुकंपा, स्त्रियांच्या ठायीं अत्यादर आणि विश्वास, त्यांचें मार्दव व सौजन्य, इत्यादि लक्षणें जर सुधारणा, आचारशिष्टता, व उन्नती, ह्यांचीं द्योतक असतील तर, यूरोपांतील कोणत्याही राष्ट्रांपेक्षां हिंदु खचित कमी नाहींत. इतकेंच नाहीं तर, सुधारणेसंबंधीं इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशांत अदलाबदल झाली तर सदरहू अदलाबदलींत, व देवघेवींत, इंग्लंडालाच हिंदुस्थानापासून

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

can contribute to either convenience or luxury, schools established in every village for teaching reading, writing, and arithmetic, the general practice of hospitality and charity amongst each other, and above all, a treatment of the female sex full of confidence, respect, and delicacy, are among the signs which denote a civilized people—then the Hindus are not inferior to the nations of Europe and if civilization is to become an article of trade between England and India, I am convinced that England will gain by the import cargo."

कांहींना कांहीं तरी विशेष लाभ होईल, अशी माझी पूर्ण खात्री आहे.

ठग लोकांचा पिच्छा पूरवून त्यांचा बीमोड करण्यासाठीं, करनल[1] स्लीमन्‌ची कमिशनरच्या हुद्यावर नेमणूक झाली असल्यामुळें, लबाड व लुच्चे लोकांची अंतःस्थिति, आणि मनुष्याचा एकंदर प्रकृतिस्वभाव व मनोधर्म अवलोकन करण्याची त्यास उत्तम संधि, आणि चांगली अनुकूलताही होती. सबब त्यांचें मत व विचार ग्राह्य असून, ते आदरासही पात्र आहेत. ते हिंदुलोकांविषयीं असें लिहितात कीं, एकाच गांवांतलें लोक आपापसांत कधीं देखील खोटें बोलत नाहींत.

सर[2]जीक्लार्क ह्याचा असा अभिप्राय आहे कीं, हिंदूंची उच्च वर्गांतील नीति फार उच्च प्रतीची असून, मध-

1 "He assures us that falsehood or lying between members of the some village is almost unknown. Speaking of some of the most savage tribes, the Gonds, for instance, he maintains that nothing would induce them to tell a lie, though they would think nothing of lifting a herd of cattle from a neighbouring plain."

(What can India teach us? P. 49).

2 "Coming down still later to the present time, Sir G. Clerk thinks the morality among the higher classes of Hindus of a high standard, and of the middle and lower classes remarkably so."

(Essays and speeches of Dada Bhai Nowroji P. 9).

ऱ्या व खालच्या वर्गांतील लोकांची नीति देखील तशीच आश्चर्यकरण्यासारखी आहे.

व्यापारसंबंधीं सचोटीची हिंदूंची सदैव ख्याति आहे. करनल. डी. सिम्सच्या मतें ह्या देशांतले (हिंदुस्थानांतले) लोक सचोटींत व सत्यशीलतेंत इतर देशापेक्षां कमी नाहींत.

---

1 "Their commercial integrity has always been famous."

[Report of select committee 1853. Ques. 2278].

"This commercial integrity is mentioned by Strabo also, who says that 'they make their deposits, and confide in one another.'"

(Speeches &c. of Dádàbhái N. P. 9)

"Let me add that I have been repeatedly told by English merchants that commercial honour stands higher in India than in any other country, and that a dishonoured bill is hardly known there."

(What can India teach us? P. 63).

2 "Colonel. D. Sims considers the natives not inferior to the people of other countries in point of honesty, and even veracity, and says that people are apt to judge of the natives of India by those whom they find about the precincts of the different Courts of justice, where, temptations to mendacity being many, the atmosphere is unfavourable to truthfulness, as is probably the case in any other countries under the same circumstances."

[Speeches &c. of Dàdàbhài N. P. 9].

सदरहू प्रमाणांवरून, हिंदूंची सत्यशीलता व त्यांचें सत्याविषयींचें गुरुतर प्रेम, हीं कोणाच्याही लक्षांत सहजीं येण्यासारखीं आहेत. असें असून, केवळ मत्सरबुद्धीनें, मिल्ल व जॉन क्रॉफर्ड सारख्यानीं हिंदूंवर विनाकारण शस्त्र सोडून, ते सर्व जगांत लबाड असल्याविषयीं अगदीं अन्यायानें व निष्कारण डंका वाजवावा, हें किती शोचनीय आहे ! ! ! मिल्ल आपल्या इतिहासांत ब्राह्मणांस लबाड ह्मणतो, आणि ते असत्य व दंभाचें केवळ माहेरघरच आहेत असें लिहितो, ह्याला कांहीं तरी प्रमाण आहे काय ?

मिल्ल व क्रॉफर्ड-सारख्या द्वेषबुद्धिपरायणांचे कुतर्क.

आतां, मिल्लच्या लेखास कांहीं विश्वसनीय आधार, किंवा एकादें पक्षपातरहित असें प्रमाण असतें, तर आमचें कांहींच बोलणें नव्हतें. परंतु तसें बिलकुल नाहीं. हिंदूविषयीं निरर्गल प्रलाप जेवढ्या ग्रंथांतून उपलब्ध झाले, अथवा

---

1 "A Bráhman is an ant's nest of lies and impostures."

(Mills' India.).

2 "Mill in his estimate of the Hindu character is chiefly guided by Dubois, a French missionary and by Orme and Buchanan, Tennant, and word, all of them neither very competent nor very unprejudiced judges."

[W. I. L. P. 42].

हिंदूंविरुद्ध ह्मणून ज्या ज्या ठिकाणीं जेवढें सांपडलें, तेवढेंच मिल्लनें निवडून घेतलें. आणि तत्समवेत हिंदुगुणद्योतक असे जेवढे अभिप्राय होते, तेवढे मात्र सर्व त्यानें अजिबात गाळोंऊ केले. तेव्हां अशा प्रकारच्या द्वेषबुद्धिपरायण गृहस्थाची किती थोरवी असेल, अथवा त्यानें लिहिलेल्या[1] अशा प्रकारच्या इतिहासाचा कितपत खरा उपयोग होईल, याची कल्पना करण्याचें काम मी वाचकांकडेंच सोंपतों.

मिल्लच्या इतिहासाची किंमत.

मिल्लनें लिहिलेला इतिहास किती किंमतीचा आहे, याविषयीं आतां जास्त सविस्तरपणें किंवा निराळें न सांगतां, तत्संबंधीं प्रोफेसर मोक्षमुल्लरांचा अभिप्राय देतों. ते असे लिहितात कीं, ह्या पुस्तकामुळें गुरुतरहानि झाली असून, त्यापासूनच हिंदुस्थानावर कित्येक घोरतम अरिष्टें ओढवलीं आहेत.

---

1 "Mill, however, picks out all that is most unfavourable from their works, and omits the qualifications which even these writers felt bound to give to their whole-sale condemnation of the Hindus."

(What can India teach us? P. 42/43).

2 "The book which I consider *most mischievous* nay, which I hold responsible for some of the greatest misfortunes that have happened to India, is Mills' History of British India, even with the antidote against its poison, which is supplied by Professor Wilsons' notes."

(What can India teach us? P. 42.)

अशा प्रकारचा इतिहास सनदी नोकरांच्या परिक्षेत असल्याकारणानें, इकडे येणाऱ्या गोरकायांस तो जणूं काय बाळकडू सारखाच उपयोगी पडतो; आणि त्यामुळें आमच्या विरुद्ध त्यांची प्रथमपासूनच ठाम मतें होऊन, तीं दूषित होण्यास तो कारणीभूत होतो. तेव्हां, असल्या इतिहासाच्या अध्ययनानें, आणि आमच्याविषयीं परकीयांचें मन दूषित करण्याबद्दल आरंभापासूनच प्रयत्न सुरू झाल्यामुळें, राजकर्त्यांस आणि प्रजेस परस्पर किती व कसा फायदा व्हावा, याचा विचार वाचकानींच करावा.

मिल्लनें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, ब्राह्मण

1 "Certainly I can imagine nothing more mischievous more dangerous, more fatal to the permanence of English rule in India, than for the young Civil servants to go to that country with the idea that it is a sink of moral depravity, an ant's nest of lies; for, no one is so sure to go wrong, whether in public or private life, as he who says in his haste: 'All men are liars.'"

(What can India teach us? P. 75.)

2 "But Mill goes further still, and in one place he actually assures his readers that, 'a Brahman may put a man to death when he lists.' In fact, he represents the Hindus as such a monstrous mass of all vices that, as Colonel Vans Kennedy remarked, society could not have held together, if it had really consisted of such reprobates only. Nor does he seem to see the full bearing of his remarks. Surely, if

(पुढें चालू)

वाटेल तेव्हां मनुष्याचा खून करितात. खरोखरच, ते इतके चांडाळ, क्रूर, अविचारी, आणि मनुष्यघातकी असते तर, ही सर्व पृथ्वी अगदीं ओसच पडली पाहिजे होती; व हिंदूंच्या अखिल श्रुतीला आणि स्मृतीला देखील सर्वत्र हरताळच लाविला पाहिजे होता ! ! पण अशा स्थितींत इतकें भाग्य समजावयाचें कीं, मिल्ल बोवाचें हें अशा प्रकारचें वाङ्माधुर्य, तद्देशीयांस व तद्बांधवजनांस, अगदीं देखील पसंत नसून, ते त्याबद्दल त्याची यथास्थित वाक्पूजा करितात. आतां, ब्राह्मणांचा देश हिंदुस्थान, आणि मिल्लचा इंग्लंड, या दोहोंत तुलना केली तर असें खचित दिसून येईल कीं, बंगाल प्रांतांत प्रत्येक दहालक्ष लोकसंख्येंत, फक्त एकालाच खून केल्यामुळें फांशीची शिक्षा होत असून, इंग्लंडांत प्रत्येक दहा हजारांत एक मनुष्य खून करणारा मिळतो. ह्मणजे इंग्लंडांत हिंदुस्थानापेक्षां दसपटीनें जास्त खून होतात. तेव्हां खरोखर, मिल्लची सरळबुद्धि, आणि मनाची समता, व त्याचें वाक्पांडित्य, हीं कांहीं अवर्णनीय आहेत ! ! !

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

a Brahman might, as he says, put a man to death whenever he lists, it would be the strongest testimony in their favour, that you hardly ever hear of their availing themselves of such a privilege, to say nothing of the fact–and a fact it is–that, according to statistics, the number of capital sentences was one in every 10,000 in England, but only one in every Million in Bengal."

(What can India teach us ? P. 44)

जॉन् क्रॉफर्डनें तर सर्व आशियस्थांसच एकदम लुच्चे व लबाड ठरविलें. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, सत्य हें काय तें युरोपांतच वास करीत असून, त्याचा

कॉफर्डची वृथा बरळ.

---

1 Mr. Crawfurd says:—"In morals there has ever existed a wide difference between Europeans and Asiatics. Truth, the basis of all morality, has never distinguished the races of India. In Europe fidelity to engagements has been in esteem even in rude times, and increased with the advance of civilization. Not so in Asia, for it may safely be asserted that there the most civilized nations are found to be the teast truthful, among whom may be named the Persions, the Hindus, and the Chinese Integrity is most prevolent among the educated classes in Europe ; but with the more civilized, the want of it pervades all classes in Asia. The European maxim that 'honesty is the best policy' is not recognised by the more civilized people of Asia ; on the controry finesse is substituted. It is only among Asiatic nations of the second order of civilizations '(Mr. C. knows only them, it appears)', such as Burmeese, Malays &c. that we find an adherence to truth, and even they become demoralized in the attainment of power. The difference in morals between Europeans and Asiatics seems to have belonged to all ages."

(Speeches &c. of Dadabhai N. M. P.)
(P. P. 6/7)

आशियांत अगदीं गंध देखील नाहीं. अर्थात्, त्याच्या मतें हिंदुस्थानांतही त्याचा वानवाच आहे, हें उघड आहे.

ज्या हिंदूंची सत्यशीलता वेदकालापासून तों तहत चालू एकोणीसाव्या शतकापर्यंत, म्हणजे सुमारें दहा पंधरा हजार वर्षें एकसारखी गर्जत आहे; जिचा परिमल सुटून, तो देशांतरींही जाऊन थडकला; ज्यामुळें, परद्वीपीयांचें कुतूहल सतत जागृत झालें; ज्या कारणानें त्यांनीं इकडे येऊन तत्संबंधीं स्वतः अनुभव घेऊन तिचें मनःपूर्वक वर्णन केलें; त्या हिंदूंच्या सत्यशीलतेला क्रॉफर्ड मजकूरनें एकदम पीस फिरवून, आपल्या निरर्गल व अमंगल वाणीनें केवळ अन्यायानेंच कलंक लावण्याचा प्रयत्न केला, ही कांहीं लहानसान आश्चर्याची गोष्ट नाहीं!

अस्तु. मनाची समता राखून, किंवा सारासार विचार करून, त्यांनीं सदरहू उद्गार काढले असल्याचें दिसत नाहीं. ते निव्वळ एकतर्फी व मनसोक्त, तसेच निराधार व दोषैकदृक् असून, त्यांनीं आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ, भलत्याच उपनयांनीं इच्छित प्रमेयें पुढें केल्याचें उघड होत आहे.

---

1 "Lastly, I think Mr. Crawfurd's treatment of this important subject is one sided, and not judicial and scientific. The paper professes to draw a conclusion from certain facts, but to me it seems the facts are selected for, and adapted to a foregone

(पुढें चालू)

बरें, मिल्ल, क्रॉफर्ड, इत्यादि दुराग्रही लोक केवळ आपल्या भोंवतीं आपणच दिवा ओंवाळून घेऊन, युरोपस्थ आणि ख्रिस्ती लोकांच्या नीतिमत्तेविषयीं

पौरस्त्य आणि पाश्चात्य नीतिची तुलना.

जो येवढा टेंभा पाजळतात, त्याप्रमाणें एकंदर वस्तुस्थिति तरी खरी असती तर, आम्हाला एक चकार शब्दही काढण्यास जागाच राहिली नसती. परंतु तसें बिलकुल नसल्या कारणानें त्यांचें बोलणें अगदींच फोल होतें. कारण, पाश्चात्यांची नीतिमत्ता आमच्यापेक्षां पुष्कळच कमी दर्जाची

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

conclusion. All explanatory causes of difference are made light of and thrown into the back ground, and all tending to prove the conclusion brought most forcibly into the foreground. * * * But the premises do not warrant the conclusion ; moreover, there are several assumptions which are not correct."

(Speeches &c. of Mr. Dada Bhai-
(Nowroji P. P. 21/22)

1 "Those who wish for an opinion 'of the most excellent moralities which are to be observed among the people of these (Hindu) nations,' cannot do better than read the 14th section of the observant, intelligent, and tolerant chaplain, who is more just, at least on one point, than the modern missionary who denies to the Hindu filial affection."

(Tod's Ràjasthan P. 560)

असल्यामुळें, खुद्द त्यांच्याच पाद्र्यांस देखील केवळ निरुपायास्तव, असेंही कबूल करणें भाग पडतें कीं, हिंदूंची नीति श्रेष्ठतर असून एकंदर ख्रिस्ती राष्ट्रांची नीति अगदींच उतरत्या पाहिरीची आहे.

एलफिन्स्टनचें असें मत आहे कीं, अपराधाच्या संख्येची एकंदर तुलना केली तर इंग्लंडापेक्षां हिंदुस्थानांतील अपराधाचें मान कमी आहे. आणि हें मत त्यानें प्रमाणानें व आहावालांच्या आंकड्यावरून सिद्ध करून दाखविलें आहे. सन १८३२ साली,[3] जे रिपोर्ट हौस ऑफ कॉमन्स

---

1 "The Chaplain thus conludes his chapter 'On the moralities of the Hindu.'—

'O ! What a sad thing is it for Christians to come *short of Indians*, even in moralities ; come short of those, who themselves believe to come short of heaven ! ' "

[Tod's Rajasthan P. 560].

2 "Including Thags and Dacoits, the mass of crime in India is less than in England."

[Elphinstones' History of India P. 385].

3 "By a series of Reports laid before the House of Commons in 1832, it appears that, on an average of four years, the number of capital sentences carried into effect annually in England and Wales was 1 for 2, 03, 281 souls ; and in the provinces under the Bengal Presidency, 1 for 10, 04, 102 ; transportation for life, inEngland, is 1 for 67, 173, and in the Bengal provinces 1 for 4, 02, 010."

[Do. Do.]

सभेंत सादर झाले, त्यांवरून त्यानें असें शोधून काढिलें आहे कीं, इंग्लड आणि वेल्स देशांत, प्रत्येक २,०३; २८१ लोकसंख्येंत एक मनुष्य खून करून फांशी जातो. परंतु असल्या घोरतम अपराधाचें मान बंगाल प्रांतांत फारच कमी आहे. म्हणजे स्थूल मानानें तें (१/५) एक पंचमांश कमी आहे, असें म्हटलें तरी चालेल. कारण, बंगाल प्रांतांत प्रत्येक १०,०४,१८२ लोकसंख्येंत एक मनुष्य खून करून फांशी जातो. इंग्लडांत ६७,१७३ मनुष्यांत एक इसम काळ्या पाण्यावर जात असून, बंगाल्यांत ४,०२,०१०त एक इसम जातो. इंग्लडची[1] तत्कालीन लोकसंख्या १,३०,००,००० असून त्यांपैकीं दरवर्षास १२३२ जणांस फांशीची शिक्षा झाली, व त्यांत ६४ इसम फांशी गेले. परंतु बंगालप्रांताची ६,००,००,०००, म्हणजे स्थूल मानानें सहापट जास्त लोकसंख्या असतांही, तिकडे फक्त ५९ जणांसच फांशीची शिक्षा झाली, व तितकेच फांशी गेले.

---

1 "The annual number of sentences to death in England was 1232, and of executions 64. In Bengal, the sentences were 59, and the execution the same. England is taken at 13,000,000 souls and the Bengal provinces at 60,000,000."

[Elphinstones' India P. 385].

सर जी क्लार्कचें असें म्हणणें आहे कीं, यूरोपां-तील पुष्कळ देशापेक्षां, इकडे (हिंदुस्थानांत) कमी अनीति आहे.[1]

सेर. ई. पेरीचें असें मत आहे कीं, मुंबईतील अप-राधाचें मान, युरोपांतील तत्सम समाजाच्या तुलनेनें, साधारणचपणें पुष्कळ कमी आहे. आणि इंग्रजांच्या सह-वासानेंच आपली नीति बिघडली आसल्याविषयीं हिंदूंची समज आहे.[2] सर. ज्यॉर्ज क्यॉंबेल यांचा देखील असाच अनुवाद आहे. ते ह्मणतात कीं, (ब्रिटिश) कोर्टांच्या पद्धतींत कांहीं तरी विशेष दोष असल्याकारणानेंच एतद्देशी यांच्या प्रामाण्यांत[3] अश्लिलता किंवा गडबड दृष्टीस पडते.

---

1 "He thinks there is less immorality [in India] than in many countries of Europe."

(Speeches &c of Dàdá Bhai Nowroji P. 9)

Vide also report of Select Committee. 1853.

2 "Sir E. Perry tells us, that offences against property and crimes generally, are less frequent in the island of Bombay than in any similar community in Europe, and that it is the opinion of the Hindus that native morality suffers by coming into close contact with the English–the pristine simplicity and truthfulness of the native village disappears in drunkenness, intrigue, and a litigious spirit supervening, and that their commercial intigrety has always been famous."

(Speeches &c. of D. Nowroji P. 9]

3 "And the Hon. Mr. compbell fully admits that

(पुढें चालू)

परंतु सारासार विचार केला तर, **गिल्डहॉल्** (**लंडन्**), आणि **कलकत्ता** येथील (भिन्न द्वीपीयांच्या) साक्षीचें महत्व सारखेंच आहे, असा जस्टीस **फियर्स्**चा अभिप्राय आहे.

असो. तात्पर्य इतकेंच कीं, **भारतीयां**ची नीति, व त्यांचें सदाचरण, याविषयीं कोणत्याही प्रकारें आक्षेप घेण्यास **परकीयांस** यत्किंचित् देखील कारण किंवा जागा नाहीं.

आतां, दुसऱ्याचें नसतें छिद्र विनाकारण शोधून काढून, त्याची उणीव दाखविणें, ह्मणजे कुत्सितकल्पनेस निरर्थक आश्रय देणें होय. ह्मणून तसें करणें देखील वाजवी आणि प्रशस्त नाहीं.

शिवाय, आपल्याच सत्यतेची व नीतिमत्तेची विशेष शेखी मिरविण्यासारखी **पाश्चात्यां**ची बिलकूल स्थितिही नसून, त्यांच्या समाजघटनेंत, नीतिमत्तेच्या संबंधानें मोठी तारीफ करण्यासारिखेंही कांहींच नाहीं. उलट, **भारतीयांच्या** तुलनेनें सदरहू सत्वगुणांचा त्यांच्या देशांत अभावच आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

(मागील पृष्ठवरून पुढें चालू)

it was the courts which were to blame for the character of native testimony."

1 "In Mr. Justice Phear's opinion, 'the character of the average oral testimony in the Guildhall of London, and that of the same in the town-hall of Calcutta, were on a par.'"

(Speeches &c. of D. Nowroji P. 10)

पाश्चात्यांची नीतिमत्ता, व त्यांच्या बोलण्यांत धरसोड.

आपल्या दिव्याखालीं भरपूर अंधेर असतांही, दुसऱ्याच्या डोळ्यांत चटकन् बोट घालण्यास कांहीं कांहीं पाश्चात्य बिलकुल मागें पुढें पाहत नाहींत, असें पाहून, आणि त्यांच्या त्या वृथागर्वोक्तींचा अगदीं वीट येऊन, एक निस्पृह गृहस्थ असें ह्मणतो कीं, खोटी दानत

---

1 "A Parsee gentleman, during his residence in this country [England] for nearly eight years, disgusted with these sweeping charges, used to say:—'Look at all the mass of untruths in the daily advertisements and puffs; the concoction of companies for the benefit of the promoters only; see what the book on facts, failures, and frauds discloses; what extremly watchful care one is obliged to have in his dealings in the city, where every kind of scoundrelism is so rife; how many manufacturers always give you the best article only, at any price; how cleverly flaws are found in contracts; how artizans always require more time for wage-work than for job; how often you get goods different from patterns and samples; and he asked what grounds are there for Europeans to boast of higher commercial morality than that of the natives of India? Look at the number of immoral haunts in London, read the account of Life in Liverpool, see the social evil and street immorality, cases of unfaithfulness in domestic life, great immorality wher-

(पुढें चालू)

असत्याकारणानें युरोपांतील धनाढ्य पेढ्यांनीं एकामागून-
एक अशीं आपलीं दिवाळीं काढणें; पनामा कालव्यासं-

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

ever numbers of the two sexes work together, the amount and character of crime disclosed by Police and law reports, and election corruption, and all this among a highly civilized people ? Is there not more reason for humiliation than boasting on the part of Europeans as to their morality ? See the constant changes of views in the papers about Indian matters, as it suits the purpose of the writer at the moment; the mode in which India has been acquired:—

"War, disguised as commerce came;
"Won an Empire, lost a name."

When it suits their purpose, the Hindus are described as most loyal, obedient, civilized, etc; at other times they are cowardly wretches, disloyal, ungrateful, barbarous. They first give a bad name, and then cry out to hang them. They draw millions every year from India, and in return abuse its people, caring not so much for it as for a rotten Engish borough. They yield with the greatest reluctance and difficulty any of the just rights and privileges demanded by the nations. Look at that iniquitous annexation-policy in spite of treaties; see how the cost of the Afghan war is clapped on the shoulders of India; their whole aim being how to get most money from India. The only God the English worshipped was gold; they would do any thing to get it. If it were

(पुढें चालू)

बंधाच्या कारभारांत, मोठमोठ्या फ्रेंच मुत्सद्यांनीं देखील दुर्नीतीनें वर्तणें; हिंदुस्थानांतील दारिद्री प्रजेचें भूकंपामून

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

discovered that gold existed in human blood, they would manage, and with good reasons to boot, to extract it from thence?"

'The English boast of fair play &c, and yet see with what different measueres they deal it out sometimes to the European and native; how bullying they are towards the week, and very polite and reasonable with the strong. Coercion alone, it seems, makes them do what is right. As long as the Englishman wanted anything he was the very embodiment of politeness, but the object gained, he was no more the same person. Gratitude was not a very prominent trait in the English character."

'I beg to submit for your consideration, that the decision of the cabinet not to pay the ordinary pay of the Indian troops employed in the Abyssinian expedition is an injustice to India, and an injury to the prestige of England."

(Essays and speeches &c. of Dadá Bhai Nowroji.)
[P. P. 16-17-51].

हबशी स्वारीचा खर्च हिंदुस्थानावर यत्किंचित्ही कारण नसतां लादल्यामुळें, इतका अन्याय झाला कीं, त्याबद्दल लार्डक्रान्बोर्न सारख्या आंग्ल गृहस्थांस देखील फारच वाईट वाटलें. ते ह्मणतात कीं:—

"At all events the special injustice of the course now about to be pursued consists in this —that

(पुढें चालू)

संरक्षण व्हावें ह्मणून, दुष्काळ निवारणार्थ संशोधन केलेल्या ठेवीची दुर्दशा करून, चुराडा उडविणें; तसेंच सांसर्गिक रोगांचा कायदा; तदुद्भूत दुर्नीतीचा फैलाव; खोट्या जाहिराती; वचनभंग; लबाडीचें वर्तन; धेरसोडीचें बोलणें; काळ्या गोऱ्यांचा न्याय करतांना, व्यक्तीच्या वर्णावर मुख्यत्वेंकरून लक्ष्य पोहोंचवून त्याप्रमाणें इन्साफ देणें; तहनाम्यांच्या शर्तीविरुद्ध, राज्येंच्या राज्यें आपल्या वशांत टाकण्याच्या हेतूनें तीं अन्यायानें खालसा करणें; आफगाणिस्थान आणि ब्रह्मदेश, यांच्याशीं निष्कारण व अनितीनें लढाई करून, तत्संबंधीं सर्व खर्च हिंदुस्थानावरच लादणें; आबिसीनिया व हिंदुस्थान, ह्यांचा परस्पर अर्थाअर्थी संबंध नसतांही, आबिसीनियांत इंग्लंडानें चालविलेल्या संग्रामाचा खर्च, अन्नान्न करित फिरणाऱ्या बिचाऱ्या हिंदी रयतेच्या बोडक्यावरच घालणें; इत्यादि अनेक प्रकारास काय ह्मणावें! किंबहुना, ही वर्तनक्रममालिका, हजारो कोसांवरून फार दूर दिसणारी, आणि सप्त समुद्रांपलीकेड, खंडांतरीं,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

when we employ English troops in India they are paid for out of the Indian revenues from the moment they land in that country; but when we employ Indian troops on English duty, we say that India must pay for them."

1 The contagious Diseases Act.

2 Vide Manchester agitation on the Indian import cotton-duties.

मोठ्या थाटानें विराजमान होणारी, जणूं काय मूर्तिमंत नीतीच होय. अथवा, ह्या प्रत्यक्ष नीतिमूर्तीचीं हीं भिन्नभिन्न आविष्करणें व अतिरमणीय स्वरूपेंच आहेत, असें म्हटलें तरी चालेल. खरोखर, अशाच प्रकारची पाश्चात्यांची नीतिमत्ता असेल तर, त्याबद्दल त्यांस यत्किंचित्ही भूषण अथवा अभिमान न वाटतां, सरलदृष्टीनें पूर्ण विचार केला तर, तत्संबंधीं उलटा त्यांस विषादच झाला पाहिजे.

त्यांच्या समजुतीप्रमाणें ते आपणांस कितीही नितिमान समजोत, तथापि, निदान आम्हाला तरी, पाश्चात्यांच्या नितिमत्तेचें यत्किंचितही श्रेष्ठत्व, किंवा पूज्यता, अथवा धन्यता वाटत नाहीं. इतकेंच नाहीं तर, त्यांचा तो लपंडाव आणि कावेबाजपणा पाहून, आमच्या मनाला उद्विग्नता प्राप्त होते; व त्यांची ती नीतिभ्रष्टता अवलोकन करून आमच्या मनाला तिटकारा वाटतो. आणि त्यांतही विशेषतः दुसऱ्याची निष्कारण विटंबना करून ते आपलीच वृथा शेखी मिरवीत असल्या कारणानें, त्यांच्या पोकळ अभिमानाचा अगदींच वीट येतो.

दुसऱ्याची उगीच निंदा करून, आपलाच वृथा बडिजाव मिरवण्याची कांहीं कांहीं इंग्रजांस देखील अतिनिंद्य सवय लागली आहे; व त्यामुळें आमचें फारच नुकसान होत आहे. आतां, ही गोष्ट जरी त्यांच्या लक्षांत येत नाहीं तरी, आमच्याविषयीं दुसऱ्यांचीं मनें निष्कारण दुषित होऊं

नयेत ह्मणून, अथवा आमच्याबद्दल इतरांचा भलताच ग्रह होऊं नये एतदर्थ, आह्माला तत्संबंधीं यथान्याय प्रतिकार करणें अगदीं अवश्य आहे. आणि येवढ्याच कारणासठीं, जरी इंग्रज लोक आमचे एकंदरीनें न्यायी प्रभु आहेत तरी, इतिहासदृष्टीनें जे त्याचे गुणदोष आहेत त्यांचें यथार्थ विवेचन झाल्यामुळें, ते आह्मांवर रोष करणार नाहींत, अशी आह्मी पूर्ण आशा करितों.

कित्येक इंग्रज[1] लोक अगदीं उघडपणें, पण कारणांवांचून, असें प्रतिपादन करितात कीं, **भारतीय हे** लज्जापराङ्मुख असून, नीतिभ्रष्टही आहेत. अशा प्रकारें प्रथम आमची निंदा करून, ते आपला स्तुतिवाद गाण्यास प्रारंभ करितात, आणि म्हणतात कीं, **यूरोपस्थां**सारिखे ते नीतिमान नाहींत. परंतु हा वृथा आत्मस्तुतिवाद, व ही निष्कारण परनिंदा, सर्वथैव खोटी आहे, असें म्हणण्यास आम्हाला यत्किंचित् देखील शंका वाटत नाहीं, व तें सप्रमाण सिद्ध करण्यासही आम्हीं तयार आहोंत.

आंग्लनीति.

आमचे **आंग्लप्रभु** राजकीय कामांत कितीही दक्ष असोत, व्यापारांत ते कितीही कार्यक्षम, धोरणी, व दूरदर्शी असोत, अथवा

---

१ पूर्वार्ध पु.१. प्रस्तावना. पान ८।९ वरील टीप पहा. तसेंच मिह्लकृत इतिहासही पहावा. तथापि, कांहीं इंग्रज लोक, अशा कामीं. फारच नामांकित अपवाद असून, ते उदार, थोर, सात्वीक, आणि सरळ मनाचे आहेत.

उद्योग, शौर्य, साहस, आणि विद्याभिरुचि, यांत ते कितीही पुढें सरसावलेले असोत, तथापि, नीतिमत्तेचा जेव्हां जेव्हां ह्मणून प्रश्न निघेल, तेव्हां तेव्हां वृथा घमेंडीनें त्यांनीं आपलीं डोकीं उगीच वर न करितां निव्वळ खालीं पाहूनच तटस्थ बसावें, हें विशेष श्रेयस्कर होय.

ज्याप्रमाणें राजकीय कामांत **पाश्चात्यांचें** कृष्णकारस्थान क्षणोक्षणीं दिसून येतें, त्याचप्रमाणें एकंदर सामाजिक व्यवहारांत देखील त्यांची नीतिभ्रष्टता, त्यांचा कावेबाजपणा, त्यांचें दुटप्पी वर्तन, त्यांची स्वार्थपरायणता, आणि त्यांचें कापट्य, हीं पदोपदीं दृष्टिगोचर होतात.

ह्याचें खरें स्वरूप ध्यानांत येण्यासाठीं **इंग्लंड**चा आणि **यूरोपखंडा**चा इतिहास, अन्यखंडांतील **वसाहतीं**ची व्यवस्था व **हिंदुस्थानां**तील **आं**ग्लराज्यकारस्थान, यांजकडे थोडें बहुत लक्ष पुरविलें पाहिजे. म्हणजे नीतिमत्तेसंबंधीं **पाश्चात्यां**ची पोकळ फुशारकी किती किमतीची आहे हें पूर्णपणें लक्षांत येईल.

जॉन्नामक्या राजाला खरेपणा हा कसा तो स्पर्श देखील माहीत नव्हता. अशा पापमूर्तीचें दर्शनच न व्हावें

---

१ याविषयीं एक त्यांचाच गोरकाय पाद्री असें लिहितो कीं:—

"O! what sad thing is it for Christians to come short of Indians, even in moralities?" * * *

(Tods' Rajasthàn P. 560.)

1 "He (John) was a mean coward, a shameless liar, the most profligate in a profligate age, the most faithless of a faithless race."

[Colliers' History of the British Empire. P. 81]

आंग्लदरबारांतील नीति.

एतदर्थ लज्जेनें ~णूं काय आपलें बिऱ्हाडच, त्या राज्यांतून उचललें होतें. विनयानेंही आपलें तोंड काळें केलें होतें. सत्यतेनें तर आपला गाशाच गुंडाळला होता. व्यभिचाराचें साम्राज्य सर्वत्र मातलें होतें. पापाचरणानें आपली कमाल करून सोडली होती. आणि दुराचार व भ्रष्टता यांचा तर पूरच लोटला होता.

राजे, व

सातव्या हेन्रीसारख्या[1] राजांनीं न्यायअन्यायाकडे लक्ष न देतां, सूक्त असूक्त उपायांनीं द्रव्यसंचयच केला. व अशा निर्लज्जपणानें लूट करण्याच्या कामीं त्याजला एम्पसन् आणि डड्ले सारखे मंत्रीही मिळाले.

आठव्या हेन्रीसारख्या राजानें[2] आपल्या कामशान्त्यर्थ

1 "During all these events infamous extortion was going on. Richard Empson and Edmund Dudley were the chief agents of Henrys' rapacity."

(Colliers' History of the British Empire. P. 152).

2 "He was an unwieldy mass of currupted flesh and evil passions." * * *

"A new face—that of the lovely Jane Seymour—caught his changeful fancy."

"Anna was tried on a charge of unfaithfulness to her royal husband, and was condemned to die."

"For about a year and a half the charms of

(पुढें चालू)

एका मागून एक अशा अनेक बायका केल्या. ह्यांपैकीं कित्येक तर पातिव्रत्यापासून भ्रष्टच झाल्या होत्या, सबब कांहींचा शिरच्छेद करून, बाकीच्यांचा त्यानें घटस्फोट केला. क्याथराइन हावर्ड नांवाची जी ह्या राजाची राणी होती, तिनें तर आपलें अनीतीचें आचरण कबूलच[1] केलें होतें.

राण्यांची नीतिभ्रष्टता.

कंदर्पाच्या सपाट्यांत सांपडल्यामुळें मेरीसारख्या राणानें आपल्या पतीसही राजरोस फसवून, [2]शेवटीं त्याची प्राणहानि देखील केली. इताली देशांतील

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)
Catherine Howard delighted the king. Then some events of her earlier life began to be whispered abroad; and of these Cranmer sent a written statement to Henry, who refused at first to believe them.

1 "But when she herself confessed, what many witnesses swore that she had been unchaste before her marriage, the fierce jealousy of Henry blazed forth. Nothing but blood could quench his rage, and she was beheaded on Tower-hill. 1542 A. D."

(Colliers' British Empire. P. P. 165-161-163)

2 "Her private life was open to suspicion. * * Then followed her fondness for Rizzio, an Italian musician; which excited the jealousy of Darnley (her husband), * * who found her at supper with Rizzio."

(Colliers' British Empire. P. 188).

ही मेरी स्कॉट्लंडची राणी होय.

ग्रिझिओ नामक गायकाशीं सख्य करून, त्याजबरोबर ती रममाण झाली. आणि बॉथवेलशीं लग्न लावून, तिनें अवन्नित व निंद्य कर्मे आचरिलीं.

इलिझाबेत राणीनें मेरीस्टुअर्ट राणीचा अन्यायानें शिरच्छेद केला. आणि ह्याच आमच्या अविवाहित राजकन्येनें, कुसुमशराचे तीव्राघात सहन न झाल्यामुळें, नानाप्रकारचे कुढंग केले; ती नट्ट्याफट्ट्यांत दंग झाली; व आपल्या हाताखालच्या सरदारांशीं तिनें सानुराग वर्तन ठेविलें.

प्रजेचें नीतिशैथिल्य.

असो. उत्तरोत्तर याहीपेक्षां नीतीची अवनतीच होत गेली, आणि एकंदर राष्ट्र चैनींत गुंग झालें. खुद्द राजाचेंच वर्तन अगदीं गढूळ असल्या कारणानें, त्याच्या प्रजेलाही त्याच मासल्याचें वळण लागलें. व तसें होणें देखील साहजीकच होतें. कारण, यथा राजा तथा प्रजा. याप्रमाणें सर्वत्र नीतिभ्रष्टता पसरली. वारांगनांचे

---

1 "And her (Mary Stuarts') violent death is a foul stain on the memory of Elizabeth."

"Vanity was her great fault; and the picture drawn by historians of 'Good Queen Bess,' as she has been called, coquetting in her old age with Raleigh and Essex; and believing all their tender speeches, makes her rather ridiculous in our eyes."

(Colliers' British Empire. P. 179).

नेत्रकटाक्ष, युवतिजनांचें साहचर्य, आणि विश्वयोषितांचें हास्यवदन, इत्यादिकांतच दुसरा चार्लस्¹ सदैव निमग्न असे. त्यामुळें राजकीय खटपटींत देखील स्त्रियांचें प्राबल्य बऱ्याच तीव्रतेनें भासमान होई. कमी जास्ती महत्वाच्या कामांत त्या हटकून ढवळाढवळ करीत, आणि आपल्याच मर्जीप्रमाणें साधेल त्या कामाचा उलगडा पाडीत. या कारणानें अनीतीचा सर्वत्र फैलाव झाला; दुराचरण जोरावलें; आणि बहुजन समाज कुव्यसनांत अगदीं दंग होऊन गेला. पार्लमेंट्च्या² सभासदांनीं देखील आपली नेकी

1 "He was a mean spirited, treacherous, dissolute man, who, thoroughly vicious himself, scoffed at the idea of virtue or honour in others. Much of his time was passed in worthless company."

"From the tumults and impostures of the reign sprang two words—ever since in common use—*Mob* and *Sham*."

(Colliers' British Empire. P. 235).

2 "The nation, released at the restoration from such restrictions, plunged wildly into the opposite extreme. The king lived a life of indolence and profligacy, and spent most of his time in the society of beautiful and witty, but very worthless women, whose influence affected the politics of the day to no small extent. Licentiousness spread every where. Members of Parliament *sold* their votes, as a matter of course."

[Colliers' British Empire. P. 229].

सोडली, व प्रजेच्या हिताचें मातेरें केलें. देशकल्याणार्थ हरएक बाबतींत मत देण्याचा जो त्यांचा महत्वाचा अधिकार होता, त्याचा देखील ते बेधडक क्रयविक्रय करूं लागले. याप्रमाणें सरकार दरबारांत, राजकीय आणि सामाजिक कांजाचा निव्वळ बाजारभाव होऊन, नीतिमार्ग आपोआपच बंद झाला.

स्त्रीजनसमूहाचें अनीतीचें आचरण.

याच कारकीर्दीत बायकांस देखील नाटक करण्याचा[1] षोक लागला. स्त्रियांचें प्रकृतिसौजन्य व सौकुमार्य, त्यांचें मार्दव आणि सुशीलता, त्यांचा विनय व शिष्टाचार, हीं सर्व त्यांनीं गुंडाळून ठेविलीं, आणि त्या अचकट विचकट खेळ करूं लागल्या. नानातऱ्हेचीं नाटकें लोकसमाजापुढें येत चाललीं, व त्यांत बीभत्सरसानें तर अगदीं कमाल करून सोडली. हीं पुस्तकें किती गचाळ आहेत ह्याची प्रथमतः कल्पना सुद्धां होत नाहीं. पण तीं इतकीं वाईट आहेत कीं, तीं अनीतीचीं केवळ

1 "The plays written then, in which for the first time female performers took the female-parts, are unfit to be read, so *immoral* are the thoughts and the language. The power of even the Church was but feebly exerted to stem this torrent of wickedness."

(Colliers' British Empire. P. 229).

माहेर घरेंच असल्यामुळें आपल्या हातीं धरण्याच्यांही लायक नाहींत.

हाच दुर्नीतीचा प्रभाव सर्वत्र दृष्टीस पडतो. लॉर्ड-हाय चान्सेलरासारखी उच्च पदवी धारण करणाऱ्या मॅकलस्फील्डनें देखील प्रजाजनापासून यथेच्छ लांच खाल्ला, आणि अधिकार व पदवी यांचा मनसोक्त क्रय-विक्रय केला. ह्याच्याकडे अनाश्रित, वेडे, खुळे, पोरकीं-पोरें, अज्ञान, विधवा, निवारस, इत्यादिकांची व्यवस्था असून, त्या सर्वांचा पैसा व मालमिळकत, हीं यच्चावत् त्याच्या ताबे अधिकाऱ्यांकडे सोंपलेलीं असत. ह्या ताबे-अधिकाऱ्यांस **मास्टर्स** ऑफ धी रोलस् ह्मणत, आणि आप-ल्या देशांत **नाझरां**कडे ज्या प्रकारचें काम सोंपलेलें असतें, त्याच मासल्याचें काम ते करीत. तेव्हां, अशा प्रकारें ह्या जागा मोठ्याच उत्पन्नाच्या असल्यामुळें, **लॉर्ड मॅकल्सफील्डच्या** तोंडाला सहजींच पाणी सुटलें, आणि त्यानें लाखो रुपयांचीं अवदानें त्या **आंग्ल** नाझरां-कडून घेऊन, आपल्या तोंडांत टाकिलीं. बरें, ह्या **मास्तर्स** ऑफ धी रोलसनीं तरी इतकी रक्कम आपल्या पदरची भरली कीं काय; छे ! छे ! विष्णवेनमः. त्यांनीं देखील परभारेंच पाहुणचार केले; हलवयाच्या घरांतलाच त्यांनीं नैवेद्य दाख-विला; आणि त्यांच्याकडे सोंपलेल्या अनाश्रितांच्या पैशावर

आंग्लन्यायाधीश, आणि व्यवस्थापक, यांची नीतिभ्रष्टता.

यथास्थित ताव मारून, त्या बिचाऱ्या अनाथ विधवांस, व पोरक्या पोरांस मात्र अजिबात नागविलें. मिळून येनकेन प्रकारेण, त्यानीं मॅकल्स् फील्डची चांगली तुंबडी भरली.[1]

बरें, बेकन् सारखे तत्ववेत्ते आणि न्यायमूर्ति, यांनीं तरी सावध राहून नीतिमार्गाचें दृढावलंबन करावयाचें होतें; व लोकांस चांगला कित्ता घालून देऊन, सुरेख वळण लावावयाचें होतें. पण तें व्हावें कसें ? कारण, मुळापासूनच नीतीचा पाया पडला डळमळीत. तेव्हां अर्थात्‌च अनीतीची जिकडे तिकडे रेलचेल झाली, व चंगळ उडाली; आणि खुद्द बेकन्‌नें ही न्यायासनारूढ असतां, पक्षकारांकडून खोऱ्यांनीं पैसे ओढून न्याय विकला, व बेधडक अन्याय[2] केला. पुढें याचाच कित्ता मॅकल्सफील्डनें गिरवून अनीतीचा विजयध्वज रोंविला, असें दिसतें.

याप्रमाणें राजवाड्यांत भ्रष्टकार, अनीति, आणि

---

१ इ. स. १७२५ सालीं, याजवर लांच खाल्याबद्दल खटला झाला.

२ "In his need for money he took bribes; and this was made the basis of an accusation. Tried before the Lords (1621), he was degraded from the Woolsack and exiled from the Court."

(Colliers' British Empire. P. 205).

आंग्लधर्माधिकाऱ्यांची नीतिमलीनता.

निष्ठुरता, यांचें पारडें बरेंच वर चढलें असून, धर्माधिकारी देखील फारच दुराचारी, विषयासक्त, व मदांध झाले होते.

आतां, धर्माचें व नीतिचें संरक्षण करून ज्यांनीं खरोखर केवळ आपल्या वर्तनानेंच दुसऱ्यांस लाजविलें पाहिजे, त्यांनीं देखील आपलें ब्रीद सोडून देऊन दुर्नीतिचें बेधडक अवलंबन केलें. धर्माधिकाऱ्यांनींही आपला वर्तनक्रम बदलला आणि ते दुराचरण करूं लागले. परंतु अशा दुराचाराबद्दल त्यांचें योग्य शासन न होतां, त्यांची उलट वाहवाच होत गेली. त्यामुळें सर्व इंग्लंडांत मोठी गडबड उडून, अखिल प्रजा अगदीं भयभीत व संत्रस्त झाली. टायटस् ओट्स् सारख्या दुराचारी पाद्यास त्यांनीं केले-

1 "The monks generally led dissolute lives, and that many of the monasteries were dens of iniquity.'

(Colliers' British Empire. P. 161).

2 "Then Titus Oates, a clergyman disgraced for vicious habits, came forward with the story of a 'Popish Plot,' to assassinate the king and to massacre all Protestants: * * All England went mad with fear."

(Colliers' British Empire. P. P. 231/232).

3 "Titus Oates was rewarded with a pension of

(पुढें चालू)

ऱ्या अति निंद्य पापकर्माचा मोबदला न मिळतां, उलट बक्षीसच मिळत गेलें. आणि जणूं काय कुटिल कारस्थानें अगदीं शांत व निर्विघ्नपणें करण्यासाठींच, एक राहण्यास चांगलेंसें घर व खर्चासाठीं थोडेबहुत पैसे, ह्मणजे सालीना सुमारें बारा हजार १२००० रुपयांचें वर्षासनच, त्यास मिळालें. मग काय विचारावें ! पिशाच्याच्या हातीं कोलीत दिल्यासारखें झालें. आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुनमास, लवकरच अति क्रूर व घोर कर्में करणारांचा उद्भव[1] झाला. त्यामुळें धर, पकड, आणि मार, हाच कायदा अमलांत येऊन, उचल आदमी कीं दे फांशी, याशिवाय दुसरी गोष्टच राहिली नाहीं. सकट घोडे आणि बारा टक्के. या न्यायानेंच सर्व देवघेव होऊं लागली, त्या कारणानें, कोणीही खरोखर

तिचे दुष्परिणाम.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

£1200 a year, and rooms were assigned to him in White-hall. Encouraged by his success, new perjurers, such as Bedloe and Danger-field, poured from the gambling-houses and drinking-dens of London."

[Colliers' British Empire. P. 232].

1 "It was an English Reign of Terror, and many Catholics were unjustly put to death. * * New perjurers poured from the gambling-houses, and drinking-dens of London. Execution followed execution."

(Colliers' British Empire. P. 232).

अपराधी असो वा नसो, त्याची उचलबांगडी करून, त्याजला बेधडक यमसदनास पोहोंचविण्याचा एकसारखा तडाका चालला. जिकडे तिकडे मोंगलाई सुरू झाली, व चोहोंकडे बेबंदनगरी आणि झोटिंग पातशाही मातली.

हा सर्व प्रकार खुद्द इंग्लंडांतल्याच नीतिमत्तेचा झाला. आतां, ईस्टइंडीया कंम्पनी बाहादूर व तिचे नोकर, यांनीं हिंदुस्थानांत कसा दिवा लाविला, व आपल्या आंग्लनीतिमत्तेचा किती प्रकाश पडला, याविषयींचें थोडक्यांत विवेचन करूं.

आंग्लहिंदी यांचें दुराचरण.

बंगाल प्रांताचा गव्हरनर हेस्टिंग्ज याचें हिंदुस्थानांतील चरित्र अवलोकन केलें, ह्मणजे तर आपल्या अंगावर कांटाच उभा राहतो. त्यानें केवळ अवदानावर अवदानें मारूनच आपला तळिराम गार केला इतकेंच नाहीं. तर, अति लोभामुळें त्याला दुर्बुद्धि होऊन त्यानें फारच अनन्वित, व अतिक्रूर, अशीं असंख्य घोर कर्में केलीं, सत्ताधीश असल्या कारणानें, त्यानें दुर्बल अशा मांडलिक राजांचाही छळ केला, आणि त्यांची अपार संपत्ति लुटली. देशी राण्यांस निस्सीम निर्दयतेनें वागवून

1 "He fixed £500,000, as a mulct for insult offered to himself, and then a rebellion brakeout in consequence of his violence."

[Burke, Vol. VIII. P. 17],

त्यानें त्यांची उपासमारें केली; आणि अशा प्रकारें त्यांस पेंचांत घालून, त्यांजला अर्जी नागविलें. आपल्या वीतभर पोटाची खळगी येनकेन प्रकारेण भरून काढण्यासाठीं, त्या राण्यानीं आपले पंचप्राण व्याकुळ केले, व आतां मरण

---

1 "I think every demand she (the Ràni) has made to you, except that of safety and respect for her person, is unreasonable."

'These women had never quitted their homes, and yet they were cruelly excluded from the general indemnity, turned out of the fort, and ordered to the quarters of the commanding officer, Major Popham. This officer had received from Mr. Hastings a power to rob them, a power to plunder them, a power to distribute the plunder, but no power to give them any allowance, nor any authority even to receive them.' [Burke]

'The women are in want of every necessary of life.' *

"They are in a starving condition, having sold all their clothes and necessaries, and now have not where withal to support nature."

"The women in the Khurd mahl Zenana, * * assembled on the tops of the buildings, crying in a most lamentable manner for food."

(Burke. Vol. VIII. P. P. 268-269).

2 "The repeated cries of the women in the Khourd Màhl Zenana for subsistence have been truly melancholy. They beg most piteously for

(पुढें चालू)

येईल तर बेहेत्तर आहे, असेंही त्यांस वाटूं लागलें. परंतु त्यांची ती मरणोन्मुख आणि दीन स्थिति पाहून देखील, त्या पाषाण हृदयास बिल्कुल दया आली नाहीं.

अशाच प्रकारचा कहर बंगाल प्रांतांतील सर्व रयतेवर गुदरला होता. ती रयत बिचारी गरीब असतांही तिच्यापासून हेस्टिंग्जनें पैसे बुचाडिले, आणि ती खरोखर निर्धन आहे, असें पूर्णपणें माहीत असून देखील तिच्यावर त्यानें अन्यायानें सक्ती व निष्कारण जुलूम झाला. ह्या नीतिमत्तेच्या पुतळ्याला

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

liberty, that they may earn their daily bread for laborious servitude, or be relieved from their misery by immediate death."

(Burke. Vol. VIII. P. P. 269-270).

१ खुद्द हेस्टिंग्जच ह्या रयतेविषयीं व त्यांच्या एकंदर स्थिति-बद्दल एके ठिकाणीं असें लिहितो कीं:—

"It is notorious, that poverty generally prevails amongst the husbandmen of Rungpore, more perhaps than in any other parts of the country. They are seldom possessed of any property except at the time they reap their harvest; and at others barely procure their subsistence. And this is the cause that such numbers of them were swept away by the famine. Their effects are only a little earthen ware, and their houses only a handful of straw; the sale of *a thousand* of which would not produce twenty shillings."

(Burke. Vol. VII. P. 184).

जितकी ह्मणून रक्कम मागण्याचें साहस झालें, तितकी तर त्याला देणें प्राप्तच होतें. पण ती ह्या बिचाऱ्या गरीब रयतेजवळ कोठून असणार ? तेव्हां

त्यामुळें रयतेचे हाल, व यमयातना.

अर्थातच, त्यांच्या घरादारांवर साहजीकच पाळी आली. परंतु येवढ्यावरच मजल थांबली नाहीं. त्यां मनुष्यरूपी राक्षसांची इतक्यानेंच तृप्ति कोठून होणार ? त्यांनीं केवळ मातीच्या मोलानें त्यांचीं घरेंदारें, व चीजवस्त, विकली; प्रत्येक गाईची विक्री देखील फक्त बारा आणेपर्यंतच होत गेली; आणि त्यामुळें त्या बिचाऱ्या अनाश्रित रयतेचाच क्रयविक्रय करण्याचा प्रसंग आला; व खुद्द त्यांजवरज गदा येऊन ठेपली. मग काय विचारावें ! ! ! प्रत्येक कुटुंबांतील माणसाची ताडातोड होऊन, सर्वत्र हाहाःकार झाला. आईबाप, बहीणभावंडें, नवराबायको, पितापुत्र, या सर्वांचाच क्रयविक्रय सुरू होऊन, त्यांची अतीव निर्दयतेनें

1 "Five cows were sold for not more than seven or eight shillings."

(Burke. Vol. VII. P. 185).

2 "The families were disposed of. * * The most tender of parents sold their children at market. The most fondly jealous of husbands sold their wives. The tyranny of Mr. Hastings extinguished every sentiment of father, son, brother, and husband."

(Burke. Vol. VII. P. 185).

ताडातोड केली. पण येवढ्यानेंच सर्व बाजार आटोपला नाहीं. त्या बिचाऱ्या रयतेस आणखीही असंख्य **यमयातना** भोगाव्या लागून, कष्टतम देहदंड सोसणें भाग पडलें. पुरुष व स्त्रिया, यांच्या गुह्य व लाजेच्या ठिकाणीं कोलित लाविलें. कित्येक नाजूक ठिकाणीं तर चांपांचीच योजना झाली. आणि कांहीं ठिकाणीं तर कांकडे पेटवून, त्या प्रांतांतील आमच्या हतवीर्य **भारतीयांचें** अनन्वित छल केले.[1]

ह्या सर्व गोष्टी **हेस्टिंग्ज्च्याच** कारकीर्दीत, व त्या त्याला चांगल्या प्रकारें विदित असतांही, अगदीं निमूटपणें होत होत्या. **कंपनी** मजकूरचे लष्करी[2] **इंग्रज** लोक, व मुलकी

---

1 "Often they [the wives] were taken out of the refuge of this consoling gloom, stripped naked, and thus exposed to the world, and then cruelly scourged: * * The nipples of their breasts were put between the sharp and clastic sides of cleft bamboos. Here, in my hand is my authority. * * These fiends, at length outraging sex, decency, nature, applied lighted torches and slow fire,—(I cannot proceed for shame and honour !)—these infernal furies planted death in the source of life, and where that modesty * retires from the view, * there they exercised their * * nefarious cruelty."

(Burke. Vol. VII. P. 190).

२ हेस्टिंग्ज म्हणतोः—

"The remote stations of these troops, placing the commanding officers beyond the notice and

(पुढें चालू)

आणि दिवाणीखात्यांतील सर्व इंग्रज कामगार, हे रयतेवर कसा जुलूम करीत होते, व ते त्यांजडून कसा अतोनात पैसा खात होते, हें त्यास पूर्णपणें माहीत होतें. असें असून देखील, त्यानें त्या सर्व गोष्टींकडे जाणूनबुजूनच कानाडोळा केला. तेव्हां हा घडून आलेला यच्चावत् प्रकार पाहून, त्याच्या **नवनीत हृदयाचें** महदाश्चर्य वाटतें; आपलें काळीज तर तज्जन्यवेदनेनें अगदीं करपून जातें; आणि सर्वांगावर दुःसह यातनेमुळें रोमांचच उभे राहतात.

आपल्या नोकरांचा भ्रष्ट आचार, मलीन वर्तन, व गढूळ कारभार, इत्यादि सर्व निर्विघ्नपणें चालले असल्या-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

control of the board, afforded too much opportunity and temptation for unwarrantable emoluments, and excited the contagion of *peculation* and *rapacity* throughout the whole army."

(Burke. Vol. VIII. P. P. 150-151)

1 "Here, you see, he (Hastings) declares his opinion, that in Oude the Civil Servants of the company had destroyed the national character, and therefore they ought to be recalled."

"He sent these Civil Servants to do ten times more mischief than the military ravagers could do." * * *

"He sent them there to suck the blood which the military had spared."

(Burke. Vol. VIII. P. 153).

विषयीं, खुद्द कंपनीस देखील माहीत होतें. आणि ह्मणू-नच ह्या दुष्ट चालीचा एकदम प्रतिकार होऊन, त्या बाब-तींत कायमचा अटकाव व्हावा एतदर्थ, त्यांनीं तजवीज-ही केली असल्याचें दिसतें. पण त्याचा यत्किंचित् देखील उपयोग झाला नाहीं. कारण, ज्याच्यावर ही प्रतिकाराची तजवीज सोंपली होती, त्याचीच[2] कंपनीच्या सर्व नोकरांस प्रत्यक्ष फूस असल्यामुळें, जो तो, यत्किंचित्‌ही अटकाव न होतां, मनसोक्त चरे.

सर एलिजा[3] इम्पे सारख्या मुख्य न्यायाधिशानें दे-

1 "They (the company) declared at that time, that the whole of their service was totally corrupted by bribes and presents, and by extravagance and luxury."

(Burke. Vol. VII. P. 132.)

2 "He has left them to prey upon the people without the smallest degree of control."

(Burke. Vol. VII. P. 28).

3 "Your orders came to me through Sir Elijah Impey, the chief justice. * * when it came to our knowledge, that all this private intrigue for the destruction of these high women was carried on through the intrigue of a chief justice, we felt such shame and such horror both for the instrument and the principal, as I think it impossible to describe, or for anything but complete and perfect silence to express."

(पुढें चालू)

आंग्लन्यायमूर्ती-चा कुटिलभाव

खील बेगमांच्या विपुल संपत्तीवर डोळा ठेवून, ती आपल्या घशांत टाकिली. ज्याची नेमणूक केवळ लोकांचा इनसाफ करण्यासाठीं झाली, त्याच्याही तोंडाला अखेर पाणीच सुटलेना!!! न्यायाधीशानेंच लांच खाण्याचें मनांत आणिल्यावर बिचाऱ्या प्रजेनें तरी कोठें जावें! कुंपणानेंच शेत खाल्ल्यावर त्याचें संरक्षण तरी कसें व्हावें! मातापितरांनींच आपल्या मुलाला दूर केल्यावर, त्यानें कोणाच्या आश्रयास उभें राहवें! प्रत्यक्ष भावानेंच आपल्या बहिणीस विकल्यानंतर तिनें कोणाच्या साहाय्याची अपेक्षा करावी! किंवा, खुद्द राजानेंच प्रजेला लुटलें तर, स्वदुःख निवारणार्थ ह्मणून तिनें कोणाकडे तरी पहावें!!

आंग्लवणिग् बालकें, व त्यांचा अनीतीचा वर्तनक्रम.

बरें, जे इंग्रज लोक केवळ व्यापार निमित्तच इकडे आले, व ज्यांनीं निव्वळ वाण्याचाच उदीम पत्करला, त्यांनीं तरी थोडेंबहुत नीतिमार्गाचें अवलंबन करावयाचें होतें! पण नाहीं. तें होणार कोठून? एकंदर राष्ट्राचीच नीति बिघडली, तेथें एकदम

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

"But by Sir Elijah Impey was that order carried up to seize and confiscate the treasures of the Begums."

(Burke. Vol. VIII. P. P. 179-180)

नीतीचा फैलाव तो कसा होणार! सर्व आकाशच फाटलें तेथें ठिगळ तें कोठें लावणार!!

ह्या गौरकाय[1] वाणेग् बालकांनीं इकडे जसा कांहीं सर्व प्रकारें सुळसुळाट करून सोडला. ते आपल्या मर्जी-प्रमाणें, वाटेल त्या किंमतीस माल देत, व मन मानेल त्या किंमतीला ते दुसऱ्यापासून घेत. अशा प्रकारें, त्यांनीं अन्यायाचा जसा कांहीं कहरच करून सोडला. व्यापाराचें ढोंग करून त्यांनीं सर्व प्रजेस लुटलें. श्रमविभागाच्या मिषानें, त्यांनीं अखिल वंगस्थांस भिकेस लाविलें. फौजेचें पाठबळ असल्यामुळें, त्यांनीं तिच्या जोरावर पाहिजेल त्यावर हवा तसा जुलूम केला. जिकडे तिकडे लुटीशिवाय

1 "These traders appeared every where; they sold at their own prices, and forced the people to sell to them at their own prices also. It appeared more like an army going to pillage the people, under pretence of commerce, than anything else. Invain the people claimed the protection of their own country courts. This English army of traders, in their march ravaged worse than a Tartarian conqueror. The trade they carried on, and which more resembled robbery than commerce, anticipated the resources of the tyrant, and threatened to leave him no materials for imposition or confiscation. Thus this miserable country was torn to pieces by the horrible rapaciousness of a double tyranny."

(Burke. Vol. VII. P. 80).

दुसरी गोष्टच त्यांच्या लक्षांत येतनाशी झाली. आणि त्या कारणानें प्रत्यक्ष दरवडा बरा, पण ही इंग्रजी व्यापार-पद्धति नको, असें सर्वांस वाटूं लागलें.

त्यांचें महा अव-दान, व.

हाच मासला चालू एकोणीसाव्या शतकांतही मधून मधून दृष्टीस पडतो. **सरस्ट्राचीच्या** कारकीर्दीत दोन कोट रुपये एकदमच गडप्प झाले, आणि एवढ्या मोठ्या रकमेचा कोठें देखील मागमूस लागला नाहीं. इतकेंच नाहीं तर, सदरहू अफरातफरीचा तलास करण्याविषयीं कोणाच्या स्वप्नीं देखील आलें नाहीं; व मोठमोठ्या जबाबदारीच्या कामगारांनीं सुद्धां तिकडे निव्वळ दुर्लक्ष्य व कानाडोळाच केला.

खंबायतच्या घाणेरड्या खटल्यांतील **विल्सन्**चें अति निंद्य वर्तन, त्याची अगदीं अमंगळ वर्तणूक, आणि त्याच्या अनीतीची पराकाष्ठा हीं सर्वत्र जगजाहीर आहेत. **क्रॉफर्ड**चे नानाविधविलास देखील सर्वांस महशूर आहेत. ह्या गृहस्थानें सूक्त असूक्त अशा हरतऱ्हांनीं लोकांचें वित्त केवळ अन्यायानें कसें हरण केलें, हें सर्वांस माहीत आहे. इतकेंच नव्हे तर, त्याच्या अपकीर्तीचा दुंदुभिरव अजूनही आबालवृद्धांच्या कर्णरंध्रांत एकसारखा दुमदुमत आहे. मोहपाशांत सांपडल्यामुळें, **लॉर्ड कॉनीमरासारख्यांनीं** देखील **नीतिमार्गाचें** बेधडक उल्लंघन केलें, व ह्या अवि-

चाराबद्दल केवळ प्रायश्चित्तादाखल, आपल्या जागेचा निव्वळ राजीनामा देऊनही त्यांस देशांतर करणें भाग पडलें.

बरें, हे अधिकारी तरी लहानसहान, किंवा अलबते गलबते होते, असेंही नाहीं. सर्वच बडीं बडीं, व प्रचंड धेंडें. कोणी गव्हरनरजनरल, कोणी **गव्हरनर**, कोणी **फायनान्स मिनिस्टर**, कोणी **कमिशनर**, आणि कोणी **कलेक्टर**. ह्या सर्वांस लोकैषणेची चाड; व ह्या सर्वांवरच अखिल प्रजेचा डोळा. हे जसा कित्ता घालून देतील, त्याप्रमाणें सर्व रयतेस वळण लागण्याचें; आणि हें ज्या प्रकारचें आपलें वर्तन ठेवितील त्याप्रमाणें इतर लोकांच्या नीतींत फेरबदल होण्याचा. असें असूनही, ह्या कामगारांनीं नीतीचीं सर्व तत्वें झुगारून देऊन, "**मनःपूतंसमाचेरत्**," याच मार्गाचें अवलंबन केलें.

नीतिभ्रष्टता.

मुख्य सेनाधिपति **लॉर्ड रॉबर्ट्स्** यांच्या कारकीर्दींत तर, केवळ त्यांच्याच संमतीनें सकल आंग्लसेनेच्या कामशांत्यर्थ, वारांगनांचीं राजरोस दुकानेंच मांडलीं. मग काय विचारतां! आधींच उल्हास आणि त्यांत **फाल्गुन**मास! अगोदरच ह्या विश्वयोषिता, आणि तशांत बोलून चालून त्यांजला बड्या कामगारांची फूस!! तेव्हां अर्थात्च **पिशाचाच्या** हातीं **कोलीत** दिल्यासारिखें होऊन, "आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला," अशी अवस्था झाली. ह्या वारांगनांनीं आपल्या कुटिलकर्माचें एक जणूंकाय

विस्तीर्ण **अधर्मजालच** पसरून, त्याला त्यांनीं **स्वेच्छाचाराचें** आमिष लाविलें, आणि हजारों सरल **युवतीजनांस**, व **मुग्ध अर्भकांस**, आपल्या पाशांत ओढिलें. त्यामुळें, जिकडे तिकडे पापाचरण वाढलें. जेथें नीति वास करीत होती, तेथें अनीतीचा प्रसार झाला. जेथें सरलता होती, तेथें कुटिलता प्राप्त झाली. ज्या ठिकाणीं शुद्धाचरण होतें, त्या ठिकाणीं भ्रष्टता मातली. दुराचारी बायकांस खुद्द सरकारांतूनच प्रोत्साहन मिळाल्याकारणानें, त्या यथेच्छ कुंटिणकीचाच धंदा करूं लागल्या. **गौरकाय** सैन्याच्या निवासस्थानानजीक (**बराकीं**त), त्यांच्या कामशांत्यर्थ शृंगारविलासयुक्त अशीं वारांगनांचीं दैदीप्य भवनें निर्माण झालीं. आणि त्यामुळें पापाचरणाची अगदीं रेलचेल उडाली.

नीतिभ्रष्टतेस उत्तेजन.

अशा प्रकारें दुर्नीतीचा फैलाव जारीनें होत असतांही, सदरहू तरवारबाहादुर **आंग्लसेनाधिपतीस** त्याबद्दल यत्किंचित् देखील वाईट न वाटतां, उलट त्यानें ह्या विघातक व दुष्ट प्रचारास आपलें पाठबळच दिलें. इतकेंच नाहीं तर, **इंग्लंडांतील पार्लमेंटसभेनें** हा दुराचार बंद करण्याविषयीं ठराव केला असतांही, त्यानें तो हुकूम अजिबात गुंडाळून ठेवून, त्या चाललेल्या पापकृत्यास

१ ह्यासंबंधानें सांसर्गिक रोगाचा कायदा, व तत्संबंधीं वर्तमानपत्रांतील चळवळ, आणि पार्लमेंटसभेंतील तद्विषयक विवाद पहावे, ह्मणजे वाचकांची खात्री होईल.

एकसारखें उत्तेजनच दिलें. त्यामुळें, सर्व वेश्याश्रम कायम राहिले; कुंट्टिनीकर्मास प्रोत्साहन मिळालें; आणि अनीतीचीं द्वारें सर्वत्र खुलीं झालीं.

असो. या प्रमाणें, आंग्लनीतीचा प्रभाव असल्याकारणानें, खुद्द इंग्रज[1] लोकांनीं देखील आपलें घर ओळखून, व आपल्या दिव्याखालीं असलेला अंधकार पूर्णपणें लक्षांत आणून, आह्मां **भारतीयांच्या** निर्मल आचरणाविषयीं स्तुति करावी, आणि **इंग्रजांपेक्षां भारतीय** हे विशेष नीतिमान् आहेत, ह्मणून अगदीं प्रांजलपणें कबूल करावें, यांत नवल तें काय !

प्रकृतिसौजन्य.

हिंदु लोक सौम्य स्वभावाचे असून निरुपद्रवी आहेत.

---

1 "They did not know that, judged by any truthful standard, the people of India were on a far higher level of morality than English men; that they were industrious, sober, chaste, and religious; that a drunkenman was rare, unless he were an Englishman; and that a drunken woman was unknown. Yet, in the name of virtue, a crusade was to be launched against opium, a harmless luxury and often a necessary stimulant, by a people the high ways of whose capital were choked by prostitutes, and the illumination of whose streets was the flaring gaslights of the gin palaces at every corner."

(Sir Lepel Griffin).

हिंदूंचें प्रकृतिसौजन्य.

होतां होईं तों, ते कोणालाही विनाकारण दुःख देण्याला इच्छित नाहींत. मातापितरांस ते दैवतच समजतात; व त्यांजवर त्यांची विशेष भक्ति असल्यामुळें, ते त्यांची मनःपूर्वक सेवा देखील करितात. आपणास कितीही कष्ट पडले तरी ते सोसून, आपल्या आईबापांस जेणेंकरून सुख व आराम वाटेल, अशी तजवीज ते ठेवितात. आणि प्रसंग पडेल तेव्हां आपणही उपोषणें काढून त्यांच्या खाण्यापिण्याची अगोदर तजवीज व बरदास्त राखतात. आतां, त्यांत कांहीं अपवादही आहेत; नाहींत असें नाहीं. तथापि, ते अगदींच विरळ आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

पितृसेवा.

आईबापांची सेवा करणें, हें आपलें शील व पहिलें कर्तव्यकर्म आहे, असें हिंदु लोक पूर्णपणें समजतात. मातापितरांच्या ठिकाणीं हिंदूंचें अशा प्रकारचें प्रेम आणि सौजन्य पाहून, ख्रिस्तीधर्मांतील पाद्र्यास देखील बहुत आश्चर्य वाटतें.

---

1 "And here I shall insert another most needful particular, which deserves a most high commendation to be given unto that people (Hindus) in general, how poor and mean so ever they be; and that is, that great exemplary care they manifest in their piety to their parents, that, notwithstanding

(पुढें चालू)

मातापितरांशिवाय इतर आप्तवर्ग, स्वकीयजन, आणि इष्टमित्र, यांच्यांशीं देखील ते फार सभ्यतेचें आणि आदरशील असें वर्तन ठेवितात. इतकेंच नाहीं तर, ते आपल्या नोकरांशीं, किंवा हाताखालच्या चाकरमाणसशीं सुद्धां, अशाच प्रकारें शिष्टतेनें वागतात. मग ते आपल्या बरोबरीच्यांस किती स्नेहभावानें वागवीत असतील, याची कल्पना सहजींच होण्यासारखी आहे.

स्वकीयांचा, व इष्टमित्रांचा सत्कार.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

they serve for very little, but five shillings a moon for their whole livelihood and subsistence, yet if their parents be in want, they will impart, at the least, half of that little towards their necessaries, choosing rather to want themselves, than that their parents should suffer need." "It is in fact one of the first precepts of their religion."

(Tods' Rajasthan. Vol. I. P. 560).

1 "Hindus of rank are remarkable for their politeness to inferiors, generally addressing them by some civil or familiar term, and scarcely ever being provoked to abusive or harsh language."

"The lower classes are courteous in their general manners among themselves, but by no means so scrupulous in their language when irritated."

(Elphinstones' India P. 341)

2 "The manner of the Hindus is polite, and their

(पुढें चालू)

ते भांडखोर नसून कृतज्ञ आहेत; आणि प्रसंग पडेल तेव्हां, किंवा विपत्तिकाळांत, फारच उपयोगी पडण्यासारखे आहेत.

त्यांची कृतज्ञता,

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

language obsequious. They abound in compliments and expressions of humility even to their equals, and when they have no object to gain."

[Elphistones' India P. 342]

1 "I have had ample opportunity of observing the Hindus in every situation, and I can affirm, that they are not *litigious.*"

(Sir Thomas Munro, the Governer of Madras.)

2 "Their devotion to their own chief is proverbial, and can arise from no other cause than *gratitude,* unless where cost supplies the place of clannish feeling. The fidelity of our Sepoys to their foreign masters has been shown in instances which it would be difficult to match, even among national troops in any other country."

(Elphinstones' History of India. P. 386)

3 Abul Fazil, the Minister of Akbar says:—

"The Hindus are religious, affable, courteous to strangers, cheerful, enamoured of knowledge, lovers of justice, able in business, *grateful,* admirers of truth, and of unbounded fidelity in all their dealings. *Their character shines brightest in adversity.*"

(Tods' Rajasthan. Vol. I. P. 553.
Elphinstone's India P. P. 386-387)

हिंदुलोक, सहसा, कोणालाही कधीं टाकून बोलत नाहींत, किंवा कोणाचें छद्म काढून ते लिहीत देखील नाहींत. विद्वान आणि संभावित लोक तर असें कधींच करीत नाहींत. कारण, तसें करणें म्हणजे हलकटाचें, मूर्खाचें, व पाजीपणाचें काम आहे, असें ते समजतात. वाग्युद्धांत

त्यांच्या मनाची समता, व

1 "During the last twenty years, I have had some excellent opportunities of watching a number of native scholars under circumstances where it is not difficult to detect a man's true character, I mean in literary work and, more particularly, in literary controversy. I have watched them carring on such controversies both among themselves and with certain European Scholars and I feel bound to say that, with hardly one exception, they have displayed a far greater respect for truth, and a far more manly and generous spirit than we are accustomed to, even in Europe and America. They have shown strength but no rudeness; nay I know that nothing has surprised them so much as the course invective to which certain Sanskrit scholars have condescended, rudeness of speech being, according to their view of human nature, a safe sign not only of bad breeding, but of want of knowledge. When they were wrong: they have readily admitted their mistakes; when they were right, they have never *sneered* at their European adversaries. * * Here, too, we might possibly gain by the import cargo."

(What can India Teach us? P. 63)

देखील ते आपल्या मनाची समता, व गांभीर्य, कधींच सोडीत नाहींत. आपली चूक असल्यास ते तत्काळ कबूल करितात; आणि प्रतिपक्ष्याची चूक झाली तर ते मौन धरतात. परंतु उण्या उत्तरानें ते कधीं बोलत नाहींत, किंवा उपहास करण्याच्या हेतूनें ते टाळ्याही पिटीत नाहींत.

त्यांचे इतर गुण.

आतां, हिंदूंची सर्व साधारण रीतभात, चालवर्तणूक, आणि एकंदर प्रकृतिमान, यांविषयीं दोन शब्द लिहून हा भाग पुरा करतों.

वरच्या प्रतीचे हिंदुलोक शिष्टाचार संपन्न असून मनमिळाऊ, विवेकी, सुज्ञ, तरतरीत, आणि पोक्त बुद्धीचे असतात. ते मानी असून नम्र आहेत; स्वेच्छाचारी असून सद्गृहस्थ आहेत; व विचारस्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेत असून, उदारमनाचे आहेत.

मध्यम आणि खालच्या प्रतीचे लोक देखील आनंदी, मायाळू, कामाळू, व आज्ञाधारक असून, विश्वासूक, मो-

1 "Professor Wilson says that he witnessed among them (Hindus), 'polished manners, clearness and comprehensiveness of understanding, liberality of feeling and independence of principle that would have stamped them gentlemen in any country in the world.' 'With some of this class,' "he adds," ' I formed friendship which I trust to enjoy through life.,' "

(What can India teach us ? P. 41).

कळ्या मनाचे, व मनमिळाऊ आहेत. तथापि, दिवसानु-दिवस ते जास्त व्यसनासक्त होत चालले असल्यामुळें, दरिद्रावस्थेंत आहेत. **उत्तर हिंदुस्थानांत** बहुतकरून अफिणीच्या[1] व्यसनांत लोक दंग असतात; आणि **दक्षिण हिंदुस्थानांत** ते मदिरापानांत चूर होतात. परंतु ह्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे अपकारी बाबीपासून प्राप्त होणारी वाढती जमाबंदी, त्यापासून उत्पन्न झालेली तृष्णा, व तत्संबंधीं **इंग्रज सरकारचें सांप्रतचें वर्तन होय.**

---

1 "But this trade has prolonged the agonies of India."

(Speeches &c, of Dadabhai N. P. 476)

2— * * "That native morality suffers by coming into contact with the English—the pristine simplicity and truthfulness of the native village disappears in *drunkenness*, intrigue, and a litigious spirit supervening."

(Speeches &c. of Dadabhai N. P. 9)

"I lived, both from necessity and choice, very much amongst the Hindus, and had opportunities of becoming acquainted with them in a greater variety of situations than those in which they usually come under the observations of Europeans. In the Calcutta mint, for instance, I was in daily personal communication with a numerous body of artificers, mechanics, and labourers, and always found amongst them cheerful and unwearied industry,

(पुढें चालू)

त्यालच्या प्रतींच्या लोकांविषयीं प्रोफेसर विल्सन्चा अभिप्राय ध्यानांत ठेवण्यासारखा असल्यामुळें, त्यांतील अवतरण याखालीं देतों:—ते आनंदी व कामाळू असतात; व मनमिळाऊ असून आपल्या धन्याची मर्जी सुप्रसन्न ठेवितात. ते छाकटे होत नसून व्यवस्थितपणें राहतात. दुसऱ्या देशापेक्षां ते पुष्कळ इमानी दिसतात. आणि आपापला मानमरातब राखून, ते सर्वांशीं मोकळ्या मनानें वागतात.

---

good-humoured compliance with the will of their superiors, and a readiness to make whatever exertions were demanded from them: there was among them no drunkenness, no disorderly conduct, no in subordination. It would not be true to say that there was no dishonesty, but it was comparatively rare, invariably petty, and much less formidable than I believe, it is necessary to guard against in other mints in other countries. There was considerable skill and ready docility. So far from there being any servility, there was extreme frankness, and I should say that where there is confidence without fear, frankness is one of the most universal features in the Indian character. Let the people feel sure of the temper and good-will of their superiors, and there is an end of reserve and timidity without the slightest departure from respect."

(Mill's British India).

भाग ३७ वा.

आर्यसाहस आणि शौर्य.

प्राचीनकाळीं हिंदूंचें देशांतरीं पर्यटन.

प्राचीनकाळीं, हिंदुलोक देशांतरीं पुष्कळ पर्यटन करीत असत, असें अंतःप्रमाणावरून चांगलें सिद्ध होतें. मात्र हें पर्यटन, आर्यलोकांच्या प्रथमावस्थेंत अगदींच नजीकचें असून, कालांतरानें त्याची पर्याप्ति क्रमशः वाढत गेली असावी, असें वाटतें. आतां, हें पर्यटनसाहस, आणि तत्संबंधीं कुतूहल, सुमारें केव्हां जागृत झालें असावें, याविषयीं विचार करूं.

आर्यसाहस.

वेदकालांतील साहस.

वेदांतील ऋचांवरून, समुद्रांत पर्यटन करण्याचें साहस आमचे लोक तितक्याही प्राचीनकाळीं करीत असत, असें उघड दिसून येतें.

१ तुग्रोह भुज्य मश्विनाद मेघेरयिंन कश्चिन्ममृवां अवाहाः ।
तमुहथुर्नौभिरात्मन्वता भिरंतरिक्ष प्रुद्भिर पादेकाभिः ॥३॥

(पुढें चालू)

त्याचप्रमाणें, स्मृतिकालांत देखील समुद्रांत पर्यटन करण्याची प्रवृत्ति होती, यांत संशय नाहीं. कारण, जोखमीच्या व्याजबट्यांत जें व्याज द्यावयाचें, तें ठरविण्याचें काम, समुद्रपर्यटन करण्याच्या कामीं कुशल असतील, अशा पुरुषांकडे सोपवावें, ह्मणून मनुस्मृतींत सांगितलें आहे.

स्मृतिकालांतील समुद्र प्रवास.

नानातऱ्हेचे अन्यदेश वसवून, एकंदर राज्याचा फैलाव

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

अनारंभणे तदवीर येथामनास्थाने अग्रभणे समुद्रे ।
यदश्विना उहथुर्भुज्युमस्तं शतारित्रां नावमातस्थिवांसम् ॥ ५॥

(ऋग्वेद संहिता.)

अर्थः—" कोणी मरावयास टेंकलेला पुरुष जसा आपल्या संपत्तीला सोडतो, तसें तुग्र यानें आपला पुत्र भुज्यु यास समुद्रांत पाठविलें. परंतु, हे अश्विन हो ! तुह्मीं आपलीं तारवें समुद्रांत चालवून आणि पाण्यापासून रक्षून तो परत आणून दिला. महासागरामध्यें आश्रय करण्यास, किंवा बसण्यास, किंवा धरण्यास कांहींच नाहीं. तशांत, हे अश्विन हो ! तुह्मीं असा पराक्रम केला कीं, शंभर वल्ह्याच्या तारवांत बसून भुज्यु आपल्या पित्याच्या घरीं परत आणून दिला."

(करसनदास मूळजीकृत इंग्लंडांतील प्रवास.) पान. ४६.

समुद्रयान कुशला देशकालार्थ दर्शिनः ।
स्थापयंति तु यांवृद्धिं सा तत्राधिगमं प्रति ॥ १५७ ॥

(म. स्मृ. अ. ८)

करण्याविषयीं मनुस्मृतींत स्पष्ट आज्ञा असल्याचें दिसून येतें. तसेंच, ज्या नवीन वसाहती करावयाच्या त्या सुपीक व कोरड्या प्रदेशांत कराव्या; तेथील लोक गरीब, नम्र, आणि सुशील असावेत; तेथें कोणत्याही गोष्टीचा त्रास नसावा; त्याठिकाणीं विपुल तृण व धान्य असावें; व कृषिवाणिज्यादि जीवनसाधन, सुलभ रीतीनें प्राप्त व्हावें; इत्यादि उपदेश वसाहत करणारांच्या कल्याणार्थ केल्याचें आढळून येतें.

हिंदूंचें द्विपांतरीं पर्यटन.

पुढें, दिवसानुदिवस, हिंदूंचें कुतूहल, त्यांचें शौर्य, व त्यांची साहसशक्ति, हीं जास्तच वाढत गेलीं. आणि त्यांनीं केवळ सर्व हिंदुस्थानदेशच काबीज करून वसविला असें नाहीं. तर, त्यांनीं आपल्या बाहुबलानें फार दूर दूरचे देश जिंकिले; पश्चिम, दक्षिण, आणि पूर्व-

---

१ जांगलं सस्य संपन्नमार्य प्राय मनाविलम् ।
रम्यमानत सामंतं स्वाजीव्यं देशमावसेत् ॥ ६९ ॥

(म. स्मृ. अ. ७)

1 "The Indian colonies are traceable as for north as the Persion Gulf, and the shores of the Red Sea, and in the West and South, along the African coast to Zanzibar."

(The Bombay Gazette 3-10-92)

समुद्रांत, त्यांनीं आपलें साम्राज्य स्थापन केलें; सर्वत्र

---

1 "The spread of Indian settlements in the Far East can now be traced by the recent discoveries of scholars in the Indian Archipelego and even as far as the Phillippines. Sumatra, Java, Borneo, Combodia, as well as Siam, were colonised by Brahmin warriors from India, long prior to the great Buddhistic movement, which in later times sent missionaries through all those regions, and diffused an Indian faith throughout the whole of the Farther East, where it survives to this day. The Indian nobles who led their followers to the conquest and settlement of remote lands, apparently first subdued Sumatra and Java, and ultimately Combodia, with the Southern parts of Cochine China, where the French in our time are endeavouring to creat another India. From the inscriptions found in Combodia and Champa, it is ascertained that Sanskrit was the official language in those territories; and that it was also the language of official poets. Shiva and Vishnu were worshipped, and the Máhàbhàrata and other sacred writings piously recited as in the Mother-Country. The ruins of temples in the Indian Style of architecture are still extant, and excite the admiration of the traveller. To Dr. Buhler the outlines of the history of these Indian Conquests in the Further East are already clearly discernable, and further exploration will doubtless add many remarkable developments."

(The Bombay Gazette 3rd October 1892.)

विजयध्वज फडकाविला; लोकांस विद्यामृत पाजिलें, आणि सुशिक्षित केलें; आर्यधर्म स्थापिला व तत्वज्ञानाचें भांडार खुलें केलें; तेथील लोकांस रानटी अवस्थेंतून मुक्त-करून, सुधारणेच्या पंथास लाविलें; आणि शास्त्र व कला यांचें तेथें अध्ययन चालविलें.

हिंदूंच्या तिकडील वसाहती.

पश्चिमेस इराणांत व तांबड्या समुद्रांत, दक्षिणेस आफ्रिकेंत व झांझिबार प्रदेशांत, आणि पूर्वेस पूर्वसमुद्रांत (स्थीर महासागरांत) सुमात्रा, जाव्हा, बोर्नियो, कॉम्बोडिया, आणि सयाम, वगैरे ठिकाणीं, व त्याही पलीकडे ज्याला हल्लीं फिलिपाईन् बेटें म्हण-तात तेथें, ब्राह्मण वीरांनीं आपल्या पराक्रमानें मोठमो-ठ्या वसाहती वसविल्या, असें आतां सप्रमाण सिद्ध झालें आहे. पण सांप्रतस्थितींत, आमच्या ह्या अचाट हिंदुसाहसाची कांहीं तरी कल्पना होते काय !

प्राचीनकाळीं, आफ्रिकाखंडाच्या पूर्वभागाशीं हिंदूंचें

1 "It is difficult to realise under present Conditions that at one time India sent forth expeditions to occupy and colonise the remoter East, and had trading settlements and connections in the Persian Gulf, on the shores of the Red Sea, and along the African littoral down nearly to Natal."

(The Bombay Gazette. 3/10/92.)

आफ्रिका. पुष्कळच दळणवळण असे. आणि त्यामुळें, तिकडे हिंदूंची इतकी वस्ती झाली होती कीं, तो भाग देखील "झिंद" या नांवानेंच प्रसिद्धीस आला होता. हल्लीं झांझिबार हें देखील त्याचेंच अवशिष्टरूप राहिलें असल्याचें दिसतें.

जमेका व जावा. प्राचीकडील वसाहत केलेल्या प्रदेशांत, व बेटांत, अजून देखील हिंदुतऱ्हेची लेणीं, जुन्या आणि पडक्या इमारती, जीर्ण झालेलीं देवालयें, अद्भुत निर्माणशिल्प, पुरातन शिलालेख, आणि अन्यवस्तु सांपडतात; व तीं पाहून प्रेक्षकांस अत्याश्चर्य वाटतें. त्या वेळची तिकडील राजभाषा ह्मटली ह्मणजे संस्कृत असून, तद्देशीय राजकवि देखील संस्कृतांतच कवन करीत. भरतखंडांतील हल्लींच्या स्थितीप्रमाणेंच सदरहू वसाहतींतले लोक शैव आणि वैष्णव पंथांतले असत, आणि ते आपापल्या आवडीप्रमाणें शिवाची अथवा विष्णूची पूजाही करीत. हल्लींप्रमाणेंच त्यावेळीं

1 " * * Ancient India traded with Eastern Africa, which was so for Hinduised that it became known, under the name Zang as one of "The Indies." The historical Indies were three in number—Hind, Sind, and Zang—the latter name surviving in Zanzibar, and the two former in Hindustan and Sind."

(The Bombay Gazettee 3/10/92.)

देखील, तिकडे महाभारताचे पाठ होत असून, भक्तिमान् लोक ते मोठ्या श्रद्धेनें ऐकत असत. रामायण तर ते अत्यानंदानें श्रवण करीत. आणि त्यांच्या मुखांतून नित्यशः वेदघोष चाले. तिकडे गेल्यानंतर हिंदूंनीं आपला शक देखील तेथें सुरू केला, व तो अद्यापि चालत आहे. जाव्हा द्वीपाच्या इतिहासावरून तर असें कळून येतें

त्या बेटांतील हिंदूचा अम्मल.

1 "It has long been known that there are more or less distinct traces of Indian immigrations and of Indian influence, in the islands of Indian Archipelego, and even in the di tant Phillippines * * "It now appears, said Dr. Buhler, 'that this portion of the Far East did not receive its civilization like China and Japan, through the bare-footed friars of the Buddhistic persuasion, but after being conquered with the sword by the Brahminical warriors of Eastern, and possibly also of Western India". These warriors carried with them, their civilization and their religions, mindful ot Manu's advice to settle in newly acquired kingdoms, learned Brahmans and artizans skilled in various handicrafts. The Sáma and the Rigvedas were sung, the Mahabharat and the Ràmàyana recited, Siva and Vishnu w re worshipped in the Far East as in Aryávarta it elf! The ruins of their temples still speak of an Indian origin, and even now strike the beholder with admiration."

(The Times of India. 1 October 18?2).

कीं, हिंदूंनीं त्या बेटांत पुष्कळ वसाहत केली असून, त्यांनींच तद्देशीय लोकांस सुधारलें. हिंदुधर्मानंतर ह्या बेटांत बौद्धधर्म पसरला, आणि त्या मागून तेथें इस्लामधर्म झाला. तथापि, इसवी सनाच्या चौदाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत, त्या बेटांत हिंदुसाम्राज्यच होतें. आणि जाव्हा बेटाच्या नजीक, पूर्व बाजूला, जें बाली नामक बेट आहे, तेथें अजूनही हिंदु लोकांचीच वस्ती आहे.

मलाया, व सुमात्रा.

समुद्र कांठचे बहुतेक लोक महासागरांत सफर करणारे असतात. आणि भरतखंड हें तिन्ही बाजूंनीं समुद्रवलयांकित असल्यामुळें, दर्यांत प्रवास करण्याचें साहस हिंदु लोकांत कालांतरानें पुष्कळच आलें. पश्चिम किनाऱ्यावरील लोक पश्चिम व

---

1 "The histories of Java give a distinct account of a numerous body of Hindus from Clinga (Çalinga), who landed on their island, civilized the inhabitants, and who fixed the date of their arrival by establing the aera still subsisting, the first year of which fell in the 75th year before Christ. The truth of this narrative is proved beyond doubt by the numerous and magnificent Hindu remains that still exist in Java, and by the fact that although the common language is Malay, the sacred language, that of historical and poetical compositions, and of most inscriptions, is a dialect of Sanskrit."

(Elphinstone's History of India P. 327).

2 Elphinstone's History of India. P. 327.

दक्षिणेकडे गेले, आणि पूर्वकिनाऱ्याचे लोक पूर्वेकडे पसरले. बंगालचा उपसागर वलांडल्यानंतर अन्य देशांची चंगळच लागली. त्यामुळें, मलायादि द्वीपकल्प, व सुमात्रादि बेटें, यांत हिंदु लोकांचें दळणवळण झपाट्यानें सुरू होऊन, तिकडे त्यांच्या वसाहती देखील झाल्या. बंगालच्या उपसागरांत, गंगेच्या मुखापासून तों सिंहलद्वीपापर्यंत, आणि हिंदी व स्थीर महासागरांत, हिंदूंचीं अनेक गलबतें सफर करूं लागलीं. व इस्लामशाहीमुळें अटकाव होईपर्यंत, हिंदु साहसाची चढतीच कळा होत गेली. ह्या सर्व गलबतांत व नौकांत हिंदूच खलाशी असत.

आपला देश सोडून हिंदु लोक अन्यत्र कोठेंही बाहेर जात नाहींत, आणि मोठ्या साहसाचें काम त्यांच्यानें

---

१ हा काल म्हटला म्हणजे ईसवी शकाच्या पूर्वी सुमारें चारशें वर्षें होय.

" The early date is almost as decisively proved by the journal of the Chinese pilgrim in the end of the fourth century, who found Java entirely peopled by Hindus, and who sailed from the Ganges to Ceylon, from Ceylon to Java, and from Java to China, in ships manned by crews professing the Brahminical religion."

(Elphinstone's History of India).

(Journal of the Royal Asiatic Society No. IX.

P. P. 136-138)

हिंदूंचें अन्य देशीं गमन.

बिलकुल रेटत नाहीं, असा त्यांजवर वृथा आक्षेप आला आहे. आतां, परकीयांची सत्ता, व त्यामुळें उद्भवलेली अपकृष्टदशा, इत्यादि कारणांनीं आमचा पूर्वीचा उत्साह, पराक्रम, आणि साहस, हीं पुष्कळच कमी झालीं आहेत. तथापि, तीं अद्यापि अजिबात नाहींशीं झालीं नाहींत. आणि राजकारण किंवा ज्ञानार्जन, साहस किंवा कुतूहल, व्यापार किंवा नोकरी, वगैरे अनेक कारणांसाठीं **हिंदुस्थान** सोडून, आमचे लोक अन्यदेशीं गेलेले पुष्कळ आढळतात.

इराणांत.

इराणचा राजा **क्षीरोक्षस** यानें **युनान्** देशावर स्वारी केली, तेव्हां त्याच्या सैन्यांत **भरतखंडांतले** कित्येक नामांकित सरदार होते.

कार्थेजांत.

कार्थेजांत देखील **हिंदु** शिपाई गेले असून, ते तिकडील प्रसिद्ध सेनाधिपति **ऑस्ड्रूबाल्** व **हॉनिबाल्** यांच्या लष्करांत होते.

1 Asiatic Researches.

करसनदास मूळजीकृत इंग्लंडांतील प्रवास पहा.

2 Xerxes.

३ इसवी सनापूर्वी सुमारें ४५५ वर्षें.

४ इ. स. पू. सुमारें ४०९ वर्षें.

मासिडोनियेंत.

शिकंदर बादशाहा हिंदुस्थानांतून परत फिरला, तेव्हां त्याच्या स्वारींत कलेनश नांवाचा एक हिंदु योगी असून, दुसरेही कित्येक हिंदु सरदार आपल्या बायकामुलांसहित त्याजबरोबर गेले होते. तसेंच, एक केतु नांवाचा हिंदु सरदार देखील त्याच्या फौजेंत होता, व त्यानें आपल्या दोन बायका सुद्धां आपल्या बरोबरच घेतल्या होत्या.

रूम व स्पेन देशांत.

पुरूरवस, व दक्षिणेकडील पांड्य राजा, यांनीं आपापले वकील रूमचा बादशहा आगस्टस् याच्या दरबारीं पाठविले असून, ते सर्व हिंदूच होते. त्यांच्या बरोबर एक भडोचचा देखील विद्वान् ब्राह्मण होता. ही सर्व मंडळी थेट स्पेनपर्यंत गेली असल्याविषयींचा लेख आहे.

शिकंदर्येंत.

आपल्या वृद्धापकाळचे दिवस घालविण्यास, सेवरस नांवाचा एक विद्वान् रूमी, शिकंदर्या येथें गेला होता. त्याची विद्वत्ता ऐकून, हिंदुस्थानचे कित्येक विद्वान् ब्राह्मण, त्यास

---

१ इ. स. पू. ३२७ वर्षें,

२ केतु पुढें मरण पावल्यापुळें, त्याच्या एका बायकोस त्या बादशहानें सती जाऊं दिलें, व दुसरी बायको गरोदर असल्याकारणानें तिला परवानगी मिळाली नाहीं.

भेटण्याकरितां तिकडे गेले होते, व त्यांचा त्यानें चांगला आदरसत्कारही केला.

सुशेणाचार्य हा पाश्चिमात्यज्योतिष शिकण्यासाठीं, रूम देशांत गेला, व तिकडील सिद्धांत शिकला.

ग्रीस, आसीरिया, व बाबिलन, येथें.

याप्रमाणें कार्थेज, रूम, ग्रीस, इराण, आसीरिया, बाबिलोन, आणि अरबस्थान, इत्यादि पाश्चात्य राष्ट्रांबरोबर हिंदूंचा सुमारें बाराशें वर्षें एकसारखा व्यवहार चालला होता, असें अनेक प्रमाणांवरून कळून येतें.

व फिलिपाइन् बेटांत.

प्राची दिशेकडे त्यांच्या वसाहती थेट फिलिपाइन् बेटांपर्यंत पसरल्या असून, जाव्हा बेटांत हिंदु लोक गेल्याला आज सुमारें १९६९ वर्षें झालीं.

अशा प्रकारें आशिया, यूरोप, आणि आफ्रिका,

---

1 "That a system of Hinduism pervaded the whole Babylonian and Assyrian empires, scripture furnishes abundant proofs, in the mention of the various types of the sun God Bàlnàth, whose pillar adorned "every mount" and "every grave;" and to whose other representative, the brazen calf [Nandi], the 15th of each month [Amavus] was especially sacred."

[Tods' Rajasthan P. 519- 520.]

२ इ. स. पू. ७६ वर्षें. (क. मू. इं. प्रवास.).

या तिन्ही खंडांत हिंदूंनी आपली ठाणीं पसरलीं; व इतर बहुतेक राष्ट्रें निद्रित असतां, आणि कित्येकांचा जन्मही नव्हता तेव्हां, त्यांनीं आपलें लोकोत्तर धैर्य आणि साहस प्रकट करून, दिगंतरीं किर्ती मिळविली.

यासंबंधानें **आर्यललितविस्तार** नामक लेखांत थोडीबहुत माहिती दिली आहे, ती ध्यानांत ठेवण्यासारखी असल्यामुळें, या खालीं देतों:—

"विलकिनसचा जुन्या इंजिपशियन लोकांचा इतिहास, लोकोपयोगी आवृत्ति भाग २, २३७, व रावलीसनचा हिरा डोटस, भाग २, ६४, १६८, १७३, २७९, यावरून हिंदुस्थानांतील मलमल, सुंठ, मिरीं, दालचिनी, वेलदोडे, नीळ, गोमेद, वगैरे जिन्नस मिसर देशांत जात, असें दिसतें. मोक्ष मुलरचें भाषाशास्त्र, १९०, काल्डवेलचा द्राविडी कोश, ९२, यावरून आपल्या सोपारें येथें इसवी सना-

---

1 "India, older than Greece or Rome —India that was old before Egypt was born —India that was ancient before Chaldea was dreamed of — India that went back thousands of centuries before Persia had come to the front—India was still a living nation when the nations of the past were dead and their dust had vanished from the surface of the globe. * * "She (India) was the earliest of the Aryan peoples, the first born of the mightest races,"*

[Mrs. Besant on India and its mission.]

पूर्वी १००० ११०० वर्षांपासून सोनें, कथील, चंदन, कापूस, जटामांशी, गुगुळ, साखर, दालचिनी, मिरें, तांदूळ, हस्तिदंत, यांची देवघेव करणारे फिनशिन लोक, आपले वणिक्जन किंवा वाणी असावेत, असें वाटतें. आगस्टस बादशहाच्या कारकीर्दींत [इ. स. पूर्वी ३६ ते इ. स. १७] रोमशहरांत हिंदुस्थानांतील मसाल्यांच्या दुकानांची एक आळीच होती, व निरो बादशहानें पोपियाच्या अंत्यकृत्याच्यावेळीं, एका वर्षाच्या हंगामाचा मसाला बाजारांत राहूं दिला नाहीं, असें ह्मणतात. (राबर्टसनकृत इंडिया ९६, ९७ पहा). प्लिनीच्या मतें या बाबतींत रोम मधून हिंदुस्थानांत एक कोट रुपया येत असे. विलफोर्डच्या एका निबंधावरून, (एशियांतील शोध १०,१०६,१०७ पहा), हिंदुलोक इराण व पालेस्ताइन यांत जोशी या नात्यानें इ. स. पूर्वी ७०० वर्षांच्या सुमारास, झरक्सीसच्या सैन्यांत इ. स. पूर्वी ४८० च्या सुमारास, कार्थाजिनियन व रोमन लोकांमध्यें माहूत या नात्यानें, इ. स. पूर्वी ३०० व २९० वर्षांच्या सुमारास, ग्रीसमध्यें दासदासी ह्मणून, व जर्मनींत, व कदाचित् इंग्लंडांत, व्यापारी या नात्यानें, इसवी सनापूर्वी ६० वर्षांच्या सुमारास होते, असें दिसतें. प्लिनीच्या वेळीं (इ. स. ७७) पुष्कळ हिंदुलोक मिसर देशांत रहात असत. इ. स. १०० च्या सुमारास, हिंदुलोक आलेक्झांड्रिया शहरांत असल्याबद्दल डायो क्रिसोस्तम याच्या

लेखांत उल्लेख आहे. व त्यांनींच शलमीनामक प्राचीन भूगोलवेत्यास हिंदुस्थानची सविस्तर माहिती सांगितली. व क्लिमेनस् यास गौतम बुद्धाविषयीं माहिती सांगितली. कुस्तुंतुनिया शहरांतील लोकांस पुरातन काळीं ब्राह्मण ठाऊक होते. (ओपर्टभद्रासी भाषाशास्त्राचें पत्रक, १८७८, २१०). राफलचा जावा, भाग २, ६९ वरून, इ० सन २४ ते ५७ पर्यंत २०,००० हिंदु कुटुंबांनीं जाऊन जावा व बली बेटांत वसाहती केल्या, असें दिसतें. इराण, अरबस्तान, आफ्रिकेचा पूर्व किनारा, जावा, मले बेटें, वगैरे प्रदेशांत, याहीपेक्षां पुरातन काळीं हिंदु लोकांच्या कायमच्या वसाहती झाल्या होत्या, म्हणून त्यांची गणना हिंदुस्थानांत प्राचीनकाळापासून होत असे. (सर डब्ल्यू जोन्स. एशियांतील शोध, भाग ३, २, ४, ५, ७, पहा). इराणांतील युफ्राटिस थडीला, ओडेरिक (१३२०) ‘ मध्यप्रदेशांतील हिंदुस्थान ’ असें ह्मणतो, (युलचा काथे भाग.). व मार्कोपोलो [१२९०] हा मोठें हिंदुस्थान किंवा हिंदुस्थान, उर्मझपर्यंत होतें, असें ह्मणतो. [युलचा मार्कोपोलो, भाग, २, ३३६]. आरब लोकांच्या अमदानींत, [६४०–१०००], इराणी अखाताच्या शिरो भागाजवळील प्रदेशांत, सिंधुनदीच्या मुखाजवळील जाट व सनगर लोकांनीं वसाहती केल्या, व त्यास हिंदु हें नांव पडलें होतें. (रावलीसन–राजकीय एशियाटिक–परिषदेचें पत्रक. नवीन

आवृत्ति. भाग १२,२०८ व राजकीय भूगोल शोधक भरत वर्षस्व परिषदेचीं कामें, ४०. व युलचा काथे, भाग १,९९ टीप ३). मसुदीच्या [प्रेरिडी आर. भाग ४,२२९] म्हणण्यांत असें आहे कीं, आरब लोकांच्या विजयाच्या सुमारास (इ० सन ६४०) बस्ता जवळील प्रदेशास हिंदुस्थान ह्मणत असत. व ही वहिवाट इसवी सनाच्या प्रारंभापासून होती. [रावलीसन–राजकीय भगोल शोधक परिषदेचें पत्रक भाग २७,१८६]. सहाव्या, सातव्या, आठव्या, व नवव्या शतकामध्यें, इराणच्या अखाताभोंवतालच्या प्रदेशावर, समुद्रावरून हिंदु लोकांनीं मोठमोठ्या स्वाऱ्या केल्यामुळें (मूळ, व रेनाडचा अबुलफिदा, व राजकीय भूगोल शोधक भरतवर्षस्व परिषदेचीं कामें, ४०. यांच्याशीं रुजवात घ्या), ह्या किनाऱ्यावरील प्रदेशाला ‘ हिंदुस्थान ’ असें म्हणत असत. समुद्रावरून हिंदुस्थानांतून स्वाऱ्या होत, म्हणूनच पूर्वीच्या इराणी लोकांनीं (इ० सना पूर्वी ३३० वर्षापर्यंत) समुद्र किनाऱ्यावर शहरें वसविलीं नाहींत, (एलियट व डावसन भाग १,९१३), व टायग्रीस नदीला बंधारा घातला. (रूकचें आरियन, भाग २,१४९; व एलियट व डावसन भाग १,९१३). काकेशस पर्वताच्या जवळ इसवी सनापूर्वी जाणाऱ्या हिंदु म्हणविणाऱ्या लोकांच्या टोळ्या ह्या इराणच्या अखातावरून पूर्वोक्त चढाई करून आलेले लोक असावेत.(एलियट व डावसन,

भाग १,९१२). पुरातनकाळच्या अवशिष्ट इतिहासाच्या भागावरून असें दिसतें कीं, अंदुबार नांवाच्या एका हिंदूनें इराणच्या अखातावर वसाहत करून बाबिलोनिच्या लोकांस देव, धर्म, विद्या, कला यांचें ज्ञान करून दिलें. (रावलीसन—राजकीय एशियाटिक परिषदेचें पत्रक, भाग १२,२०९). आफ्रिका खंडांत हिंदुस्थानांतील लोकांचा संबंध सकोत्रा (सुखतर), अबिसोनियाचा किनारा, व झांझिबारचा किनारा, या तीन ठिकाणीं मुख्यत्वें करून दिसतो. सकोत्रा याचें संस्कृत नांव सुखतर असें आहे. शिवाय मसुदी यानें (९१५) असें लिहून ठेविलें आहे (प्रेरिस डी आर, भाग ३,३७) कीं, ग्रीक लोक येण्यापूर्वी सकोत्रा बेटांत हिंदुलोकांची वसाहत झाली होती. व मसुदी, मार्कोपोलो, व इबिन बाटुटा यांच्या (प्रेरिस डी आर, भाग ३,३७; युलचा मार्कोपोलो, भाग २,३२८,३४४,३४५) ग्रंथांतील वाक्यांवरून असें उघड होतें कीं, दहा ते चवदा शतकापर्यंत त्या बेटांत हिंदु चांच्यांचें ठाणें होतें. अलीकडे अशी कोटि काढण्यांत आली आहे कीं [तात्विक संग्रह, भाग २,१४६, स्मीथचा ग्रीक व रोमन लोकांच्या भूगोलाचा कोश, भाग १,६०], इथियोपियांतील मेममान लोक पश्चिम हिंदुस्थानांतून आले, व विलफोर्डच्या ईजिप्त वरील निबंधांवरून, [एशियांतील शोध, भाग ३,२९५—४६२], सर डब्ल्यू

जोन्सची खात्री होऊन चुकली कीं (सदर ४६७], पुरातनकाळच्या हिंदु लोकांस, मिसर, व नाईल नदीची माहिती होती. जोरडेनस हा [१३२०] अबिसीनियाला धाकटें हिंदुस्थान असें ह्मणतो. (युलचा मार्कोपोलो, भाग २,३६९); व मार्कोपोलो (१२९०). टयुडेलाचा बेन्जामिन हा (११६०). अबिसीनियाला अनाश, ह्मणजे मध्यहिंदुस्थान असें ह्मणतो. (सदर ३६०, ३६९). पांचव्या सहाव्या शतकांत, अबिसीनियाचा हिंदुस्थानाशीं निकट संबंध होता. (राजकीय एशियाटिक परिषदेचें पत्रक, भाग २२, २९२). अबिसीनियाच्या राजांच्या लढायांत हिंदुस्थानांतील व इथियोपियांतील हत्ती असल्याबद्दल उल्लेख आहे. [मार्कोपोलो, भाग २, ३६९]. आपालोनियस हा [इ. स. १००] इथियोपियांत हिंदुस्थानांतून वसाहत झाल्याचें लिहितो. (प्रिआल्कसराजकीय एशियाटिक परिषदेचें पत्रक, भाग १८, ९२). होमर (अमर) पासून व्हर्जिलपर्यंत, ग्रीक व रोमन ग्रंथकार, हिंदुस्थान व इथियोपिया, यांत भेदाभेद जाणत नाहींत. [स्मीथचा प्राचीन भूगोल, भाग २,४३]. अबिसीनियांत हिंदु लोकांच्या वसाहती झालेल्या होत्या, असें मानिल्याशिवाय ह्या घोंटाळ्याचा उलगडा होण्यासारखा नाहीं, असें सर डब्ल्यू जोन्सचें ह्मणणें आहे. (एशियांतील शोध, भाग ३,४,९). हिंदु

लोकांच्या झांझिबार किनाऱ्यावर वसाहती झाल्या असल्या-मुळें, जोर दनुस [१३२०] हा झांझिबार किनाऱ्यास हिंदुस्थानचा प्रदेश असें ह्मणतो. [युलचा काथे, १८२]. व मार्कोपोलो [१२९०] हा झांझिबाराला हिंदुबेट असें म्हणतो. (युलची आवृत्ती, भाग २,३९६). रिटरचें असें मत आहे कीं, हिंदुलोकांच्या वसाहती झांझिबारच्या किनाऱ्यावरच झाल्या असें नाहीं. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, झांझिबार ज्या अक्षवृत्तावर आहे, त्याच वृत्तावर असलेल्या पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर, कोंगो नदीच्या धबधब्या जवळ, अर्वाचीन काळींही पुष्कळ बनियांनीं, ह्मणजे वडांची झाडें, लाविलेलीं आढळतात. [अर्ड-कुंडें, बंद ४, अ, ब, क, २,६६१]. केप आफ् गुड् होपला वळसा घालण्यापूर्वी, कोंगो नदीवरून आफ्रिकेभर चाललेला हिंदुलोकांचा जारी व्यापार, पोर्टुगीज लोकांना ठाऊक होता. (स्टीव्हेंन्सनचें शोधाचें टिपण, ३३६). पोलोडीगामाच्या गलबतांत गिनी येथील काफर होता. तो मोझांबिकला जाऊन पोहोंचला तेव्हां, किनाऱ्यावरील लोकांस त्या बरोबरच्या मनुष्याचीं बोली सहज समजत होती. (वासकोडीगामाच्या तीन सफरी, ७९). टालमी (इ. स. १५०) ह्यास, मध्य आफ्रिकेचें बरेंच ज्ञान होतें. त्यानें झांझिबारपासून व्यापाराचे दोन रस्ते दाखविले आहेत. एका रस्त्यानें माल पश्चिमेस अटलांटिक महासागरावर, व

दुसऱ्या रस्त्यानें उत्तरेस ट्रिपोली येथें, जात असे. (आफ्रिकेचा नकाशा ९ बरटियसची आवृत्ति). आफ्रिकेंतील व्यापार अद्याप राहिला आहे. कामेरान हा १८७४ त झांझिबार येथून कोंगो नदीजवळ गेला. तेव्हां हिंदीमहासागरावरील व अटलांटिकमहासागरावरील व्यापाराचा संगम, मध्यआफ्रिकेंत झाला आहे, असें त्याच्या पाहण्यांत आलें. [केथ जान्सची आफ्रिका, ३४९]. अलबिरुणी (१०२०) ह्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, झांझिबारच्या दक्षिणेकडील कोमरिस, हे हिंदुधर्माभिमानी होते. (रेनाडचा अबुलफिदा). व झांझिबार किनाऱ्यावरील सवाहिलो लोकांत, स्मी (१८११) ह्याला हिंदूंचा अंश आढळला. (मुंबईंतील भूगोलशोधक मंडळीचीं कामें, भाग ६,९३). मादागास्कर येथील लोक मले जातीचे आहेत. (केथ जान्सनची आफ्रिका, ९३१). आफ्रिकेंत हिंदुलोकांच्या ज्या वसाहती झाल्या, त्यांत विशेष मजा, ही दिसून येते कीं, हिंदुस्थानांतील एक टोळी पश्चिम यूरोपखंडांत गेली, म्हणून इकडल्यासारखेच अक्षरांचे शिलालेख, त्यांच्या मार्गांत जागोजाग आहेत, असें त्या विषयावर लिहिणारांचें मत आहे. कर्नल लेस्टी (स्काटलंडांतील जुन्या जाती, भाग २,४७८) ह्याचें असें मत आहे कीं, केल्टीक लोकांची एक टोळी मध्यआफ्रिकेंतून, फ्रान्स, स्पेन मधून, स्काटलंडांत गेली, असें दगडी खांबावरून दिसतें. यावरून, पश्चिम हिंदुस्थानचा पूर्व आफ्रिकेशी संबंध होता,

हें उघड होतें. पण डाक्तर फरग्युसनची धांव याही पुढें आहे. त्याचें असें मत आहे कीं, आल्जीर्स येथील स्तंभांमध्यें आढळणारा हिंदु करामतीचा अंश, ऐतिहासिक काळांत पश्चिमेकडे निघून गेलेल्या हिंदु लोकांच्या टोळ्यांमुळें, किंवा बौद्धधर्मप्रसारकांमुळें, प्राप्त झाला असावा. अबिसीनियाच्या पश्चिमेस, मध्यसाउडणमध्यें, कानडी नांवाच्या लोकांची वसाहत आहे. त्यांचें नांव, व भाषा विशेष, यांवरून त्यांचा संबंध हिंदुस्थानांतील कानडी व द्रवीड लोकांशीं असावा, असें सहज अनुमान निघतें. (केथ जान्सनची आफ्रिका १७६,१८८. कालवेलचा द्राविडी कोश ८). समगर किंवा जिनगर नांवाचे सिंधी, काठेवाडी, व कच्छी हिंदु लोक, तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर वसाहत करून राहिले होते. ते इजिप्तमधून सर्व युरोपखंडभर पसरले, म्हणन त्यांस जिप्सी म्हणतात. पण त्याच भाषेंतील पानी, याग, बाल, आंस, इत्यादि शब्द गुजराथीशीं मिळते आहेत, यावरून हिंदु लोकांच्या वसाहती व व्यापार, किती दूर दूर चालला होता, ह्याचें अनुमान सहज होईल.

१०. मलबारचा साग, सह्याद्रीचें लोखंड, व गुजराथचा कापूस, हा आपल्या भरतखंडांत गलबतांस लागेल तितका, पुरातन काळापासून आहे, व स्वभावतः उत्पन्न होतो. तसेंच विराटराजाचा सासरा माई दानव, यानें 'मच्छयंत्र' नामक होक्याची युक्ति हिंदुस्थानांत मूळ

काढिली, असें काश्यप संहितेंत सांगितलें आहे. त्या यंत्रांत, माशाच्या आकाराचा एक लोहचुंबकाचा कांटा, पाणी अथवा तेलाच्या भांड्यांत तरता ठेविला असे, व त्याच्या आंगच्या चुंबकशक्तीनें, त्याचें टोंक सदोदित उत्तर दिशेकडे वळे. ह्या मच्छयंत्रांचा उपयोग हिंदु ज्योतिषी घराचे पाये, व धर्मकृत्यांतील यज्ञयागांच्या वेदिका, व कुंडें, यांच्या दिशा ठरविण्याच्या कामीं, पुरातन काळापासून करीत आले आहेत. असले ब्राह्मण जोशी, हिंदुलोकांच्या गलबतांवर असत. त्यांच्या आंगीं समुद्रावर तुफान उत्पन्न करण्याचें, किंवा शमविण्याचें, अमानुष सामर्थ्य असे, असें पंधराव्या शतकांतील फ्रामौरो, व निकोलो कुंटी नामक इतालियन ग्रंथकार व प्रवासी, यांनीं लिहून ठेविलें आहे. (व्हीन्सेन्टचा पेरिप्लस, भाग २,६७२ स्टिव्हेन्सनचें शोधांचें टिपण ३३२, व पंधराव्या शतकांतील हिंदुस्थान. निकोलो कुंटी २६–२७). फ्रामौरो यानें आणखी असें लिहून ठेविलें आहे कीं, एक हिंदुस्थानांतील गलबत आफ्रिकेला जात होतें, तें एकाएकीं झालेल्या वादळानें दोन तीन हजार मैल दक्षिणेस व पश्चिमेस वाहत गेलें तेव्हां गलबतावरील जोशानें तें उत्तरेकडे चालवून, सत्त दिवसांनीं जाग्यावर आणिलें. सूर्य, चंद्र, तारे, यांचें ज्यां कित्येक दिवस दर्शनही झालें नसेल, असा त्या वादळांत त्या गलबतास निभावून उत्तरेस वळविण्यास, सदरहु मच्छ

यंत्राशिवाय, दुसऱ्या कशाचाही उपयोग होण्यासारखा नव्हता, हें उघड आहे. तें यंत्र, ते जोशी कोणास दाखवीत नसतील, ह्मणून तें त्या प्रवाशांच्या पाहण्यांत आलें नसेल. व त्या जोशांच्या अमानुष शक्तीनें ते चकित झाले असतील. आठव्या नवव्या शतकाच्या सुमारास, कालिफानीं अशा विद्वान् ब्राह्मणांस बगदाद येथें राहण्यास बोलावून नेलें. व त्यांचे जवळ शिकून आरबलोक नौकानयन, त्रिकोणमिति, जोतिष, व वैद्यक, यांमध्यें पुष्कळ निष्णात झाले. (रेनाडचा अबुलफिदा पहा). आरब लोक 'मच्छयंत्राला' 'कुत्वनमा' असें म्हणतात. 'कुत्व' म्हणजे उत्तरध्रुव. हा शब्द अरब्बी आहे. व 'नमा' ह्मणजे दर्शक, हा फारशी आहे. तेव्हां आरब लोक इराण जिंकून ब्राम्हण जोतिषापाशीं पढूं लागत तोंपर्यंत, त्यांस होकायंत्राची माहिती नव्हती, हें उघड आहे. शिवाय मसुदी (९१९) याच्या नौकानयनाच्या इतिहासावरून, त्याच्या वेळच्या आरब लोकांस होकायंयत्राची माहिती नव्हती, असें दिसतें. अग्याथरसाइडनें [इ० स० पूर्वी २०० वर्षें] असें लिहून ठेविलें आहे कीं, साबियन अथवा येमेन किनाऱ्यावरील आरब लोकांच्या नावा चामड्याच्या होत्या. यावरून आरब लोक प्रथम खोल समुद्रावर दर्यावर्दीपणा करणारे नव्हते, हें लासन व डन्कर यांचें ह्मणणें प्रशस्त दिसतें. पण तेराव्या शतकाच्या प्रारंभीं भूमध्यसमुद्रांत जलपर्यटन करणारा एक

इकडील नाखवा (नौकाध्यक्ष), पाण्याच्या भांड्यांत, आडव्या ठेविलेल्या लांकडांच्या पट्टीवर, तरत्या राहणाऱ्या, उत्तर ध्रुवोन्मुखी, मच्छाकार लोहशलाकेच्या योगानें, गलबत चालवीत असे. व याच्या पुष्कळ पूर्वी, हिंदुमहासागरावरील दर्यावर्दी असल्या मच्छयंत्रांचा उपयोग करीत असत, असे लेख आहेत. एवढेंच नाहीं तर, रेनाडच्या अबूलफिदा ग्रंथांवरून, मच्छयंत्राची युक्ति नवीन नाहीं, असें दिसत असून, इ० स० १२१८ तील एका ग्रंथकारानें, ही युक्ति हिंदुस्थानांतून पश्चिमेकडे गेली, असें स्पष्ट लिहून ठेविलें आहे. व ऐन्साक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या नौबंधनावरील निबंधावरून, इतालींतील होक्याची युक्ति चौदाव्या शतकांत निघाली, व तिचा युरोपभर प्रसार, पंधराव्या शतकांत, व्हेनिस व मिसर यांचा निकट संबंध जुळल्यावर झाला. तसेंच, चायनिज लोकांना लोहचुंबकाची माहिती होती असें ह्मणतात. पण त्यांचा त्यांनीं सुद्धां चौदाव्या शतकापर्यंत होक्याच्या कामीं उपयोग केला होता, असें आरबी वगैरे कोणत्याही ग्रंथावरून दिसत नाहीं. यावरून मच्छयंत्राची युक्ति अनादिकाळीं आपल्या हिंदुलोकांनीं काढून, पूर्वोक्त जलस्थलमार्गांनीं हिंदुमहासागराच्या सर्व किनाऱ्यांवर पूर्वोक्त व्यापार, वसाहती, व प्रवास केले, हें निर्विवाद आहे."

आमच्या **आर्य** लोकांनीं केवळ **आशिया, यूरोप,** आणि **आफ्रिका,** अशीं तीनच खंडें पालथीं घातलीं

अमेरिकाखंडांत आर्यांचा प्रवेश.

असें नाहीं. तर त्यांनीं अगदीं पश्चिमेकडील जें पाताल किंवा अमेरिकाखंड, त्यांतही आपला प्रवेश केला असल्याचें हल्लीं कळून येतें. बेहेरिंगच्या सामुद्रधुनींतूनच ते प्रथमतः अमेरिकेंत गेले, आणि क्रमाक्रमानें पेरू व मेक्सिको वगैरे देशांत ते वसाहती करून राहिले. ही गोष्ट आतां शब्दव्युत्पत्तिशास्त्राच्या योगानें दिवसानुदिवस विशेष रीतीनें सिद्ध होत चालली आहे. कारण, तिकडील भाषांत संस्कृत शब्द पुष्कळ आढळतात. शिवाय, कित्येक शोधकांचें असें देखील ह्मणणें आहे कीं, अमेरिकेंतील इन्दियन् लोकांच्या संस्था आमच्या आर्य लोकांच्या ग्रामसंस्थांशीं[1] अगदीं साम्य पावतात. यावरून हें अमेरिकाखंड प्रथमतः आमच्या आर्यांनींच[2] शोधून

१ राष्ट्रभाषा नांवाचें पुस्तक पहा.

२ ' तद्वत कोलंबसानें अमेरिका शोधून काढल्याचा अभिमान त्याच्या साहाय्यकर्त्यांस होता. परंतु तो मान शब्दव्युत्पत्तिशास्त्रानें कोलंबसास न देतां, भरतखंडांतील प्राचीन आर्यांसच दिला. '

(राष्ट्रभाषा.)

तेव्हां, १ अमेरिका, २ स्थीर महासागरांतील द्वीपसमूह, ३ आशिया, ४ आफ्रिका, आणि ५ यूरोप, या पांची खंडांत संस्कृत भाषा घुसली असल्यामुळें तिची विश्वव्यापकता दिसून येते.

(राष्ट्रभाषा.)

काढिलें असून, कोलंबसाला तत्संबंधीं विनाकारण मान मिळत आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे.

हिंदूंचें साहस कमी होण्याचें कारण.

हें हिंदूंचें अचाट साहस, त्यांची उद्योगदक्षता, व प्रौढ पराक्रम, हीं उत्तरोत्तर वाढतच गेलीं असतीं. परंतु, तार्तरी प्रदेशांतून वायव्य दिशेनें हिंदुस्तानांत मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या वारंवार येऊं लागल्या, आणि त्यांच्या अविचारानें व क्रौर्यानें सर्व देश उध्वस्त झाला. त्यामुळें हिंदु फार त्रस्त होऊन त्यांचीं, विक्रमशीलता, धैर्य, व साहसशक्ति, हीं दिवसानुदिवस पुष्कळच कमी होत गेलीं. परंतु तीं सर्व ईश्वरकृपेनें अजिबात नाहींशीं झालीं नाहींत. आणि म्हणूनच हे गुण, मधून मधून क्वचित् प्रसंगीं उद्भवतात, व त्यांचें चांगलें पोषण होत गेलें तर, ते फार प्रकाशमानही होतात. इतकेंच नाहीं तर, ते आपल्या प्रज्वलित तेजानें सर्व जगासही दिपवून टाकितात.

प्रत्येक गुणाला पोषणाची अशी खरी आणि विशेष अवश्यकता आहेच. आणि गुणग्रहण, व प्रोत्साहन, हेंच त्यांचें वास्तविक पोषण असल्यामुळें, जेव्हां जेव्हां त्यांस यत्किंचितही प्रोत्साहन मिळतें, तेव्हां तेव्हां त्या गुणांचें अद्वितीय तेज सर्वत्र फांकतें. ह्याचें ठळक उदाहरण पाहण्याकरितां फार दूर जावयास नलगे. राजस्थानचा किंवा महाराष्ट्र साम्राज्याचा इतिहास ज्यांनीं

ज्यांनीं ह्मणून वाचला आहे, त्यांस पदोपदीं ह्या गोष्टीची सत्यता भासेल. त्याकाळीं, **पराक्रम** आणि **साहस** हें गुण हिंदूंच्या घरीं केवळ पाणीच भरीत असत, असें ह्मटलें तरी चालेल. कारण, यत्किंचित् स्फूर्तीनें महत्कार्य होई, व लहानशा ठिणगीनें प्रलयाग्नि खवळे.

मुसलमानांच्या आगमनानें **हिंदूंचें** साहस बहुतेक नष्ट झालें. कारण, धर्मसंबंधानें त्यांचा **हिंदूंस** अतिशय उपद्रव होऊं लागला; ते त्यांस बाटवूं लागले; आणि त्यांचे त्यांनीं नानाप्रकारचे व अनन्वित छळ केले. ह्या असह्य त्रासामुळेंच, कालान्तरानें **अटक** नदीची शेंवटची मर्यादा ठरली असावी; व तिच्या पलीकडील देशांत जाणें बहुतकरून निर्भय नाहीं, असें त्या धामधुमीच्या काळांत वाटून, तिच्या पलीकडे कोणत्यांही **हिंदूनें** सहसा जाऊं नये, असें आमच्या नंतरच्या **स्मृतिकारांनीं** धर्मबंधनानें एकदम नियमांत आणिलें असावें.

परंतु, **मुसलमानी** कारकीर्दीपेक्षां, हल्लीं **इंग्रजी** अमलाखालीं, **हिंदूंचें** साहस व **शौर्य** अजिबात नाहींसें होईल कीं काय, अशी आतां दिवसानुदिवस सर्वांस जास्त भीति वाटूं लागली आहे. कारण, आमचें **इंग्रज** सरकार त्यांजवर **लष्करी सोंप** कोणत्याही प्रकारें करीत नसून, त्यांस अवश्य असें लष्करी शिक्षणही देत नाहीं; किंवा स्वतंत्रपणें त्यांस एकाद्या स्वारींत, अथवा लढाई-

तही पाठवीत नाहीं. यामुळें, सेनाधिपतीसारख्या स्वतंत्र कामगारांत जे गुण पाहिजे आहेत, त्यांचा उपयोग करण्यास, किंवा ते विकास पावण्यास बिलकुल संधीच मिळत नाहीं. प्रसंगावधान, धैर्यावलंबन, उत्साह, उद्यमसातत्य, अभिनिवेश, साहस, पराक्रम, आणि सहनशिलता, इत्यादि गुण केवळ अभ्यासानें, आणि वारंवार प्रसंग आल्यामुळेंच विकास पावणारे आहेत. सबब लढाईच्या वेळीं, किंवा आणीबाणीच्या प्रसंगीं, आह्मीं आपल्या अकलेनें बेहद्द काम करावें, एतदर्थ **भारतीयांस** लष्करीशिक्षण देण्याविषयीं, आमच्या **आंग्ल** प्रभूंचा बिलकुल प्रयत्न नाहीं. किंबहुना, अशा प्रकारचें शिक्षण आह्मांस होतां होईल तों बिलकुल मिळूं नये, अशीच त्यांची मनःपूर्वक इच्छा असल्याचें दिसतें. तेव्हां, अशा स्थितींत, आह्मी अगदीं हतवीर्य व नष्टसाहस होऊन **शेंदाड शिपाई** बनूं, यांत नवल तें कोणतें!!

लष्करी पाठशाळांची स्थापना करून, **भरतखंडांतील** लोकांस **इंग्रजांप्रमाणें** लष्करी शिक्षण द्यावें, ह्मणून आम्हीं आपल्या दांतांच्या कण्या केल्या, व अजूनही आमच्या **आंग्ल** प्रभूंची वारंवार पायधरणी करीतच आहोंत. परंतु आमच्या प्रार्थनेकडे ते अद्यापि लक्ष्य पुरवीत नाहींत. यावरून त्यांतलें खरें इंगित सहजीं ध्यानांत येण्यासारिखें आहे.

असो. अटक नदीची सर्वसाधारण " अटक " करून ठेविली होती तरी, त्यामुळें द्वीपांतरीं पर्यटन करण्याला अगदींच प्रत्यवाय झाला होता असें नाहीं. मधून मधून, कोणी ना कोणी तरी, हम्मेश जातच असे. आणि पूर्वीच्या काळीं हल्लींप्रमाणें दळणवळणाचे मार्ग बिलकुल खुले नसतांही, तितक्या अडचणींत देखील देशांतरीं जाण्याचा हिय्या आमचे लोक नेहमीं करीत.

शोकाखातर, ज्ञानार्थ, किंवा व्यापार निमित्य, हिंदूंचें अन्य देशीं जाणें.

श्रावक लोकांचा एक जती थेट कुस्तंतुनिया (इस्तंबूल) पर्यंत जाऊन आला असून, त्यानें आपल्या पर्यटनाचा वृत्तांतही लिहून ठेविला आहे.

इस्तंबुलांत.

सुमारें शंभर वर्षांवर, एक जोगी युरोपखंड पाहण्याच्या हेतूनें फिरत फिरत तिकडे गेला होता. हा बैरागी रजपूत जातीचा असून, त्याचें नांव पुराणपुरी असें होतें. त्यानें हिंदुस्थानांत प्रवास केल्यावर, तो प्रथम आफगाणिस्थानांत गेला, आणि गिझनी शहर व महमदशाहा अबदालीची फौज पाहून, तो हिरातच्या वाटेनें खुरासानांत जाऊन पोंहचला. तिकडून तो कास्पियन् समुद्राच्या कांठानें आस्त्राबादेकडे गेला; आणि तेथें सुमारें अकरा

युरोप व आशियांत.

महिने राहून आस्त्राखानाच्या मार्गानें युरोपांतील रूसदेशांत शिरला, व तेथून तो पुनश्च आशिया खंडांत परतला.

तदनंतर त्यानें इस्पाहान, शिराज, अब्रू, बसरा, मस्कत, इत्यादि शहरें, व खारका आणि बाहरीन नामक बेटें, तार्तरी आणि त्यांतील मुख्य शहरें (समरकंद, बुखारा, व बाल्क, वगैरे) पाहून, तो काश्मीरच्या मार्गानें नेपाळांत गेला. तेथील राजधानीचें ठिकाण कटमंडू पाहून, त्यानें तिबेटांत पर्यटन केलें. पुढें, तिबेट सरकारनें कांहीं राज्य प्रकरणीं पत्र, हिंदुस्थानचा गव्हरनर जनरल हेस्टिंगज्‌ला देण्याकरितां त्याच्याजवळ दिलें, व त्यानें तें त्यास पोहोंचतें केलें.

याप्रमाणें, ह्या हिंदु बैराग्यानें अनेक देश व नाना प्रकारचीं शहरें पाहिलीं असून, तो असें म्हणतो कीं, आस्त्राखान शहर आशियांतील रूसच्या मुलुखांत आहे, व तेथें पुष्कळ हिंदु आहेत. तसेंच बसऱ्यांत ही हिंदूंचीं कित्येक घरें, व गोविंदराय आणि कल्याणराय यांच्या मूर्ती असून, मस्कतेंत देखील पुष्कळ हिंदु राहतात, असें तो सांगतो.

आस्त्राखानांत

" आशिया खंडाच्या मध्यभागांत जितका व्यापार चालतो तितक्यापैकीं चवथा हिस्सा तर एकटे हिंदूंच चालवितात. व्या-

पार धंद्यासाठीं **मूलतान** आणि **लाहोर** येथून शेंकडों हिंदू लोक **आस्त्राखानांत** जाऊन राहिले आहेत, आणि येथें एक **हिंदूचें** देऊळही आहे."

सेंट्पीटर्सबर्ग येथें.

सुमारें बासष्ट वर्षांमागें **रायब्राह्मण** नांवाचा एक शीक गृहस्थ **सेन्टपीटर्सबर्ग** येथें जाऊन राहिला होता. तो प्रथमतः **पंजाबांत जंग** परगण्यांत राहत असे. परंतु **रूस** देशांत गेल्यावर त्यानें **सेन्टपीटर्सबर्ग** येथें एक मोठी पेढी काढून, येवढा व्यापार वाढविला होता कीं, थोडक्या काळांत त्यानें वीस लाख रुपये मिळविले.

मस्कतेंत.

भाट्ये आणि **वाणी** यांचें **मस्कतशीं** दळण वळण आज सुमारें तनिशें वर्षें सुरू असून, तेथें **हिंदूंचीं** दोन देवालयें देखील झालीं आहेत. **मस्कत** येथें **ब्राह्मण**, **वाणी**, व **भाट्ये** मिळून, सुमारें बाराशें **हिंदूंची** वस्ती असून, **आदनांत** एक **हिंदूंचें** देवालय, आणि दोनशे **वाणी** आहेत.

मोझांबिकेंत.

मुंबासा, **जंगबार**, **लामू**, व **मोझांबिक**, या ठिकाणीं **भाट्ये** आणि **वाणी** मिळून एक हजारावर **हिंदूंची** वस्ती आहे. **जावा** बेटांत तर **हिंदु** लोक पूर्वीं इतके जात येत

---

१ करसनदास मुळजीकृत इंग्लंडांतील प्रवास पहा.

जावा बेटांत.

असत कीं, तिकडे व्यापार संबंधीं कांहीं वर्षांपूर्वीं विशेष भीति असल्यामुळें, तेव्हांपासून गुजराथी भाषेंत एक ह्मण देखील पडली आहे.

"जे जाय जावे ते फरीन आवे,
आवे तेना परियांनां परीयांचावे."

जमेकापर्यंत देखोल हिंदु लोक गेलेले आढळतात.

जमेका, व सिंगापूर, येथें.

तसेंच, सिंगापूर येथें, व मलायाच्या कांठावर, शेट जीवराज बाळू आणि शेट गोविंदजी वीरजी, यांचीं गलबतें जात येत असून, त्यांवर पुष्कळ भाट्ये असतात. प्राणजीवन पूर्णानंद ब्रह्मक्षत्रिय हा पोक्त वयाचा असतां, सिंगापूर येथें इ० स० १८५९ त गेला होता.

सुमारें अठ्ठावन वर्षांमागें शाह ताराचंद चिनाई

चीनांत.

हा चीनास गेला असून, त्यानंतर चार वर्षांनीं सवचंद जयराम नांवाचा वाणी, आणि दुसरे कित्येक लोक त्या व अन्य देशांतें जाऊन आले आहेत.

---

१ ह्मणजे जावा बेटांत जातो तो परत येत नाहीं. परंतु जो परत येतो, तो आपल्या नातवंडांस आणि पणतवंडांस सुद्धां खाबयाची बेगमी करून ठेवितो.

२ खालीं लिहिलेल्या जागीं हिंदु लोक जाऊन आले आहेत, व अजूनही जातातः—

(पुढें चालू)

इंग्लंडांत.

इंग्लंडांत गेलेला पहिला एतद्देशीय ह्मटला म्हणजे हणमंतराव होय. हा जातीचा ब्राह्मण असून, त्याला रघुनाथराव पेशवे यांनीं कांहीं राजकीय प्रकरणांत सल्ला, मसलत, व मदत मिळण्यासाठीं, सोबत मणियार नामक पारशी देऊन, इ० स० १७८१ सालीं मुद्दाम विलायतेस पाठविलें होतें. त्यानंतर राममोहनराय, चक्रवर्ती[1], वगैरे अनेक गृहस्थ इंग्लंडास गेले असून, हल्लीं तर तिकडे जाणें ह्मणजे कोणास कांहींच वाटतनासें झालें आहे.

अमेरिकेंत.

प्रसिद्ध पंडिता रमाबाई ह्या तर विलायतेस व अमेरिकेसही जाऊन आल्या आहेत. ह्यांना स्त्रीशिक्षणासाठीं तिकडे जाऊन,

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

गुवादर. मकुला. तारण. केरमान. चोबार. मस्का. बुशेर. आंगोल. मकराण. लोइया. सेना. केपवर्ड. बंदर आवास. बा[illegible]. लामू. मादागास्कर. बसरा. आदन. मुवासा. मोरीस. बुइबी. मस[illegible]. म[illegible]. बारबोर. मुसनो. हुदीदा. जंगबार. श[illegible]म. होर[illegible]ज. पुन[illegible]. पेशा. जावा. मस्कत. जपान. किलवा. [illegible]पूर. मछ[illegible]. काबूल. [illegible]. बुखारा. रा[illegible]. कंद[illegible]र. [illegible]. तेहरान. कि[illegible]. बा[illegible]. मोझाबिक. आस्त्राखान. सोरा. गामरून. सूफाळा. शिराज.

(क. मू. रु. वि. प्रवास.)

1 डाक्टर चक्रवर्ती हे बंगाली असून, त्यांनीं विलायतेस जाऊन वैद्यकीची सनद प्रथमच मिळविली होती.

इतका भगीरथ प्रयत्न आणि आत्मार्पिनि योग केला कीं, त्या कामीं त्यांची जितकी म्हणून तारीफ करावी तितकी थोडीच.

सौभाग्यवती आनंदीबाई जोशी ह्या देखील अमेरिकेस जाऊन आल्या होत्या. त्या तिकडे केवळ विद्यार्जनासाठींच गेल्या असून, वैद्यशास्त्र आणि शस्त्रविद्या, या विषयांत त्यांनीं **फिलाडेलफिया** येथें परीक्षा दिली, व त्यांस एम्. डी. ची पदवी मिळाली.

आर्यशौर्य.

हिंदूंचें शौर्य.

ज्या हिंदूंनीं अखिल भरतखंड पालथें घातलें; ज्यांनीं आपल्या पराक्रमानें अन्य देशांत व फार दूर दूर वसाहती करून, त्या लोकांस सुधारलें; ज्यांनीं आपल्या तरवारीच्या जोरानें हिंदुधर्म सांवरला; ज्यांनीं अचाट पराक्रमानें सर्व हिंदुस्थान दणाणून टाकिलें; ज्यांनीं आपल्या दयितभूमीला, ती इस्लामपंकांत अजी बुडाली असतांही, पुनश्च स्वातंत्र्यसुख दिलें; ज्यांनीं आपल्या विक्रमतेजानें पाश्चात्यांस देखील दिपवून टाकिलें; ते हिंदु लोक किती शूर असतील, याविषयीं कल्पना करण्याचें काम मी वाचकांकडसच सोंपतों.

आतां, जी वस्तुस्थिति आहे, ती जशीच्या तशीच लोकांपुढें ठेवून, हिंदुराष्ट्रानें सन १८५७ सालापर्यंत,

त्याविषयीं परद्वीपीयांचें मत.

आणि निराधार व निष्कारण गर्वोक्ति केल्याचा दोष आपल्या कपाळीं येऊं नये, एतदर्थ ह्या आमच्या गुणाविषयीं परद्वीपीयांचें काय मत आहे, तें थोडक्यांत कळवितों.

शिकंदर बादशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली, तेव्हां त्याच्या बरोबर नामांकित, शूर, विद्वान्, आणि रसिकजन होते. त्यांचें मन कोणाच्याही तर्फेचें, किंवा कोणत्याही प्रकारें दूषित झालेलें नसल्यामुळें, त्यांचा अभिप्राय विशेष विश्वसनीय, व फार विचार करण्यासारखा आहे. हे ग्रीक लोक असें म्हणतात कीं, हिंदु हे पराक्रमशील असून, लढण्याच्या कामांत ते सर्व आशियास्थांमध्यें हरएक प्रकारें वरचढ आहेत.

ग्रीक मत.

अकबरचा मंत्री अबुलफाझील हा मुसलमान असून, तो देखील हिंदूंच्या शौर्याची पूर्ण तारीफ करतो. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुलढवय्ये समरांगणांत कधीं देखील

इस्लाम मत.

---

१ इ० स० पू० ३२७ वर्षें.

२ अरिअन् कृत शिकंदराची स्वारी.

"Their bravery is always spoken of as characteristic; their superiority in war to *other Asiatics* is repeatedly asserted, and appears in more ways than one."

(Elphinstones' History of India, P. P. 475-476).

पराङ्मुख होत नाहींत; व जयश्रीचें चिन्ह जेव्हां संशयात्मक दिसतें, तेव्हां ते घोड्यावरून खालीं उतरून, केवळ पराक्रम प्रीत्यर्थ आपले प्राणही खर्ची घालतात.

इंग्रजांचें मत.

हिंदूंचे शौर्य व पराक्रम, त्यांची स्वदेशप्रीति व राजनिष्ठा, त्यांचें आदरातिथ्य व सरलवृत्ति, याविषयीं करनल् टॉड्, सर जान् माल्कम्, लॉर्ड एल्फिन्स्टन्, लॉर्ड राब-

1 "Their soldiers (the Rajpoots) know not what it is to fly from the field of battle ; but when the success of the combat becomes doubtful, they dismount from their horses and throw away their lives in payment of the debt of valour."

(Vide Tods' Rajasthan. P. 553).

2 "High courage, patriotism, loyalty, honour, haspitality, and simplicity, are qualities which must at once be conceded to them"

(Tods' Rajasthan. P. 552).

3 "But from the moment you enter the district of Behar, the Hindu inhabitants are a race of men generally speaking, not more distinguished by their lofty stature and robust frame than they are for some of the *finest* qualities of the mind. They are *brave generous, humane*, ; * * *

4 "The best specimen of the Hindu character, retaining its peculiarities which divested of many of its defects, is found among the Rajputs and other military classes in Gangetic Hindustan, from among

(पुढें चालू)

टर्स्, बिशेप हीबर, रेवरंड डाक्तर डफ, इत्यादींनीं

(मागील पृष्ठवरून पुढें चालु)

whom so many of our Sepoys are recruited. It is there, we are most likely to gain a clear conception of their *high spirit*, their *enthusiastic courage*, and generous *self-devotion*, so singularly combined with gentleness of manners and softness of heart, together with a boyish playfulness and almost infantine simplicity."

(Elphinstones' India P. 383).

१ हे हिंदुस्थानचे मुख्य सेनाधिपति असून, ते अपरील सन १८९३ सालीं, हा देश सोडून विलायतेस गेले. ते म्हणतातः—

"But the Punjáb still furnishes *hardy* and intrepid soldiers, in whose loyalty I have the *utmost confidence*." * * *

I have every wish to make the full use of the *admirable fighting material* of the *Punjab* ." * *

(Address of Lord Roberts at Lahore, delivered on the 10th of January 1893.)

2 "The Hindus are *brave, courteous, intelligent*, most eager for *knowledge*, and *improvement* ; *sober*, industrious, dutiful to parents, affectionate to their children, uniformly gentle and patient, and more easily affected by kindness and attention to their wants and feelings, than any people I have ever met with."

(S. Johnson).

3 He says " and many consisting of *warlike*

(पुढें चालु)

आपापल्या समजुतीप्रमाणें आमच्या पराक्रमशीलतेची साक्ष दिली आहे. आतां, आह्मीं कोणती बहादुरी केली, आणि कशी तरवार गाजविली, याविषयीं प्रत्यक्ष इतिहासच प्रमाण असल्यामुळें, तत्संबंधीं जास्त उदापोह करण्याची अवश्यकता नाहीं.

सांप्रत स्थिती.

तथापि, इतकें आह्मांला अगदीं कबूल केलें पाहिजे कीं, मुसलमानी अमदानींत कांहीं वर्षें आमचें स्वातंत्र्य बहुतेक नष्ट झाल्यामुळें, सत्य व शौर्य, नीति व धैर्य, साहस व दृढनिश्चय, विद्यार्जनरति व स्वावलंबन, उद्योग व अध्यवसाय; इत्यादि अमूल्य गुणांत, जें आमचें प्रखर तेज पूर्वीं दृष्टिगोचर होत असे, तें हल्लींच्या परतंत्रतेमुळें, तितक्या दीप्तीनें परकीयांस भासमान होत नाहीं. सबब त्याबद्दल आम्हीं फार कष्टी झालें पाहिजे. इतकेंच नाहीं तर, त्याविषयीं आह्मांला जितकें ह्मणून वाईट वाटेल तितकें थोडेंच. यासाठीं, आह्मीं आपला पूर्वींचा गुणोत्कर्ष कायम राखण्याचा

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

tribes, so *gallant* and *brave* as to have again and again repelled the combined hosts of the Moslem conquerors, with a *heroism not unworthy* of the best *sons of Greece*:"

(Vide Wards' India and the Hindus. P. 70)

सतत प्रयत्न केला पाहिजे, व ज्या ज्या गुणांत आमची उणीव दृष्टीस पडेल, ती ती उणीव भरून काढण्याकरितां, आह्मीं मोठ्या धैर्यानें व नेटानें अहोरात्र आणि एकसारखे परिश्रम केले पाहिजेत.

भाग ३८ वा.

आर्यव्यापार व उन्नति.

फार प्राचीनकाळापासून भरतखंड हें दूर दूर देशांशीं व्यापार करीत असल्याविषयीं सर्वांस महशूर व सुप्रसिद्ध आहे. व्यापार-निमित्त भारतीय हे मोठमोठ्या समुद्रांतून आणि महा-सागरांतून जात येत, व फार लांबलांबच्या सफरी करीत. पश्चिमेकडे भूमध्यसमुद्रापर्यंत, दक्षिणेकडे आफ्रिके-

भरतखंडाचा प्राचीनकाळीं चालत असलेला व्यापार.

1 From the earliest days, India has been a trading country. The industrial genius of her inhabitants, even more than her natural wealth and her extensive sea board, distinguished her from other Asiatic lands. In contrast with the Arabian peninsula on the west, with the Malayan peninsula on the east, or with the equally fertile empire of China, India has always maintained an active intercourse with Europe. Philology proves that the precious cargoes of Soloman's marchant-ships came from the ancient coast of Màlàbàr. The briliant midiæval republics of Italy drew no small share of their wealth from their Indian trade.

(Dr. Hunters' Indian Empire P. 555.)

मुद्द आशियांत, यूरोपांत, व आफ्रिकेंत.

च्या टोंकापर्यंत, आणि पूर्वेकडे स्थीर महासागरापर्यंत, त्यांचा एक सारखा व्यापार असे. यूरोपखंडांत ते इराणच्या आखातांतून सीरियांत उतरून, नंतर भूमध्यसमुद्रानें जात; किंवा तांबड्या समुद्रानेंच ते तिकडे पर्यटन करीत. आफ्रिकाखंडांत झांझिबार येथें ते हिंदीमहासागरांतून जात. आणि स्थीर महासागरांत, बंगालचा उपसागर वलांडून मलाया द्वीपकल्पानें संचार करीत. सुमात्रा, जाव्हा, आणि त्याच्याही पलीकडे बाली नामक बेटापर्यंत, व्यापार निमित्त त्यांनीं आपलीं ठिकठिकाणीं ठाणीं बांधलीं होतीं. इतकेंच नाहीं तर, त्यांनीं या प्राच्यतम दिशेकडे सर्वत्र वसाहती करून, आपलें

1 "The early date is almost as decisively proved by the journal of the Chinese pilgrim in the end of fourth century, who found Java entirely peopled by Hindus, and who sailed from the Ganges to Ceylon, from Ceylon to Java, and from Java to China, in ships manned by crews professing the Braminical religion. The Hindu religion in Java was afterwards superseded by that of Buddha; but the Indian Government subsisted till the end of the fourteenth century; when it was subverted by Ma-

(पुढें चालू)

उद्यमसातत्य चालविलें, आणि थेट चीन देशापर्यंत व्यापार केला. हिंदु लोकांचें जावत्कालपर्यंत इकडे वर्चस्व होतें, तावत्कालपर्यंत त्यांचा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालला असून, उदीम व साहस करण्यास देखील त्यांस प्रोत्साहन मिळे. परंतु कालवशात् इसलामशाही जिकडे तिकडे मातली, आणि तिनें आपल्या नेहेमींच्या वर्तनक्रमाप्रमाणें सर्व प्रदेश उध्वस्त केला. ह्या धर्माचें मूलतत्व समशेर बहादरीच असल्यामुळें, त्याचा अचुक परिणाम बेबंदनगरी आणि झोटिंगबादशाही, हीं होत. तेव्हां अर्थात्च शनैः शनैः आमच्या उन्नतीस इसलामच्या सहवासानें उतरतीकळा प्राप्त होऊन, आम्हीं अवनतीप्रत लवकरच पोहोंचलों; आमचा उत्तरोत्तर होत असलेला फैलाव मंदावला; आणि आमचा व्यापार संपुष्टांत आला.

हिंदूंच्या व्यापाराची उतरतीकळा, व त्याचें कारण.

असो. सांप्रतकाळीं जो माल आयात किंवा निर्गत होतो, त्याच मालाची प्राचीनकाळींही ने आण होत

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

homedan proselytes, converted by Arab missionaries in the course of the preceding century. The island of Bali, close to the east of Java, is still inhabited by Hindus."

(Elphinstones' History of India. P. 327.)

निर्गतमाल आणि आयातमाल.

असे. म्हणजे हिरे, माणकें, मोत्यें, व मौल्यवान खडे; सोनें, रुपें, लोखंड, वगैरे धातु; रेशमी कपडे आणि रेशिम; कापूस, कापड, चीट, व बारीक मलमल; नीळ आणि इतर रंग; साखर, वेलची, व गरम मसाला; इत्यादि सर्व प्रकारच्या मालाची निर्गत होई. आणि पितळ, जस्त, व कथील; पोंवळीं, कांच, आणि सुरमा; कांहीं सुगंधी पदार्थ, व दारू; इत्यादि पदार्थ आयात होत.

व्यापाराचें साधन.

देशांतल्या देशांत हा व्यापार गाड्यांवर अथवा जनावरांवर चाले, आणि त्यावेळीं हल्लींप्रमाणें आगगाड्यांचें साधन नसल्याकारणानें, खुष्कीच्या रस्त्यांची चांगली व्यवस्था व विशेष पैरवी ठेवण्यांत येत असे.

हल्लीं भरतखंडांतील व्यापार चार प्रकारें चालतोः—

जलमार्गानें.

१. अन्य देशांशीं, व

२. किनाऱ्यावरून.

खुष्कीनें.

३. देशांतल्या देशांत, आणि

४. सरहद्दीवरून.

1 " * * * From the earliest Hindu times to the decline of the Mogal empire, the great roads were objects of much attention to the Government."
(Elphinstones' History of India P. 329)

द्वीपांतरीं व्यापार करण्यासाठीं, हिंदुस्थानांत थोडींच बंदरें आहेत. १ **कलकत्ता**, २ **मद्रास**, ३ **मुंबई**, आणि ४ **कराची**, हीं मुख्य बंदरें असून, त्यांपैकीं **मुंबई** व **कलकत्ता** हीं विशेष महत्वाचीं होत.

भरतखंडाचा सांप्रचा व्यापार.

भरतखंडाचा व्यापार पृथिवींतील सर्व देशांशीं आहे:—

एशियांत; **चीन**, **जपान**, **प्राचीदिशेकडील द्वीपें**, **सायाम**, **ब्रह्मदेश**, **स्ट्रेट्स् सेटल्मेंट्**, **सिंहलद्वीप**, **इराण**, **अरबस्थान**, **एडन्**, वगैरे ठिकाणीं.

यूरोपांत; **आंग्लदेश**, **फ्रान्स**, **इताली**, **जर्मनी**, **आस्त्रिया**, **बेल्जियम्**, इत्यादि ठिकाणीं.

आफ्रिकेंत; **मिसरदेश** (ईजिप्त), **मरीचि** (मॉरिशिअस्) बेटें, **मादागास्कर**, **मोझांबिक्**, वगैरे ठिकाणीं.

अमेरिकेंत; **संयुक्तसंस्थानें**, व इतर देशांत. आणि **आस्ट्रेलियां**त; **तास्मानिया**, **न्यूझीलंड**, वगैरे ठिकाणीं.

हा एकंदर व्यापार **भरतखंडां**त कसकसा विभागला

त्याचा विभाग.

जातो, याविषयीं तपासाअंतीं असें कळून येतें कीं, **मुंबई** आणि **कलकत्ता** मिळून शेंकडा चाळीस टक्के, **मद्रासे**स शेंकडा सहा टक्के, **कराचीस** शेंकडा दोन टक्के, आणि इतर किरकोळ बंदरीं, शेंकडा आठ टक्के, याप्रमाणें व्यापाराची सरासरीनें घडामोड होतें. इसवी सन १८८४-८५ सालीं तर

मुंबईस शेंकडा ४२ टक्के, कलकत्यास शेंकडा ३९ टक्के, आणि कराचीस शेंकडा तीन टक्के, याप्रमाणें व्यापार चालला; आणि दिवसानुदिवस हा व्यापार वृद्धिंगत होण्याचींच सुचिन्हें दिसत आहेत.

त्यांचे मार्ग.

सरहद्दीकडील व्यापार उत्तर, आणि ईशान्य, व वायव्य, या दिशांनीं चालतो. वायव्य दिशेला सुलेमान पर्वत असून, त्यांत १ बोलन, २ गोमल, आणि खैबर, असे तीन घाट आहेत. बोलन घाटानें सिंध, व कंदहार, आणि खिलात, यांच्या दरम्यान व्यापार चालतो. सिंधचें शिकारपूर नामक शहर प्रसिद्ध व्यापाराचें मथक आहे, आणि येथील व्यापारी थेट मध्यआशियांतील दूरदूरच्या शहरांशीं व्यापार करतात. गोमल घाटांतून डेरा इस्मायेलखान व गिझनी यांच्या दरम्यान व्यापार चालतो. आणि खैबर घाटानें काबूल व पेशावर यांच्या दरम्यान व्यापाराची घडामोड होते.

सरहद्दीवरील.

उत्तरेकडील.

उत्तरेकडील व्यापार हिमालय पर्वतांतील खिंडरस्त्यांनीं चालतो पंजाबची बरीच देवघेव काश्मीर देशांतून लडाख, यारकंड, आणि काशगर, या प्रदेशांशीं होते. ह्या प्रांतांना व्यापारनिमित्त हिंदुस्थानांतील महत्वाच्या पेठा म्हटल्या म्हणजे,

अमृतसर व जालन्धर, या दोन ठिकाणच्या होत. नेपाळ देशाशीं व्यापार कटमंडु शहरावरून तिबेटांतील विशाळ सानपू नदीच्या खिंडीनें चालतो. आणि भूतान व सिकीम या संस्थानांतूनही तिबेट देशाशीं थोडेंबहुत दळणवळण होतें.

ईशान्येकडील.

ईशान्य दिशेकडील व्यापार पर्वतांतील खिंडरस्त्यांनीं होतो, आणि ब्रह्मदेशांतील देवघेव व हालचाल इरावती नदीनें चालते.

आभ्यंतरीय व्यापार.

भरतखंडाच्या देशांतल्या देशांत जो व्यापार चालतो, तो फारच मोठा आणि महत्वाचा आहे; येथील द्वीपांतरीं किंवा अन्यदेशांशीं होत असलेला व्यापार इतका विस्तृत व जंगी नाहीं. तथापि, हिंदूंस व्यापाराची स्वभावतःच तीव्र लालसा असल्यामुळें, ते तन्निमित्त खंडांतरीं जातात, आणि हवेंतसें धाडस करितात.

आर्योन्नति.

हिंदूंच्या उन्नतीचा काल आपण पाहूं गेलों तर, तो

1 "The Hindus possess a natural genius for commerce, as is shown by the daring with which they have penetrated into the heart of central Asia, and to the east coast of Africa."

[Dr. Hunters' Indian Empire. P. 591].

आर्योन्नतीचें प्राचीनत्व.

फारच प्राचीन आहे, असें दिसून येईल. किंबहुना, तो प्राचीनतमच आहे, असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं. खरोखर, आर्य लोकांइतकें सुधारलेलें पुराणराष्ट्र, पृथिवीच्या पाठीवर कोठेंही नाहीं.

इस्लामचा दीन् दीन् शब्द ऐकूं येण्यापूर्वीं, भरतभूमींतील हर हर असा मधुर रव कर्णरंध्रीं दुमदुमत होता. आकाशांतील बाप येसूख्रिस्त ह्याचा तार, तार, असा धावा होण्यापूर्वीं, आमचे भारतीय आर्य भक्तिरसानें थबथबलेले होते. रोमचा जयघोष विस्तृत होण्यापूर्वीं, आर्यसिंहाची भयंकर गर्जना सर्वत्र पसरली होती. ग्रीसनें आपल्या यशोदुंदुभीचें ताडन करण्यापूर्वींच, आर्यशास्त्रकलांचा प्रचुर परिमल अखिल भूतलावर सुटला होता. इराणची संपत्ति आणि शौर्य आविर्भूत होण्यापूर्वीं, भरतखंडांतील कनकमयदीप्ति व पराक्रम भासमान होऊं लागला होता. चिनी लोकांनीं हरएक गोष्टींत आपली नैसर्गिक युक्ति लढविण्यापूर्वींच, हिंदूंनीं आपल्या अ-

1—"India older than Greece or Rome India that was old before Egypt was born—India that was ancient before Chaldea was dreamed of—India that went back thousands of centuries before Persia had come to the front."

(Mrs. Besant on India and its mission)

चाट कल्पना चालविल्या होत्या. **मिसर** देशांतील अतिविशाळ मनोरे तयार होण्यापूर्वी, **आर्योन्नतीच्या** दिग्विजयध्वजा चोहोंकडे फडकत होत्या. **निनिव्ही** आणि **बाबिलोन** यांनीं आपापलीं सुरम्य नगरें वसविण्यापूर्वी, **आर्यांची** सामाजिक रचना पूर्णतेस आली होती. आणि **चाल्डिया** उदयास येण्यापूर्वी देखील, **भरतखंड** हें शिष्टाचारसंपन्न होतें. फार तर काय, पण, ज्यावेळीं **आर्यराष्ट्राचा** जन्म झाला, त्यावेळीं इतर राष्ट्रांचा तर ठिकाणही नव्हता; आणि ज्याकाळीं **आर्योन्नतिसूर्य** प्रकाशमान होऊं लागला, त्यावेळीं बाकीचीं राष्ट्रें अगदीं निद्रावस्थेंतच होतीं.

प्राचीन आणि अर्वाचीन सुधारणा, व त्या दोहोंतील अंतर.

आतां, ह्या प्राचीन **आर्योन्नतीच्या** मानानें हल्लींच्या एकोणीसाव्या शतकांतील **पाश्चात्य**-सुधारणा विशेष पुढें सरसावल्या सारखी दिसते खरी. परंतु ह्या दोहोंच्या कालांतील महदंतर मनांत आणिलें ह्मणजे, हल्लींच्या सुधारणेचें विशेष महत्व किंवा कौतुक वाटत नाहीं. कारण, **आर्योन्नतीचा** काल आठ दहा हजार वर्षां-

---

1 "She [India] was the earliest of the Aryan peoples, the first born of the mightest races."

(Mrs. Besant on India and its mission.)

2 Vide B. G. Tilaks' Orion.

च्याही पलीकडे असून, त्यावेळीं हिंदूस कोणाचें देखील साहाय्य नसतां, त्यांनीं केवळ आपल्या बुद्धिसामर्थ्यानेंच सर्व शास्त्र व कला उदयास आणिल्या. सांप्रतच्या पाश्चात्य-सुधारणेचा तसा प्रकार बिल्कुल नाहीं. ह्या सुधारणेंत पांच सात हजार वर्षांच्या अनुभवाची भर पडली असून, सदरहू मुदतींत या भूतलावर जितके म्हणून अद्वितीय पुरुष होऊन गेले, त्यांच्या अलौकिक कुशाग्र बुद्धीनें एका मागून एक असें सर्वच कांहीं प्रकाशमान झालें. हरएक विषयांत नानाप्रकारचे शोध लागले. पुष्कळ नवीन गोष्टी कळून आल्या, कित्येक अजाण व असमंजसपणाच्या समजुती नाहींशा झाल्या. दिवसानुदिवस कल्पना वाढत चालली. ज्ञानोदधि विकासाप्रत पावला. आणि प्रत्येक बाबतींत सुधारणेचें पाऊल पुढेंच पडत गेलें. तेव्हां, अशा प्रत्येक गोष्टीची अनुकूलता असल्याकारणानें जर **प्राचीनआर्योन्नती**पेक्षां सांप्रतची **पाश्चात्य**सुधारणा जास्त विकासाप्रत पावली आहे, तर त्यांत म्हणण्यासारिखें नवल कांहींच दिसत नाहीं. कारण, सर्वसाधारण नियम असा आहे कीं, साहाय्यकृत बुद्धिपराक्रमापेक्षां, असाहाय्यकृत कल्पनातेज निःसंशय प्रशंसेस पात्र होतें. आणि म्हणूनच **आर्योन्नति** होण्याच्या कामीं प्राचीन **आर्य**प्रयत्न विशेष स्तुत्य होत. कोणाचें साहाय्य नसतांही **भारतीय आर्यांनीं**

---

1 "While the Hindu civilization grew up alone

(पुढें चालू)

नानाविधशास्त्रांत शोध केला; हरएक प्रकारच्या कला पूर्णतेस आणिल्या; धर्माची संस्थापना मजबूत पायावर केली; अपूर्व समाजरचनेचा उत्तम पाया घातला; आणि अशा प्रकारची दुसरी अनेक लोकोपयोगीं कामें त्यांनीं मोठ्या नेटानें केलीं; तेव्हां त्यांच्या कल्पनाशक्तीचें व विशालबुद्धीचें जास्त कुतूहल वाटणें अगदींच साहजिक आहे.

भरतखंड हेंच जगदुन्नतीचें आदिस्थान.

देशोन्नतीचा किंवा राष्ट्रोन्नतीचा केव्हांही प्रश्न निघाला तरी, ग्रीसकडे बोट दाखविण्याची बहुतेक पाश्चात्यांची सर्वसाधारणच चाल आहे. परंतु ह्या भूतलावरील प्रत्येक राष्ट्राचा साद्यंत इतिहास निःपक्षपातानें व निरभिमानानें कोणीही पाहिला, तर त्याला उन्नति पराकाष्ठेच्या संबंधानें आमच्या भरतभूमीकडेसच प्रथम आंगळी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. एक प्रसिद्ध फ्रेंच पंडित क्रूझर असें ह्मणतो कीं, हिं-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

and thus acquired an *original* and peculiar character, that continues to spread an interest over the higher stages of refinement to which its *unaided* efforts afterwards enabled it to attain."

(Elphinstones' History of India. Vol. I. P. 95)

1 "If there is a country on earth, which can justly claim the honour of having been the cradle

(पुढें चालू)

दुस्थान हें अखिल मानवीजातीची मूळ जन्मभूमि होय. निदान, अखिल मानवी जातीची आद्योन्नति तरी येथेंच उदयास आली, व ती येथेंच विकासाप्रत पावली. येथूनच ती जगांतील इतर भागांत, म्हणजे प्राचीन आणि अर्वाचीन खंडांत पसरली. व मनुष्याचें जीवन जें ज्ञान त्याचा देखील फैलाव येथूनच होऊन, तें सर्वत्र प्रकट झालें.

भारतीयांची ऐहिक व पारमार्थिक उन्नति.

आतां, उन्नतीचे प्रकार दोन आहेत. एक ऐहिक-उन्नति, आणि दुसरी पारमार्थिक-उन्नति. बहुतेकांचा भर म्हटला म्हणजे ऐहिक उन्नतीकडेसच असतो. त्याप्रमाणें प्राचीनकाळींही भरतखंडाशिवाय जेवढीं जेवढीं म्हणून सुधारलेलीं राष्ट्रें होऊन गेलीं, त्या सर्वांचा भर ह्या प्रापंचिक उन्नतींतच होता. परंतु हिंदूचें तसें नव्हतें. ते केवळ ललितकलांतच पारंगत होते असें नाहीं, तर आमुष्मिक सुखान्वेषणांत

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

of the human race, or at least the scene of a primitive civilization, the successive developments of which carried into all parts of the ancient world—and even beyond, the blessings of knowledge, which is the second life of man, that country assuredly is India."

1 "The early excellence of the Bráhmans in all these branches of learning."

(Elphinstone's History of India P. 92.)

देखील त्यांचा हातखंडाच. ज्याप्रमाणें ते ऐहिकसुखांच्या उच्चकोटीप्रत पोहोंचले होते, त्याचप्रमाणें, किंबहुना त्याही-पेक्षां कांकणभर जास्त, ते पारमार्थिकसुखाच्या अगदीं परोकाष्ठेच्या अवस्थेप्रत पावले होते. आणि हा स्वात्म-सुखाचा अनुभव इतर कोणांसही, कधीं देखील नसल्या-कारणानें, या शाखेंत त्यांचा हात धरणारें या भूतलावर एक सुद्धां राष्ट्र नाहीं.

पराक्रम व साहस, सरलता व सत्यशीलता, दान-शौर्य व परदुःखैपरायणता, इत्यादि गुणांत देखील ते

---

1 * * "The eastern nation seems clearly to have been in the more advance stage of Society. Their internal institutions were less rude ; their conduct to their enemies more humane ; their general learning was much more considerable (than the Greeks)."

(Elphinstones' History of India P. 94.)

2 "And, in the knowledge of the being and nature of God, they (the Hindus) were already in possession of a light which was but faintly perceived even by the loftiest intellects in the best days of Athens."

(Elphinstones' History of India P. 94/95.)

३ श्रद्धयेष्टंच पूर्तंच नित्यं कुर्यादतन्द्रितः ।
श्रद्धाकृते ह्यक्षयेते भवतः स्वागतैर्धनैः ॥ २२६ ॥

म. स्मृ. अ. ४

(पुढें चालू)

श्रेष्ठत्व असल्याकारणानें, ते विदेशीयांस अगदीं दिपवून टाकीत. आणि पूर्वींप्रमाणेंच सांप्रतकाळींही लोकहितार्थ, आणि सार्जवनिक सोईसाठीं, ते अत्युत्कंठेनें आत्मविनियोग व जोवितसमर्पण करून, परदुःखापहरणाची हरएक प्रकारें तजवीज लावितात. तृषाक्रांतांना पाणी मिळण्यासाठीं, ते ठिकठिकाणीं विहिरी व तलाव खणतात. जागोजागीं पाणपोयाही ठेवितात. सूर्याच्या तापापासून निवारण व्हावें एतदर्थ मार्गावर वृक्ष लावितात. विश्रांतीसाठीं धर्मशाळा बांधतात. आणि क्षुधेनें व्याकुळ झालेल्यास अन्न मिळावें म्हणून अन्नछत्रेंही घालतात.

स्वच्छता, नीति, आणि ‡सदाचार, यांतही त्यांची

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

पूर्तम् याचा अर्थ साधारणतः औदार्य व दानशीलता आणि परदुःखहरण असा होतो; आणि त्याची व्याख्या खालीं लिहिल्याप्रमाणें दिली आहे.

वापीकूपतडागादि देवतायतनानिच ।
अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते ॥ (म. स्मृ.).

1 " We find, also from their extant works, that the Hindus once excelled in departments of taste and science on which they never now attempt to write; and that they formerly impressed strangers with a high respect for their courage, veracity, simplicity, and integrity, '

[Elphinstones' History of India P. 391.]

2 "The cleanliness of the Hindus in their persons is proverbial."

[Elphinstones' India P. 390.]

(‡ ही टीप पुढील पानावर पहा.)

प्राचीन काळापासूनच ख्याति आहे, आणि व्यावहारिक विषयांत, तसेंच तिरंदाजींत, व घोड्यांवर बसण्यांत, ते मोठे पटाईत आहेत.

त्याची सांप्रत स्थिति.

असो. ह्या एकंदर सर्व हकीकतीवरून इतकें मात्र निर्विवादपणें अगदीं सिद्ध आहे कीं, हिंदुराष्ट्र हें निदान प्राचीनकाळीं तरी फारच उच्चश्रेणीतलें होतें. आणि कालच-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

‡ "High respect for their [Hindus'] courage veracity, simplicity, and integrity," was shown by foreigners.

[Elphinston's India P. 391].

1 "The military men * * * are active and excellent horsemen. The Marathas in particular are celebrated for their management of the horse and lance." * * * "The Hindus are also good shots with a matchlock from a horse."

(Elphinstone's India P. P. 353/354)

2 " It is impossible, from all this, not to come to a conclusion that the Hindus were once in a higher condition, both moral and intellectual, than they are now, and as, even in their present state of depression they are still on a footing of equality with any people out of Europe, it seems to follow that, at one time, they must have attained a state of civilization only surpassed by a few of the most favoured of the nations, either of antiquity or of modern times."

(Elphinstone's History of India P. P. 391/392.)

क्राच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें, सांप्रतकाळीं जरी तें अवनीप्रत पोहोंचलें आहे, तरी अशा स्थितींतही त्यांची बुद्धिमत्ता, व पराक्रमसामर्थ्य, हीं कांहीं विलक्षण आहेत, असें पाश्चात्यांस देखील कबूल केल्यावांचून राहवत नाहीं.

शुद्धिपत्रक.

——:o:——

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१	१०	मध्यायनं	मध्ययनं
१३	१७	Tentonic	Teutonic
२२	१७	कल्या	केल्या
२५	१४	आचारण	आचरण
२६	१४	(Mahomets)	(Mahomet's)
३६	२१	—	अशीं
३७	५	तव्हां	तेव्हां
,,	६	लॉड	लॉर्ड
४१	९	ते	तें
४५	२	मजबत	मजबूत
,,	४	आमच	आमचें
४६	४	मूळपासूनच	मुळापासूनच
४७	११	उपनिषदें,	उपनिषदें
४९	११	हास	हौस
५०	१०	शद्राला	शूद्राला
५३	२०	fo	of
५५	४	स्री-	स्त्री-
५९	७	अतिशयाक्तीचे	अतिशयोक्तीचे
६४	२१	आज्ञात	अज्ञात
६७	१६	Decconee	Deccanee
७२	२१	अदियमाना	अदीयमाना
,,	,,	यधि	यदि

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
७२	२२	नचयं	नचयं
७४	११	ablaquy	obloquy
७५	९	झालं	झालें
,,	१४	अयुष्यक्रम	आयष्यक्रम
,,	१९	इच्छ	इच्छे
७८	१३	लाहित	लोहित
८१	१२	काय,	काय !
८७	२७	diffusiou	diffusion
८९	८	पोरस्त्य	पौरस्त्य
९०	१	निःसीम, असून,	निःसीम अ गून,
,,	१८	Rákshasha	Ràkshasa
९१	१२	असे, गुण	असे गुण,
९७	२	स्त्रियांचे	स्त्रियांचें
१०६	१४	Abdallak	Abdallah
,,	१६	sound	sand
११३	१५	some	same
११५	१४	चिलकुल[१]	चिलकुले[२]
,,	२१	word	ward
,,	२४	(W. I. L.)	(W. I. T.)
११९	१३	teast	least
,,	१५	prevolent	prevalent
,,	२०	controry	contrary
१२२	५	एलफिन्सूनचें	एलफिन्स्टनचें[२]
१२८	८	measueres	measures
,,	१०	week	weak
१३१	५	त्याचे	त्यांचे

पृष्ट.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१३१	११	आपला	आपलाच
१३३	२२	Anna	Anne
१३५	२	तिनं	तिनें
१४२	२१	brake	broke
१४४	८	झाला.	केला.
१५०	४	प्रकार	प्रकारें
१५४	२	कुंट्टिनी	कुंट्टिणी
१६५	५	Phillippines	Phillippines.
१६९	१६	estbling	establishing
१९४	१२	ह्यांना	ह्यांनीं
२०६	१९	चालतो	चालतो.
२१०	१०	आल्या,	आल्या.
२१३	११	advance	advanced
२१५	५	त्याची	त्यांची
२१६	४	अस	असें